UNIVERSAL
LIBRARY
OU_196150
UNIVERSAL
LIBRARY

॥ ॐ ॥

श्रीमत्स्वामी हंसस्वरूप योगिराज महात्मे

यांचीं

सनातन वैदिकधर्मावरील

# दहा व्याख्यानें.

आवृत्ति तिसरी.

प्रकाशक,

दामोदर सांवळाराम आणि मंडळी.

या व्याख्यानांचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत.

मुंबई,-'इंदुप्रकाश' स्टीम प्रेस.

सन १९०७.

किंमत बारा आणे.

# अनुक्रमणिका.


| व्याख्यानें. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| | प्रस्तावना .... .... .... .... | १ |
| | श्रीस्वामींचें चरित्र .... .... .... | ४ |
| १. | सनातन धर्माची महती.... .... .... | १ |
| २. | ब्रह्मविद्येशीं संध्येचा संबंध .... .... | १२ |
| ३. | अहिंसा .... .... .... .... | २७ |
| ४. | संध्येच्या द्वारा आयुष्याची वृद्धि .... .... | ४० |
| ५. | संध्येच्या द्वारा सुख व मोक्ष यांची प्राप्ति .... | ५९ |
| ६. | पुनर्जन्म .... .... .... .... | ७४ |
| ७. | संध्येच्या द्वारा आरोग्याची वृद्धि .... .... | ८९ |
| ८. | प्रतिमापूजन .... .... .... | १०४ |
| ९. | श्राद्ध .... .... .... .... | ११९ |
| १०. | रामनामाचा महिमा व अवतार .... .... | १३५ |

# प्रस्तावना.

प्रसिद्ध महात्मे श्रीमत्स्वामी हंसस्वरूप योगीराज यांनीं हिंदुस्थानांत फिरून मोठमोठ्या शहरीं सनातन धर्माविषयीं जीं व्याख्यानें दिलीं तीं ज्यांनीं प्रत्यक्ष ऐकलीं असतील त्यांस तीं किती रसभरित होतीं हें सांगण्याची मुळींच जरूर नाहीं; स्वामींचीं व्याख्यानें लोकांस फार आवडल्यावरून तीं लिहून काढलीं असतां फार उपयोग होईल, असे उद्गार निघाल्यावरून व तीं स्वामींनीं स्वतः तपासून देण्याचें कबूल केल्यावरून कै. वे. शा. सं. भास्कर राजाराम शास्त्री यांनी स्वामींच्या देखरेखीखालीं तीं लिहून तयार केलीं.

हीं व्याख्यानें मूळ हिंदुस्थानी भाषेंत झालीं होतीं हिंदुस्थानी भाषा स्वभावतः गोड व त्यांत स्वामींची सरळ व सुबोध अशी विषयप्रतिपादन करण्याची शैली, अलौकिक वक्तृत्वशक्ति व अस्खलित वाग्धारा यांच्या योगानें तीस अद्वितीय मोहकपणा आला होता. एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत मजकूर नेताना मूळचा रस वठविण्याचें काम फार बिकट आहे. तशांत बोलण्याची गोष्ट निराळी व लिहिण्याची गोष्ट निराळी; बोलण्यांत वाटेल तो मजकूर वाटेल त्या स्थळीं सहज जुळवून घेतां येतो व प्रसंगास अनुसरून हावभाव इत्यादिकांच्या साह्यानें रसाविर्भाव चांगला होऊं शकतो. तशी मदत लेखांत मिळत नाहीं. यामुळें त्या व्याख्यानांतील सर्व रस यांत येणें कठीण, तथापि स्वामींचे बहुतेक मुद्दे व त्यांतील स्वारस्य न जाऊं देण्याविषयीं आम्हीं होईल तितका प्रयत्न केला आहे, व लोकांस संशय पडण्यासारख्या स्थळीं स्पष्टतेसाठीं व कांहीं स्थळीं ज्यास्त स्पष्टतेसाठीं टिपा दिल्या आहेत; त्यांच्या योगानें मूळ विषय समजण्यास चांगली मदत होईल. हा आमचा प्रयत्न कितपत सफल झाला आहे, हें पाहाण्याचें काम वाचकाचें आहे.

यांतील पहिल्या व्याख्यानांत सनातन धर्माविषयीं स्फुट माहिती आहे. २-४-५-७ या व्याख्यानांत प्राणायामाचें महत्त्व निरनिराळ्या

प्रकारांनीं स्पष्ट केलें आहे व बाकीच्या व्याख्यानांत अहिंसा, पुनर्जन्म, इत्यादि निरनिराळे स्वतंत्र विषय आहेत. दहाही व्याख्यानें मिळून शास्त्रीय व सयुक्तिक अशी नव्या तऱ्हेची पुष्कळ माहिती आलेली आहे. बऱ्याच व्याख्यानांत स्वामींचा प्राणायामावर विशेष कटाक्ष असल्याचें दिसून येईल; त्याचें कारण शरीर निरोगी राहून आयुष्यवृद्धि होण्यास प्राणायामासारखें रामबाण औषध नाही असें त्याचें मत आहे. चित्तवृत्तींच्या निरोधाशीं योगाचा मुख्य मतलब आहे, असें असून व्याख्यान २ वगैरे मध्यें प्राणाचें विशेष महत्त्व दाखवून त्याचा निरोध करण्यास सांगितलें, हे कसें ? अशी कोणास शंका येईल त्यासाठीं इतकें सांगणें जरूर आहे कीं " चित्ताच्या स्थितीला कारणें दोन आहेत; एक वासना आणि दुसरा प्राण. यांतून एकाचा निरोध झाला असतां दुसराही निरुद्ध होतो; जेथें प्राणाची प्रवृत्ति होते तेथें चित्ताचीही प्रवृत्ति होते आणि जेथें चित्ताची प्रवृत्ति होते तेथें प्राणाचीही होते; तसेंच, ज्या स्थानीं प्राण लय पावतो, तेथें चित्तही लीन होतें व जेथें चित्त लय पावतें, तेथें प्राणही लीन होतो. ह्मणून एकाच्या निरोधानें दुसऱ्याचा निरोध आपोआप होतो. " असा योगग्रंथांतून खुलासा सांगितला आहे. पहिल्या व्याख्यानांत ‘ पुराणें अठराच कां ? एकोणीस अगर सतरा कां नाहींत?’ याजबद्दल व तिसऱ्या व्याख्यानांत ‘ यज्ञांत पशूची हिंसा करितात ती हिंसा होते किंवा नाहीं, ’ याजबद्दल निराळ्या प्रसंगीं विवेचन करण्याचें अभिवचन स्वामींनीं त्या त्या व्याख्यानांत दिलेलें आहे; परंतु त्याचा खुलासा पुढें कोणत्याही व्याख्यानांत आलेला नाहीं; त्याविषयीं ‘ पुराणें अठराच असलीं पाहिजेत ’ व ‘ वैदकी हिंसा ह्मणजे यज्ञांतील पशुहिंसा ही हिंसा होऊं शकत नाहीं,’ असे स्वामींचे सिद्धांत आहेत; परंतु त्यांजबद्दलची सविस्तर उपपत्ति, त्यांच्या मुखांतून ऐकावयास मिळाली असती, तर बरें झालें असतें; परंतु तसें झालें नाहीं व आह्मांसही ती विचारून घेण्यास सवड मिळाली नाहीं, याजबद्दल दिलगिरी वाटते.

स्वामीं हे केवळ बोलके नसून त्यांस अनुभवसिद्ध अशी योगमार्गाची माहिती आहे व त्याप्रमाणें त्यांची योगक्रिया नेहमीं चालू आहे,

यामुळेच त्यांच्या व्याख्यानांचा इतक्या लोकांच्या मनावर चांगला ठसा वठला होता. सध्यांच्या काळीं अशा मनुष्यांची आह्मांस फारच जरूर आहे. व्याख्यानमाला आटोपल्यावर त्यांनीं त्याच्या मुक्कामावर शेकडो जिज्ञासु लोकांस आसनप्राणायामादि क्रिया करून दाखविल्या व गुरुपरंपरागत कांहीं विशेष माहिती सांगितली. शिवाय, योगक्रियेच्या गोष्टी केवळ पुस्तकांतून वाचलेल्या कांहीं कामाच्या नाहींत; अथवा तशा गोष्टी करण्याचा नुसता आव घातल्यानेंही कांहीं हातीं लागणार नाहीं; त्या प्रत्यक्ष हातूनच घडल्या पाहिजेत, असा कळकळीचा उपदेश केला. हा त्यांचा उपदेश योगक्रियेखेरीज इतर कोणत्याही बाबतींत देखील सारखाच लागू पडण्यासारखा आहे, हें कोणीही कबूल करील. स्वामींनीं सनातन धर्माची शास्त्रीय माहिती देण्यासाठीं व प्राणायामादि योगक्रिया प्रत्यक्ष शिकविण्यासाठीं ब्यांकीपुर येथें '**भारतत्रिकुटीमहल**' नामक धर्मसंस्था स्थापन केली असून तिच्या जागोजाग शाखा–प्रतिशाखा स्थापन करण्याविषयीं वगैरे त्यांची इच्छा आहे व त्या कामीं रात्रंदिवस त्याचे परिश्रम चालू आहेत. परमेश्वर कृपेनें या कामीं त्यांस उत्तम यश येईल अशी आह्मास आशा आहे.

ह्या व्याख्यानाची पहिली आवृत्ति सहा महिन्यांतच संपली व लोकांच्या मागण्या सारख्या होऊं लागल्या, तेव्हां थोडा मोठा टाईप वाढून याची दुसरी आवृत्ति छापून प्रसिद्ध केली. तीही थोड्याच अवकाशांत संपून गेली व लोकांच्या मागण्या अद्याप सारख्या होत आहेत ह्मणून ही तिसरी आवृत्ति मराठी वाचकांच्या सेवेस सादर करीत आहोंत. ह्या आवृत्तीसही लोकांकडून योग्य आश्रय मिळेल, अशी आशा आहे.

प्रकाशक.

# श्रीमत् हंसस्वरूप स्वामी योगिराज यांचें संक्षिप्त चरित्र.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभती ॥ देह कष्टवीती उपकारें ॥

तुकाराम.

आपल्या आजूबाजूस जरा दृष्टि फेंकिली असतां, जो तो मनुष्य स्वार्थाविषयीं तत्पर असा दिसून येईल; परोपकारासाठीं झटणारे थोडे. तशांत ज्यांना स्वार्थाची बिलकूल पर्वा नसून ज्यांनीं आपलें तनमनधन केवळ लोकांच्या कल्याणासाठींच वाहिलें आहे असे लोक फारच विरळा असून ते जगास परमवंद्य वाटतात. अशांपैकींच स्वामी हंसस्वरूप हे असल्यामुळें त्यांचें अल्प चरित्र आह्मी वाचकांस सादर करितों.

भरतखंडाच्या उत्तरेस बंगाल इलाख्यांत, जनकपुराजवळ रिगा नावाचें एक गांव आहे, त्या गांवीं बलदेव नारायण शर्म्मा या नांवाचे गौडब्राह्मणजातीचे गृहस्थ तालुकदार होते; त्यांच्या भार्येचें नांव रामदेनी देवी असें होतें. या तालुक्यांत हें कुटुंब खाऊन पिऊन चांगलें सुखी होतें व जमीनजुमला, घरदार, गुरेंढोरें वगैरे गृहस्थाश्रमास योग्य अशा प्रकारची संपत्ति त्यांच्याजवळ वास करीत होती. रामदेनी देवी स्वभावानें फार शांत असून पतिसेवा व ईशभक्ति यांत त्या नेहमीं निमग्न असत. याच महासाध्वी श्री. हंसस्वरूप स्वामींच्या जननी होत. रामदेनी देवी ह्या सुपुत्रास जन्म दिल्यानंतर लवकरच इहलोक सोडून गेल्या; व त्यानंतर थोड्या दिवसांनीं स्वामींचे जनक बलदेव शर्म्मा हेही स्वर्गवासी झाले. अशा प्रकारे बाल्यावस्थेंतच जनकजननी निवर्तल्यामुळें स्वामींचें पालनपोषण नजीकच्या आप्तमंडळीस करावें लागलें. त्यांनीं स्वामींच्या वडिलांच्या द्रव्याचा सदुपयोग करून स्वामींस उत्तम प्रकारचें शिक्षण देण्याची तजवीज केली. बालपणापासूनच स्वामींस परमार्थविषयाची आवड असे; ती वाढतां वाढतां पुढें इतकी वाढली कीं, चांगलें समजूं लागतांच ह्मणजे वयाच्या सुमारे सतरा अठराव्या वर्षीं त्यांस पूर्ण उपरति

प्राप्त झाली; व घरादारादि संपत्तीचा व आप्तेष्टांचा त्याग करून ब्रह्मविद्येच्या प्राप्तीस्तव सिद्ध पुरुषांचा शोध करीत अरण्य, पर्वत, गुहा यांतून फिरूं लागले. त्यांच्या आप्तमंडळींनीं त्यांस, तीन चार वेळ घरीं आणिलें व गृहस्थाश्रम स्वीकारण्याविषयीं व संपत्तीचा उपभोग घेण्याविषयीं त्यास अनेक प्रकारें उपदेश केला, परतु त्याचा उपयोग कांहीं झाला नाहीं. ब्रह्मज्ञानाचा अंमल स्वामींवर पूर्ण बसला होता, व त्याची प्राप्ति करून घेण्याकरितां सिद्ध पुरुषाच्या शोधाचें काम त्यांचें एकसारखें चालू होतें. प्रयत्ना अंतीं अत्यंत दुर्मिळ वस्तुहि प्राप्त होते, या सिद्धांताप्रमाणें मुक्तिनाथास स्वामी गेले असतां तेथ **श्रीमत्परमहंस महाराजा इंद्रस्वरूप** याची गांठ पडली. तेथेंच यांचा पूर्वाश्रम पूर्ण झाला. त्यांजवळ राहून स्वामींनीं ब्रह्मविद्या व योग यांचें पूर्ण ज्ञान संपादन केलें. अशा प्रकारें इच्छित वस्तूची प्राप्ति झाल्यानंतर स्वामींस परमाल्हाद झाला. पुढें सन १८८७ सालीं ते नेपाळास गेले. तेथें बाबा इंद्रदास चैतन्यदास, स्वामी भूतानंद बाबा मनसाराम, बाबा बाळखंडी, व गोरक्षाचे कित्येक शिष्य यांचा परिचय झाला. आणि त्या सर्वांच्या विचारें, सनातन वैदिक धर्माची उन्नति करण्याचा विचार ठरला, व प्रत्येकानें थोडथोडी कामगिरी वांटून घेतली. त्यांत आपले श्रीमत् हंसस्वरूप स्वामी यांजवर या देशांत धर्मप्रसार करण्याची कामगिरी आली.

अशा प्रकारें धर्मप्रसाराची अत्यंत महत्वाची कामगिरी पत्करून महाराज प्रवासास निघाले ते १८८७ च्या एप्रिल महिन्यांत मैथिल प्रांतांतील '**कमतौल**' नामक शहरीं येऊन दाखल झाले, व त्यांनीं त्या ठिकाणीं, 'भारतत्रिकुटीमहल सदर सभा' ( अर्थात् सनातन धर्मोपदेशक मंडळी ) नामक संस्था स्थापन केली. स्वामींनीं आपल्या गोड, अस्खलित व रसपरिप्लुत वक्तृत्वानें लोकांच्या मनावर सनातन धर्माच्या महत्वाचा ठसा इतका सुरेख वठविला कीं, गरीबापासून श्रीमंतापर्यंत त्या नगरांतील सर्व मंडळी आपल्या अनादिसिद्ध वैदिकधर्मी लीन होऊन भारतत्रिकुटीमहलसभेचे सभासद झाले. पहिल्याच मुक्कामावर स्वामींनीं वरप्रमाणें धर्मप्रसाराचें बीजारोपण केल्यावर ते पुढें काशी, प्रयाग, मथुरा, वृंदावन, अयोध्या, कानपूर, लखनौ, आरा, छपरा, पटना वगैरे शहरीं गेले व

प्रत्येक ठिकाणीं स्वामींनीं सनातन धर्मावर व्याख्यानें देऊन सहस्रावधि नास्तिकांस आपल्या सनातन आर्यधर्मी लीन करून सोडिले.

सन १८८८ सालीं स्वामींचें आगमन दरभंग्यास झालें, त्या वेळीं दरभंग्याच्या श्री. महाराजांनीं स्वामींची भेट घेऊन स्वामींचा सर्व हेतु ऐकून घेतला; आणि महत्कृत्याची शाखा आपल्या राज्यांत स्थापन करण्याकरितां 'कमतौल' येथील वाडा दिला. या ठिकाणीं स्वामींनीं सभेची स्थापना केली; परंतु पुढें लोकांच्या सोईकरतां व इतर व्यवस्थेकरितां हें स्थान बदलून येथील सभा मुजफरपूर येथें नेण्यांत आली, व पुढें कांहीं दिवसांनीं ती जागा बदलून 'बंकीपूर पटणा' येथें नेण्यांत आली व हल्लीं तेथेंच ही संस्था आहे. या सभेचें काम करण्याकरितां योग्य अशी कार्यकारी मंडळी नेमिली असून तिनें आपलें काम फार समाधानकारक चालविल्याचें ऐकिवांत आहे. अशा प्रकारच्या संस्था शहरोशहरीं स्थापून सनातन वैदिक धर्माचा प्रसार करण्याबद्दल स्वामींचे परिश्रम चालू आहेत हें वेगळें सांगणें नकोच. याप्रमाणें स्वामींचें हें अल्प चरित्र आहे व तें आह्मांस जितकी माहिती मिळाली तिच्या आधारानें सादर केलें आहे. स्वामींचें पूर्वाश्रमींचें नाव काय होतें तें समजलें नाहीं. सबब सांप्रत आश्रमाच्या नांवावरच निर्वाह करून स्वामींचें चरित्र लिहिलें आहे.

॥ श्री ॥

श्रीमत्स्वामी हंसस्वरूप महात्मे योगी व प्रसिद्ध वक्ते यांची

# व्याख्यानमाला.

## व्याख्यान १ लें.

### विषय—सनातन धर्माची महती.

ईशस्तवन.

हे नाथ शरणं देहि मां भक्तं शरणागत

सर्वाद्य सर्वनिलय सर्वबीजसनातन ॥

सर्वाधार निराधार साक्षिभूत परात्पर ॥

दुष्पारासारसंसारकर्णधार नमोऽस्तु ते ॥

याप्रमाणें ईशस्तवन केल्यावर ते ह्मणाले,

हे प्रिय सभासदांनो! मी आपणांपुढें ज्या गहन व विस्तीर्ण विषयावर व्याख्यान देणार आहें, त्या विषयांत प्रवेश होण्याकरितां आजरोजीं मी फक्त प्रस्तावनेदाखल धर्मसंबंधीं स्फुट प्रकरणें घेऊन त्यांजविषयीं संक्षिप्त रीतीनें विवेचन करितों.

या समाजरूपी वृक्षवाटिकेच्या ठायीं सभाजनरूपी भिन्न भिन्न सुगंधी पुष्पलतांवर विहार करणाऱ्या सुखरूपी पक्ष्यांचे मंजुळ शब्द ऐकून मनोरूप माळी प्रेमाश्रूंनीं सिंचन करीत आहे असें पाहून, मीही हरिनामरूपी जलाचें सिंचन करून त्या वृक्षवाटिकेस ज्यास्त प्रफुल्लित करण्याचा यत्न करीत आहें.

प्राचीनकाळीं या आर्यावर्तांत सनातन धर्म संपूर्ण रीतीनें जागृत होता. संपूर्ण लोक मोठे धर्मिष्ठ व नैष्ठिक अशा तऱ्हेचे होते. अधर्मास प्रवेश करण्यास यत्किंचितही अवकाश नसे. त्या वेळेस युधिष्ठिर, नल, मांधाता, दिलीप इत्यादि नरवरशिरोमणि राजे प्रजापालनीं तत्पर असत. वशिष्ठवामदेवादि महर्षिही धर्माची जागरूकता ठेवण्यांत व त्याची वृद्धि करण्यांत अहर्निश तत्पर असत. सारांश, ज्याप्रमाणें एकाद्या किल्ल्यांत एकादा प्रासाद असून त्यास उत्तम तऱ्हेची तटबंदी असावी त्याप्रमाणें सनातन धर्मरूपी प्रासाद, वरील धर्मनिष्ठ राजे व महर्षि इत्यादिकांच्या योगानें सुरक्षित होता. परंतु त्या स्थितीचा लय होऊन कालांतरानें क्षय होतां होतां विद्यमान काळीं एकाद्या पडक्या इमारतीप्रमाणें त्या प्रासादाची दुर्दशा झाली आहे. जुन्या कांहीं पडक्या सडक्या भिंती राहिल्या आहेत. त्या पडक्या भिंती कोणत्या ह्मणाल तर आमचे पवित्र व विद्वत्तापरिपूरित असे अवशिष्ट राहिलेले धर्मग्रंथ हे होत. आमचें प्राचीन पुस्तकभांडार एवढें जबरदस्त होतें कीं, औरंगजेब बादशहानें आमचा ग्रंथसंग्रह जाळण्याची आज्ञा दिली तेव्हां सहा महिने सारखें ग्रंथ जाळण्याचें काम चाललें असतांही तो खुंटला नाहीं. शेवटीं जो अवशेष ग्रंथसंग्रह राहिला आहे, त्याचा बहुमोलपणा इतका आहे कीं, तो जगांतील इतर लोकांच्या ग्रथांस व विद्यांस खालीं पहावयास लावील. अर्वाचिन फिलॉसफर (तत्वज्ञानी) ही अशा ग्रंथांतील एक ओळ वाचून थक्क होऊन जातात व आपली अक्कल काम करित नाहीं असें स्पष्ट कबूल करितात. असो, ही जी हीन स्थिति प्राप्त झाली आहे, ही आमचे धर्माची वार्धक्य स्थिति होय. ज्याप्रमाणें मनुष्यास, बाल्य, तारुण्य व वृद्धवस्था असते, त्याचप्रमाणें धर्मासही हीच गोष्ट समजली पाहिजे, त्यांतून कलि महाराजांचा अंमल ! ! वृद्धावस्थेंत ज्याप्रमाणें मनुष्याची मान कंपयुक्त होऊन हालूं लागते, त्याप्रमाणें ह्या धर्माचीही मान हालूं लागली आहे. ह्मणजे आह्मांस जर विचारलें कीं ब्रह्मचर्य कसें काय आहे? तर अंहः ( नाहीं ) हें सुचविण्याकरितांच जणूं ही मान कांपते. सत्य—नाहीं, धृति—नाहीं, क्षमा—नाहीं, अहिंसा—नाहीं इत्यादि रीतीनें या सर्व शब्दांबरोबर मान हालविली जाते, हेंच धर्मवार्धक्याचें चिन्ह होय. असो, अशी जरी स्थिति

आहे, तरी याबद्दलचीं वास्तविक कारणें काय आहेत हें शोधणें आपलें कर्तव्य आहे. व तीं सर्व सांगण्यास जरी अवकाश नाहीं तरी संस्कृत भाषेचा ऱ्हास हें एक बलवत्तर कारण होय. संस्कृत भाषा ही आमच्या धर्मग्रंथांची व विविध शास्त्रांची त्या वेळची भाषा असून जगांतील सर्व भाषांचीही जननीच होय असें ह्मटलें असतां वावगें होणार नाहीं; उदाहरणार्थ कांहीं शब्द सांगतों त्यावरून आपली खात्री होणार आहे.

| संस्कृत | लॅटिन् | इंग्लिश | पर्शियन् | जर्मन् | ग्रीक |
|---|---|---|---|---|---|
| मातृ | मेटर् | मदर् | मादर् | माते | .... |
| पितृ | पेटर् | फादर् | पिद् | पाते | पिटर् |

याच प्रमाणें:—

| संस्कृत | लॅटिन् | इंग्लिश् | पर्शियन् | संस्कृत | अरेबिक् |
|---|---|---|---|---|---|
| सुवन् | सन् | सन् | .... | अंकवर | अकबर |
| दुहितृ | .... | डॉटर् | दुख्तर् | अंतकाल | इंलकाले |

तसेंच:—

| संस्कृत | इंग्लिश् | संस्कृत | पार्शियन् |
|---|---|---|---|
| सर्प | सर्पेन्ट् | अस्ति | अस्त |
| पथ | पाथ् | नास्ति | नेस्त |
| त्रिपथ | ट्रायपेड् | किमस्ति | कीस्ती |

याप्रमाणें अनेक शब्दांचें साम्य दाखवितां येईल; परंतु तितका अवकाश नसल्यामुळें पुढील विषयाकडे वळतों.

अशा सूक्ष्म रीतीनें पाहिलें असतां जगांतील भाषांची संस्कृत ही खरोखर माता होय. मूलस्थानापासून तिचा प्रसार जसा दूर दूर होत गेला, तसतसा तिचा अपभ्रंश होऊन तद्द्वारा इतर लोकांच्या भाषा बनत गेल्या. अशी वस्तुस्थिति असतां ज्यांना संस्कृताचा गंधही नाहीं, ते लोक हिला Dead Language मृतभाषा व मूर्ख लोकांची एक भाषा, तिच्यांत कसले विचार असणार आहेत? अशी तिची अवहेलना करितात. संस्कृत शिकणें ह्मणजे भिक्षा मागण्याची विद्या शिकणें होय. रिकाम-

टेकड्या भटाभिक्षुकांनीं ती पढावी, आमच्या सारख्यांस तिचा काय उपयोग ? अशी ते वृथैव जल्पना करितात; परंतु कोंबड्याला रत्नाची काय किंमत ? मित्र हो ! नुसतें शब्दसाम्य नव्हे, तर निरनिराळीं शास्त्रेंही ह्या गोष्टींवरून, ग्रंथांवरून व व्यवहारावरून स्पष्ट करतां येतात. सूर्याच्या उष्णतेनें पाण्याची वाफ बनून तिचे ढग होऊन मग वृष्टि होते, हा शोध अर्वाचीन नव्हे; उपनिषदांत ह्मटलें आहे,--

" आदित्याज्जायते वृष्टिर्वृष्टेरन्नं ततः प्रजाः " इ०

ज्या विद्युच्छास्त्रानें सांप्रतकाळीं सर्व जगाला आश्चर्यचकित करून सोडिलें, त्याचा प्रसार पूर्वी आमच्याकडेही असला पाहिजे, हें एका सामान्य उदाहरणावरून आपल्या लक्षांत येईल. उत्तर हिंदुस्थानांत जेव्हां पावसाळ्यांत ढगांतून विजा चमकूं लागतात तेव्हां यःकश्चित् दासीही आंगणांत पडलेलीं धातुपात्रें जलदीनें घरांत घेऊन जाते. धातूमध्यें वीज चटकन् शिरते, ही गोष्ट साधारण दासीसारख्या क्षुल्लक माणसासही आमचेकडे माहीत आहे. सारांश, बीजभूत अर्वाचीन अनेक शास्त्रें प्राचीनकाळीं आह्मांत वसत होतीं. परंतु आतां सांगितल्याप्रमाणें ग्रंथांचा विध्वंस झाल्यामुळें ह्या गोष्टी स्वप्नवत् होऊन राहिल्या आहेत.

ज्याप्रमाणें ग्रंथांची व संस्कृत भाषेची अशी अवनति झाली, त्याप्रमाणेंच आमच्यांतील गुरुप्रणालिकाही बिघडली आहे. हल्लीं जास्त तर काय, परंतु गुरूसही संध्याप्राणायामादि गोष्टी यथाशास्त्र कोणत्या रीतीनें कराव्या हें समजत नाहीं. नुस्ता नाकाकानाला हात लावला कीं झाला प्राणायाम ! अशी गुरूंची स्थिति, तर शिष्यांना ह्या संबंधीं काय ज्ञान होणार ? बरें, गुरु यदाकदाचित् चांगला मिळाला, तरी दिवसेंदिवस गृहस्थ लोकांतील आस्था कमी झाल्यामुळें त्यापासूनही उभयतांस कांहीं फायदा होत नाहीं. शिमगा वगैरेंत एखादी कलावंतीण येण्याबद्दल तिजकडून तार आली असतां कोणी गाडी पाठवितो, कोणी मेणा, कोणी तावदान पाठवितो. अंजीर, अंगुर, दाळिंब, संत्रे, केळीं, आंबे, द्राक्षें, बरफी, पेढे वगैरेच्या छबड्यांच्या छबड्या हजर होऊं लागून, शिवाय 'हुजूर, आपली तबेत कशी आहे?' ह्मणून तिची परोपरीनें विनवणी करितात.

परंतु तेच कोणी गुरुवर्य येण्यासंबंधानें त्यांजकडून तार-पत्र आलें असतां सर्व नाकें मुरडूं लागतात. शेवटीं गुरुमहाराज आलेच, तर त्यांस एकाद्या घोड्याच्या तबेल्याकडे किंवा कोंबड्या-खबुतराच्या खुराड्याकडे जागा देतात व उपहारास सदहूंतील राहिलेलीं नासकीं कुसकीं व आळया वगैरे पडलेलीं फळें येतात ! गुरूंनीं प्रश्न केलाच तर त्यांस जबाब देण्यांत येतो कीं, आपण तर परमहंस आपल्यास कसलाच बाध नाहीं !! सारांश, अशी जेथें स्थिति असणार तेथें धार्मिक उन्नति ती कशी होणार? तर हा प्रकार अत्यंत गर्हणीय होय.

अशी जरी स्थिति आहे तरी आमच्यांत स्त्रियांमध्यें कांहीं अंशानें धर्म अद्यापि जास्त प्रमाणानें वसत आहे व त्यांस जरी हल्लींचे एज्युकेटेड लोक अज्ञानांत गणतात, तरी सनातन धर्माच्या मतें हें अज्ञान नव्हे. उदाहरणार्थ पहा, एक गृहिणी प्रातःकाळीं उठून गंगेवर स्नानास जाते; स्नान झाल्यावर श्री गंगेची पूजा करून शेंदूर अगर कुंकूं तत् प्रसाद जाणून आपल्या भांगांत लावून सौभाग्यदर्शक चिन्ह समजते. तत् पश्चात् पिंपळाच्या झाडास शेंदराचा टिळा करून पुढें आम्रवृक्षास टिळा करिते. पुढें जातां जातां गाय भेटते तिला शेंदराचा टिळा करिते. तत् पश्चात् शेतांतील नांगरलेल्या ढेकळास टिळा करिते. चार रस्ते जेथून जातात त्यांस टिळा लाविते व शेवटीं घरीं आल्यावर उंबऱ्यास, दिवा ठेवण्याच्या जागेस, आपल्या पर्यंकाच्या चारी कोंपऱ्यांस, त्याप्रमाणेंच जात्यास शेंदराचा टिळा करिते. तर पहा, या सर्व वस्तूंस टिळा करण्याचें काय प्रयोजन ? तर सनातन धर्माचें जें रहस्य कीं ब्रह्म सर्वत्र समव्याप्त आहे, हें तिच्या या कृत्यानें दर्शित झालें. इतकेंच नव्हे, तर, शेंदूर अगर कुंकूं हें स्वामी असल्याचें चिन्ह होय. व त्याप्रमाणें जगत्स्वामी हा सर्व काष्ठपाषाणादि वस्तूंचे ठायीं ओतप्रोत भरून राहिला आहे, असा जो " १ सर्वं खल्विदं ब्रह्म इ० २ ईशावास्यमिदं सर्वं यत्किंचित्च इ० ३ तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् " इत्यादि श्रुतींचा मथितार्थ, तो तिनें निरनिराळ्या वस्तूंस कुंकवाचा टिळा लावून व्यक्त केला.

अशा रीतीनें उपदेश व त्याप्रमाणें आचरण या दोहोंची एकवाक्यता केवळ सनातन धर्मामध्येंच दिसून येत असल्यामुळें तो इतर सर्व धर्मांपेक्षां श्रेष्ठ आहे.

वृक्षपश्वादिकांची पूजा सनातन धर्मांत सांगितली आहे, ही केवढी मूर्खता आहे, असें परधर्मी लोक ह्मणतात. परंतु त्यांस सनातन धर्माचें रहस्य मुळींच कळलें नाहीं. वृक्षपश्वादिकांची पूजा ही मूर्खता नसून उलट ती, सनातन धर्मांत किती उदात्त तत्त्वांचा समावेश केला आहे, त्याची दर्शक आहे. कारण पहा कीं, दूध, दहीं, लोणी, मलई वगैरेच्या द्वारानें आबालवृद्धांस अत्यंत उपकारक परम मित्र अशी जी गाय, तिची पूजा करण्याविषयीं सनातन धर्मांत आज्ञा दिली आहे, त्याचप्रमाणें प्राणघातक परम शत्रु जो सर्प, त्याची ही श्रावण शुक्ल ५ रोजीं पूजा करण्याविषयीं आज्ञा दिली आहे. अशा रीतीनें " समः शत्रौ च मित्रे च " या उदात्त तत्वाचा केवळ उपदेशच केला आहे असें नाहीं, परंतु त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरणही सनातन धर्मानें लावून दिलें आहे. अशीं उदात्त तत्वें व तदनुसार उपदेश व आचरण यांची सांगड, इतर कोणत्याही धर्मांत आढळून येत नाहीं. यावरून सनातन धर्माची योग्यता, व्यापकता, व थोरवी समजून येईल. ईश्वर सर्वत्र आहे, याचा विचार ज्यांत आहे, असा एक सनातन धर्मच होय. यास इतर लोक व आमच्यांतील सुधारक पाहिजे तीं नांवें ठेवोत, परंतु ईश्वराच्या खऱ्या व्यापकतेचें रहस्य सनातन धर्मीयांसच कळलेलें आहे.

आमच्यांत अठरा पुराणें असून तीं भूमितींतल्या प्रत्यक्ष प्रमाणांप्रमाणेंच जणूं १८ प्रत्यक्ष प्रमाणेंच होत. तीं कांहीं विशिष्ट कारणानेंच १८ आहेत. तीं सतराही करितां येणार नाहींत व एकोणीसही करितां येणार नाहींत. हें मी विस्तारानें अन्य वेळीं सांगेन.

सनातन धर्मांत भक्ति हें परमतत्त्व मानिलें आहे. परंतु गुरुप्रणालिका बिघडल्याविषयीं मीं पूर्वींच आपल्यास सांगितलें आहे. त्याप्रमाणें ती बिघडल्यानें योगमार्गाचा जसा लोप झाला, तसाच भक्तिमार्गाचाही लोप झाला. गुरूच्या कृपेनें व सत्समागमानें ईश्वराची ओळख पटून भक्तिरसाचें द्वार कसें खुलें होतें व पुढें तो अनन्य भक्ति करूं लागला असतां, संकटसमयीं त्यास श्यामसुंदर प्रभु आपलें दर्शन देऊन कसें साहाय्य करितो, याविषयीं उदाहरणादाखल परम भक्तशिरोमणि तुलसीदास यांचें चरित्र मी संक्षेपानें सांगतों.

तुलसीदासजी यांचें मूळ गांव राजापूर नामें बांदा जिल्ह्यांत असून यांचें वडील तिकडे तहसीलदारीच्या ( मामलतदारीच्या ) नोकरीवर असून त्यांनीं बहुत पैसा एकत्र केला होता. तुलसीदासजीच्या आईचें नांव तुलसी असें होतें. पुढें दुर्दैवानें तुलसीदासजींचे वडील लहानपणीं ह्मणजे त्यांच्या वयाच्या सातवे आठवे वर्षी वारले. एकुलता एक मुलगा लाडका असल्यामुळें १५–१६ वर्षांचा होईपर्यंत अगदीं निरक्षर राहिला. पुढें त्याचें लग्न चांगल्या घरंदाज मनुष्याच्या कन्येशीं झालें. मुलगी रूपानें परम रूपवती असल्यामुळें तुलसीदासाचें लक्ष रात्रंदिवस तिच्याकडे वेधलें. अष्टौप्रहर तिच्याजवळून हालूं नये. वडिलांनीं कमावलेलें धन संपलें. सांचलेलें पाणी किती दिवस पुरणार? तुलसीदास असा स्त्रैण झाल्याकारणानें त्याच्या मातुश्रीस परम खेद उत्पन्न झाला व मुलाचें लक्ष कांहीं व्यापारधंद्यांत व चाकरीनोकरींत लागावें म्हणून तिनें त्यास बहुत उपदेश केला, परंतु तुलसीदासांच्या लक्षांत ती गोष्ट येईना. उलट त्यांनीं सांगितलें कीं तूंच आमचें दोघांचें पोषण कर, म्हणजे झालें!! या उत्तरानें मातुश्री बिचारी निरुत्तर व खिन्न झाली. पुढें असा क्रम पांच सहा वर्षेपर्यंत चालला असतां या मुलीस नेण्याकरितां तिच्या माहेरचीं माणसें आलीं. त्यांस तुलसीदासानें निषेध करून हांकून दिलें व बायकोस पाठवीत नाहीं, असें साफ उत्तर दिलें; त्यावर त्याच्या मातुश्रीनें सांगितलें कीं सकाळच्या प्रहरीं तुलसीदास हा एक कलाकपर्यंत यमुनेवर स्नानादि नित्यविधीस जात असतो, त्या वेळेस तुह्मी मेणा घेऊन या, ह्मणजे मी सुनेची रवानगी करून देतें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं तुलसीदास यमुनेवर स्नानास गेला असतां मागें संकेताप्रमाणें त्या मुलीच्या माहेरच्या मनुष्यांनीं येऊन तिला नेलें. इकडे तुलसीदास स्नान वगैरे आटोपून खांद्यावर धुतलेलें धोतर, हातांत तांब्या व एक लहान पंचा नेसलेला अशा स्थितींत आला; त्यानें प्रथम घरांत चुलीकडे, माजघरांत, देवघरांत व सर्व ठिकाणीं पाहिलें, परंतु स्त्री कांहीं नजरेस पडेना, तेव्हां आईस विचारिलें तेव्हां तिणें तीस माहेरीं पाठविल्याचें वृत्त कळविलें. तें वृत्त कानीं पडतांच तुलसीदास तसाच उघडा बोडका व हातांत तो तांब्या व खांद्यावर पिळा घेतलेला असा तडक सासऱ्याच्या घरीं आला. रस्त्यानें जातांना आपण

असे वस्त्रहीन वगैरे जात आहों, याची कांहीं एक त्यास शुद्ध नव्हती. श्वशुरगृहाचा रस्ता धरून तो तडक सपाटेबंद चालला होता. प्रेमरज्जूनें त्यास अशा रीतीनें जखडून टाकिलें कीं त्यास लोकलज्जा, मनलज्जा कांहीं राहिली नाहीं; परंतु हें निष्कपट प्रेम पाहून परमकारुणिक, भक्तवत्सल, श्यामसुंदर परमात्म्यानें दयायुक्त अंतकरणानें विचार केला कीं याचें हें असें निष्कपट प्रेम जर माझे ठिकाणीं जडेल, तर याचा किती उपयोग होणार आहे बरें !!! तेव्हां याच्या या प्रेमास अनुलक्षून आपणाकडे उपयोग करून घेऊन याजवर अनुग्रह करावा, असा भगवंतांनीं संकल्प केला. इकडे तुलसीदासजी श्वशुर गृहीं पोहोंचतांच तेथील श्वशुरादि मंडळीस जामाताची अशी स्थिति पाहून वाटलें कीं, हे असे उघडे बोडके आले आहेत, तेव्हां यांची मातोश्री वृद्ध होती ती मृत झाली कीं काय? म्हणून जनरीतीप्रमाणें त्यांच्या नेत्रांस अश्रु आले. इकडे मला पाहतांच यांना रडें आलें, तेव्हां माझ्या प्रिय भार्येस कांहीं कम जास्त स्थिति झाली कीं काय असा विचार मनांत येऊन तुलसीदासही रडूं लागले. असा एकच घोटाळा झाल्यामुळें दासीकडून त्यांच्या स्त्रियेस ही गोष्ट कळली. ती चतुरस्र असल्यामुळें, भर्त्याची खोड तिला माहीत होती; तिज-वर आच्छादन घालण्याच्या हेतूनें वडिलांस कळविलें कीं माझे भर्त्यास कधीं कधीं असा उन्मादवायु होत असतो, त्यामुळें ते असे उघडे बोडके फिरतात, तेव्हां रडण्याचें वगैरे कांहीं कारण नाहीं. हें जाणून पुढें त्यांनीं जामातास कपडे लत्ते देऊन घरांत स्त्रियेकडे जाण्याविषयीं आज्ञा दिली. तुलसीदास उंबऱ्याचा आंत पाय ठेवणार, तोंच भगवंताची करणी—त्या स्त्रियेनें लागलाच त्यांचा निषेध करून त्यांस उपदेश केला कीं, हे स्वामिन् ! मजकरितां आपण इतके कष्ट सोसून व जनलज्जा, मनलज्जा सोडून आलांत, परंतु हें तुमचें प्रेम जर परम कृपानिधि भक्तवत्सल श्याम-सुंदर कमलनेत्र चापपाणि श्रीरामचंद्रजींकडे लावाल, तर किती उत्तम व अक्षय्य सुखाचें साधन होणार आहे बरें ! माझें हें सुंदर दिसणारें शरीर वास्तविक पाहतां मलमूत्रानें परिपूरित, नाक तोंड यांत अनेक तऱ्हेनें मल ! शरीरांत काय तर रक्तमांसाचा संचय ! तर क्षुल्लक, मलिन व नाश-वंत अशा ह्या माझ्या शरीरावरील प्रेम श्यामसुंदर रामचंद्रजींकडे आपण

अवश्य लावाल अशी मला दृढ आशा आहे! ह्या उपदेशानें तुलसीदासास उपरति होऊन ते तकड मजल दरमजल करीत काशीस येऊन मणिकर्णिकेवर राहिले. घांटावर पडले आहेत, रामनामाचा सारखा मुखांतून घोष चालला आहे व श्यामसुंदराच्या दर्शनप्राप्तीकरितां कोणी तरी गुरु करावा अशी मनांत उत्कृष्ट इच्छा आहे, इतक्यांत नरहरिस्वामी यांची स्वारी प्रातःकालची स्नानसंध्या आटोपून परत आश्रमास जावयास निघाली आहे, त्यांनीं हा हृदयद्रावक रामनामाचा घोष ऐकून हा कोणी आर्त व प्रेमळ मनुष्य असावा असें जाणून जवळ गेले व पुसतपास केला. तेव्हां तुलसीदासांनीं, आपलें इतिवृत्त सांगून कळविलें कीं, या देहास श्रीरामचंद्राचें दर्शन देण्याची जर आपण खात्री देत असाल, तर हा देह ठेवितों, नाहींपेक्षां गंगार्पण करून टाकितों. तेव्हां नरहरिस्वामींनीं विचार केला कीं भक्ताला जरा अश्रु आले तरी परमकरुणिक परमात्मा धांव घेतो, मग हा अत्यंत आतुर व संपूर्ण देहार्पण करण्यास सिद्ध झाला आहे, यास भगवत्प्राप्ति कां होणार नाहीं? असें ध्यानीं आणून सांगितलें कीं ऊठ, कांहीं चिंता करूं नको. या देहांत व या जन्मीं तुला दर्शन होईल. तदनंतर गुरूच्या पायावर मस्तक ठेवून त्यांची सेवा चाकरी करून पांच सहा वर्षें उत्तम वेदशास्त्राध्यन केलें. व उत्तम भक्तिही केली. पुढें एके दिवशीं नावेंत बसून नित्यविधीस गंगेच्या पैलतीरीं गेले असतां, त्यांच्या बहिर्दिशा आटोपून अवशिष्ट फेकून दिलेल्या अपवित्र जलानें एका पिशाच्चाची तृप्ती होऊन त्यानें आग्रह धरिला कीं, मजपाशीं कांहीं सोनें, हिरे, मोतीं मागा. तुलसीदासांनीं सांगितलें मला या वस्तूंची जरूर नाहीं. मला श्री श्यामसुंदराचें दर्शन देववावें. पिशाच्च ह्मणालें ही गोष्ट मला अशक्य आहे; परंतु जरी मजकडून ही गोष्ट होणार नाहीं, तरी मी आपणास एक उपाय सुचवितों त्या मार्गानें आपण जा ह्मणजे आपलें कार्य होईल. तो उपाय असा कीं, हल्लीं गंगातीरावर वाल्मिकीरामायण चाललें असतें, त्या वेळीं श्रोतृवृंदांत एका कोपऱ्यांत एक कुष्टानें ज्याचें अंग गळत आहे असा पुरुष बसत असतो; त्यास पुराण संपल्यावर गांठून त्याचे पाय तुह्मीं सोडूं नका, ह्मणजे तो तुह्मांस श्रीरामचंद्राचें दर्शन करून देववील. त्याप्रमाणें तुलसीदासजी पुराण आटोपल्यावर त्य

पुरुषाचे मागें जाऊं लागले. बऱ्याच अंतरावर गांवाबाहेर गेल्यावर त्या कुष्टी पुरुषानें विचारिलें तुह्मी मजबरोबर कशास येतां? तुह्मांस काय पाहिजे? व मजसारख्यांकडून काय मिळणार? तेव्हां तुलसीदासजीनीं सांगितलें मला श्रीरामाचें दर्शन देववा, तेव्हां हा आतां आपला पिच्छा सोडीत नाहीं असें जाणून लागलेंच कुष्टी पुरुषानें आपलें मूळरूप प्रगट केलें. ते मारुति होते. त्यांनीं ह्यांचा पूर्ण भक्तिभाव व दृढ निश्चय जाणून आश्वासन दिलें कीं, आपणास श्रीरामचंद्रजीचें दर्शन होईल कांहीं संदेह ठेऊं नये व माझें स्मरण कराल तेव्हां मीही तुह्मांस दर्शन देईन. त्यावर कांहीं दिवस गेल्यानंतर तुलसीदासजी हे गंगातीरीं रामायण लिहित असतां कानावर लेखणी ठेवून अमळ विश्रांति घेत होते. तों गंगेच्या पैलतीरीं अश्वारोहण केलेल्या अशा श्यामसुंदराच्या मूर्तिचा आविर्भाव झाला; परंतु तुळसीदासांनीं त्यांजकडे पाहून शंकित होऊन मनांत ह्मटलें कीं असेल कोणी सुंदर राजकुमार; अखेर त्याच ठिकाणीं त्या मूर्तीचा तिरोभाव होऊन गेला. पुष्कळ दिवस लोटले अद्यापि श्रीरामचंद्रजींचें दर्शन होत नाहीं. मनाला सारखी तळमळ लागली आहे, तेव्हां पुनः मारुतींचें स्तवनपूर्वक स्मरण करितांच मारुती प्रगट झाले. तेव्हां तुलसीदासांनीं अद्याप दर्शन कां देववीत नाहीं ह्मणून विचारिलें; त्यावर मारुतींनीं सांगितलें कीं, अमुक अमुक दिवशीं गंगेच्या पैलतिरीं घोड्यावर श्यामसुंदराची मूर्ति प्रगट झाली असतां आपण नाहीं कसें ह्मणतां! त्यावर तुलसीदासांनीं आपल्यास आलेली राजपुत्राची शंका निवेदन करून परम करुणस्वरानें परमेश्वराची प्रार्थना केली कीं, हे श्यामसुंदरा, परमकृपानिधे, मी किती अभागी कीं आपणास खास तसदी पडली असून मला आपले दर्शनाचा पूर्ण लाभ झाला नाहीं. पाप माझ्या ठिकाणीं रोम रोम व्यापलें आहे; परंतु हे दीनबंधो, आपण अजामिळादिकांचाही उद्धार केला आहे व आपण शरण आलेल्याचा अव्हेर करित नाहीं, असें श्रुतिस्मृति ह्मणते. तर हे कृपासागरा, मी आपल्या पायांशीं शरण आलों आहें. तरी मला आपण दर्शन देऊन माझा उद्धार करावा. तेव्हां मारुतीनें त्यांस पोटाशीं धरून शांतवन करून कळविलें कीं तुह्मी धीर सोडूं नये, पुनः दर्शनाचा योग खास येईल; आतां आपण चित्रकूटास

जावें व तेथें प्रभुसेवा अशीच सुरू ठेवावी, ह्मणजे अल्प काळांत श्यामसुंदराचें दर्शन होईल. त्याप्रमाणें चित्रकूटास जाऊन हे सेवाधर्म आचरित असतां बहुत दिवस लोटले तरी दर्शनाचा योग येईना. एके दिवशीं गंध उगाळीत असतां अंतःकरण प्रभुदर्शनार्थ व्याकुळ होऊन नेत्रांतून अश्रुधारा चालल्या आहेत ! ! ज्या अर्थी योगी, सन्याशी यांच्या काष्ठांच्या माळांचे मणी ओढण्यानें जर प्रभुदर्शनचा योग येतो, तर तो आपले अश्रुरूपी मणके टपाटपां ओढित आहे ( टाकित आहे ) त्याजकरितां प्रभु धांव घेणार नाहीं काय ? असो, ह्याप्रमाणें श्यामसुंदरांनीं मनांत कारुण्य स्वीकारून आतां ह्या भक्तशिरोमणीचा अंत पाहण्याची वेळ नव्हे, असें ध्यानीं आणून लागलेंच अष्टवर्षात्मक परम मनोहर रूप धारण करून तुलसीदासासन्निध येऊन, 'बावाजी' ह्मणून त्यांस नमस्कार केला व जवळ बसले. तुलसीदासासही तें सुंदर बालरूप पाहून परम आनंद झाला; परंतु त्यास शंकेनें ग्रस्त केल्यामुळें व मनास विव्हलता असल्यामुळें जावें तसें लक्ष गेलें नाहीं, त्यामुळें मारुतीस पुनः चिंता प्राप्त झाली कीं हा सुयोगही निष्फळ होतो कीं काय ? ह्मणून आपण स्वतः पोपट बनून सन्निद्ध असलेल्या वृक्षावर बसले. इकडे रामचंद्रांनीं तुलसीदासजीस विचारलें कीं, बावाजी, मी आपल्या हातांनीं गंध लावूं काय ? तेव्हां तुलसीदासांनीं होय म्हटलें. त्या बरोबर प्रभु श्यामसुंदर हे आपल्या कोमल हस्तांनीं त्यांस रेखून गंध लावूं लागले, तेव्हां हनुमंतानें ( त्या पोपटानें ) दोहरा ह्मटला.

**चित्रकोटके घाट पै भै संतनकी भीड ॥**
**तुलसीदास चंदन घसे तिलक करे रघुवीर ॥ १ ॥**

याप्रमाणें बोलले, तरी तुलसीदासाचें लक्ष्य जाईना. दुसऱ्यानदां हाच दोहरा ह्मटला तरी लक्ष जाईना. शेवटीं रामचंद्रांनीं तुलसीदासांस ह्मटलें बावाजी, आतां आपल्यास मी दर्पण दाखवितों; व दर्पण दाखवितांना त्यांस श्रीश्यामसुंदराची तीं तेजस्वी अंगुळें दिसलीं व पोपटानेंही तिसऱ्यानदां दोहरा ह्मटला, त्या सरशी तुलसीदासांच्या लागलेंच लक्ष्यांत आलें कीं, हेच प्रत्यक्ष श्यामसुंदर कमलनेत्र रामचंद्रजी होत, ह्मणून परम आल्हादानें त्यांची प्रार्थना करून दर्शनसुखाचा साक्षात् अनुभव घेतला ! ! !

सारांश, श्रीनरहरिस्वामीच्या उपदेशानें तुलसीदासाच्या ठायीं भक्तिरस कसा बाणला व पुढें तो अत्यंत प्रेमळ भक्त बनून श्यामसुंदरप्रभूची त्यास कशी प्राप्ति झाली, हें माझ्या विवेचनावरून सहज ध्यानांत येईल. त्याचप्रमाणें आपल्या प्रेमळ भक्तांकरितां परम कारुणिक परमात्म्याचा नानारूपांनीं अविर्भाव होतो, हेंही सहज कळून येईल.

आधुनिक सायन्टिफिक ( शास्त्रज्ञ ) लोकांस हें अशक्य वाटेल, परंतु आत्मा—परमात्मा ह्मणजे काय व संध्या, प्राणायाम, भक्ति इत्यादि साधनांनीं आत्म्याची उन्नति करून परब्रह्मप्राप्ति कशी करून घ्यावी, हें मी आपल्या पुढील व्याख्यानांत सांगेन. ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

## व्याख्यान २ रें.

### विषय—ब्रह्मविद्येशीं संध्येचा संबंध.

ईशस्तवन.

त्वमादिदेवः पुरुषः पुराण-<br>स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ॥<br>वेत्तासि वेद्यं च परं च धाम<br>त्वया ततं विश्वमनन्तरूपम् ॥

याप्रमाणें ईशस्तवन केल्यावर ते ह्मणाले:—

हे प्रिय सभासद हो, सनातन धर्मरूपी आगगाडी सभारूप स्टेशनावर हर्षरूप शिटी वाजवीत येत आहे, व उपदेष्टारूप स्टेशन मास्तर उपदेशरूप टिकिटें कापून ईश्वराच्या चरणारविंद सदर स्टेशनावर पोहोंचविण्यासाठीं, तीं; सभासदरूपी उतारूंस देण्यास तयार आहे, त्याचप्रमाणें ध्यान ही तार कुंडलिनीपासून ब्रह्मरंध्रापर्यंत खबर देण्यास तयार आहे. या स्टेशनावर ८४ लक्ष योनिरूपानें निरनिराळीं टिकिटें देण्यांत येत असून

त्यांपैकीं फर्स्ट क्लास टिकिट मनुष्ययोनि आहे. त्याच्या आश्रयानें धर्मरूप गाडी साधण्याचा यत्न केला पाहिजे. ती गाडी हातांतून निसटून गेल्यास पुढें पस्तावा होईल; करितां पुढील विवेचनाकडे आपलें अवधान असावें.

संपूर्ण विद्यांत ब्रम्हविद्या ही अति श्रेष्ठ विद्या होय. ती अनंतकालापर्यंत कल्याण करून देणारी अशी आहे व ही विद्या जाणणारे ते ब्रह्मज्ञ होत. प्राचीनकाळीं अग्निरूपी गायत्रीमुळें ब्राह्मण अतिश्रेष्ठ होते, आपल्या तेजोबलानें ते सर्वांस पूज्य असत. इतके कीं, मोठमोठे राजे देखील यांस हात जोडून त्यांजपुढें उभे राहत असत व आपल्या स्थानीं त्यांस बसवीत असत. युधिष्ठिरानें राजसूययज्ञास भोजनास ब्राह्मणांस बोलाविलें, तेव्हा आह्मी अशा यज्ञांत भोजनास येत नाहीं असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें, परंतु तो काल व तें ब्राह्मणांचें तेज जाऊन आज ब्रह्मविद्येच्या अभावीं त्यांस हीनास्थिति प्राप्त झाली आहे. संन्यासी वगैरेचीही हीच स्थिति झाली आहे. पूर्वी अति उत्तम आदर सत्कार होत असे, परंतु आतां दारोदार कमंडलु घेऊन जात असतांही कोणी विचारित नाहीं. क्षत्रियांचीही हीच स्थिति झाली आहे. जे क्षत्रिय आपल्या क्षात्रविद्येच्या तेजानें शत्रूच्या अंगावर बेधडक चालून जात असत व तोफेच्या गोळ्यासही हात देत असत, ते क्षत्रिय आज हतवीर्य होत्साते साधारण एकादा बंदुकीचा आवाज झाला असतांही शौचकूपांत दडून बसण्याची तजवीज करितात. ब्रह्मविद्येच्या अभावीं वर्णद्वयाची अशी पायमल्ली आहे. वैश्यांचीही हीच गति आहे. याचे उलट शूद्रादिक आपण उच्च ह्मणवूं लागले आहेत. पहा, रेल्वेंत जेव्हां एकादा ब्राह्मण बसून त्याचे जवळ एकादा महार बसतो, तेव्हां प्रथम ब्राह्मण त्यास दूर बसण्याविषयीं सांगतो; त्या वेळीं तो ह्मणतो कीं, मीही टिकिटाचे पैसे दिले आहेत; शिवाय मी मनुष्य तुह्मी मनुष्य, दोघांत अंतर काय? तेव्हां बिचारा ब्राह्मण आपलें पोथीपुस्तक व सोंवळें गवाळें घेऊन एका कोंपऱ्यांत जाऊन बसतो.

तेव्हां हा शूद्र आणखी पाय फैलावून बसतो. सारांश, ज्याप्रमाणें आमच्या लोकांच्या पोषाकांत फरक झाला आहे, तसाच हा वर्णविपर्यासही झाला आहे. पूर्वी अंगरखा वगैरे पायांपर्यंत असून जोडा पायाच्या पंजापुरता घालीत असत, तें मान बदलून नंतर जोडा घोट्यापर्यंत व होतां होतां हल्लीं जोडा ( बूट ) गुडघ्यापर्यंत आला व अंगरख्यास कोटाचें स्वरूप प्राप्त होऊन तो आतां कंबरेपर्यंत राहूं लागला. अशीच वर्णसंबंधीं उलट स्थिति आहे. ही अशी शोचनीय स्थिति येण्याचें कारण आमचा कर्मलोप हें होय. ज्याप्रमाणें लिपीच्या वर्णमालेंतील ‘ क ’ हें पहिलें अक्षर फाटून अगर कीटकानें खाऊन नाहींसें झाल्यानें त्यांतील दुसरें अक्षर ‘ ख ’ हेंच पहिल्याच्या जागीं होऊन, तोंडानें पूर्वी घोकून ठेविलेल्या वर्णमालेंतील तो ‘ क ’ च आहे असें वाटण्याचा संभव आहे, व याच क्रमानें पुढें ‘ ग ’ असेल तर तो ख, घ असेल तो ग इत्यादि वाटून केवळ एक वर्णाच्या अव्यवस्थेनें भाषेंत सर्वत्र अव्यवस्था होऊन असा अनर्थ व्हावा, त्याचप्रमाणें ब्रह्मविद्येच्या प्राप्तीस जी आद्य साधनीभूत आमची संध्या, तिजपासून आह्मी पराङ्मुख झाल्याकारणानें आमची सर्व प्रकारें अव्यवस्था होऊन गेली आहे. ज्याप्रमाणें इंग्रजी भाषेचीं २६ मुळाक्षरें आहेत, त्याप्रमाणें ब्रह्मविद्येचींही १ अहिंसा, २ सत्य, ३ अस्तेय, ४ ब्रह्मचर्य, ५ क्षमा, ६ धृति, ७ दया, ८ आर्जव[1], ९ मिताहार, १० शौच, ११ तप, १२ संतोष, १३ आस्तिक्य, १४ दान, १५ ईश्वरपूजन, १६ सिद्धांतवाक्यश्रवण, १७ ह्री[2], १८ मति[3], १९ जप, २० हुत[4], २१ आसन,

---

१ आर्जव ह्म० सरळपणा. अहंपणाचा त्याग करून सर्वांशीं गरिबीनें वागणें. २ ह्री ह्म० लज्जा. अर्थात् वाईट कृत्याविषयीं लाज धरणें हा गुण, व चांगल्या कृत्याविषयीं कोणाचीही लाज न बाळगणें हाही गुण होय. ३ मति ह्म० सांसारिक सुखाविषयीं अगर स्वर्गादिवैभवाविषयीं लोभ न धरितां, ‘ ब्रह्म सत्य व जगत् मिथ्या ’ अशी दृढ बुद्धि ठेवणें. ४ हुत ह्म० होम. राजस वृत्तीचे पुरुष पशूंचा व फळादिकांचा होम करितात, परंतु ज्ञानी लोक अंतर्दृष्टि करून, विषयांचा इंद्रियांच्या ठायीं व इंद्रियांचा अंतःकरणाचे ठायीं होम करितात.

२२ प्राणायाम, २३ प्रत्याहार[1], २४ धारणा[2], २५ ध्यान[3], व २६ समाधि[4] अशीं २६ मूळाक्षरें आहेत.

एकंदर जगांतील मनुष्यमात्रास जर विचारिलें कीं, तुला कशाची अपेक्षा आहे? तर तो सांगेल कीं मला सुख, आयुष्य, आरोग्य व ब्रह्मप्राप्ति ( मोक्ष ) या चार गोष्टींची अपेक्षा आहे. यांतही प्रथमतः तो आयुष्याची मातबरी विशेष समजतो. पहा; कोणी रोगी अगदीं आसन्नमरण होऊन पडला व त्यास औषधोपचारासाठीं डाक्तर आणिला, व त्या डाक्तरानें सांगितलें कीं तुला बरें करण्यास तुझ्या दंडावर व गळ्यावर शस्त्रानें प्रथम छेद करून मग उपाय करावा लागेल; तर तो ह्मणेल, महाराज, मला दंडावर छेद करा, परंतु कृपा करून गळ्यावर करूं नका, न जाणो कदाचित् गळ्यासारख्या मर्मस्थानीं शस्त्र लागल्यानें मरण्याची पाळी यावयाची! सारांश, इतक्या वृद्धापकाळींही त्याला जगण्याची इतकी प्रबळ इच्छा आहे! तेव्हां मनुष्याची प्रथम प्रियवस्तु आयुष्य ही होय. याचप्रमाणें वरील तिन्ही गोष्टींचीही आणखी अपेक्षा कोणता भाग्यवान् प्राणी ठेवणार नाहीं? असो; हे चारी प्रकारचे लाभ संध्येनें प्राप्त होतात, इतकी संध्येची महती आहे. सारांश, ब्रह्मरूपी हिरा आमच्या पाशींच आहे,

---

१ चित्त निरुद्ध झालें ह्मणजे तें शब्दादि विषयांकडे जाईनासे होतें, मग त्याप्रमाणें इंद्रियेंसुद्धां होतात आणि आपापल्या विषयाचें ग्रहण करित नाहींत, त्यास प्रत्याहार ह्मणतात. २ नाभिचक्र इत्यादि विशषस्थळीं चित्त स्थिर करणें ह्यास 'धारणा' ह्मणतात. ३ ज्यावर चित्ताची धारणा केली असेल, तेथेंच त्याची एकाग्रता होऊन दुसरीकडे न जाऊं देणें ह्यास 'ध्यान' ह्मणतात. ४ ध्यान जेव्हां ध्येयस्वरूपाकार होऊन, अन्य पदार्थांचें ज्ञान निराळें ह्मणून कांहींच राहत नाहीं, ह्मणजे ध्यान व पदार्थ ह्या दोहोंचा एकाकार होतो, तेव्हां त्यास 'समाधि' असें ह्मणतात. ५ श्रीभगवान् पतंजलीनें "यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाधयोऽष्टावंगानि" अशीं योगाचीं ( ब्रह्मविद्येचीं ) मुख्य ८ अंगें सांगितलीं आहेत. त्यांपैकीं पहिलीं जीं दोन अंगें ( यम व नियम ) त्यांचा, हठयोगप्रदीपिका इत्यादि ग्रंथांत, विस्तार वर्णिला असून, यमाचे अहिंसादि १० प्रकार, व नियमांचे तप इत्यादि १० प्रकार सांगितले आहेत. त्यांस अनुसरून त्या दोहों मिळून २० अंगें व बाकीचीं आसनादि मुख्य ६ अंगें, अशीं एकंदर २६ अंगें कल्पून, श्रीस्वामींनीं ब्रह्मविद्येच्या वर्णमालेची समर्पक योजना केली आहे. प. स. बि.

परंतु तो दाखविण्यास सद्गुरु मात्र पाहिजे. उदाहरणार्थ—एकदा एक धनगर मेंढ्या चारणीस घेऊन रानांत गेला असतां दैववशात् त्यास एक हिरा सांपडला, परंतु त्यास त्याची परीक्षा न होऊन त्यानें चिंधी घेऊन तो एक सुरेख गारगोटीसारखा कांहीं तरी पदार्थ आहे असें समजून आपल्या बकरीच्या गळ्यांत बांधला. पुढें कांहीं दिवसांनीं त्या ठिकाणीं दुष्काळ पडला. लोक अन्नास अगदीं मोताद झाले. त्या वेळीं या बिचाऱ्याची काय स्थिति!! पावशेर तांदूळही मिळेनात. अशा समयास तो क्षीण होऊन घरांत पडला असतां, त्याचा कोणी मित्र परदेशाहून आला. त्यानें आपल्या प्रिय मित्राची ही कठिण अवस्था पाहून तो बहुत कष्टी झाला! इतक्यांत ती बकरी सहज त्या मित्राच्या नजरेंत येऊन तिच्या गळ्यांत बांधलेलें रत्नही त्याच्या नजरेस पडलें. तेव्हां त्यानें विचारिलें, हे मित्रा, ही बकरी कोणाची व इच्या गळ्यांत हें तूं काय बांधिलें आहेस? त्यानें उत्तर दिलें, ही बकरी माझी आहे व इच्या गळ्यांत मी अमुक वस्तु अमुक तऱ्हेनें बांधिली आहे. तेव्हां तो ह्मणाला, हे मित्रा, ही क्षुल्लक वस्तु नव्हे, हा हिरा आहे. हा तूं बाजारांत घेऊन जाशील तर तुला सहजीं याच्या २०—२५ हजाराच्या किंमतीचे ठिकाणीं निदान निमे किंमत तरी प्राप्त होईल, त्याप्रमाणें त्यानें बाजारांत जाऊन तो हिरा विकला, तेव्हां त्यास उत्तम धनप्राप्ति होऊन त्याचा त्या दुष्काळापासून बचाव झाला व उलट तो मोठा श्रीमान् झाला; तद्वत् ब्रह्मरूपी रत्न आह्मां सर्व मनुष्यांच्या गळीं बांधिलेलें आहे, परंतु त्याची आह्मांस ओळख व खरी किंमत माहीत नसल्यामुळें आह्मांस ही अशी दीनदशा प्राप्त झाली आहे; तथापि आशा आहे कीं, सद्गुरूची प्राप्ति झाल्यानें आह्मांस तिची खरी किंमत कळून आह्मांस वरील चारी प्रकारचे लाभ होतील.

सारांश, संध्या हीच ब्रह्मविद्येस पोंचविणारी असून तिचा योग्य मार्ग समजण्यासाठीं आह्मीं उत्तम तऱ्हेनें यत्न केला पाहिजे. आतां आह्मीं संध्या केल्यानें आम्हांस जर हे चार फायदे होणार आहेत, तर ती योग्य रीतीनें होण्यासाठीं प्रथमतः आमच्या शरीराची रचना कशी आहे, याचें दिग्दर्शन करितों.

पृथिव्यादि पंचतत्वें या स्थूल शरीराच्या भिंती असून चर्म, रक्त, मांस अस्थि इ० सप्तधातु हे चार ( खंदक ) आहेत. चतुर्दलचक्र—षट्दलचक्रादि हे सात मजले असून ३॥ लाख नाड्यारूपी खोल्या आहेत. हे सात मजले खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ ला.—गुदस्थान व जननेंद्रिय यांच्या मध्यभागीं चतुर्दलचक्र[1] ( Pelvic Plexus ).

२ रा.—नाभिस्थानाच्या खालीं लिंगाच्या पश्चिमभागीं षट्दलचक्र[2] ( Hypogastric Plexus ).

३ रा.—नाभीमध्यें दशदलचक्र[3] ( Epigastric Plexus ).

४ था.—हृदयामध्यें द्वादशदलचक्र[4] ( Cardiac Plexus ).

५ वा.—कंठामध्यें षोडशदलचक्र[5] ( Corotid Plexus ).

६ वा.—भृकुटिस्थानीं द्विदलचक्र[6] ( Medulla Oblongata ).

७ वा.—मस्तकांत सहस्रदलचक्र[7] ( Brain ).

येणेंप्रमाणें हे सात मजले होत. कोणास शंका येईल कीं, शरीराच्या आंत हीं कमळें किंवा त्यांच्या पाकळ्या किंवा चक्रें ह्मणजे हा काय प्रकार आहे? खरोखरीचीं कमळें किंवा चक्रें वगैरे आहेत कीं काय? तर असें नाहीं. ह्या आकृति ह्मणजे निरनिराळ्या नाड्या एकत्र होऊन

---

१ यास 'आधारचक्र' ह्मणतात. याचा अधिष्ठाता ह्मणजे त्यामध्यें राहणारी देवता भगवान् गणेश आहे. व या चक्रांत ज्योतिष्मती भगवती कुंडलिनी आहे.

२ यास 'स्वाधिष्ठानचक्र' ह्मणतात. त्याची देवता भगवान् ब्रह्मा.

३ यास 'मणिपुरचक्र' ह्मणतात. त्याची देवता भगवान् विष्णु.

४ यास 'अनाहतचक्र' ह्मणतात. त्याची देवता भगवान् शंकर.

५ यास 'विशुद्धिचक्र' ह्मणतात. त्याच्या डाव्या बाजूस इडा, उजवीकडे पिंगला आणि मध्यभागीं सुषुम्ना आहेत. याची देवता रुद्र.

६ यास 'आज्ञाचक्र' असें ह्मणतात. कोणी 'बिंदुस्थान' असेंही ह्मणतात.

७ यास 'ब्रह्मचक्र' ह्मणतात. यांत संविद्रूप सच्चिदानन्द आहे.

त्यांचें जें जाळ बनलें आहे, त्याचा आकार याप्रमाणें बनलेला आहे.* असो. टरबुजाच्या देठाप्रमाणें मस्तकावरील लांब शिखा हा निवळ मूर्खतेचा प्रकार होय असा कित्येक परधर्मी लोक उपहास करितात. परंतु सनातनधर्मांत ती मुख्य मुद्याची गोष्ट आहे. जसा किल्ल्यांतील महत्वाच्या जागीं ह्मणजे राजाच्या सिंहासनाजवळ अगर तिजोरी ठेविलेल्या स्थळीं चोहींकडून संत्राच्या पहाऱ्याचा बंदोबस्त असून ध्वज फडकत असतो, त्याप्रमाणें ब्रह्मरूपी हिरा मस्तकांतील सहस्रदलचक्रांत चोहींकडून बंदोबस्तांत असून तेथें तद्दर्शक शिखारूप ध्वज फडकत आहे. आणि ह्मणूनच त्या हिऱ्याच्या प्राप्तीसाठीं, जेव्हां आपण संध्या करण्यास प्रवृत्त होतों, तेव्हां प्रथमतः ब्रह्मसूचक गायत्रीमंत्रानें शिखाबंध सांगितला आहे.

वर वर्णन केलेल्या एकंदर शरीररूपी किल्ल्यांत परमात्मरूपी हिरा आहे. तो घेण्याकरितां जणूंकाय जीवरूपी चोर रात्रंदिवस प्रयत्न करीत असतो, त्यास एकामागून एक वरील तट, खंदक व मजले इत्यादिकांचा अटकाव होतो. सामान्य जीवाच्यानें ह्यांचा भेद होऊं शकत नाहीं. कदाचित् त्यानें थोडा प्रयत्न केला व त्याची दिशा योग्य नसली ह्मणजे वरील पंचतात्विक भिंतीमध्यें किंवा रक्तमांसादि खंदकांमध्यें ताप, खोकला वगैरेनीं बिघाड होऊं लागतो व त्यामुळें एक तऱ्हेचा घोंटाळा व अस्थैर्य उत्पन्न होऊन प्रसंगीं संपूर्ण देहाचाही नाश होण्याची भीति असते. प्राचीन काळीं वाल्मिक्यादि ऋषींच्या शरीरावर वारुळें वगैरे वाढलीं तरी त्यांची बिलकुल पर्वा न करितां ते ब्रह्मपदीं मग्न असत, परंतु तशी शक्ति आज आह्मांमध्यें राहिली नाहीं. आमच्यांत अशी शक्ति न राहण्याचें कारण काय? पूर्वीचे लोक काय ईश्वरास लांचरुसवत देत होते व आतां आह्मीं देत नाहीं, ह्मणून तो आमच्याशीं अशी प्रतारणा करितो?

---

* हीं जीं चक्रें व त्यांचीं दलें ह्मणून सांगितलीं, त्यांत चक्रें ह्मणजे सुषुम्नेबरोबर संबद्ध झालेले एका प्रकारचे शिराग्रंथि, यांनाच 'पद्में' ह्मणतात. व या ग्रंथींचे जे सूक्ष्म शिरातंतु, त्यांला 'दल' असें ह्मणतात.

चक्रादिकांचें विस्तृत स्वरूप गरुडपुराणांत वर्णिलें आहे; सबब, इच्छा असेल त्यांनीं तें तेथें पहावें. प. स. वि.

तर असें नव्हे, आमचे प्राचीन पूर्वज ज्या नैष्ठिक तऱ्हेनें राहत होते, ती नैष्ठिकवृत्ति आमच्यांतून गेल्यामुळें आमची अशी हीन स्थिति झाली आहे.

जरी अशी स्थिती झाली आहे, तरी आम्हीं प्रयत्न केला असतां आह्मांस पुष्कळ सुधारणा करितां येईल. आतां ज्याप्रमाणें व्यवहारांत एकाद्या राजाची भेट करून घ्यावयाची असतां, प्रारंभीं द्वारपाळाशीं संधान बांधलें ह्मणजे युक्तीनें काम होतें; त्याचप्रमाणें ह्या शरीररूपी गृहांचा जो प्राणरूपी मुख्य द्वारपाळ त्याच्याशीं आह्मांला संधान बांधिलें पाहिजे, ही गोष्ट कोणीही कबूल करील. इंद्रियादि गणांत प्राण हाच श्रेष्ठ होय. छांदोग्य उपनिषदांत सांगितलें आहे कीं:—

**यो ह वै ज्येष्ठं च श्रेष्ठं च० ॥ १–५॥ अथ ह प्राणा अहं् श्रेयसि व्यूदिरेऽहं् श्रेयानस्म्यहं् श्रेयानस्मीति ॥ ६ ॥ ते ह प्राणाः प्रजापतिं पितरमेत्योचुर्भगवन् को नः श्रेष्ठ इति तान्होवाच यस्मिन्व उत्क्रान्ते शरीरं पापिष्ठतरमिव दृश्येत स वः श्रेष्ठ इति ॥ ७ ॥ सा ह वागुच्चक्राम सा संवत्सरं प्रोष्य पर्येत्योवाच कथमशकतर्ते मज्जीवितुमिति यथा कला अवदन्तः प्राणन्तः प्राणेन पश्यन्तश्चक्षुषा शृण्वन्तः श्रोत्रेण ध्यायन्तो मनसैवमिति प्रविवेश ह वाक् ॥ ८ ॥ चक्षुर्होच्चक्रा० ॥९–११॥ अथ ह प्राण उच्चिक्रमिषन् स यथा सुहयः पड्वीशशंकून्संखिदेदेवमितरान् प्राणान्समखिदत्तं् हाभिसमेत्योचुर्भगवन्नेधि त्वं नः श्रेष्ठोऽसि मोत्क्रमीरिति ॥ १२ ॥ अथ हे० ॥ १३–१५ ॥**

**पञ्चमाध्याये प्रथमः खण्डः ।**

हा संवाद फार मोठा आहे, परंतु याचें तात्पर्य असें आहे कीं, “ एकदा सर्व इंद्रियादिकांत, श्रेष्ठ कोण या विषयीं वाद उपस्थित होऊन, तीं निर्णयासाठीं ब्रम्हदेवाकडे गेलीं, तेव्हां त्यानें सांगितलें तुमच्यांतून एक एक जण एक एक वर्षपर्यंत शरीरांतून बाहेर जा ह्मणजे ज्याच्या अभावीं काम अटकेल त्यास मी श्रेष्ठ समजेन. त्याप्रमाणें सर्व इंद्रियें पाळीपाळीनें बाहेर निघून गेलीं. तरी काम अडलें नाहीं. डोळे गेल्यावर आंधळ्याप्रमाणें, इत्यादि सर्व व्यवहार निभावितां आला. परंतु शेवटीं

"सोहं, सोहं" करणारा प्राण हाच श्रेष्ठ ठरला, कारण कीं, ह्याची जरा चलबिचल होतांच सर्वांचे व्यापार थंड होऊं लागून शरीर पंचतत्वांस मिळूं लागलें ( नष्ट होऊं लागलें ). तेव्हां सर्व इंद्रियांनीं प्रार्थना केली कीं हे प्राणा, तूं आमच्यांतून जाऊं नको. सारांश, हाच श्रेष्ठ ठरून त्यासच शरीराचा द्वारपाल बनविलें. हा आपला पहारा जागेपणींच करितो असें नाहीं, तर निजल्यावरही करितो व त्या वेळीं चोंहींकडे सामसूम असल्यामुळें जणू काय चोरांची भीति जास्त असें समजून आपलें काम मोठ्या जोरानें चालवितो. तेव्हां याच्याशीं मित्रत्व केल्यानें परमात्मरूपी हिरा सहज हस्तगत होईल. प्राणाशीं मित्रता करणें ह्मणजे प्राणायाम करणें होय. व तो प्राणयाम आपणांस संध्येंतच शिकावा लागतो, ह्मणून संध्या हीच आमच्या ब्रह्मप्राप्तीचें साधन होय. इच्याच द्वारानें आह्मांस ईश्वरप्राप्ति होणार आहे. मात्र ही संध्या यथासांग झाली पाहिजे. हल्लींचा जसा लटापटीचा प्रकार चालतो, तसा चालविणें इष्ट नाहीं. प्राणायाम ह्मणजे बसले पाटावर, कीं लावला नाका कानाला हात, सोडलें थोडें पाणी, ह्मणतात एकीकडे गायत्री मंत्र, अवधान लागलें चुलीकडे, भाजी शिजली काय, वरण करपलें तर नाहींना, भात टाकिला पाहिजे, इत्यादि तोंडानें नुसते गायत्री मंत्र ह्मणून त्या परमात्म्याचें मी ध्यान करितों वगैरे अर्थात्मक बोलावयाचें; परंतु लक्ष असतें दुसरीकडे; तेव्हां असें करणें ह्मणजे अर्थात् एकाद्यानें जाग्यावर बसून मी हलावयाच्या दुकानांतले खातों पेढे, खातों बरफी, खातों जिलब्या, खातों लाडू इत्यादि म्हटल्याप्रमाणें फक्त शुष्काशुष्की प्रकार होतो. तर असा प्रकार सोडून देऊन वास्तविक प्रकारच स्वीकारला पाहिजे, ह्मणजे आत्मोन्नति होणार आहे. असो.

याप्रमाणें प्राणायामाची महती आहे. तो प्रारंभीं योग्य रीतीनें करण्यास कठीण जाणार आहे, तथापि अभ्यासानें सर्व कांहीं सिद्ध होणार आहे. याकरितां आरंभीं जरी कष्टद गोष्ट असली, तरी परिणामीं ती सुखद असल्यामुळें तिचा स्वीकार करणें, हें सुज्ञपणाचें लक्षण होय. परंतु अज्ञान्यास त्याची महती कळणार नाहीं. मुलास शाळेंत घातल्यावर पंतोजी मुळाक्षरें शिकवूं लागला असतां तीं त्यास प्रथम कष्टद वाटून इतका कंटाळा येतो कीं, हा बापही मरो व हा पंतोजीही मरो !

परंतु अखेरीस तो जेव्हां मोठमोठ्या परीक्षा पास होऊन ओझींच्या ओझीं पगार आणितो, तेव्हां बहुत आनंदित होत्साता म्हणतो कीं धन्य माझे गुरु व धन्य माझे मातापिता ! ! ब्रह्मविद्येचीही गोष्ट तशीच आहे. प्रारंभीं यम, नियम, आसन, प्राणायामादि कृत्यें जरी कठीण वाटतात, तरी अभ्यासानें तीं अंगवळणीं पडून शेवटीं त्यांपासून खऱ्या सुखाचा लाभ होतो.

वर सांगितलेंच आहे कीं, ब्रह्मविद्येचीं १६ अक्षरें आहेत. जशी कोणतीही भाषा शिकावयाची ह्मणजे तिच्यांतील संपूर्ण वर्णमाला शिकली पाहिजे व ती शिकल्यानंतरच ती भाषा आपल्यास अवगत होते, तद्वत् ब्रह्मविद्येच्या प्राप्तीकरितां तिचे अहिंसा, सत्य इत्यादि वर्णही शिकले पाहिजेत. यांपैकीं अहिंसा तर स्वराप्रमाणें असून तिच्याशिवाय व्यंजनाच्या जागीं असलेल्या इतर गुणांचें कांहींच चालावयाचें नाहीं. ( अहिंसा हा विषय मी माझ्या एकाद्या खास व्याख्यानांत घेऊन तो प्रतिपादन करीन, कारण तो विस्तारात्मक असून त्यास वेळही लागणार आहे. ) तेव्हां आतां या ब्रह्मविद्येच्या वर्णमालेंतील दुसरा वर्ण जो सत्य त्याचें मी प्रतिपादन करितो.

मनुष्यानें सदासर्वदा सत्यच बोललें पाहिजे. सत्य जर नसेल तर या जगातील व्यवहार चालणार नाहींत व पदोपदीं अव्यवस्था होऊन समाजस्थिति व कौटुंबिकस्थितिही बिघडेल. करितां हा गुण ब्रह्मविद्यासंपादकांनीं अवश्यमेव संपादन केला पाहिजे. श्रीमनूने सांगितलें आहे कीं:—

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयान्नब्रूयात्सत्यमप्रियम् ।
प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ॥

ह्मणजे सत्य बोलावें, गोड बोलावें. व सत्य बोलणें तेंही दुसऱ्यास कठोर न वाटेल अशा रीतीनें बोलावें ह्मणजे त्या योगानें कोणाच्या मनास उद्वेग होऊं नये. उद्वेग झाला असतां सत्य बोलणारा उलटा दोषास कारणीभूत होतो. यास उदाहरण. कोणी मनुष्य १॥ शेराचा आहार करित असल्यास, त्यास कोणी जर ह्मणेल कीं आपण खूप १॥ शेरावर ताव देणारे गृहस्थ आहांत, तर यद्यपि हें बोलणें खरें आहे, तरी त्या योगानें त्या दुसऱ्या मनुष्यास राग येणार आहे. त्यापेक्षां जर अशी भाषा वापरली कीं साहेब, आपली पचनशक्ति इतरापेक्षां चांगल्या प्रका-

रची आहे, तर या दुसऱ्या वाक्यानें उलट त्यास स्वतःबद्दल भूषण वाटणार आहे. तसेंच न्यायाधीश देखील फांशीच्या कैद्यास जेव्हां हुकूम समजावितो, तेव्हां तो सुनाविल्यावर मागाहून ह्मणतो कीं, तुझ्यासारख्याच्या मनुष्यदेहाची मला फार दया येऊन तुला या शिक्षेपासून मुक्त करावें असें मला वाटतें, परंतु काय करूं? कायद्यानें मला बद्ध केल्यामुळें नाइलाज आहे, तेव्हां त्याच्या निर्वाणप्रसंगींही त्या न्यायाधीशाबद्दल त्याचा चांगला ग्रह होतो. सारांश, सत्य असून तें प्रिय वाटेल अशा रीतीनें बोलावें. असें होतां होतां कदाचित् तोंडपुजेपणाची संवय लागून मनुष्य असत्यही बोलूं लागेल, यास्तव पुढें मनु महाराज असें सांगतात कीं, प्रिय असून खोटें असेल, तर तें कधींही बोलूं नये. हा एकंदर सत्य बोलण्याचा महत्वाचा नियम ध्यानांत ठेविला पाहिजे. याविषयीं एक गोष्ट आहे:—

एका गृहस्थास वांग्याची भाजी फार आवडत असे, ह्मणून तो आपल्या चाकरास ह्मणाला, देवानें ही भाजी मनुष्याकरितां केली आहे, ही फार चांगली गोष्ट आहे. तेव्हां तो सेवक धन्याची मर्जी पाहून बोलतो, होय साहेब, ह्मणूनच परमेश्वरानें या उत्तम फळाच्या डोक्यावर छत्र ठेवलें आहे. त्या रात्रीं गृहस्थानें खूप वांग्याची भाजी खाल्ली व सकाळीं त्यापासून विकार उत्पन्न होऊन दुःख होऊं लागलें, तेव्हां तो गृहस्थ ह्मणतो, कसली ही वाईट भाजी पैदा केली कोण जाणे! त्यावर तो खुशामत्या सेवक ह्मणतो, होय हुजूर, ह्मणूनच परमेश्वरानें शिक्षेदाखल त्याच्या डोक्यांत कांटे भोंसकून ठेविले आहेत. यावर तो यजमान विस्मित होऊन ह्मणतो, काय रे, तूं काल वांग्यास छत्र दिलें ह्मणून तारीफ करित होतास व आज अशी निंदा करितोस, तेव्हां तुझें खरें काय समजावें? त्यावर तो ह्मणतो, हुजुर मी थोडाच वांग्याचा नोकर आहें? मी हुजुराचा ताबेदार ह्मणून मी हुजुरास प्रिय तेंच बोलतों. सारांश, असल्या तऱ्हेचें असत्यमिश्रित तोंडदेखलें सत्य वर्जावें हें उत्तम. परंतु आजकाल असा तोंडपुजेपणाचा प्रकार फार वाढला आहे. त्या योगानें समाजाचें फार नुकसान होत आहे. जिकडे तिकडे व ज्या त्या कामांत लोक Policy वापरूं लागले आहेत; परंतु जेव्हां ही पॉलिसी बंद पडेल, तेव्हांच समाजाचें

कल्याण होणार आहे, व ब्रह्मविद्येंत तर असा खोटेपणाचा लेशही कामाचा नाहीं. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, ज्यास अशी खोटें बोलण्याची संवय पडली आहे, त्याची ती संवय एका दिवसांत जाणार नाहीं, तर त्यानें हा सद्गुण अभ्यासानें संपादन करून घ्यावा, म्हणजे आज २० भाग खोटें व ५ भाग खरें बोलत असलों, तर उद्यांपासून १९ खोटें व ६ खरे, आठ दिवसांनीं १८ खोटें व ७ खरें, याप्रमाणें वाढवीत वाढवीत गेलें असतां शेवटीं पंचवीसच्या पंचवीस भाग खरें बोलतां येणार आहे.

आतां कोणी यावर अशी शंका घेईल कीं, संध्येंत पातकक्षालनाचा मंत्र सांगितला आहे, तेव्हां त्याच्या साह्यानें रात्रीच्या My dear friend, take a glass for my love इत्यादि पापाचें क्षालन प्रातःसंध्येनें, व दिवसभर खोटें बोलणें, खिसे कापणें, खोटे दस्तऐवज बनविणें, गोर गरिबांच्या माना मुरगळणें इत्यादि पापाचें क्षालन सायंसंध्येनें होतें. असा जर कोणाचा समज असेल, तर तो व्यर्थ होय. संध्येंतील पापक्षालनाचा असा विपरीत अर्थ नाहीं. जपून चाललें असतांही, न कळत जर कीटकादिकांवर हातपाय पडेल, अगर एकाद्या अपरिहार्य कारणानें एकादें पाप घडेल, तर त्या क्षुल्लक पातकाकरितां ही व्यवस्था आहे. जाणून-बुजून लोकांच्या गर्दना मारून व दरोडे घालून वगैरे केलेल्या पातकांसाठीं नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेवावें.

आणखी महत्वाचा गुण ह्मटला म्हणजे अस्तेय हा होय. अस्तेय म्हणजे दुसऱ्याची वस्तु न चोरणें. ह्या गुणाचेंही परिशीलन उत्तम तऱ्हेनें केलें पाहिजे, नाहींतर पाहिजे त्याची वस्तु पाहिजे तो उपटूं लागला असतां जगांत अव्यवस्था होईल व मनुष्याचे व्यापारउदीम बंद पडतील. रानटी स्थितींतल्या पेक्षांहीं मनुष्य नीच अवस्थेंत जाऊन पडेल, करितां दुसऱ्याचा अपहार करण्याची बुद्धि सर्वथैव वर्जावी. ब्रह्मविद्या-संपादकांच्या तर ही गोष्ट स्वप्नींही येतां कामा नये. यावर एक गोष्ट अशी आहे कीं, एक स्त्री व तिचा नवरा अशीं उभयतां मार्ग क्रमित असतां नवऱ्याच्या दृष्टीस वाटेंत एक मोहोर आढळली. तेव्हां कदाचित् आपल्या स्त्रियेच्या मनांत ही घेण्याची पापवासना उत्पन्न होईल म्हणून त्यानें

ओंजळभर धूळ तिजवर टाकली. पुढें स्त्री जवळ आली तेव्हां तिणें आपण कां ओणवे झालां होतां, म्हणून भर्त्यास विचारिलें. त्याणें सांगितलें हे प्रिये ! त्या ठिकाणीं एक मोहोर पडली होती, ती घेण्याची तुला इच्छा होऊं नये, म्हणून मी तीवर धूळ टाकिली. त्या साध्वीनें उत्तर केलें, हे प्राणनाथ, आपल्या दृष्टींत अद्यापि सुवर्णाची चमक राहिली आहे; तशी नसती, तर आपण त्यावर धूळ टाकिली नसती. तेव्हां तो पुरुष म्हणाला, धन्य ! भार्ये, तुझे ठिकाणीं मजपेक्षां अस्तेयधर्म जास्त वसत आहे. सारांश, अशी मनोवृत्ति झाल्यावांचून ब्रह्मविद्या संपादन होऊं शकणार नाहीं.

याचप्रमाणें धृति हा गुणही परम आवश्यक होय. पुराणांतील विश्वामित्रासंबंधाचें महात्म्या वसिष्ठाचें धैर्य सुप्रसिद्धच आहे. स्वतःचे शंभर पुत्र मारिले, तरी त्या ब्रह्मर्षीचें धैर्य खचलें नाहीं. ब्रह्मविद्यासंपादनांत अनेक प्रकारच्या व्यावहारिक व दैविक अडचणी येतील, परंतु त्यात जराही डगतां कामा नये. जरी आकाश कोसळलें तरी धैर्य सोडणार नाहीं, अशी वृत्ति दृढ राहिली पाहिजे. या सद्गुणाविषयीं महाभारतांत एक अत्यंत रसभरित गोष्ट आहे, तिजकडे आपण सर्व अवधान ठेवाल, तर या सद्गुणाची काय महती आहे, ती सहज आपल्या ध्यानांत येणार आहे. ती गोष्ट अशीः—

ज्या वेळीं महाराज धर्मराजानें अश्वमेधयज्ञासाठीं श्यामकर्ण वारू सोडिला होता, त्या वेळीं तो जातां जातां ताम्रध्वज राजाचे नगरासमीप आला. तो येतांच त्याचा पुत्र जो मयूरध्वज त्यानें त्यास पकडलें; मागाहून अर्जुन व कृष्ण त्या घोड्याच्या रक्षणार्थ येत होते, त्यांस वरदी लागली कीं, ताम्रध्वजाचे राज्यांत आपला अश्व पकडला गेला आहे. तेव्हां तो सोडून देण्याविषयीं त्यास निक्षून सांगितलें, परतु त्यानें ती गोष्ट नाकबूल करून पुत्र मयूरध्वज यास अर्जुनाशीं क्षात्रधर्माप्रमाणें युद्ध करण्यास पाठविलें. युद्ध घोर चालून राहिलें, तेव्हां त्या गर्दींत अर्जुनानें मयूरध्वजाचा रथ १०० हात मागें सारावा व मयूरध्वजानें अर्जुनाचा रथ २ हात मागें सारावा, असा क्रम चालला. जेव्हां मयूरध्वज रथ मागें सारी, तेव्हां कृष्णांनीं त्यास शाबासकी द्यावी. तें अर्जुनास सहन न होऊन त्यानें क्रोधाविष्ट होऊन भगवंतास याचें कारण विचारलें कीं,

मी १८० हात मयूरध्वजाचा रथ मागें सारीत असतां उलट आपण त्यासच शाबासकी देतां हें कसें ? प्रभु ह्मणाले, हे अर्जुना, पहा, याचा रथ ह्मणजे सामान्य लाकडाचा व त्यास सामान्य घोडे जोडलेले, परंतु तुझा रथ दैवी असून त्यावर सर्व ब्रह्मांडांचा भार घेऊन मी बसलो आहें, तर अशा ह्या जड प्रस्थास हा मागें हटवीत आहे, हें मोठेंच आश्चर्य होय. तेव्हा तो निरुत्तर होऊन विचारूं लागला कीं, याचे ठिकाणीं हा पराक्रम कोठून आला ? त्यावर कृष्ण ह्मणाले बाबा, याचे पित्याचे अंगीं धृति हा गुण अत्यंत वसत आहे, त्याचें हें फळ होय. तेव्हां अर्जुनानें ह्मटलें कीं, हे कसें, याची परीक्षा मला दाखवावी. तेव्हां त्याचें समाधान करण्यासाठीं श्रीकृष्णांनीं लागलेंच साधूचें स्वरूप घेतलें. अर्जुनास चेला बनवून बरोबर एक मायावी सिंह घेतला व ताम्रध्वजाच्या राजवाड्यांत आले. द्वारपाळांनीं अतिथि आल्याची राजास वर्दी दिली, तेव्हां राजा परम संतुष्ट होत्साता त्यांस आंत बोलावून आसनादि देऊन विनंति करिता झाला कीं, हे साधो, आपली काय इच्छा आहे ? त्यावर साधुजींनीं सांगितलें कीं, माझ्या या सिंहास नरमांसभक्षणाची इच्छा आहे राजा अतिथींचा सत्कार करण्याविषयीं परम दक्ष असल्यामुळें त्यानें सांगितलें ठीक आहे; खुनाचा गुन्हा केल्यामुळें फाशीस जाणारे कैदी आहेत, त्यांतून आपल्यास देतों आणून एकादा. तेव्हां साधूंनीं सांगितलें, असल्या अमंगल मांसाची मला अपेक्षा नाहीं. मला तुझ्या एकुलत्या एक सुकुमार मयूरध्वजाच्या उजव्या अंगाच्या मासांची अपेक्षा आहे, तेव्हां बोल लवकर काय तें ? राजानें गोष्ट कबूल केली. घरांत जाऊन राणीची संमति घेतां तिणेंही सांगितलें, कांहीं हरकत नाहीं. साधूकरितां असा योग येत आहे, तर कांहीं चिंता नाहीं. पुढें पुत्रास बोलावून विचारितां तो ह्मणाला, हे तात ! हा देह कधीं तरी जाणारा आहे, तेव्हां हाल अपेष्टेत व दुःखांत लोळून मरण्यापेक्षां साधुसंतांच्या कारणीं हा देह लागेल, तर सर्व प्रकारें त्याचें सार्थक तरी होईल, यास्तव मला ही गोष्ट उत्तम वाटत आहे, तरी मजकडून तयारी आहे. तदनंतर राजानें सांगितलें कीं, उठावें व स्नानादि उरकून नरमांस ग्रहण करावें. तेव्हां त्याप्रमाणें सर्व झाल्यावर, वधाकरिता पुत्रास मजसमोर घेऊन ये अशी साधुजींनीं आज्ञा केली. प्रधाना-

दिकांनीं संपूर्ण कचेरी भरलेली असतां अतिथि ह्मणाला, तुह्मीं याच्या मस्तकावर करवत धरून यास कापलें पाहिजे व जर तिघांतून कोणाच्याही नेत्रांस यत्किंचित् अश्रु आले, तर मी तें मांस न घेतां चालता होईन. तिघांनींही त्याप्रमाणें कबूल केलें, परंतु संपूर्ण दरबारी लोकांस त्यामुळें पराकाष्ठेचें दुःख होऊन ते रडूं लागले व आज आमच्या राजवंशाचा उच्छेद होतो ह्मणून हळहळूं लागले आणि एकदम सर्वांच्या मुखावाटे रामनामोच्चारणघोष मोठ्यानें सुरू झाला.

इकडे राजाराणींनीं मुलाचे डोक्यावर करवत धरून कापण्यास सुरवात केली. कापतां कापतां नाकापर्यंत करवत आल्यावर डाव्या डोळ्यांतून किंचित् अश्रुस्राव होऊं लागला, तेव्हां अतिथि म्हणाला, हां, हात आटोपा, हात आटोपा, हा पुत्र रुदन करतो, त्यापक्षीं मला या मांसाची आतां अपेक्षा नाहीं ! तेव्हां मयूरध्वज करुणस्वरानें ईश्वराचा धांवा करून ह्मणूं लागला, हे करुणानिधे, हे विश्वंभर, हे श्यामसुंदर, भगवान्, दीनवत्सल, आतां आमचा तूं किती अंत पहाणार ! पहा, माझें हें शरीर मी या अतिथीच्या सत्कारार्थ देत असतां हे, फक्त माझ्या उजव्या अंगाचाच स्वीकार करितात, त्यामुळे त्याचें सार्थक होत आहे, परंतु डावें अंग तसेंच राहिल्यामुळें त्याचें सार्थक होऊं शकत नाहीं; ह्मणून डाव्या नेत्रांतून अश्रु गळत आहेत ! हें श्रवण करून अतिथीनें ह्मटलें कांहीं हरकत नाहीं, दोहोंचाही मी स्वीकार करितों. अखेर सर्व कापल्यावर त्याचे खंड खंड करून सिंहापुढें टाकले. इकडे पाकसिद्धि झाल्यावर ताम्रध्वजानें पात्र वाढिलें, तेव्हां अतिथि ह्मणाला तूं, राणी व पुत्र असे त्रिवर्ग मजसमोर जेवण्यास या. त्या वेळीं राजा विव्हल होऊन सांगूं लागला कीं पुत्राची तर आपले देखतांच सद्गति लागली आहे, तेव्हां कसें करावें ? त्यांनीं सांगितलें कांहीं हरकत नाहीं; घरांत जा व शोध करून बोलावून आण. साधुवचनावर पूर्ण श्रद्धा असल्यानें त्याप्रमाणें राजानें घरांत जाऊन पाहिलें. तों, तो पलंगावर निद्रिस्त झालेला आढळून आला, तेव्हां त्यास उठवून आणिलें ! ! ! तो येतांच वरून पुष्पवृष्टि झाली व श्रीकृष्णांनीं दर्शन देऊन त्या त्रिवर्गास पावन केलें. अर्जुन बिचारा गप्प बसला होता, त्यानें एक अक्षरही मुखावाटे काढलें नाहीं. शेवटीं

श्रीकृष्णांना वर मागण्याविषयीं आज्ञा केली, तेव्हां तत्रस्थजानें ह्मटलें कीं कलियुगांत धैर्याची अशी इतकी प्रखर परीक्षा कोठेंही होऊं नये ! !

याप्रमाणें धृतीची महती आहे. पुढील व्याख्यानांत अहिंसेबद्दल निरनिराळ्या शास्त्रांच्या व पंथांच्या दृष्टीनें विशेष विचार केला जाईल. ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

---

## व्याख्यान ३ रें.

### विषय—अहिंसा.

ईशस्तवन.

**त्वदीयशक्त्या निखिलं चराचरं शक्त्यान्वितं भाति सकार्यकारणम् ॥**
**त्वं कारणानामसि कारणं प्रभो ह्यात्मस्वरूपेण जगत्प्रविष्टः ॥ १ ॥**

याप्रमाणें ईशस्तवन केल्यावर स्वामी महाराज ह्मणाले:—

या सनातनधर्मरूपी जहाजांत बसलेल्या उतारूंस, मी भगवत्पादरूपी पैलतीरास नेऊन पोहोंचविण्याचा यत्न करितों.

ब्रम्हविद्येच्या प्राप्तीकरितां संध्या, ही अत्यावश्यक असून, तदंगभूत अहिंसादि धर्मांचेंही पालन अवश्य झालें पाहिजे, असें कालच्या व्याख्यानांत सांगितलें व त्याप्रमाणें अहिंसादि धर्मांपैकीं सत्य, अस्तेय व धृति याविषयींही संक्षिप्त विवचन केलें. आतां, आज रोजीं खास 'अहिंसा' या विषयावर प्रतिपादन करण्याचा विचार आहे.

पवित्र अशा सनातनधर्मांत अहिंसेला यत्किंचितही स्थळ नसून, उलट सर्वत्र तृप्ति राहावी म्हणून ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ व अतिथियज्ञ असे पांच प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. प्राचीन काळीं हे यज्ञ यथाविधि केले जात असत, परंतु सांप्रत ते पंचमहायज्ञ होत नसल्यामुळें त्या

त्या देवता क्षुब्ध होत आहेत व तेणेंकरून आपलें बहुत नुकसान होत आहे. पंचमहायज्ञ करणें तर दूरच राहिलें, परंतु उलट, लोक नानातऱ्हेची हिंसा करून पापाचरण करित आहेत.

हिंसा शब्दाचा अक्षरशः अर्थ ' आपल्या सुखाकरितां दुसऱ्याचा जीव घेणें ' असा होतो. परंतु व्यापक अर्थ म्हटला म्हणजे त्यांत एकाद्यास ताडन करणें, किंवा त्याची निंदा करणें किंवा अन्य कोणत्याही प्रकारानें त्यास दुःख होई, असें करणें, या सर्वांचा समावेश होतो. यावरून, केवळ दुसऱ्याचा जीव घेणें, यासच हिंसा म्हणतात असें नाहीं, तर परपीडाजनक कोणतेंही कृत्य करणें, हा हिंसाच होय. आणि ती हिंसा सर्वथा वर्ज्य करणे, यास अहिंसाधर्म म्हणतात.

यावर आतां कोणी म्हणेल कीं, श्रीभगवद्गीतेंत " **नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः** " असें म्हटले आहे, त्यावरून कोणासही मारल्यानें आत्मा मरत नाहीं, तेव्हां यात हिंसा कशाची ? हें म्हणणें खरें आहे, परंतु देहाच्या आश्रयानें राहणारा जो आत्मा, त्यास जीव म्हणतात, व त्यास संसारांतील सुखदुःखादि भाव होतात, म्हणून परक्या जीवास कोणत्याही प्रकारें दुःख देणें ही हिंसाच होय.

**अनुमन्ता विशसिता निहन्ता क्रयविक्रयी ॥**
**संस्कर्ता चोपहर्ता च खादकश्चेति घातकाः ॥**

**मनुस्मृति—पञ्चमाध्याय.**

मनु म्हणतो, ' जो निरपराधी प्राण्यास आपल्या सुखासाठीं दुःख देतो, तो इहपरलोकीं दुःखी होतो. ' शिवाय मनूने असेंही सांगितलें आहे कीं, जो प्रत्यक्ष दुसऱ्या प्राण्याचा वध करितो, तोच केवळ पातकी होतो असें नाहीं, तर त्या कामांत कोणत्याही प्रकारें जो संबंध ठेवितो, तोही पातकी होतो.

म्हणजे हिंसेस अनुमति देणारा, कापून खंड खंड करणारा, प्रत्यक्ष गळा उडविणारा, मांस विकणारा, तें विकत घेणारा, मसाला घालून शिजविणारा, आणून वाढणारा व खाणारा, हे आठ ' **घातक** ' या संज्ञेस पात्र होतात. म्हणजे हिंसेविषयीं पातकी होतात. हें ऐकून सुधारक

मंडळी म्हणेल कीं, आम्ही थोडाच प्रत्यक्ष वध केला आहे. मांस देणें, घेणें, शिजविणें, खाणें, यांत आमचा कसला गुन्हा आहे ? Manu was foolish enough to lay down such a rule ! ! [ टाळ्या ] परंतु प्रिय मित्रहो ! ज्या कायद्याचा आपल्यावर सांप्रत अंमल चालत आहे व ज्यांवर आपला पूर्ण विश्वास आहे, त्या कायद्याचें तत्त्वही असेंच आहे. पहा कीं, एकाद्या ठिकाणीं जेव्हां खून घडतो, तेव्हां तेथें एक मनुष्य प्रथम त्यास युक्तीनें बोलावून विवक्षित स्थळीं नेतो, दुसरा—त्यास तेथें नेल्यावर पंख्यानें वारा घालितो, तिसरा—मोठ्या आदरानें गोड गोड गोष्टी सांगतो. चवथा—तो निद्रावश व्हावा म्हणून त्यावर गुलाबपाणी टाकितो. पांचवा—त्याच कारणाकरितां, सतार वगैरे मोहक वाद्य वाजवितो, व सहावा त्यास झोंप लागल्यावर तरवारीनें त्याचा गळा उडवितो. तर आतां न्यायाधीश, या सहाही जणांस कायद्यानें अपराधी ठरवील कीं नाहीं? अलबत ठरवील. कारण, सहाही जणांचा हेतु एकच होता. याच्याच उलट, कोणी पतोजी एकादा मुलगा धडा तयार करित नाहीं व फार खोड्या करितो, त्यास चांगला मार्ग लागावा म्हणून शिक्षा करील, तर तो पातकी होणार नाहीं.

सारांश, Good actions, done with bad motives, are bad; and bad actions, done with good motives, are good. असें कायद्याचें तत्व आहे. म्हणजे पाप किंवा पुण्य, हें विशेषतः हेतूवर अवलंबून असतें.

हें ऐकून कोणी म्हणतील कीं, ह्या सनातन हिंदुधर्मांत हिंसेवर इतका कटाक्ष आहे व हिंसेकरितां इतका प्रतिबंध आहे, त्यापेक्षां मुसलमानीधर्म स्वीकारलेला बरा; कारण, त्यांत असा प्रतिबंध नसल्यानें यथेच्छ मांसादिकांचा उपभोग घेतां येईल; तर तीही त्यांची चूकच आहे; कारण, कुराणांत सुरहज आयत ३६ मध्यें,

“ लैंइ यनाल अल्लाह लहुमहा वलादिमा
ओहा वलेकिन यना लहु अत्तक वा मिन्नकुम्

असें म्हटलें आहे. याचें तात्पर्यः—“ मांस व रक्त; परमेश्वरास पोहोंचत नाहीं [ मान्य नाहीं ]. ”

यावर प्रतिपक्षी म्हणेल, हें वचन हजचे वेळचें म्हणजे मकेच्या यात्रेस यात्रेकरू गेला असतां, तेथें मात्र त्यास हें लागू आहे. म्हणजे मुसलमानी धर्माप्रमाणें त्या ठिकाणीं एकादा क्षुद्र प्राणी कोणाच्या हातून मेला गेला, तरी पाप लागतें. त्याविषयीं हें वचन आहे, अन्य प्रसंगीं व अन्यस्थळीं तें लागू नाहीं. यावर उत्तर असें आहे कीं, कोणी कलेक्टर साहेबानें, बदमाश लोकांस जर असें सांगितले कीं, "इतउत्तर तुमची कागाळी अगर खून आमच्या नजरेस येतां कामा नये." तर याचा अर्थ "कलेकक्टरच्या नजरेबाहेर रस्यावर त्यांनीं वाटेल तशी मारामारी अगर खून करावे," असा बिलकूल विवक्षित नाहीं. त्याचप्रमाणें अमुक ठिकाणीं हिंसा करावी व अमुक ठिकाणीं करूं नये, असा त्या वचनाचा अर्थ विवक्षित नसून सर्व ठिकाणीं हिंसेचा निषेधच समजावयाचा आहे.

यावर आतां कोणी मांसाहारी ह्मणेल कीं, जर याही धर्मांत प्रतिबंध आहे, तर आतां आपण ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेऊ, तर तिकडेही त्याची निराशा होईल. कारण, बायबलांत:—"To what purpose is the multitude of your sacrifices unto me ? Said the Lord. I am full of the burnt offerings and the fat of the fed beasts. I delight not in the blood of bullocks, or of the lambs or of the goats." ( इसाया चाप्टर १ ) असें लिहिलें असून, त्यांत शेवटीं देवानें स्पष्टच ह्मटलें आहे कीं, "मी बैल, कोंकरें अगर बकरीं यांच्या रक्तानें प्रसन्न होत नाहीं."

तसेंच रोमन्स् चाप्टर १२ मध्येंः—"Behold, I have given you every herb bearing seeds and trees yielding fruits, they shall be your meat" अशी वनस्पतीच्या आहाराविषयीं आज्ञा देऊन मांसाचा निषेध केला आहे व पुढें "हे तुमचे हात रक्तानें भरले आहेत, तेव्हां मी तुमचा नमस्कार स्वीकारणार नाहीं." असेंही ह्मटलें आहे.

याप्रमाणें जगांतील मोठमोठ्या धर्मांत हिंसेचा निषेध आहे असें दर्शविलें व तें दाखविलेल्या शब्दप्रमाणांनीं श्रद्धाळु लोकांस पटण्यासारखें आहे. परंतु, एका पक्षास मात्र तें पटणार नाहीं. त्या पक्षाचें मला भय वाटतें. तो कोणता ह्मणाल, तर free-thinkers. ह्यांस शब्दप्रमाण

मान्य व्हावयाचें नाहीं, तेव्हां त्यांच्या समाधानासाठीं मी निराळ्या मार्गानें ह्मणजे Natural Philosophy च्या दृष्टीनें या विषयाचा विचार करितों.

जगांतील स्वेदज, अंडज व पिंडज प्राण्यांपैकीं पहिल्या दोन वर्गांशीं ह्मणजे ढेंकूण, पिसा वगैरेशीं किंवा पक्षी वगैरेशीं मनुष्याचें साम्य तर होतच नाहीं, तेव्हां या दोन वर्गांशीं या विषयासंबंधानें, त्याची तुलना करण्याचें कांहीं कारण नाहीं. आतां राहिलेल्या पिंडज वर्गामध्यें गाय, बैल, गर्दभ, घोडा, हत्ती वगैरे प्राणी येतात व ते तृणधान्यभक्षक असून मांस खात नाहींत; तसाच मनुष्यही आपलें उपजीवन, वनस्पति व धान्य यांजवर करीत असल्यानें, त्यास मांस खाण्याचा अधिकार नाहीं. कांहीं लोक मनांत ह्मणतील Oh ! weak point ! कारण, आपल्या मतलबास्तव, मांस न खाणारे तेवढे प्राणी घेऊन त्यांची गणती करून दाखविली ! ( टाळ्या. ) परंतु पिंडज वर्गांत सिंह, व्याघ्र, कोल्हा, कुत्रा, मांजर इत्यादि प्राणी मांसाहारी आहेत, ते कां घेतले नाहींत ? त्यांच्याप्रमाणें मनुष्यही मांसाहारी असूं शकेल. हें त्यांचें ह्मणणे खरें आहे. दुसरे कित्येक असें ह्मणत असतील कीं, आह्मी गर्दभाच्या वर्गांत जाण्यास खुषी नाहीं. ( हंशा व टाळ्या. ) आह्मीं मांसाहारी प्राण्याच्या वर्गांतलेच आहोत; तर हेंही त्याचें ह्मणणें क्षणभर खरेंच आहे, असें घेऊन चालूं. आतां या दोन वर्गांपैकीं कोणत्या वर्गांत मनुष्यास घालावयाचा, याचा निकाल केला पाहिजे, व तो करण्यापूर्वीं, तूर्त मनुष्यास या दोन्ही वर्गांच्या मध्यभागीं उभा करून ठेवूं.

एकाद्या ठिकाणीं खून झाला असतां त्याचा ठावठिकाण लागण्यासाठीं त्याच्या आजूबाजूच्या घरांत तपास केला जातो; एका प्रदेशांत खून व लांबच्या दुसऱ्या प्रदेशांत तपास असें कधीं कोणी करित नाहीं; किंवा एकाद्या शेताच्या किंमतीबद्दल वाद पडला असतां, त्याच्या शेजारच्या शेतांचा मगदूर व सारा वगैरे पाहून न्यायधीश वादग्रस्त शेताचा निकाल करितो. त्याचप्रमाणें मुखांत दोन क्रिया चालतात; एक खाणें व दुसरें पिणें. त्यापैकीं खाण्याच्या संबंधाचा वाद पडला असतां, त्याकामीं पिण्याची साक्ष घेऊन निकाल केला पाहिजे हें उघड आहे. तेव्हां आतां

गवादिवर्ग व सिंहादिवर्ग यांची पाणी पिण्याची पद्धति कशी काय आहे, त्याचा आपण तपास करूं. गवादि प्राणी आपल्या ओंठांच्या बळानें पाणी खेंचून पितात व सिंहादि प्राणी आपली जीभ बाहेर पाण्यापर्यंत लांब काढून तें चटचट चाटून पितात. यावरून मनुष्याचा समावेश कोणत्या वर्गांत करावयाचा हें स्पष्ट झालें. यावर कोणी मांसाहारी मनुष्य ह्मणेल कीं आह्मीं आपलें पेय उद्यांपासून ओंठांनीं न पितां चटचट चाटून पिऊं, तर ही गोष्ट अशक्य व सृष्टिक्रमाविरुद्ध होय !!!

२ रें प्रमाणः—मनुष्याचे दांत व नखें यांची आकृति गवादिकांच्या व वानरादिकांच्या दंतनखांप्रमाणें रुंद असते. डार्विनच्या कल्पनेस जरी घटकाभर मान दिला कीं, वानर ह्या अवस्थेपासून सुधरत सुधरत मनुष्य बनला आहे, तरी पहा ! तो रानटी स्थितींत जर मांस खात नव्हता, तर आतां सुधारलेल्या स्थितींत तें त्यानें सर्वथाच वर्ज्य केलें पाहिजे, असें सिद्ध होत नाहीं काय ?

३ रें प्रमाणः—नेत्ररचनेवरून पाहतांही मनुष्याचें साम्य गवादि वर्गाशींच होऊं शकतें, सिंहादि वर्गाशीं होऊं शकत नाहीं. मनुष्यास दिवसा जसें उत्तम प्रकारचें दिसतें, तसें रात्रीं दिसत नाहीं. परंतु सिंह–मार्जारादि हिंस्र पशूंची स्थिति याच्या उलट आहे; ह्मणजे त्यांच्या डोळ्यांस दिवसापेक्षां रात्रीं चांगलें दिसतें. प्रातःकाळीं त्यांचे डोळ्यांची जी कनीनिका असते, ती जसजसा दिवस जास्त वर येत जातो तसतशी लहान लहान होत जाते व मध्यान्हीं तर अगदीं रेषेप्रमाणें बनते व दुपार उलटल्यावर पुनः हळू हळू जास्त प्रसृत होऊं लागून सायंकाळीं पूर्व स्थितीवर येते; पुढें जसजशी रात्र होऊं लागते, तसतशी ती पूर्ण गोल होऊन, त्यांस उत्तम दिसूं लागतें. असा प्रकार गवादिकांचा नसतो. या परीक्षेवरूनही मनुष्य गवादिवर्गांतच गणला पाहिजे.

४ थें प्रमाणः—श्रमाच्या योगानें उष्णता वाढून मनुष्यास ज्याप्रमाणें घाम येतो, त्याचप्रमाणेंच गवादिकांसही श्रमाच्या योगानें घाम येतो; तसा हिंस्र पशूंस येत नाहीं. यावरूनही मनुष्याचें साम्य गवादिवर्गाशींच होतें. मनुष्यास घाम न येणें ह्मणजे ज्वरादिकांनीं

त्याची प्रकृति बिघडली आहे, असें समजावें व सिंहादिकांस घाम येणें ह्मणजे त्याची प्रकृति बिघडली असल्याचें चिन्ह समजावें.

९ वें प्रमाणः—आतां कोणी शंका काढतील कीं, We have canine teeth ह्मणजे आह्मांस दोन सुळे दांत आहेत. त्यांची तुलना हिंस्र पशूंच्या दंतांशीं होऊ शकते, ह्मणून मनुष्याची गणना त्यांच्या वर्गातच झाली पाहिजे. तर यावर उत्तर असें आहे कीं, खाद्य (खाण्याचे पदार्थ), पेय (पिण्याचे पदार्थ), लेह्य (चाटण्याचे पदार्थ), व चोष्य (चोखण्याचे पदार्थ) असें चार प्रकारचें अन्न आहे. त्यांतील बदाम, खारीक वगैरे कठिण खाद्य पदार्थ फोडून खाण्याकरितां हे दोन दांत देवानें दिले आहेत, मांसभक्षणासाठीं नाहींत. कल्पना करा कीं, जर आपण बाजारांत गेलो व एकाद्या दुकानीं केळीं, आंबे, द्राक्षें, बदाम, खारीक, बेदाणा वगैरे पदार्थ मांडून ठेविलेले पाहिले, व त्याच्या शेजारीं एक दोन जोडेही पडलेले पाहिले, तर आपण त्यास जोड्याचें दुकान ह्मणूं किंवा मेव्याचें दुकान ह्मणूं? त्याप्रमाणें २९–३० दांत जर मांसाहारासाठीं नव्हत असें सिद्ध होत आहे, तर तेही तसेच असून वर सांगितल्याप्रमाणें कठिण पदार्थ फोडण्यासाठींच ते दिले आहेत. व मांसभक्षणाशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं, अशी कल्पना करणें जास्त सुयुक्तिक नव्हे काय?

अशा रीतीनें निरनिराळ्या अनेक प्रकारांनीं परीक्षण करितां, मनुष्य हा मांसाहारी प्राणी नव्हे, असेंच सिद्ध होतें व तें सत्य आहे.

शेवटीं मांसाहारी मनुष्यास कोठेंच थारा न मिळाल्यामुळें तो ह्मणेल कीं, " देव्युपासक जे वाममार्गी शाक्त, त्यांत आपण दाखल होऊं ह्मणजे तेथें आपली योग्य सोय होईल. कारण, त्यांतील लोक ह्मणतात कीं:—

**गोमांसं भक्षयेन्नित्यं पिबेदमरवारुणीम्**
**कुलीनं तमहं मन्ये इतरे कुलघातकाः ॥**

ह्मणजे रोज गोमांस खावें; अमरवारुणीचे (मद्याचे) डोह्र उडवावे. असें करील तो कुलीन, बाकीचे कुलघातक होत. " तर त्याची ही समजूत सर्वथा चुकीची आहे. कारण हा श्लोक तंत्रशास्त्रांतला नसून

योगशास्त्रांतला आहे व तो खेचरी मुद्रेच्या संबंधानें आहे. त्याचा अर्थ असा आहे कीं, गो ह्मणजे जिव्हा, ( गोशब्दाचे पुष्कळ अर्थ होतात. कोश पहा. ) तिचा, कपाळाच्या ( टाळूजवळ असलेल्या ) भोंकांत प्रवेश करविणें यास ' गोमांसभक्षण ' * म्हणतात. व भृकुटींच्यामध्यें डावे बाजूस चंद्रापासून अमृत स्रवत असतें तीं ' अमरवारुणी ' † होय, तेव्हां अशा रीतीनें ' गोमांसभक्षण ' करून जो ' अमरवारुणी ' पितो. तो योगी कुलीन ह्मणजे कुलदीपक होय; बाकीचे कुलघातक होत. असें अमृतपान खेचरी मुद्रेनें साध्य होतें.

जीभ वळवून तिचा टाळूजवळ असलेल्या भोंकांत प्रवेश करविणें व दृष्टि भुवयांच्यामध्यें स्थिर राखणें, याला खेचरी मुद्रा ह्मणतात. जीभ याप्रमाणें वळविण्यास छेदन, चालन व दोहन या क्रिया कराव्या लागतात. जिभेच्या खालची शीर तीक्ष्ण शस्त्रानें प्रथम केंसाइतकी छेदन करावी व आठवे दिवशीं पुन्हां केंसाइतकी, या क्रमानें सहा महिनेंपर्यंत युक्तीनें केलें तर, खालची शीर तुटून जिव्हेचा वर प्रवेश करण्यास जो अटकाव होतो, तो दूर होईल. यास ' छेदन ' ह्मणतात. हाताचा अंगुठा व तर्जनी या दोन बोटांनीं जीभ धरून डावी उजवीकडे फिरवावी, यास ' चालन ' ह्मणतात. व दोन्ही हातांचे आंगठे व तर्जनी या बोटांनीं, गाईची धार काढतांना जसा स्तन धरून ओढतात, तशी जीभ ओढओढून लांबवावी, याला ' दोहन ' म्हणतात. खेचरी मुद्रेच्या योगानें योगी अजरामर होतो. असो, आजचा हा विषय नाहीं, सबब त्याजबद्दल जास्त विवेचन नको. प्रकृत विषयाकडे वळतां, पूर्वी सांगितल्याप्रमाणें खऱ्या सनातन धर्माचा असा विपर्यास करून, व असे नाना प्रकारचे विपरीत अर्थ करून, मतलबी व स्वार्थसाधू लोक, भोळ्या व अज्ञजनांस नादीं लावतात. तेणेंकरून

---

* गोशब्देनोदिनोदिता जिव्हा तत्प्रवेशोहि तालुनि ॥
गोमांसभक्षणं तत्तु महापातकनाशनम् ॥ ४८ ॥

† जिव्हाप्रवेशसंभूतवन्हिनोत्पादितः खलु ॥
चन्द्रात्स्रवति यः सारः स स्यादमरवारुणी ॥ ४९ ॥

हठयोगप्रदीपिका तृतीयोपदेशः ।

ते बिचारे अनेक घोर पातकांमध्यें पडतात, तेव्हां यांपासून सावध राहिलें पाहिजे.

येणेंप्रमाणें हिंसा ही स्वधर्मानें, परधर्मानें, व प्रत्यक्षप्रमाणादि युक्तिवादानें सर्वथा वर्ज्य आहे, हें आज मी आपणांस संक्षेपानें सांगितलें. यज्ञांत पशुहिंसा करितात, ती हिंसा होते कीं काय ? हा एक महत्वाचा प्रश्न आहे. परंतु आज अवकाश नसल्यानें त्याचा विचार निराळ्या वेळीं करण्यांत येईल. आतां अहिंसाधर्म उत्तम प्रकारें पाळल्यानें मनुष्याचा उद्धार कसा होतो त्यासंबंधानें एक कथानक सांगतोः—

प्राचीन काळीं, ज्यास हल्लीं नागपूर ह्मणतात त्या प्रांतीं, एक भिल्ल राजा राज्य करीत होता. त्याला शबरी नांवाची एक कन्या होती; ती फार रूपवती होती. ती वयांत आल्यावर, तिच्या विवाहाची तयारी झाली. राजाचेच घरीं लग्न, तेव्हां त्यांचे जातीच्या लाखों लोकांची गर्दी होऊन भोजनादि समारंभ व्हावयाचे, त्याकरितां त्या राजानें हजारों बकरीं इत्यादि जनावरें आणून नगराबाहेर ठेविलीं होतीं. ( भिल्ल हे मांसाहारी असतात ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. ) पुढें लग्नाचे दिवस अगदीं समीप येऊन ठेपले. एके दिवशीं ती मुलगी आपल्या मातुश्रीसह नगराची शोभा पाहत पाहत रथांत बसून चालली असतां त्या दोघीजणी ह्या जनावरांसमीप आल्या, तेव्हां मुलीनें विचारिलें मातृश्री, हीं जनावरें कशाकरितां पाळिलीं आहेत ? तिनें उत्तर केलें, बेटा, तुझ्या लग्नाचा आतां थाट होणार आहे, त्यांत मेजवानीकरितां हीं जनावरें पाळिलीं आहेत. तें ऐकून त्या मुलीस परम खेद उत्पन्न झाला, कीं माझ्या एकट्या जिवाच्या सोहळ्याकरिता इतक्यांच्या जिवांचा वध ! ! हर हर ! ! ! ह्या इतक्यांच्या संहारास मी एकटी कारण होत आहें ! असा विचार करीत असतां ती अगदीं व्याकुळ झाली व रात्रीं निद्रा बरोबर लागेना, तेव्हां शेवटीं तिनें मनांत असें ठरविलें कीं, आपण कोठें तरी पलायन करावें ह्मणजे अर्थातच विवाह बंद पडून यांचा वधही व्हावयाचा नाहीं. असा पक्का विचार करून ती रात्रीचीं निघून अरण्यांत गेली; उजाडल्यावर ती मोठ्या पर्वताच्या गुहेत लपून राहिली; न जाणो कदाचित् राजाचीं माणसें शोध करीत येतील. याप्रमाणें तिनें दिवसां गुहेत विश्रांति घ्यावी, व रात्रीं मार्गक्रमणा करावी. असें करितां

करितां ती दंडकारण्यांत आली. व तेथें ती कंदमुळें खाऊन राहूं लागली तेव्हां एके दिवशीं तिच्या मनांत विचार आला कीं, आपण आतां संसारसुखाचा तर त्याग केला; तेव्हां एकाद्या महात्म्याचा आश्रय करून परलोक तरी साधावा. तो कसा साधितां येईल अशी चिंता करीत असतां, तिला युक्ति सुचली कीं, येथें मातंग ऋषीचा आश्रम आहे, तेथें जाऊन त्यांची सेवा करावी. परंतु पुन: मनांत विचार आला कीं, मी जातीची भिल्लीण अपवित्र, तेव्हां आश्रमातील लोक मला कसले आपल्या आश्रमांत येऊं देणार ? याची सेवा तर घडली पाहिजे, नाहीतर कार्यसिद्धि नाहीं. तेव्हां तिने नित्य लांकडांची एक भारी बांधून पहाटेस कोणाला न कळेल अशा रीतीनें त्या आश्रमांत नेऊन टाकण्याचा क्रम सुरू केला व दिवसभर ईश्वरस्मरण करीत राहिली. इकडे आश्रमांतील मंडळीस आश्चर्य वाटलें कीं, ही लांकडाची मोळी दररोज कोण आणून टाकितें कोण जाणे ? याप्रमाणें क्रम चालला असतां एके दिवशी शबरीस लांकडांची मोळी टाकण्यास थोडा उशीर झाला, त्या वेळेस ऋषींचा एक शिष्य स्नानास चालला होता; रस्ता अरुंद असल्यामुळें सहजीं शबरीच्या मोळीचा त्यास धक्का लागला. शिष्य होता शीघ्रकोपी व धष्टपुष्ट, त्यानें लागलीच क्रोधानें तिच्या तोंडांत मारिली. त्यासरशी ती बिचारी मूर्छित झाली. कांहीं वेळानें सावध होऊन रुदन करूं लागली व ह्मणाली कीं, हे परमात्मन्, मी किती अभागी कीं, इहलोकच्या सुखावर पाणी सोडून वनवासी होऊन महात्म्याच्या सेवेकरितां येथें राहिलें, त्यांतही असें विघ्न आलें ! ! आतां हे लोक माझी सेवा कशाची घेतात ! असा विलाप करीत आहे, इतक्या अवधींत ऋषि स्नानार्थ त्या रस्त्यानें निघाले. तेव्हां त्यांनीं तिची ही विव्हळता पाहून विचारपूस करून तिचें शांतवन केलें; व ह्मणाले कीं, हे पुत्रि, तूं कांहीं काळजी करूं नकोस, तूं खुशाल हरिनामस्मरण करून सुखानें आमच्या आश्रमीं रहा. असें अभय देऊन आपल्या पर्णकुटिकेच्या मागें तिला एक पर्णकुटिका बांधून दिली, तेथें ती ईश्वराच्या भजनपूजनांत व ऋषींच्या सेवेंत आपला काल उत्तम प्रकारें घालवूं लागली. इकडे त्या शिष्यानें असा प्रमाद केल्यामुळें तेथील सर्वांचें जीवनास आधारभूत जें पंपा सरोवर, त्याचें पाणी बिघडून त्यांत किडे पडले, तेव्हां

सर्वांस मोठी हरकत पडूं लागली. सर्वजण या गोष्टीचीं कारणें शोधूं लागले; तेव्हां कलिमहाराजांचा त्यांचेवर अंमल बसून ( प्रत्येक युगांत बाकीचीं युगें अंशतः असतात, जसें सांप्रत कलिकाल असतांही आपणा-सारखे तीन चार हजार श्रोतेजन एकसमयावच्छेदेंकरून सद्धर्मविषयक गोष्टी श्रवण करण्याकरितां जमले आहेत. हा ह्या युगांत अंशरूपें असलेल्या सत्ययुगाचाच महिमा समजावा. ) त्यांनीं ऋषींस ठपका दिला कीं, हे गुरुमहाराज ! ही स्त्री आपल्या आश्रमांत आल्यापासून सरोवराचें पाणी बिघडलें आहे, तेव्हां आपण इचा आतां त्याग करावा. हे ऐकून ऋषि ध्यानस्थ होऊन पंपा सरोवर बिघडण्याचें कारण शोधूं लागले. तेव्हां त्याचें कारण, त्या शिष्याचें दुर्वर्तन हेंच होय, असें त्यांस कळून आलें. व त्यांनीं शबरीला कन्येप्रमाणें वागविलें होतें, त्यामुळें शिष्याच्या या भाष-णानें त्या महात्म्याच्या अंतःकरणास फारच दुःख होऊन, व निष्कारण हा कलंक केवळ जबरदस्त पूर्वसंचितानें आपल्यावर आला असें समजून, शेवटीं त्यांनीं आपलें पवित्र शरीर योग बळानें तेथल्या तेथेंच दग्ध करून टाकिलें. व तसें दग्ध करितांना ते त्या शबरीस ह्मणाले, हे कन्येके ! त्वा याच आश्रमांत राहून भगवत्सेवा करावी. तुझ्या इच्छेप्रमाणें श्याम-सुंदर कमलनेत्र चापपाणि श्रीरामचंद्रजी एक हजार वर्षांनीं या ठिकाणीं येऊन तुला दर्शन देतील. हें ऐकून त्या शबरीस मोठा आनंद झाला, व आपल्यास श्रीरामचंद्रजीचें दर्शन होणार ह्मणून पूर्वीपेक्षांही ज्यास्त दृढतेनें ती आणखी भगवद्भक्ति करीत राहिली. पुढें राम-चंद्रजी येण्याचे दिवस अगदीं समीप आले, तेव्हां तिला त्याचा ध्यास लागून आज रामचंद्रजी येतात, उद्यां येतात, अशी आतुर-तेनें वाट पहात राहिली व तिनें त्यांच्याकरितां दर्भाची चटई तयार केली. ती तिनें वारंवार धुवावी व स्वच्छ करून ठेवावी. त्याचप्रमाणें प्रभूस उपहारास देण्यासाठीं सुंदर सुंदर बोरें आणून तीं द्रोणांत भरून ठेवावीं. बोरें आंबट नसावी ह्मणून शुद्धप्रेमपूर्वक तीं आपल्या दांतांनीं कुरतडून चांगलीं चांगलीं असतील तेवढींच एका बाजूस काढून द्रोणांत भरून ठेवावीं. असा क्रम चालला असतां मध्येंच तिला वाटावें कीं मज गरिबाकरितां कसले रामचंद्र येतात! असें ह्मणून अश्रु ढाळावे, व पुनः

वाटावें कीं, ऋषिमहाराजांचें वचन मिथ्या होणार नाहीं. असें होतां होतां संकेताप्रमाणें नेमलेल्या वेळीं श्री भगवान् रामचंद्रजी, सीता व लक्ष्मण यांसह, दंडकारण्यांत येऊन त्या आश्रमासमीप आले. इकडे शबरीही, डोळे लावून प्रभूंची अगदीं वाट पहात बसली होती. इतक्यांत रामचंद्रजींची ती श्यामसुंदर कमलनेत्र अशी मूर्ति नजरेस पडली, तेव्हां तिचा कंठ दाटून आला व नेत्रांतून प्रेमाश्रुधारा वाहूं लागल्या. रामचंद्रजींनीं माते शबरी, अशी हांक मारिली, आणि मोठ्या प्रेमानें ते तिला भेटले. जें मातृप्रेम कौसल्येचे ठिकाणीं त्यांनीं दाखविलें होतें तेंच मातृप्रेम प्रभूंनीं शबरीच्या ठिकाणींही दाखविलें. त्या प्रेमाच्या गडबडींत शबरी श्रीरामचंद्रास बसण्यासाठीं चटई वगैरे देणार होती, ती देण्यासही विसरली. शुद्ध प्रेमाचा प्रकार असाच असतो. नंतर, तुझ्याकरितां मी मुद्दाम येथें आलों असें सांगून श्रीरामचंद्रांनीं तिला नवविधा भक्ति निरूपण केली. तिनें प्रभूस उपहाराकरितां तीं शुद्ध ह्मणून निवडून ठेवलेलीं बोरें समर्पण केलीं. तेव्हां त्यांनीं मोठ्या आनंदानें तीं भक्षण केलीं. लक्ष्मणासही एक द्रोणभर दिलीं होतीं, परंतु त्यास तीं शबरीचीं उष्टीं व अशुद्ध वाटल्यावरून त्यानें तो द्रोण तसाच रामचद्राची नजर चुकवून फेंकून दिला. तो हिमालयावर जाऊन पडला व त्याचा द्रोणागिरी बनून, तेथें त्या बोरांपासून मृतसंजीवनीनामक वनस्पति उत्पन्न झाल्या. सुधारक ह्मणतील Impossible. ( टाळ्या. ) परंतु हें अशक्य नाहीं. लक्ष्मण हा शेषाचा अवतार असून त्याचें वीर्यच तसें होतें. तेव्हां त्या संबंधानें हल्लींच्या अल्पवीर्य व अल्पसत्व प्रजेस अशक्य वाटल्यास नवल नाहीं. रामचंद्रांनीं विचार केला कीं, शबरीचीं उष्टीं बोरें जाणून लक्ष्मणानें माझ्या भक्ताचा असा अनादर केला, त्या अर्थीं हींच बोरें मी त्याजकडून पुढें मागें खाववीन. त्या प्रमाणें पुढें इद्रजिताशीं लढतांना जेव्हां लक्ष्मणास शक्ति लागली, तेव्हां मारुतीनें द्रोणागिरी आणून त्यावरील संजीवनी वनस्पतींचा रस काढून तो लक्ष्मणाच्या मुखांत ओतला; तेव्हां तो खाड्कन पुनः युद्धास उभा राहिला. सारांश, भक्ताविषयीं प्रभूंचें प्रेम असेंच असतें. असो. पुढें शबरीच्या आश्रमीं भगवान् रामचंद्रजी आल्याची खबर मातंग ऋषींच्या आश्रमांत राहिलेल्या शिष्यवर्गास समजली, तेव्हां

त्यांनीं मनांत विचार केला कीं, अहल्या शेकडों वर्षे शिळेसारखी पडून राहिली होती, तिचा उद्धार रामचंद्रजींनीं आपल्या चरणरजानें केला, तसेंच हें पंपासरोवर ते आपल्या चरणस्पर्शानें शुद्ध करून देतील. असा विचार करून रामचंद्रजीजवळ जाऊन त्यांनीं प्रार्थना केली कीं, हे भगवन् ! आपण हें जल आपल्या चरणस्पर्शानें शुद्ध करून द्यावें. श्रीरामांनीं ठीक आहे असें म्हटलें आणि लागलेच ते स्वतः पंपासरोवरांत जाऊन कमरे इतक्या पाण्यांत उभे राहिले, परंतु तें जल शुद्ध झालें नाहीं. तें पाहून शिष्यांच्या मनांत शंका आली कीं, शबरीचा आश्रम भ्रष्ट, त्यांत श्रीरामचंद्र गेले होते, त्यामुळें तर असें घडलें नसेलना? नंतर श्रीरामचंद्र ह्मणाले, जोंपर्यंत हें सरोवर बिघडण्याचें खरें कारण समजणार नाहीं, तोंपर्यंत याची शुद्धि होणें कठिण आहे. तेव्हां त्यांतील एका वृद्ध शिष्यानें सांगितलें कीं, भगवन्, आमच्या गुरुबंधूनें शबरीच्या तोंडांत मारिल्या दिवसापासून ह्या सरोवराचें जल बिघडलें, इतकें मला ठाऊक आहे. त्यावर श्रीरामचंद्र ह्मणाले, हेंच जर कारण असेल, तर याला उपाय थोडा आहे. एक कमंडलु जल घेऊन त्यांत शबरीच्या पायाचा आंगठा बुडवून, तें जल या सरोवरांत टाकून द्यावें ह्मणजे हें शुद्ध होईल. त्याप्रमाणें करतांच, साऱ्या सरोवराचें पाणी एकदम शुद्ध व स्वच्छ झालें. तें पाहून शिष्यांस मोठा विस्मय वाटला व त्या दिवसापासून ते शबरीच्या भजनीं लागले.

याप्रमाणें श्यामसुंदर प्रभु, प्रसंगविशेषीं आपल्याकडेही कमीपणा घेऊन भक्तांचें माहात्म्य वाढवितो. प्रभूला स्वतः दुनियेंतल्या कोणत्याही गोष्टीशीं कांहीं एक कर्तव्य नाहीं, तथापि तो आपल्या भक्तांसाठीं नाना अवतार धारण करून, त्यांचें कल्याण करितो. श्रीरामचंद्रास ‘ मर्यादा–पुरुषोत्तमावतार ’ म्हणतात, कारण नीतिमत्तेची मर्यादा कोठपर्यंत पाळावयाची, हें ज्यास समजून घेणें असेल, त्यानें श्रीरामचरित्र अवलोकन करावें, म्हणजे तें त्यास सहज कळून येईल.

सारांश, शबरीला दर्शन देण्यासाठीं, श्रीरामचंद्रांनीं स्वतः तिच्या आश्रमीं यावें अशी पात्रता तिच्या ठायीं येण्यास, तिनें पूर्वीं आचरण केलेला

अहिंसाधर्मच कारणीभूत झाला, हें लक्षांत आणून सर्वांनीं यथाशक्ति तो अहिंसाधर्म पाळण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे त्यापासून इहपरलोकीं कल्याण होईल.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

---

## व्याख्यान ४ थें.

### विषय—संध्येच्या द्वारा आयुष्याची वृद्धि.

ईशस्तवन.

करचरणकृतं वा कायजं कर्मजं वा
श्रवणनयनजं वा मानसं वाऽपराधम् ।
विदितमविदितं वा सर्वमेतत्क्षमस्व
जयजय करुणाब्धे सच्चिदानंदविष्णो ॥

याप्रमाणें ईशस्तवन झाल्यावर स्वामिमहाराज म्हणाले:—

आमच्या सभासदांच्या हृदयरूप आकाशांत सनातनधर्मरूपी मेघमंडळ असे भरून आलें आहे कीं, सर्वत्र विद्यारूपी वीज चमकून राहिली आहे, व कल्याणरूपी कोकिळ कू कू असा शब्द करून राहिला आहे. आशा आहे कीं, थोड्या अवकाशांत रकार-मकाररूपी श्रावण—भाद्रपद महिन्यांत हरियशोरूपी जलवृष्टि पडून, आम्ही लोक आपल्या शरीररूपी वाटिकेंत असा एक झोंपाळा टांगून देऊं कीं, ज्याची एकाग्रता ही फळी आहे, व ज्यास इडा, पिंगला, सुषुम्ना व वज्रा या चार कड्या जोडल्या आहेत, व प्राण आणि अपान हे दोन्ही बाजूंनीं झोंके देऊन राहिले आहेत व ज्यावरें बसून आम्हीं हरिनामरूपी गीत गात राहिलों आहों. "हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥ हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥" याप्रमाणें भजन होत आहे.

मागील व्याख्यानांत संध्येची महती व अहिंसा, सत्य इत्यादि जीं ब्रह्मविद्येचीं अंगें, त्याविषयीं आपण बरेंच श्रवण केलें आहे. त्यावरून आपली खात्री झालींच असेल कीं, ब्रह्मविद्या साध्य करून घेण्याचा अधिकार केवळ मनुष्याचाच आहे; पश्वादिकांचा नाहीं. कारण, त्यांस बुद्धि नसते. मनुष्याचा जन्म केवळ ऐहिक विषयांचें सुख भोगण्याकरितां नसून त्यास ब्रह्मज्ञानरूपी हिरा प्राप्त करून घ्यावयाचा आहे. विषयादि-सुख तर पश्वादिकांचें व मनुष्यांचें, किंबहुना देवादिकांचेंही सारखेंच आहे. परमरूपवती व भूषणादिकांनीं अलंकृत अशा इंद्राणीपासून जो विषयानंद इंद्रास प्राप्त होतो तोच सर्वांग घाणेरड्या चिखलानें भरलेल्या सूकरीपासून सूकरास प्राप्त होतो. म्हटलें आहे कीं—

आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम् ॥
ज्ञानं नराणामधिको विशेषो ये तेन हीनाः पशुभिः समानाः ॥

अशा रीतीनें मनुष्याचे ठायीं ज्ञान ही विशेष गोष्ट ठेवलेली आहे; तिचा त्यानें उपयोग करून, आपण कोण, आलों कोठून, व करावयाचें काय, याचा विचार अवश्य केला पाहिजे.

मनुष्याचे ठिकाणीं वसत असलेली ही बुद्धीची श्रेष्ठता अर्वाचीन पदार्थविज्ञानादिशास्त्रांनींही खरी ठरते. पहा, आपण जर सारख्या आकाराचे, हिऱ्याचा एक व काचेचा एक असे दोन गोळे घेतले, तर हिऱ्याचा गोळा वजनानें अधिक भरतो. कारण कीं, त्याचे परमाणु काचेच्या गोळ्याच्या परमाणूंपेक्षां फार जवळ जवळ ह्मणजे अगदीं घन आहेत. त्याचप्रमाणें, समान आकाराचे एक सुवर्णाचा व एक कापसाचा असे दोन गोळे घेतले, तरीही हीच गोष्ट सिद्ध होणार आहे. प्रसंगीं कापसाचा गोळा आकारानें जरी मोठा घेतला तरीही, सुवर्णाच्या गोळ्याचें वजन अधिकच भरणार आहे. कारण कापसाच्या गोळ्यांतील परमाणु फार विरळ असतात. याच न्यायानें पश्वादिकांची मस्तकें जरी मनुष्याचे मस्तकांपेक्षां मोठीं दिसलीं तरी, तीं वजनानें फार हलकीं असतात. याचें कारण त्यांत मगज, जें बुद्धीचें साधन, तें फारच कमी असतें. एखाद्या पशूचा नुकताच जन्मलेला बच्चा, जर पाण्यांत पडला, तर त्याच्या सर्व

शरीराचे इतर भाग पाण्यांत राहून, त्याचें मस्तक मात्र सपाटीवर तरंगत रहातें; परंतु मनुष्याच्या बच्चाचें मस्तक असें वर राहूं शकत नाहीं; तें तर अगोदरच पाण्यांत जातें. यावरून त्याचें वजन जास्त आहे, हें उघड होतें. मनुष्य एकाद्या उंच स्थळावरून खालीं पडला असतां तो उभाच्या उभा पायावर खालीं पडत नाहीं, तर खालीं मस्तक व वर पाय अशा क्रमानें पडतो; व हाच न्याय त्याच्या जननासही लागू पडतो. जन्मतांना मनुष्याचें मस्तक अगोदर बाहेर येतें, परंतु पश्वादिकांच्या संबंधानें ही स्थिति उलट असते. यावरूनही मनुष्याचें मस्तक जड आहे, हेंच सिद्ध होतें. सारांश, मनुष्याचे मस्तकाची रचनाच अशी आहे कीं, त्याचे ठायीं इतर सर्व प्राण्यांपेक्षां विशेष ज्ञान असावें. मुसलमानीधर्मामध्येंही मनुष्यांत "तमीज" हेंच जास्त मानिलें आहे. इंग्रजीमध्येंही मनुष्याला Reason ( बुद्धि, विचारशक्ति ) व पशूंना Instinct ( उपजत-स्वाभाविक बुद्धि ) असते असें मानिलें आहे.

याप्रमाणें मनुष्य हा ज्ञानानें सर्व प्राण्यापेक्षां श्रेष्ठ आहे इतकें सिद्ध केल्यावर, आपण आतां आपल्या प्रतिपाद्य विषयाकडे वळूं. मनुष्यांमध्यें ही जी बुद्धि सांगितली, तिची परिपक्वता करण्याकरितां, आपले प्राचीन महर्षि व इतर लोकही फार काळजी बाळगित असत, ह्मणजे त्या वेळीं लोक व्रतबधानंतर ४८, ३०, २४, निदान १२ वर्षेपर्यंत ब्रह्मचर्यव्रत पाळित असत व तेणेंकरून ते मोठे शक्तिमान् व ज्ञानवान् होत असत. परंतु प्रस्तुत वयाच्या ४८ वर्षांत बहुधा ४–९ लेंकरें वगैरे सर्व संसार होऊन प्रसंगीं मरूनही जाण्याची पाळी येते. ह्याचें कारण, नैष्ठिक ब्रह्मचाऱ्यास पूर्वी संध्या व तदंगभूत प्राणायामादिकांचा दीर्घ काळ अभ्यास, यांच्या योगानें जो लाभ होत असे, त्या लाभाकडे आतां लोक दुर्लक्ष्य करूं लागले आहेत; त्यामुळें त्यांचें अपरिमित नुकसान होत आहे. तर असें दुर्लक्ष्य न करितां, संध्या–प्राणायामादि अत्यंत महत्वाच्या गोष्टींकडे आपण अवश्य लक्ष्य दिलें पाहिजे.

आयुष्याची वृद्धि कशानें होईल, या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी, प्रथमतः आयुष्य ही काय वस्तु आहे, याचा विचार केला पाहिजे. सामान्य लोकांची अशी समजूत आहे कीं, अमुक वर्षाच्या चैत्र महिन्याच्या किंवा

दुसऱ्या कोणत्याही महिन्याच्या अमुक शुद्ध किंवा वद्य पक्षांत अमुक मितीस जन्म व अमुक अमुक वर्षाच्या अमुक महिन्याच्या शुद्ध किंवा वद्य पक्षांत अमुक मितीस मृत्यु अथवा अमुक अमुक इंग्रजी वर्षाच्या किंवा हिजरी वर्षाच्या अमुक महिन्याच्या अमुक तारखेस जन्म व अमुक वर्षाच्या अमुक महिन्याच्या अमुक तारखेस मृत्यु, असा संकेत अगर लेख परमेश्वर करून ठेवितो, तें 'आयुष्य' होय, परंतु, असें नाहीं. अशा रीतीनें परमेश्वराच्या येथें कांहीं रजिष्टर नाहीं ! ! ज्या त्या प्राण्यास आपापल्या पापपुण्यानुसार एका जन्मांत जें सुखदुःखादि फल भोगावयाचें, त्यास जितका काल लागणार, तितकेच श्वासोच्छ्वास तो त्या प्राण्याचे ठायीं ठेवितो, त्यास आयुष्य ह्मणतात. मनुष्य २४ कलाकांत किंवा ६० घटिकांत २१,६०० श्वासोच्छ्वास करितो. या हिशोबानें ज्याच्या त्याच्या कर्मानु० ोणांत दहा कोट, कोणांत दोन कोट, कोणांत दोन लक्ष, चार लक्ष ०.से श्वासोच्छ्वास दिलेले असतात. श्वासाचें नैसर्गिक प्रमाण म्हटलें म्हणजे बसलेल्या स्थितींत तो शरीराबाहेर नाकापासून बारा अंगुळें लांबपर्यंत संचार करित असतो. परंतु चालतांना त्याचें प्रमाण १८ अंगुळें लांब होतें, निजल्यावर ३६, क्रोधावेशांत ९७ व मैथुनप्रसंगीं त्याचें प्रमाण १०८ पर्यंत *वाढतें. अर्थात् निरनिराळ्या स्थितींत निरनिराळ्या प्रमाणानें श्वासांचा खर्च होतो. तेव्हां ज्या स्थितींत जास्त खर्च होत असेल, ती स्थिति जितकी टाळितां येईल, तितकी आयुष्याची वृद्धि होईल हें उघड सिद्ध झालें. आणि ह्मणूनच मुलांस मातोश्री फार झोप न घेण्याविषयीं किंवा क्रोध न करण्याविषयीं जो उपदेश करित असते, तो वाजवी असतो, हें आपल्या लक्षांत येईल.

आतां या विरुद्ध वैद्यशास्त्र ह्मणतें कीं, मनुष्यास जसें जेवण तशी निद्राही अवश्य पाहिजे, व त्याप्रमाणें लोकांचा अनुभवही आहे. तसेंच धर्मशास्त्रकार ह्मणतात, 'नापुत्रस्य लोकोऽस्ति' अशी श्रुति आहे, ह्मणून

---

* हें प्रमाण दुसऱ्या कांहीं ग्रंथांत निराळ्या प्रकारचें सांगितलें आहे. परंतु, वर दर्शविलेल्या त्या त्या स्थितींत श्वासांचा पुष्कळ अधिक प्रमाणानें खर्च होतो, हेंच त्या सर्वांचें तात्पर्य आहे.

स्वर्गप्राप्तीकरितां पुत्रोत्पत्ति झाली पाहिजे. तेव्हां सकृद्दर्शनीं पाहतां वरील सिद्धांतास हीं शास्त्रें अपवादक अशीं दिसतात. तेव्हां यांची एकवाक्यता कशी करावी? ही शंका खरी आहे. परंतु पुढील विवेचनावरून तिचें निराकरण होईल.

परमेश्वर फार दयाळू आहे, त्यानें हरएक पदार्थाची रचना परम चातुर्यानें केली आहे. साधारणतः आपल्या शरीररचनेकडे पहा. जेव्हां आपण स्नान करितों तेव्हां मस्तकावरील पाणी नेत्रांत जाऊं नये ह्मणून कपाळ जरा उंच ठेविलें आहे; व वरून कदाचित् पाणी आलेंच तर तर त्यास प्रतिबंध होण्यासाठीं पापण्यांचे केंस ठेविले आहेत. कानांचीही रचना अशीच चातुर्यानें केलेली आहे. एकदम कानांच्या छिद्रांत पाणी न जावें ह्मणून त्यास पाळी केलेल्या आहेत. बाळक उपजतांच, त्याच्या भुकेस पुरेल इतकेंच दूध यावें अशी मातुश्रीच्या छिद्रांची रचना प्र[illegible] असते. पुढें जसजसा तो मोठा होतो व त्याची भूक वाढत जाते, तसतशीं स्तनांचीं छिद्रें मातुश्रीच्या प्रेमानें मोठमोठीं होत जातात. अशी हरएक बाबतींत त्याची उत्तम योजना जर आपल्यास दिसून येत आहे, तर आयुष्याचे बाबतींतही तशीच व्यवस्था असली पाहिजे.

कल्पना करा कीं, परमेश्वरानें दररोजचे २१६०० श्वास, या हिशोबानें १०० वर्षांचें आयुष्य आपल्यास दिलें आहे, परंतु त्याचा आपण काटकसरीनें खर्च न करितां, वाटेल तशी उधळपट्टी केली, तर त्यांत परमेश्वराचा काय दोष? जसें कोणा श्रीमंताच्या मुलास त्याच्या वडिलांनीं एक लाख रुपयाची जिंदगी ठेविली असून, नवीन कमविण्याची जर त्यास अक्कल व शक्ति नसेल, तर त्यानें त्या पैशाचा व्यय मोठ्या काटकसरीनेंच केला पाहिजे. तसा न करितां जर तो उधळेपणा करील, तर थोड्याच दिवसांत त्याचें ऐश्वर्य नष्ट होऊन तो भिकेस लागेल; व जपून खर्च करील, तर जास्त दिवस त्यास तो पैसा पुरेल. त्याचप्रमाणें परमेश्वरानें दिलेल्या श्वासांचा जितक्या काटकसरीनें आपल्यास खर्च करितां येईल, तितकें आपलें आयुष्य वाढणार आहे. ह्मणजे दररोजच्या २१,६०० श्वासांपैकीं जर काहीं कमी श्वास खर्च झाले, तर तितके श्वास संग्रहीं पडून त्या प्रमाणानें आपलें आयुष्य १०० वर्षांपेक्षांही जास्त

वाढेल हें उघड आहे. तेव्हां आतां साहजिकच प्रश्न येतो की, अशा तऱ्हेनें श्वासोच्छ्वास कमती घडण्यास कोणता उपाय आहे? तर यास उत्तम उपाय '**प्राणायाम**' हा आहे, व तो प्राणायाम आपल्यास संध्येंत शिकविला असल्यामुळें, संध्या ही आयुष्यवृद्धीचें साधन आहे, हें स्पष्ट सिद्ध होतें.

आतां किती वेळ प्राणायाम केल्यानें किती आयुष्य वाढतें, याचा विशेष विचार करूं, अहोरात्रांत ह्मणजे २४ कलकांत मनुष्याचे २१,६०० श्वासोच्छ्वास होतात, असें मागें सांगितलेंच आहे. ज्यास २४ कलाक-पर्यंत आपला प्राणनिरोध करितां येतो, अशा परिपक्व अभ्यासाच्या योगानें, जर रोजच्या २१,६०० श्वासांपैकीं एकच खर्च करण्याचा ह्मणजे आज सूर्योदयीं कुंभक करून तो उद्यां सूर्योदयीं सोडावयाचा, असा निश्चय केला, तर २१६०० संध्येंतास, त्यास २१,६०० दिवसपर्यंत पुरतील, ह्मणजे त्याचें एक दिवसाचें आयुष्य ६० वर्षेपर्यंत वाढेल हें उघड आहे. याच्या निम्मे ह्मणजे १२ कलाक प्राणायाम करण्याची ज्याची शक्ति आहे, त्याचें एक दिवसाचें आयुष्य ३० वर्षे, एक कलाक प्राणायाम करण्याची ज्याची शक्ति आहे, त्याचें एक दिवसाचें आयुष्य २॥ वर्षे, व एक मिनिट प्राणायाम करणाराचें एक दिवसाचें आयुष्य १५ दिवसपर्यंत वाढेल, हें वरील हिशोबानें सिद्ध होतें. कोणीही मनुष्य कितीही दुर्बळ असला, तरी त्यास आरंभीं एक मिनिटाचा प्राणायाम करण्यास अडचण पडणार नाहीं. अगदीं लहान बालक देखील ३० सेकंदपर्यंत आपला प्राणनिरोध सुखानें करूं शकतो, तेव्हां मोठ्या मनुष्यास एक मिनिटाचा प्राणायाम अगदीं सुसाध्य आहे. पुढें ही शक्ति त्यानें अभ्यासानें वाढविली पाहिजे. निष्ठेनें व दृढतेनें चांगला अभ्यास करणारा असला तरी, एक कलाकपर्यंत कुंभक करण्याची शक्ति येण्यास कमींत कमी ६–७ वर्षें लागतात. एवढी जरी आपली शक्ति नसली, व संध्येंत कमींतकमी ३ प्राणायाम सांगितले आहेत, तेवढे जरी आपण अगदीं कनिष्ठप्रतीचे केले, तरी आपलें आयुष्य २१ दिवसपर्यंत वाढेल.

प्राणायामाचे–पूरक, कुंभक व रेचक–असे तीन प्रकार आहेत. बाहेर संचार करित असलेला वायु पोटांत आकर्षण करून घेणें, यास 'पूरक'

म्हणतात. आकर्षण केलेला वायु कांहीं नियमित वेळपर्यंत आंत कोंडून ठेवणें, यास 'कुंभक' म्हणतात. व पोटांत सांठविलेला वायु हळू हळू बाहेर सोडणें यास 'रेचक' म्हणतात. *गायत्रीचे तीन अंश आहेत. १ ला व्याहृति, २ रा गायत्रीमंत्र, ३ रा शिरोभाग, पूरक, कुंभक व रेचक करितांना, अनुक्रमें हे तिन्ही अंश एकेक वेळां म्हणणें, हा एक मात्रा प्राणायाम † किंवा कनिष्ठ प्राणायाम होय. पूरक, कुंभक व रेचक करितांना, अनुक्रमें ते अंश दोन वेळां म्हणणें, हा दोन मात्रांचा किंवा मध्यम प्राणायाम होय; व अनुक्रमें ते अंश तीन वेळां म्हणणें, हा तीन मात्रांचा किंवा उत्तम प्राणायाम होय.

प्राचीनकाळीं महर्षि अशा रीतीनें आपल्या आयुष्याची वृद्धि करून हजारों वर्षे वांचत असत. मोठमोठे राजेही चार [illegible] हा घटिका

---

* प्राणाचा जो आयाम म्हणजे विरोध, तो प्राणायाम. अर्थात् प्राणायाम शब्दानें मुख्यत्वेंकरून कुंभक समजावयाचा आहे. कुंभांत ( घागरींत ) भरलेल्या पाण्याप्रमाणे तो शरीरांत शांत व निश्चल राहतो, म्हणून त्यास कुंभक म्हणतात. तो सिद्ध होण्यास पूरक व रेचक यांची मदत लागते. कुंभक दोन प्रकारचा आहे. एक केवलकुंभक व दुसरा सहितकुंभक. रेचक व पूरक न करितां एकप्रयत्नानें सुखानें जो प्राणनिरोध, त्यास केवलकुंभक म्हणतात. व रेचक आणि पूरक यांच्या साहाय्यानें जो प्राणनिरोध त्यास सहितकुंभक म्हणतात. केवलकुंभकाची सिद्धि होईपर्यंत सहित-कुंभकाचा अभ्यास करावा लागतो. पूरकादि सर्व प्राणायाम करण्यास सिद्धासनादि आसनें व मूलबंध, उड्डियानबंध वगैरे मुद्रा यांची उत्तम मदत होते. त्यांचें सविस्तर वर्णन हठयोगप्रदीपिकेंत केलें आहे.

† येथें मात्राशब्दानें उद्घात समजावयाचा आहे. उद्घात म्हणजे नाभिमूलापासून प्रेरित जो वायु, त्याचें मस्तकाला जाऊन आपटणें. एक उद्घाताचा कनिष्ठ, दोहोंचा मध्यम व तिहींचा उत्तम प्राणायाम सांगितला आहे. पुष्कळ ग्रंथांत बारा मात्रांचा एक उद्घात किंवा कनिष्ठ प्राणायाम चोवीस मात्रांचा मध्यम व छत्तीस मात्रांचा उत्तम असेंही सांगितलें आहे, परंतु तेथें मात्राशब्दानें सामान्यतः चुटकी वाजविण्यास जो काल लागतो तो विवक्षित आहे. सारांश, कोणत्याही प्रकारानें म्हटलें तरी, कांहीं कमी ४२ विपलांचा कनिष्ठ, ८४ विपलांचा मध्यम व १२५-१२६ विपलांचा उत्तम प्राणायाम होतो, हें सर्वमान्य आहे. प्राणायामाचा काल मोजण्यास श्रीस्वामींनीं वर गायत्रीमंत्राची जी युक्ति दाखविली आहे, ती उत्तम आहे.

प्राणायाम करून दीर्घायुषी होत्साते आपल्या राज्याचें काम मोठ्या आस्थेनें पाहत असत व आपल्या शौर्यबलानें शत्रूंस पादाक्रांत करीत असत. परंतु तो प्रकार नष्ट होऊन हल्लीं संध्या कशी करावी व प्राणायाम ह्मणजे काय ? ह्या सर्व गोष्टी आह्मी विसरून गेलों; त्यामुळें आमचे आयुष्याची रात्रंदिवस हानि होत चालली आहे. संसाराचे काबाडकष्ट व विषयसुख इत्यादिकांमध्यें श्वासांचा जो जास्त प्रमाणानें खर्च होतो, तो भरून काढण्याचें साधन ' संध्या ' होय. ह्मणजे दिवसा व्यावहारिक विषयांच्या सिद्धीसाठीं जे काबाडकष्ट व धांवाधांव करावी लागते, त्यांत होणारा श्वासांचा खर्च सायंसंध्येनें, व रात्रीं निद्रा, विषयसुख इत्यादिकांत होणारा खर्च प्रातःसंध्येनें भरून काढण्याची योजना आमच्या शास्त्रकारांनीं करून ठेविली आहे. तेव्हां अर्थात् विषयादिक फार जपून ह्मणजे नियमित प्रमाणानें करून संध्येंत प्राणायाम अधिक करण्याची तजवीज केली असतां, आपले श्वास अधिक संग्रहीं पडून आयुष्यवृद्धिही त्याप्रमाणानें होणार आहे. साराश, आयुर्वेद, धर्मशास्त्र व योगशास्त्र हीं परस्परांशीं कोणत्याही प्रकारें विरुद्ध नाहींत, हें आतां आपल्या ध्यानांत येऊन चुकलेंच असेल.

ज्याप्रमाणें घड्याळाची स्प्रिंग ( कमान ) शिथिल झाली असतां आपण किल्ली देऊन तिची शिथिलता दूर करितों, त्याचप्रमाणें प्रमाणाबाहेर श्वासांचा खर्च झाल्यानें आयुष्यांत आलेली शिथिलता आपण प्राणायाम-रूपी किल्ली देऊन दूर केली पाहिजे.

आयुष्यवृद्धि होण्यास प्राणायाम यथाविधि झाला पाहिजे; तसा न झाल्यास उलट फायद्याऐवजीं तोटा मात्र होण्याचा संभव आहे. कित्येक लोक पुस्तकांतून प्राणायामाची क्रिया वाचून त्याचा बरोबर अर्थ न समजतां भलतीच क्रिया करितात, ह्मणजे बाहेरची हवा एका नाकपुडीनें जोरानें खेंचून ती मस्तकाकडे नेतात व दम कोंडतात व दुसऱ्या नाक-पुडीनें सोडतात. परंतु हा प्राणायामाचा खरा मार्ग नाहीं. याच्यायोगानें बाहेरून खेंचलेला वायु मस्तकांत जाऊन आदळतो आणि मेंदूला वारंवार धक्के बसून मनुष्य भ्रमिष्ट होतो. सारांश ' लेने गये पूत और खो आये खसम ' असा प्रकार घडतो.

श्रीभगवद्गीतेंत 'अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथा परे' इत्यादि संक्षिप्त वचनांत प्राणायामाचा प्रकार सांगितला आहे. परंतु कित्येकांस नासाछिद्रांचा खालीं घशाकडे संबंध आहे, हेंच मुळीं ठाऊक नाहीं, तेव्हां त्या वचनांचा खरा अर्थ कोठून कळणार? बाहेरून खचलेल्या प्राणवायूचा मूलाधारापासून मूलबंधानें*उठाविलेल्या अपानवायूशीं संयोग करवून व त्यांची सुषुम्नेंत गति करवून तद्द्वारा ब्रह्मरंध्रांत प्रवेश करविणें, हें त्या वचनाचें रहस्य आहे, व तें गुरूकडूनच चांगलें समजून घेतलें पाहिजे. गुरूवांचून खरा मार्ग कळत नाहीं व यासाठींच आमच्या शास्त्रांत गुरूचें‡ महत्व सांगितलें आहे. साधारण व्यावहारिक विद्यांस जर गुरु पाहिजे, तर अशा ब्रह्मविद्येसारख्या केवळ गुरुगम्य विद्येस गुरूची अपेक्षा नाहीं असें कोण ह्मणेल?

प्राणायाम कसा करावा याबद्दल कांहीं अनुभविक विशेष माहिती सांगण्याचा माझा इरादा आहे; परंतु निवळ तोंडानें ती माहिती येथें सांगितली असतां त्याचा कांहीं विशेष उपयोग होईल असें वाटत नाहीं, सबब, सवड जमल्यास, त्याच्यासाठीं एकादी स्वतंत्र वेळ व स्थळ नेमून तेथें प्राणायामासंबंधीं कांहीं गोष्टी प्रत्यक्ष करून दाखविण्यांत येतील व गुरुपरंपरागत कांहीं विशेष माहितीही सांगण्यांत येईल.

याप्रमाणें प्राणायामाचा व आयुष्याचा किती निकट संबंध आहे तें स्पष्ट दाखवून त्याच्या संबंधानें सांगावयाचें तें सर्व सांगितलें. आतां यावर कोणी विचारितील 'आणखी काय?' 'आणखी काय' तर त्यांस मात्र उत्तर देणें कठिण आहे. त्यांचें समाधान करावयाचें ह्मटलें ह्मणजे एका धूर्त गोष्टी सांगणारानें जसें राजाशीं केलें, तसेंच केलें पाहिजे.

---

* एका टांचेनें योनिस्थान ह्मणजे शिवण दाबून आणि गुदद्वाराला संकुचित करून अपान वायूची जी खालीं गति आहे तीं त्याला वर आकर्षण करून वर चालू करणें, याला 'मूलबंध' ह्मणतात.

‡ सामवेदाच्या छांदोग्य उपनिषदांत सांगितलें आहे कीं, "आचार्यापासून (गुरूपासून) योगचर्येचें सर्व रहस्य जाणून, अभ्यासद्वारानें पुरुष आपोआपच सिद्धि व आनंद यांतें पावतो."

एकदा एका राजाला गोष्टी ऐकण्याचा फार नाद लागला. गोष्टी सांगणारानें ती सांगावी व थकून जावें तरी याचें आपलें 'फिर, फिर' ( आणखी, आणखी ) संपूंच नये. अखेरीस गोष्टी सांगणारा थांबला ह्मणजे तो त्यास कैदेंत टाकी; असे शेंकडों जण गोष्टी सांगणारे कैदेंत पडले. तेव्हां शेवटीं एका धूर्त मनुष्यानें निश्चय केला कीं, वाटेल त्या युक्तीनें राजास ठकवावयाचें, परंतु आपण हरून यावयाचें नाहीं. तो राजाकडे गेला व गोष्टी सांगू लागला कीं, एकदा एके ठिकाणीं खसखशीचें कोठार होतें; त्यांतून एक चिमणी एक दाणा घेऊन भुर्र उडाली. राजानें ह्मटलें, 'फिर'? गोष्ट सांगणार ह्मणतो, २ री भुर्र. राजा—'फिर'? गोष्ट सांगणारा ह्मणतो, ३ री भुर्र. पुढें 'फिर'? तर, भुर्र; याप्रमाणें चाललें. तेव्हां राजा ह्मणतो, अरे, हें तुझें 'भुर्र' संपणार तरी कधीं? त्यावर तो ह्मणतो महाराज आपलें 'फिर' संपेल तेव्हां माझें 'भुर्र' संपेल. कारण सर्व चिमण्या संपतील तेव्हां मी पुढें जाईन कीं नाहीं! त्यावर राजा निरुत्तर होऊन ह्मणाला, बाबा, तूं मला हरविलेंस, आतां इनाम माग. त्यावर तो ह्मणाला जितके गोष्टी सांगणारे कैद केले आहेत त्यांस सोडावें, ह्मणजे मला माझें इनाम पोंचल्यासारखें आहे. असो.

कोणी गृहस्थ प्राणायाम यथाविधि करीत असतांही, कधीं कधीं त्यास त्यांत यावें तसें यश येत नाहीं; याचें कारण असें आहे कीं, प्राणायामाचा योग्य अधिकार प्राप्त होण्यास जे अहिंसा—ब्रह्मचर्यादि धर्म अवश्य पाळले पाहिजेत, त्यांचें पालन त्याच्या हातून घडत नाहीं. ज्याला प्राणायामाचें बरोबर फल साधावयाचें आहे, त्यानें अहिंसा—ब्रह्मचर्यादि यमनियमांकडे बिलकुल दुर्लक्ष करितां कामा नये.

योगविद्येला ब्रह्मचर्यव्रत हें तर अत्यंत आवश्यक आहे. तें नसेल तर सर्व निष्फळ होईल. आतां ज्यांचें वय झालें असेल, त्यांनीं मागील गोष्टीं-बद्दल पश्चाताप न करितां, पुढें आपली स्थिति सुधारून होईल तितकें वरील नियमांनीं वागण्याचा प्रयत्न करावा ह्मणजे त्यांस थोडाबहुत तरी फायदा झाल्यावांचून रहाणार नाहीं. निदान त्यांनीं आपल्या मुलांच्या तरी भावी कल्याणाकडे अवश्य लक्ष्य द्यावें ह्मणजे झालें.

योगविद्या तर दूरच राहिली, परंतु हल्लीं लोक जी नानाप्रकारची व्यावहारिक विद्या शिकतात, तिचेंही आराधन त्यांच्या हातून व्हावें तसें होत नाहीं. यामुळें ती व्यावहारिक विद्या संपादन करून व मोठमोठ्या परीक्षा उत्तीर्ण होऊनही त्यांस दरिद्रदशेंत रहावें लागतें; किंवा बरींच वर्षे नोकरीसाठीं वगैरे धक्के खावे लागतात. विद्येचें आराधन ह्मणजे ज्या अंगांनीं तिची शोभा वाढेल, त्या सर्वांचें आदरानें पालन करून तिची सेवा करणें. ह्याचें स्वरूप अंशतः देखील हल्लींच्या विद्यार्थ्यांच्या आचरणांत दिसून येत नाहीं. ते, मातापिता व इतर वडील मनुष्यें यांची अवज्ञा करितात. गुरूचाही तिरस्कार करितात. व्यभिचार, मद्यपान इत्यादि दुर्व्यसनात निमग्न होतात. साराश, विद्यादेवीस आपल्या सद्वर्तनानें अलंकृत न करितां, उलट आपल्या दोषांनीं तिला दूषित करितात, तेव्हां ती प्रसन्न कशी व्हावी ? आणि तिच्यापासून धनप्राप्तिही कशी व्हवी ?

विद्येच्या उपार्जनाची सुद्धां पूर्वींची तऱ्हा निराळी व हल्लींची निराळी. पूर्वी जेव्हां कोणी पहांटेस गंगास्नानास जात असे, तेव्हां रस्त्याच्या दोन्हीं बाजूंच्या गृहांमधून विद्यार्थ्यांचे ‘ हरिः ॐ ’ ‘ नत्वा सरस्वतीं देवीं ’ ‘ वागर्थाविवसंपृक्तौ ’ इत्यादि पवित्र ध्वनि त्याच्या कानीं पडत असत, परंतु हल्लीं तो प्रकार बदलून, त्याच्या जागीं ‘ Pig पिग् ह्मणजे डुक्कर,’ ‘Dog डॉग् ह्मणजे कुत्रा ’, ‘Tom eats two eggs’ इत्यादि शब्द ऐकूं येतात. तेव्हां अशा अध्ययनानें तामसी बुद्धि कां बरें होणार नाहीं ?

कित्येक आंग्लविद्याभूषित सुधारकवीर आपल्या मातापितरांस “These foolish superstitious old folks ! ” अशा शब्दांनीं मान देतात. क्वचित् स्थळीं ‘ हा मूर्ख बाप आह्मांला शोभत नाहीं ’ असेही उद्गार ऐकूं येतात; ! ! धन्य त्या सुपुत्रांची ! ! ज्यांच्या शुक्रशोणितांपासून त्यांची उत्पत्ति, व ज्यांच्या श्रमानें ते दुनियेंत लहानाचे मोठे झाले व नांवारूपास आले, त्या मातापितरांचे अपरिमित उपकार वरील शब्दांनीं फेडावयाचे ! ! ! असो. लहानपणापासूनच वडिलांची मर्यादा पाळण्यास शिकलें पाहिजे. आणि ह्मणूनच मौंजीबंधनाचे वेळीं ‘ मातृदेवो भव, पितृदेवो भव ’ इत्यादि आज्ञा दिलेल्या आहेत. या सर्व आज्ञांचें पालन करून,

व कडकडीत ब्रह्मचर्य राखून विद्यादेवीची उपासना केली असतां ती खचित प्रसन्न होईल, व मग धनप्राप्तीसही अडचण पडणार नाहीं. शिवाय ब्रह्मचर्याच्या योगानें वीर्याचें रक्षण होऊन पुढें गृहस्थाश्रमांत बल व संतति यांची कोणत्याही प्रकारें वाण पडणार नाहीं. अशा रीतीनें ब्रह्मचर्य हें, विद्यासंपादनास आणि गृहस्थाश्रमास अत्यंत उपकारक आहे.

पुरुषाचें वीर्य १६ वर्षांनंतर परिपक्व होऊं लागतें व हा काल विद्याभ्यासाचाही असतो, ह्मणून या वयांत लग्न करून त्याचें ब्रह्मचर्य बिघडूं देऊं नये त्यास निदान २४ वर्षेपर्यंत तरी ब्रह्मचर्यव्रत पाळूं द्यावें. २४ वर्षांनतर त्याचें लग्न करावें व त्या वेळीं त्याला वधु पहाणें तीही १२ वर्षांची असावी. आपल्या मुलाचें लग्न लवकर करावें अशी कोणाची इच्छा असल्यास, त्यानें वधूवराच्या वयामध्यें १२ वर्षांचें निदान अंतर तरी ठेवावें. कन्या १६ वर्षांनतर गर्भधारणास योग्य होते. तेव्हां अशा रीतीनें योग्य अंतर ठेवून, विवाह केला असतां संतति निकोप व दीर्घायुषी होईल. इंग्लंडात धर्मसंबंधीं मते व व्यवस्था पाहिजे तशी असली, तरी तिकडील लोक ब्रह्मचर्याची किंमत चांगली ओळखून आहेत. ते उशिरां लग्न करितात. तेणेकरून त्यांची संतति निरोगी व दृढ अशी होऊन तेथील लोक पदार्थविज्ञानादि भौतिकशास्त्रांत व निरनिराळ्या शास्त्रीय शोधांत सर्वांच्या पुढें सरसावले आहेत. याप्रमाणें आपल्यांत ब्रह्मचर्य उत्तम तऱ्हेनें पाळलें जाईल, तो सुदिन समजावयाचा. जसें पहिल्या आश्रमांत ब्रह्मचर्य, तसेंच दुसऱ्या आश्रमांत ( गृहस्थाश्रमांत ) एकपत्नीव्रत अवश्य पाळलें पाहिजे. ज्या घरांत पुरुष केवळ स्वस्त्रीपरायण व स्त्री पतिव्रता असते, तेथें शंकरपार्वतीचाच जोडा वास करीत आहे असें खास समजावें; नाहींतर घरोघरीं पतिव्रताच पहाण्यांत येतात. त्याविषयीं एक नक्कल प्रसिद्ध आहे. एकदा एक खरी खरी पतिव्रता स्त्री तांदूळ कांडीत असता भर्त्यानें तिच्याजवळ पाणी पिण्यास मागितलें. तेव्हां विलंब न व्हावा ह्मणून हातांतील मुसळ ठेवण्याच्याही भरीस न पडतां ती तशीच घरांत पाणी आणावयास गेली; तों इकडे मुसळ जसेंच्या तसेंच अधर राहिलें. तें पाहून, शेजारीण तेथें बसली होती तिला फारच आश्चर्य वाटलें, आणि तिनें असें घडण्याचें

कारण काय ह्मणून तिला विचारिलें. तेव्हां ती ह्मणाली, हा सर्व पतिव्रताधर्माचा प्रभाव आहे. यांत दुसरी जादू अगर युक्ति कांहीं नाहीं. तेव्हां तिणेंही आपल्या घरीं जाऊन नवरा बाहेरून आल्यावर त्यास सांगितलें कीं, "तुह्मी घरांत निजून रहा, मी तांदूळ कांडितें व तुह्मी मजपाशीं पाणी मागा." नवऱ्यास ह्यांतील इंगित कांहींच कळलें नाहीं. परंतु बायको मोठी कजाग होती, त्यामुळें तो तिणें सांगितल्याप्रमाणें करण्यास तयार झाला. तो घरांत जाऊन निजला व थकाव्यामुळें त्यास चट्कर झोंप लागून पाणी मागण्याचें तसेंच विसरून गेला. तेव्हां तो पाणी कां मागत नाहीं हें पाहण्यासाठीं ती स्त्री आंत गेली आणि पाहते तों त्यास झोंप लागली आहे. तें पाहून तीस राग आला आणि त्याला जागा करण्यासाठीं आधीं मुसळाचे दोन रट्टे लगावून ह्मटलें कीं, मीं सांगितल्याप्राणें तुह्मीं पाणी कां मागितलें नाहीं? तो ह्मणाला, मी विसरून गेलों. त्यावर ती ह्मणाली, आतां तरी संभाळा, निजूं नका व विसरूं नका. मी बाहेर जाऊन तांदूळ कांडूं लागतें व तुह्मी पाणी मागा. त्याप्रमाणें त्याणें पाणी मागतांच ती मुसळ अधर सोडून झटकर पाणी आणण्यास निघाली; परंतु मुसळ कशाचें उभें राहतें? तें तिच्याच मस्तकावर पडून कपाळ मात्र फुटलें व ती जखम बरी होण्यास बरेच दिवस लागले!!! सारांश, अशा तऱ्हेची पतिव्रता नको, हें निराळें सांगण्याची जरूर नाहीं.

जसें ब्रह्मचर्य, तसेंच शौचनामक अंगही पाळिलें पाहिजे. शौच ह्मणजे शुद्धि. ती दोन प्रकारची, बाह्य व आभ्यंतर. मृत्तिका, जल इत्यादिकांनीं बाह्यशुद्धि होते; व अंतःकरण पवित्र ठेविल्यानें आभ्यन्तरशुद्धि होते. ह्मणून स्पृश्यास्पृश्य, भक्ष्याभक्ष्य, पेयापेय इत्यादि गोष्टींविषयीं पूर्ण विचार करून शुद्ध आचरण ठेवावें. प्राणांत झाला तरी धर्माचरण सोडूं नये. पूर्वीं औरंगजेबानें आपला धर्म स्वीकारण्याविषयीं पुष्कळ ब्राह्मणांवर जुलूम करून, तो न स्वीकारणारांचीं शिरें कापून तीं आपल्या दरबारांत लटकवून ठेविलीं होतीं; व जो नवा ब्राह्मण येईल त्याला तीं दाखवून तो धमकावीत असे व दुसऱ्या बाजूनें तो धर्म स्वीकारणारास सुभेगिरीसारख्या मोठमोठ्या जागा देण्याचीही लालूच दाख-

वीत असे. त्या वेळीं त्याच्या धमकीस न भितां, अगर हुद्याच्या लोभांत न पडतां शेंकडों ब्राह्मण आपला देहत्याग करण्यास तयार झाले, परंतु त्यांनीं स्वधर्माचरण सोडिलें नाहीं. सांप्रत परम दयाळू इंग्रजसरकारच्या राज्यांत काठीला सोनें बांधून सर्वत्र खुशाल हिंडावें इतकी निर्भयता व शांतता चोहींकडे प्रत्येकाच्या अनुभवास येत आहे व कोणावरही स्वधर्माचरण सोडण्याविषयीं बिलकूल जुलूम नाहीं असें असतां, आमच्यांतील अविचारी लोक रेल्वेंतून खालीं उतरल्याबरोबर ‘ उइल्यम् हॉटेल ’ मध्यें शिरतात ! ! ! तर असें धर्मविरुद्ध आचरण न करितां होईल तितकें पवित्रतेनें वागावें. कोणी म्हणेल कीं, हल्लींच्या काळीं पूर्ण रीतीनें धर्माचरण होणें अशक्य आहे. यावर उत्तर असें आहे कीं, होईल तितकेंच करावें. सत्कर्म थोडें केलें तरी फुकट जाणार नाहीं. श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत म्हटलें आहे:—

प्राप्य पुण्यकृताँल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ॥
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥

तात्पर्य, सदाचरणानें वागत असतां, जरी मनुष्य दैववशात् कामक्रोधादि षड्रिपूंच्या तडाक्यांत सांपडला, तरी पूर्वसंस्काराच्या बळानें तो आपल्या वाईट स्थितींतून चटकर सुटून मोकळा होतो. याविषयीं दृष्टांतादाखल एक गोष्ट सांगतों:—

प्राचीनकाळीं दक्षिणप्रांतीं वीणानदीचे काठीं बिल्वमंगल या नांवाचा एक उच्च कुलांतील ब्राह्मण राहत होता. तो चांगला विद्वान् व ईश्वरभक्त असा होता. दैववशात्, नदीच्या दुसऱ्या तटास एक चिंतामणिनामक वेश्या राहत असे, तिच्याशीं याचें प्रेम जडलें; आणि रात्रंदिवस त्याला तिच्याशिवाय अन्य विषय सुचेनासा झाला. यामुळें इकडे ईश्वरभक्तींत अंतर पडूं लागलें. असा क्रम चालला असतां पुढें एके दिवशीं बिल्वमंगलाच्या घरीं त्याच्या वडिलांचें श्राद्ध आलें, त्यामुळें त्या दिवशीं त्यास दिवसा चिंतामणीकडे जाण्यास आवकाश मिळालाच नाहीं. व रात्रींही कांहीं इष्ट मंडळी भोजनास यावयाची राहिली होती, त्यामुळें मध्यरात्रीपर्यंत अवकाश मिळाला नाहीं. शेवटीं सर्व कामधाम लगबगीनें आटपून

मोठ्या आतुरतेनें, मध्यरात्रीं तो तिच्याकडे जाण्यास निघाला. परंतु बाहेर पडतो तो पाऊस अगदीं मुसळधार पडत होता. चोहींकडे विजा जोरानें चमकत होत्या. व मेघांचा कडकडाट सुरू होता. त्यामुळें कसें जावें अशा विचारांत तो पडला. शेवटीं, कसेंही असो, आज साऱ्या दिवसांत आपण तिच्याकडे गेलों नाहीं, त्या अर्थी आतां तरी अवश्य गेलें पाहिजे असा निश्चय करून मोठ्या नेटानें चालूं लागला. कसाबसा नदीच्या कांठापर्यंत येऊन पोहोंचला; परंतु तेथें नदी दोन्ही थडींनीं तुडुंब भरून चालली आहे असें पाहून धीर खचला, व आतां पुढें जावें अगर मागें जावें, हें त्यास कांहीच सुचेनासें झालें.

अशा स्थितींत तो तेथें उभा असतां सर्वव्यापक दयालु परमात्मा श्यामसुंदर प्रभु, यानें विचार केला कीं, हा गृहस्थ एक वेळ माझा परमभक्त होता, परंतु आतां या वेश्येच्या नादीं लागून फसला आहे; यावर आपण अनुग्रह करावा.

इकडे बिल्वमंगलास त्या वेश्येचा ध्यास लागल्यामुळें त्यानें निश्चय केला कीं, जरी येथें कांहीं होडी वगैरे साधन दिसत नाहीं. तरी एक वेळ नदींत उडी तर टाकावी ह्मणजे आपण कोठें ना कोठें तरी पलीकडच्या किनाऱ्यास जाऊन लागूं. असा विचार करून आतां उडी टाकणार, तोंच अलिकडच्या कांठानें एक प्रेत वाहत येत होतें, तें त्याच्या नजरेस पडून विषयांधत्वामुळें त्याला वाटलें कीं अहाहा! माझ्या प्रियेनें मला होडी पाठविली आहे, तेव्हां इजवर बसून आतां आपण जावें. असा विचार करून त्या प्रेतावर बसून युक्तिप्रयुक्तीनें वाहवत वाहवत स्वारी पलीकडच्या कांठीं तर गेलीच व त्यानें ती होडीही किनाऱ्यास बांधून ठेविली. पुढें तिच्या घराजवळ येऊन तिला पुष्कळ हाका मारिल्या; परंतु एवढ्या अपरात्रीं ह्मणजे गाढ निद्रेच्या वेळीं व वृष्टि चोहींकडे धो धो धो चालली असतां, तिला याच्या हांका कोठून ऐकूं येणार!! घराभोंवतीं फिरतां एक खिडकी उघडी दिसली. तिच्या मुळाशीं एक महाभुजंग लोंबत होता. त्याला या राजश्रींनीं दोरी समजून, व माझ्या प्रियेनें मला वर चढण्यासाठीं ही मुद्दाम सोय करून ठेविली आहे अशी कल्पना करून दुसऱ्या मार्गानें तेथपर्यंत चढून त्या भुजंगाच्या पुच्छास हात घातला व

वर चढूं लागला. तो भुजंगही कावराबावरा होऊन जोरानें वर चढूं लागला. तेव्हां त्याच्या साहाय्यानें ही स्वारी पण अल्लाद वर गेली. गेल्यावर प्रथम त्या वेश्येस जागें केलें, तेव्हां ती एकदम दचकून जागी झाली आणि पुढें पाहते तों बिल्वमंगल उभा! ती आश्चर्यचकित होऊन ह्मणाली, अरे, एवढ्या अपरात्रीं व अशी घनघोर वृष्टि चालू असतां, तूं येथपर्यंत वर आलास कसा? तेव्हां तो ह्मणाला, त्वां होडी पाठविली होती, व दोरीची सोय करून ठेविली होती, त्यांच्या योगानें मी येथपर्यंत येऊन पोंचलों. ती ह्मणाली, दोरी कोठें आहे व होडी कोठें आहे ती मला दाखीव. तेव्हां तो तिला घेऊन गेला आणि दिव्यानें तपासून पहातां ती होडी नसून एक छिन्नविच्छिन्न प्रेत होतें असें आढळलें व दोरीच्या जागीं थंडीनें काकडून पडलला मोठा साप दृष्टीस पडला!! वेश्या, तें पाहून अतिशय विस्मित होत्साती ह्मणाली, हे गृहस्था, तूं जातीनें ब्राह्मण असून या गांवांतील संभावित घराण्यापैकीं आहेस. तुझी पूर्वी पंडितामध्यें गणना होती; तो तूं आतां माझ्या ठिकाणीं असा आसक्त होऊन आपल्या आयुष्याचा नाश करून घेत आहेस व मरणोत्तर अक्षय्य नरकाचें साधन करीत आहेस. हें साहस व हें प्रेम जर तूं परमेश्वराकडे लावशील, तर तुझा व तुझ्या संपूर्ण कुळीचा उद्धार होणार नाहीं काय? खचित होईल. तर तूं आता येथून जा व अधोगतीच्या मार्गापासून निवृत्त हो, असा निषेधात्मक उपदेश केला. (सर्व वेश्या दुष्ट असतात असें नाहीं, त्यांत एखादी सुबुद्धिही देणारी असते, व त्यांतून परमेश्वराची प्रेरणा, मग काय?) त्या तिच्या उपदेशामुळें व प्रेत-सर्पादिकांचा खरोखर भयंकर प्रकार त्याच्या दृष्टीस पडल्यामुळे त्याच्या मनास फार वाईट वाटून उपरति झाली व घरदार सोडून, प्रभूचे दर्शनासाठीं तडक तेथून वृंदावनास जावयास निघाला.

प्रभूच्या चरणीं एकसारखें लक्ष लागलें आहे व मुखानें रात्रंदिवस भजन चाललें आहे. अशा क्रमानें जातां जातां, मध्यें एका गांवीं तलावाच्या कांठीं जलप्राशनार्थ त्यानें क्षणभर मुक्काम केला. इतक्यांत त्या तळ्यावर एका सावकाराची परमरूपवती स्त्री पाणी भरण्यास आली होती, तिला पाहून त्यास पुनः मोह उत्पन्न झाला. कारण,

याचें वैराग्य दृढ झालेलें नव्हतें. व ह्या विषयांचा तडाकाच असा आहे कीं, त्यांमध्यें मोठमोठे तपश्चर्यासंपन्न व कसलेले महात्मेही प्रसंगीं फसतात. मग त्या बिचाऱ्या नवशिक्या बिल्वमंगलाची कथा काय? तो तसाच त्या स्त्रीच्या मागोमाग तिच्या गृहाच्या द्वारापर्यंत गेला. ती आंत गेली व हा बाहेर उभा राहिला. तिच्या भर्त्यानें आपल्या द्वारांत हा कोणी साधु उभा आहे असें समजून तिला सांगितलें कीं, सायंकाळ झाला आहे व अतिथि थकून आला आहे, लवकर पाकसिद्धि करावी. तिनें सांगितलें 'अहो, तो साधु नव्हे; कोणी कामुक पुरुष आहे.' तें त्यास बरें न वाटतां तो ह्मणाला, कसेंही असो, आमच्या येथून अतिथि विमुख जाऊं द्यावयाचा नाहीं. तीही पतिवचनानुरोधें वागणारी असल्यामुळें तिनें अनादर न करितां पाकसिद्धि केली. नंतर भर्त्यानें तिला आज्ञा केली कीं, तूं वस्त्राभरणांनीं अलंकृत होत्साती, पंचारती घेऊन साधूची पूजा करून ये. त्याप्रमाणें ती गेली असतां, त्या साध्वीचें ते तेज व तिच्या भर्त्याची ती निष्ठा पाहून बिल्वमंगलाचे सर्व विचार बदलले व मनांत ह्मणूं लागला, हर हर!! माझ्या मनांत काय ही पापबुद्धि आली होती बरें!! मी अद्यापि पुरा साधु बनलों नाहीं, केवळ साधूचा वेष घेतला आहे, अशा स्थितींतही जर लोक मला इतके भजत आहेत, तर मग मी खरोखर अंतःकरणपूर्वक साधु बनलों असतां लोक मला किती भजतील बरें!! असा विचार मनांत येऊन तो त्या स्त्रीस ह्मणाला, हे कन्ये, भोजनापूर्वीं तूं मला दोन दाभण आणून दे. दाभण कशास पाहिजेत वगैरे कांहींएक न विचारितां, तिनें ते मुकाट्यानें आणून दिले व आपण भोजनाच्या तयारीसाठीं घरांत आली. इकडे बिल्वमंगलानें विचार केला कीं, मुख्यत्वेंकरून पापवासना उत्पन्न होण्याला मूळ कारण हे नेत्र आहेत, तस्मात् यांचा व्यापार प्रथम बंद केला पाहिजे. असें ह्मणून त्यानें ते दोन्ही दाभण दोन्ही डोळ्यांत एकदम खुपसले आणि डोळे फोडून टाकिले. इकडे ती साध्वी त्याला भोजनास बोलावण्यासाठीं पुनः तेथें आली, तों त्याच्या नेत्रांतून रक्ताच्या धारा चालल्या आहेत!! तो विलक्षण प्रकार पाहून व घाबरून, तिनें ती सर्व हकीकत आपल्या पतीस कळविली. त्याला ही हकीकत ऐकून

फार वाईट वाटलें, परंतु काय करितो ? शेवटीं बिल्वमंगलानें त्या उभयतांचें समाधान करून भोजन आटोपल्यावर वृंदावनचा रस्ता धरिला. हाच भगवद्भक्त पुढें 'सुरदास' या नांवानें प्रसिद्धीस आला. असो. याप्रमाणें तो पूर्ण वैराग्यशाली बनून श्रीकृष्णाच्या चरणांचें ध्यान करीत वृंदावनाकडे चालला असतां, रस्त्यांत एक मोठा खाडा पुढें आला. हा आतां स्वत: आंधळा झाल्यामुळें त्याला तो खाडा कोठून दिसणार ? तेव्हां श्यामसुंदर प्रभूला काळजी पडली कीं, माझा भक्त आतां खाड्यांत पडणार, यास हात दिला पाहिजे. असा विचार करून स्वत: परमात्मा, लहान सुंदर बालक बनून दुरून ह्मणतात, हे बिल्वमंगला, पुढें मोठा खाडा आहे; तूं उजव्या हाताच्या रस्त्यानें वळून जा. बिल्वमंगलानें विचार केला, या अशा निर्जन अरण्यांत मनुष्याचा व त्यांतून बालकाचा आवाज कोठून ऐकूं येणार ? बहुधा हा श्रीकृष्ण परमात्माच असावा असें जाणून तो अधिकाधिक खाड्याकडेच जाऊं लागला; तेव्हां त्या बालकानें पुन्हां ओरडून तसेंच सांगितलें. यानेंही पुन्हां ऐकल्या न ऐकल्यासारखेंच केलें व मनांत ह्मटलें कीं, भक्तजनांला ह्या संसाररूपी मोठ्या खाड्यांतून बाहेर काढितो, तो मला ह्या सामान्य खाड्यांतून बचावणार नाहीं काय ? अलबत बचावील. असें ह्मणून पुढेंच चालला व आतां खास खाड्यांत पडणार असें जेव्हां त्या वेषधारी मुलानें पाहिलें, तेव्हां जवळ येऊन त्यानें त्याचा हात धरिला व योग्य रस्ता दाखविला. (प्राय: आंधळ्याला हातांत धरून नेणारीं मुलेंच असतात.) बिल्वमंगलानेंही त्याचा हात घट्ट धरिला आणि प्रार्थना केली कीं, हे दीनवत्सल, कृपाघन परमात्मन् तूं, वायुभक्षण करून तीव्र तपश्चर्या करणाऱ्या योग्यांच्या व ब्रह्मादिदेवांच्याही हातीं लागत नाहींस, तो आज माझ्यासारख्या गरीबाच्या हातीं बरा सांपडला आहेस ! मी आतां तुला कशाचा सोडितों ? असें ह्मणून याचा कंठ सद्गदित झाला व हृदय प्रेमानें उचंबळलें ! ! तेव्हां तो बालक, लाडालाडानें मला भूक लागली, मला जाऊं द्या असें ह्मणून हातांतून निसटून चालता झाला. ठीकच आहे. अनंत ब्रह्मांडें नखाग्रावर नाचविणाऱ्या प्रभूपुढें बिचाऱ्या बिल्वमंगलाचें काय चालणार ! ! शेवटीं त्यानें ह्मटलें, हे भगवन्,

( दोहरा )

**बाहु मरोडे जात हो निबल जानके मोय ॥**
**हृदय तें जो जाहुगे बली बखानुं तोय ॥**

ह्मणजे जरी आपण माझ्या हातांतून निसटून गेलां, तरी मी आपल्या हृदयांत तुह्मांस बांधून ठेविलें आहे; तेथून आतां आपण कसें निसटतां तें पाहूं!!!

सारांश, भक्तजनपालक परमात्मा आपल्या भक्तांसाठीं नाना अवतार धारण करून त्यांस संकटांत साहाय्य करितो व जगांत आपल्या भक्तांचें माहात्म्य वाढवितो.

द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीं वस्त्रांचाच अवतार धारण करून प्रभु स्वतःच अनंत वस्त्रें बनले.* आधुनिक विद्वान् ह्मणतील कीं हें सर्व खोटें आहे. द्रौपदीनेंच अशी एखादी युक्ति केली असेल कीं आपल्या आंतील वस्त्रांचा पत्ताच लागू नये!! परंतु असें नाहीं. प्रभूचें भक्तवात्सल्यच असें आहे.

आफ्रिकेच्या सहारानामक वाळवंटांत ह्मणजे जेथें १००—१०० कोस पाणी नाहीं अशा स्थळीं, जर कोणी भक्तशिरोमणि पाण्यावांचून कासावीस होईल, तर त्याच्या करितां प्रभु, तेथें सुंदर सरोवराच्या रूपानें अवतीर्ण होऊन त्याची तृषा शांत करितील. भक्ताकरितां प्रभु कोणत्या रूपानें कसा अवतार घेतील याचा नेम नाहीं. आकाशांतील नक्षत्रें मोजतां येतील, वाळवंटांतील वाळूचे कणही मोजतां येतील, परंतु प्रभुच्या अवतारांची गणना होणार नाहीं.

सारांश, सत्कर्माचरण करणारा मनुष्य प्रसंगविशेषीं जरी कामक्रोधादिकांच्या पाशांत सांपडला, तरी तो पूर्वसत्कर्माच्या बळानें लागलाच ताळ्यावर येऊन, ईश्वरभक्तीमध्यें रत होतो. तसा तो रत झाला ह्मणजे ईश्वर त्याची कधींही उपेक्षा करीत नाहीं.

ॐ शांतिः शांति शांतिः.

---

* खालील आर्या पहा.

**परमेश्वर रूप धरी स्वपरजनहितोदया लुगडियांचें ॥**
निववाया सभ्यांसह मन नयनहि तो दयाळु गडियांचें ॥
शेले शालू साड्या क्षीरोदक लांब रुंद पाटावें ॥
झाले अनंत वस्त्रें कीं तीस अनाथसें न वाटावें ॥

**मोरोपंत-द्रौपदीवस्त्रहरण.**

## व्याख्यान ५ वें.

### विषय—संध्येच्या द्वारा सुख व मोक्ष यांची प्राप्ति.

ईशस्तवन.

**संसारसंपातनिपातितानां मोहप्रमादेन विमोहितानाम् ॥**
**दुःखार्णवप्लावितजीवितानां त्वमेव नस्तत्परमावलम्बनम् ॥**

याप्रमाणें ईशस्तवन झाल्यानंतर स्वामिमहाराज ह्मणाले:—

कलिरूपी महान् अन्यायी राजा आज पांच हजार वर्षे आपल्या कामक्रोधादि—मंत्रिमंडळासहवर्तमान, कलिनिवासी जीवांवर आपला अमल गाजवून त्यांस दुःख देऊन राहिला होता, त्यास हांकून लावण्यासाठीं सनातनधर्मरूपी चक्रवर्ती राजा, ज्ञानाच्या गोळ्या आणि विज्ञानाचे बार भरून व शम, संतोष, सत्संग, विचार या चार घोड्यांच्या ईश्वरभक्तिरूपी गाडीवर आरोहण करून प्राप्त झाला आहे. आशा आहे कीं, थोड्या वेळांत हरिनामरूपी छर्यांच्या माऱ्यानें त्या कलिरूपी शत्रूस तो जर्जर करून टाकील. ह्मणून एकवार हरिनामस्मरण करा. " हरे राम हरे राम राम राम हरे हरे ॥ हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे."

दुसऱ्या व्याख्यानांत, संध्येचा ब्रह्मविद्येशीं संबंध दाखवून संध्येच्या योगानें मनुष्यास सुख, आयुष्य व आरोग्य ह्यांची प्राप्ति होऊन मोक्षही साधितां येतो असें सांगितलें होतें, व त्यापैकीं काल रोजीं संध्येच्या द्वारा आयुष्याची वृद्धि कशी होते, त्याचे विवेचन केलें. आतां आज रोजीं संध्येच्या द्वारा सुख व मोक्ष यांची प्राप्ति कशी होते त्याचें विवेचन करितों; त्याकडे आपणां सर्वांचें लक्ष असावें.

प्राणायामाचें आनुभविक ज्ञान नसल्यानें ज्यांस त्याचें खरें रहस्य कळलें नाहीं, असे कांहीं वैद्य किंवा डॉक्टर ह्मणतील कीं कुंभक केल्यानें बाहेरील हवेंतील शुद्ध प्राणवायु ( ऑक्सिजन ) रक्तास पाहिजे तितक्या प्रमाणानें मिळणार नाहीं व शरीरांतील रक्त बिघडून नानाप्रकारचे रोग

उत्पन्न होतील. परंतु असें ह्मणणें हा त्यांचा भ्रम आहे. बलूनांत ( विमानांत ) बसून फार उंच गेलेला मनुष्य, केवळ प्यॅराशूट्च्या ( एक प्रकारच्या छत्रीच्या ) साहाय्यानें तेथून एकदम उडी टाकून खालीं सुरक्षित कसा उतरतो, ह्या गोष्टीची ज्यास माहिती नाहीं, तो आपल्या अज्ञानाच्या योगानें त्याविषयीं जशी भलभलती कल्पना करितो, तशीच ही कल्पना आहे. आपल्या इकडे जेव्हां प्रथम आगगाडी सुरू झाली तेव्हां अज्ञजन तिला देवता समजून तिची पूजा करूं लागले, परंतु जेव्हां पुढें खरोखर प्रकार काय आहे हें कळलें, तेव्हां तो अज्ञानपणाचा प्रकार बंद झाला. त्याचप्रमाणें प्राणायामाचा जसजसा जास्त अभ्यास होत जाईल, तसतशी, बाहेरच्या प्राणवायूच्या आश्रयावांचून कसें राहतां येतें याजबद्दल त्याची खात्री होत जाईल. जो योगी सिद्धदशेला पोंचला, त्याला बाहेरच्या ऑक्सिजनची फारशी पर्वा नाहीं. श्रीकृष्णांनीं योगाचीच महती विशेष वर्णिली आहे:—

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ॥
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥

भ. गी. अ. ६ श्लो. ४६.

ही योगाची महती, अनधिकाऱ्यास एकाएकीं कळणार नाहीं, परंतु आमच्या शास्त्रकारांनीं, दूरदृष्टीनें, लहानपणापासूनच आमचा योगमार्गांत प्रवेश व्हावा अशी योजना करून ठेविली आहे. मुलगा ८ वर्षांचा होतांच त्याची मुंज करून, त्याला संध्येतच प्राणायामापर्यंत योगक्रियेचा मार्ग युक्तीनें शिकविला जातो. तो पुढें त्यानें अभ्यासानें वाढवून, अहिंसा–ब्रह्मचर्यादि धर्म कडकडीत पाळून शेवटीं समाधीपर्यंत पोंचावें ह्मणजे सर्व ऐहिकसुख भोगून अंतीं मोक्षाप्रत पावावें, असा सुंदर क्रम लावून दिला आहे.

सुखाच्या संबंधानें व्यावहारिक दृष्टीनें विचार करितां, तें सापेक्ष आहे असें आढळून येतें. ह्मणजे जों जों मनुष्य आपल्या वरच्या पायरीच्या मनुष्याच्या सुखाकडे लक्ष देतो, तों तों त्यास सुखप्राप्ति न होतां, उलट दुःख होऊं लागतें. परंतु याच्या उलट तो जसजसा खालच्या पायरीच्या

लोकांच्या सुखाकडे पाहतो, तसतसा, मी जास्त सुखी आहें असें त्यास वाटूं लागतें, ह्मटलें आहे:—

अधोधः पश्यतः कस्य महिमा नोपचीयते ।
उपर्युपरि पश्यन्तः सर्व एव दरिद्रति ॥

एवढा मोठा इंद्र, तो जर आपल्यापेक्षां जास्त ऐश्वर्यसंपन्न अशा लक्ष्मीपतीकडे ( विष्णूकडे ) लक्ष देईल, तर त्याला देखील स्वतःचें ऐश्वर्य तुच्छ वाटून सुख होणार नाहीं, मग इतरांची कथा काय? बरें, जें कांहीं थोडेंबहुत सुख लोकांना वाटतें, तें तरी सदोदित सारखें वाटतें काय? तर नाहीं. आज अमुक एक इष्ट विषय प्राप्त झाल्यानें जें सुख वाटतें, तितकें सुख उद्यां त्यापासून वाटत नाहीं. उदाहरणार्थ पहा, हा मेजावरील सुंदर दिवा पाहून कोणास वाटेल कीं, असा दिवा आपणही आणावा. त्याप्रमाणें आणल्यास पहिल्या दिवशीं यजमान स्वतः तो पुसून तेलवात घालून लावील, परंतु कांहीं काळ लोटल्यावर त्याचे निरनिराळे अवयव कोठें पडले आहेत, त्याची शुद्धही राहणार नाहीं. असेंच लग्नकार्य इत्यादिकांच्या संबंधानेंही घडतें. सारांश, प्रथम जेव्हां इष्ट विषयाची प्राप्ति होते, तेव्हां जो आनंद वाटतो तो आनंद कांहीं काळ लोटल्यावर तसाच राहत नाहीं. यावरून सहजींच असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, सर्वांपेक्षां जास्त व निरंतर टिकणारा असा आनंद कोठें मिळण्याचा संभव आहे काय? असल्यास तो कोठें व कसा मिळेल?

योगी सांगतात, प्राणवायु सुषुम्नेच्या द्वारा ब्रह्मरंध्रांत प्रवेश करून तेथें स्थिर झाला असतां समाधिबलानें आत्मसाक्षात्कार होऊन असा अलौकिक व अखंड आनंद प्राप्त होतो. वेदांतीही आपल्यास सांगतात कीं, आत्मा आनंदाचा कंद आहे. व त्या आनंदापुढें हीं सर्व विषयसुखें अत्यंत तुच्छ आहेत.

असें आनंदाचें साधन प्रत्येकाचे ठायीं अगदीं जवळ असतां, त्याचा अनुभव कां येत नाहीं? व उलट, सर्व लोक दुःखानेंच व्याकुळ असे कां दिसतात? तर याचें कारण असें आहे कीं, जसजसा मनुष्य बहिःप्रज्ञ ह्मणजे बाहेरच्या विषयांत आसक्त झालेला असतो, तसतसा त्यास त्या

आनंदाचा अनुभव मिळणें शक्य नाहीं; परंतु जसजसा अन्तःप्रज्ञ ह्मणजे अन्तर्मुख होत जाईल, तसतसा त्यास त्या आनंदाचा अनुभव येत जाईल. श्रुति ह्मणतेः—

**सर्वं ह्येतद्ब्रह्मायमात्मा ब्रह्म सोऽयमात्मा चतुष्पात् ॥**

**माण्डूक्योपनिषत् ।**

हें सर्व ब्रह्मरूप आहे, हा आत्मा ब्रह्मरूप आहे. या आत्म्याचे चार पाद ह्मणजे अवस्था आहेत. अग्नीच्या ठायीं ज्याप्रमाणें प्रकाश, उष्णता, ज्वलन, व उपशमन या चार अवस्था दिसून येतात, त्याप्रमाणेंच आत्म्याच्याही चार अवस्था आहेत. त्या चोहोंपैकीं कोणत्या अवस्थेंत विशेष सुख अथवा अखंड आनंदाचा अनुभव मिळतो, तें जाणण्यासाठीं त्या चारही अवस्थांचें थोडक्यांत निरूपण करितों.

**जागरितस्थानो बहिःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः स्थूलभुग्वैश्वानरः प्रथमः पादः ॥**

**माण्डूक्योपनिषत् ।**

पहिली जागृत अवस्था. हींत आत्मा बहिःप्रज्ञ असतो ह्मणजे तो बाह्य पदार्थांस जाणतो. संपूर्ण विश्व हा त्याचा देह ह्मणून त्यास या अवस्थेंत 'विश्वात्मा अगर वैश्वानर' ह्मणतात. स्वर्ग हें मस्तक, सूर्य नेत्र, वायु प्राण, आकाश हा देहाचा मध्यभाग, उदक हें मूत्रस्थान, पृथ्वी हे पाय, आणि आहवनीय अग्नि हें मुख, अशीं त्याच्या देहाचीं सात अंगें जाणावीं. पांच प्राण, पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें, मन, बुद्धि, चित्त, अहंकार हीं त्याचीं १९ मुखें होत. हीं एकोणीस, भोगांला साधन असल्यामुळें, ह्यांस मुखें ह्मणतात. ह्या मुखांनींच स्थूलशब्दादिकांचा बाह्यवृत्तीनें जागृदवस्थेंत भोग होतो. हा आत्म्याचा प्रथम पाद होय. यांत सुख असतें काय ह्मणून प्रश्न केल्यास, 'नाहीं' असें मागेंच सिद्ध केलें आहे. यांत वृत्ति बाहेर फांकलेली असून बाह्य विषयांच्या आसक्तीमुळें त्यास घडोघडी दुःखाचे प्रसंग येतात. आज काय पुत्र मरण पावला, तर उद्यां घर जळालें; परवां कोर्टांतील मुकद्दमा बुडाला, तर

तरवां ताप अगर दुसरा कांहीं रोग झाला; याप्रमाणें सदोदित कांहीं ना कांहीं चालू असावयाचेंच.

**स्वप्नस्थानोऽन्तःप्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः प्रविविक्तभुक् तेजसो द्वितीयः पादः ।**

**माण्डूक्योपनिषत् ।**

दुसरी स्वप्नावस्था. हींत आत्मा अन्तःप्रज्ञ ( अन्तर्वृत्ति ) होऊन व बाह्य स्थूलेन्द्रियाचे सर्व व्यापार आंत खेंचून घेऊन, केवळ तेजोरूपानें राहतो, ह्मणून या अवस्थेंत यास 'तैजस' ह्मणतात. जसा एकादा फोटोग्राफर एकाद्या मोठ्या शहराचा फोटो एका लहानशा कांचेंत घेऊन तो आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तेवढा विस्तृत करितो, तसा आत्माही या विशाल बाह्यसृष्टीचा फोटो अन्तःकरणरूप कांचेवर एका बिंदूंत खेंचून घेऊन स्वप्नावस्थेंत त्याचा इच्छेप्रमाणें विस्तार करितो. ह्मणजे जागृत अवस्थेत स्थूल इंद्रियांनीं ज्या ज्या विषयांचा उपभोग घेतला असेल त्या त्या विषयांचे केवळ संस्कार स्वप्नावस्थेत उद्भूत होऊन ते त्या त्या विषयांच्या रूपानें भासूं लागतात. येथें या विषयांचा उपभोग घेण्यासाठीं पूर्वीं सांगितलेलीं सात अंगें व एकोणीस मुखें केवळ मनोमयच असतात. ह्मणजे स्वप्नावस्थेंत आत्मा, आपल्या तेजानें शरीराचीं सर्व अंगें व सर्व इंद्रियें, केवळ मनोमय अशीं निर्माण करून, त्याच्या साह्यानें स्वप्नसृष्टींतील सूक्ष्म ( वासनामय ) भोगांचा उपभोग घेतो. हा आत्म्याचा द्वितीय पाद होय. यांत सुख आहे काय ? ह्मणून प्रश्न विचारिला असतां, 'नाहीं' असाच जबाब मिळतो. कारण, या अवस्थेंतही, 'मी राजा झालों,' 'मला सर्प चावला' इत्यादि नाना तऱ्हेच्या सुखदुःखांचा अनुभव जाग्रदवस्थेप्रमाणेंच घडतो.

जाग्रदवस्था व पुढें सांगावयाची जी सुषुप्त्यवस्था, या दोहोंच्या दरम्यान जी अवस्था ती स्वप्नावस्था होय. योगशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, जाग्रदवस्थेंत हृदयामध्यें जे द्वादशदलचक्र आहे, तें मनःस्थान असून, त्याच्या दलांभोंवतीं [ पाकळ्यांभोंवतीं ], मन हें भ्रमरासारखें निरंतर फिरत असतें. ज्या दलावर तें विशेष गुंतून राहील, त्याप्रमाणें त्या त्या

वृत्तींचा अतिरेक दिसून येतो. हृदयापासून नेत्रांत दोन नाड्या गेल्या आहेत. एक गांधारी व दुसरी हस्तिजिव्हा. डाव्या नेत्रांत गेलेली ती गांधारी व उजव्या नेत्रांत गेलेली ती हस्तिजिव्हा होय. हर्षशोकादिवृत्ति अतिशयित वाढल्या असतां, हृदयकमलाभोंवतीं एक जलमयस्थान आहे. ज्यास इंग्रजींत Peri-cardiam ह्मणतात, त्यांतील जल वरील नाड्यांच्या द्वारानें नेत्रांत जाऊन अश्रुरूपानें बाहेर पडतें. सारा दिवस इंद्रियें आपापल्या व्यापारांनीं थकून जेव्हां निद्रा प्राप्त होते, तेव्हां वरील कमळाच्या पाकळ्या मिटू लागतात व मन त्यांच्या केंद्रस्थानीं राहून स्थिरावूं लागतें. बाह्य विषयांत जबरदस्त आसक्ति राहिली असल्यास मनाचें सर्व चांचल्य एकदम जात नाहीं व त्या त्या विषयांचें संस्काररूपानें भान होत असतें. हीच स्वप्नावस्था होय. हींत सुख नाहीं हें वर सांगितलेंच आहे. आतां आत्म्याच्या तृतीय पादाचा विचार:—

**यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् ॥ सुषुप्तिस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवानन्दमयो ह्यानन्दभुक् चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥**

माण्डूक्योपनिषत् ।

तिसरी सुषुप्त्यवस्था. हींत आत्मा पूर्ण निद्रावश होऊन कांहींएक इच्छित नाहीं व कांहीं स्वप्नही पाहत नाहीं. तो प्रज्ञानघन असतो ह्मणजे त्याचे ठायीं जागृदवस्थेचें व स्वप्नावस्थेचें ज्ञान, एक अविद्यारूप होऊन गेलेलें असतें. येथें पूर्वीचीं निरनिराळीं अंग अगर १९ मुखें नसून तीं सर्व एकवटलेलीं असतात. जसा एकादा गारुडी एक सुपारी घेऊन तींतून १९ सुपाऱ्या पृथक् काढून दाखवितो व पुनः त्या सर्व नाहींशा करून एकींतच त्यांचा अन्तर्भाव करितो, त्याप्रमाणें आत्मा जागृतींत पृथक् असलेल्या १९ मुखांचा या अवस्थेंत एका चेतोरूप मुखांत अंतर्भाव करून, त्यानें आनंदाचा उपभोग घेतो व केवळ आनंदमय होऊन राहतो. ह्या अवस्थेंत त्यास ‘ प्राज्ञ ’ असें ह्मणतात. हा आत्म्याचा तृतीय पाद होय. या अवस्थेंत सुख आहे काय ह्मणून विचारिलें असतां, सकृद्दर्शनीं हींत विपुल सुख आहे व आनंदी आनंद आहे असें कोणीही सहज

ह्मणेल. तर मग आतां आनंदाचा ज्यास्त ठावठिकाण शोधण्याची जरूर राहिली नाहीं. मथुरेच्या चौब्याप्रमाणें मसालेदार भांगेचा एक लोटा घ्यावा, अगर गांजा, चंडोळ, अफू, वगैरे द्रव्यांपैकीं एकाद्याचें यथेच्छ सेवन करावें आणि खुशाल निशंत पडून रहावें, ह्मणजे आनंदास मुळींच तोटा नाहीं. हें क्षणभर कोणास खरें वाटेल परंतु विचारा अंतीं तो भ्रम आहे असें कळून येईल. कारण हा आनंद चिरकाळ टिकणारा नसून त्यापासून पुढें अपायच होईल. कदाचित् तो टिकणारा आहे असें घेऊन चाललों, तरी त्यांत एक मोठी जबरदस्त गोम आहे. ती अशी कीं, हा आनंद केवळ अविद्यारूप आहे ह्मणजे आनंदाचा उपभोग घेत असतां, 'मी आनंदाचा उपभोग घेत आहें' असें त्यास मुळींच कळत नाहीं. मग असा शेंकडों वर्षें उपभोग घडत असला आणि त्याचें त्याला ज्ञान नाहीं, तर असला आनंद काय कामाचा? एकादा मातीचा रूसचा बादशहा बनविला व त्यास उंच सिंहासनावर बसवून व दागदागिन्यांनीं अलंकृत करून मानपानासाठीं १०—२० तोफांची सलामीही दिली, तरी त्या बापड्यास कांहीं आनंदाचा उपभोग घडण्याचा संभव आहे काय? अर्थात् नाहीं. तशाच प्रकारचा वरील आनंद होय. तेव्हां सुषुप्त्यवस्थेंत देखील खरा आनंद प्राप्त होत नाहीं, हें सिद्ध झालें. आतां चवथा पादः—

**नान्तःप्रज्ञं न बहिःप्रज्ञं नोभयतःप्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ॥ अदृष्टमव्यवहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपदेश्यमेकात्मप्रत्ययसारं प्रपञ्चोपशमं शान्तं शिवमद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः ॥**

**माण्डूक्योपनिषत् ।**

चवथी तुर्यावस्था. हींत आत्मा अन्तःप्रज्ञ ( अन्तर्वृत्ति ) नाहीं, बहिःप्रज्ञ ( बाह्यवृत्ति ) नाहीं, उभयतःप्रज्ञ ( अर्धवट जाग्रदवस्थेंत व अर्धवट स्वप्नावस्थेंत असा ) नाहीं, प्रज्ञानघन नाहीं, प्रज्ञ नाहीं, व अप्रज्ञही नाहीं. तर तो अदृष्ट, अव्यवहार्य, अग्राह्य, अलक्षण, अचिन्त्य, अव्यपदेश्य ( शब्दांनीं न सांगतां येण्यासारखा ) तिन्ही अवस्थांचा साक्षी, सर्व स्थूलसूक्ष्म प्रपंचापासून मुक्त, शान्त, शिव, अद्वैत असा असतो. हा आत्म्याचा चतुर्थपाद होय. तोच आत्मा म्हणजे आत्म्याचें खरें स्वरूप

होय. व तोच जाणण्यास योग्य होय. तुर्यावस्था हीच खऱ्या व अलौकिक आनंदाचा खाण आहे; परंतु तिचें वरील वर्णन ऐकून श्रोत्यांच्या मनाचा असा घोटाळा उडाला असेल कीं, 'प्रज्ञ नाहीं, अप्रज्ञ नाहीं, अदृष्ट आहे, अग्राह्य आहे,' इत्यादि विवेचनावरून आम्ही समजावयाचें काय ? वर्णन तर लांबलचक केलें, परंतु मतलब त्यांतून कांहींच निघत नाहीं. जशी एकानें एका मुलाला काहाणी[†] सांगितली.

'तीन गांव होते, त्यांपैकीं दोन उजाड व एक वसलाच नव्हता. जो वसला नव्हता, त्यांत तीन कुंभार होते, त्यांपैकीं दोन देशांतरीं गेले होते, व एकाला स्वतःचा धंदा येत नव्हता. ज्याला धंदा येत नव्हता, त्यानें तीन मडकीं घडलीं. त्यांपैकीं दोन फुटलेलीं व एक तयारच नव्हतें. जें तयार नव्हतें, त्यांत तीन तांदुळांचे दाणे शिजविले, त्यांपैकीं दोन बाहेर उसळून गेले व एक शिजलाच नाहीं. जो शिजला नाहीं, त्याच्या योगानें तीन पाहुणे जेवूं घातले, त्यांपैकीं दोन आलेच नव्हते, व एक निजून राहिला होता....वगैरे.' ही काहाणी मोठी लांबलचक झाली, परंतु आंत मतलब पाहूं जातां कांहींच नाहीं. तशाच प्रकारचें वरील विवेचन सध्यां आमच्या श्रोत्यांला वाटल्यास नवल नाहीं. तुर्यावस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा अधिकार त्यांस प्राप्त झाला म्हणजे त्यांस वरील विवेचनाचें रहस्य कळून येईल. मुलीमुली लहानपणीं बाहुलाबाहुलीचा खेळ खेळतात व नवराबायको, सासूसासरा इत्यादि सर्व व्यवहार करितात, परंतु त्या वेळीं त्यांस त्यांतील रहस्य कांहींच कळत नाहीं. त्यांतील एखाद्या जाणत्या मुलीचें लग्न होऊन ती संसार करूं लागली, म्हणजे तिला खरें रहस्य

---

† अशा चमत्कारांच्या काहाण्या प्राचीन ग्रंथांत पुष्कळ आढळतात. वरील नमुन्यासारखीच एक लांबलचक काहाणी पंचदशीच्या १३ व्या प्रकरणांत सांगितली आहे. ती विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहीं. 'एष वन्ध्यासुतो याति' हा श्लोक सुप्रसिद्ध आहे. तसाच एक दुसरा श्लोक पहा:—

अन्धो मणिमविध्यत्तमनंगुलिरवावयत् ॥
अग्रीवस्तं प्रत्यमुञ्चत्तमजिव्होऽभ्यपजयत् ॥

योगसूत्र–भाष्य.

कळतें व मग ती आपल्या इतर लहान मैत्रिणींबरोबर खेळावयास लाजते. तूं कां लाजत्येस असें त्या लहान मुलींनीं विचारिल्यास, ती सांगते कीं, तुमचें लग्न झाल्यावर हे सर्व तुम्हांला कळेल. त्याचप्रमाणें तुर्यावस्थेंतील आनंदाचा अनुभव, त्या स्थितीला जाऊन पोंचल्याखेरीज, मिळणें अशक्य आहे.

त्या अवस्थेचा अनुभव घेण्यासाठीं आपल्यास तीन अवस्था व तीन गुण यांच्या पलीकडे गेलें पाहिजे. श्रीतुलसीदास म्हणतात:—

**तीनि अवस्था तीनि गुण, तेहि कपासते काढि ॥**
**तूल तुरीय सवाँरि पुनि, बाती करै सुगाढि ॥**

**रामायण.**

तीन अवस्था, तीन गुण हा कापूस घेऊन, त्याची तुर्यारूप वात बनवून ज्ञानदीप प्रज्वलित केला असतां आत्म्याच्या ज्योतिःस्वरूपाचा साक्षात्कार होईल. फारसीमध्यें तुर्यावस्थेविषयीं म्हटलें आहे:—

ह्मणजे तुर्यारूपी शाखेचे आह्मी पक्षी आहों व गुप्ततत्वाच्या पेटींतील आह्मी मणि आहों. आरबीमध्येंही जाग्रदादि चार अवस्थांचें वर्णन केलें असून त्यांस अनुक्रमें ' **मलकूत, जबरूत, नासूत** आणि **लाहूत** अशा संज्ञा आहेत.

सारांश, सर्व तत्त्ववेत्त्यांच्या मतानें तुर्यावस्था ही अलौकिक व अखंड आनंदाचें अधिष्ठान आहे असें ठरतें. तेव्हां ती प्राप्त होण्याचा उपाय शोधिला पाहिजे ह्मणजे आपण पूर्ण सुखी होऊं. व तो उपाय '**प्राणायाम**' हाच होय. कारण, त्याच्या दृढ अभ्यासानें प्रत्याहारादि समाधीपर्यंतचीं पुढील अंगें सिद्ध होऊन तुर्यावस्थेंतील अखंड आनंदाचा आस्वाद मिळतो. तो आस्वाद मिळावा अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें अभ्यास करून दररोज ३१० प्राणायाम करण्याइतकी आपली शक्ति वाढविली पाहिजे. याप्रमाणें प्राणायामाचा व तुर्यावस्थेचा अतिशय निकट संबंध आहे*

---

***प्राणायामव्रतं तच्छ्रुतिशिरसि मतं स्वात्मलब्धौ न चान्यत् ।**

**श्रीशंकराचार्य.**

व तो प्राणायाम आपल्यास संध्येंत शिकविला जातो, ह्मणून संध्या ही तुर्यावस्थेला नेऊन पोंचविणारी असून, ती अलौकिक सुख व मोक्ष यांच्या प्राप्तीचें साधन आहे, असें सिद्ध झालें.

प्राणायामाचा अभ्यास करणारानें जे अहिंसादि धर्म अवश्य पाळले पाहिजेत, त्यांपैकीं अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादि पांचसहा धर्मांचें पूर्वी कथन केलेंच आहे. आज आतां **क्षमा** व **संतोष** याबद्दल थोडें निरूपण करितों.

क्षमा हा गुण मनुष्यामध्यें अवश्य असला पाहिजे. महासाध्वी द्रौपदीच्या ठायीं¶ हा गुण अवर्णनीय होता. दुर्योधनादिकांनीं सभेंत वस्त्रहरण करून तिची अतिशय विटंबना केली होती, तथापि पुढें पांडव वनवासांत असतां, एका वेळीं गंधर्वांनीं दुर्योधनादि मंडळीस जेव्हां बांधून नेलें, तेव्हां द्रौपदीस त्यांच्याबद्दल दया येऊन, तिनें अर्जुनाला विनंति केली कीं, आपण जाऊन कौरवांस गंधर्वांपासून सोडवून आणावें. त्याप्रमाणें अर्जुन जाण्यास तयार झाला, परंतु हें भीमास कळल्यावर त्यास अतिशय क्रोध आला व तो त्याला जाण्याविषयीं प्रतिबंध करूं लागला. परंतु, 'क्षमा हें वीराचें भूषण, व अपकार जिंकावयास उत्तम उपाय उपकार हाच होय' असें त्यास सांगून तो पुढें गेला आणि कौरवांस सोडवून त्यांस जिकडच्या तिकडे रवाना करिता झाला. तेव्हां तेही अतिशय खजील होऊन व खालीं माना घालून आपल्या घरीं चालते झाले.

हल्लीं दुनियेच्या व्यवहारांत क्षमा, सत्य, यांच्या जागीं चोहींकडे पॉलिसी येऊन राहिली आहे, परंतु तिच्यापासून कांहीं चांगलें फळ नाहीं. पॉलिसी ( Policy ) च्या नुसत्या स्वरूपावरून देखील तींत कांहीं अर्थ नाहीं असें दिसून येईल. पहा, P चें पोट रिकामें, o सगळाच पोकळ, l केवळ उभा खांबच, i नेहमीं डोक्यावर बोजा घेतलेला, c विंचवासारखी व y तर सर्वांगीं वांकडा, अशी पॉलिसीची स्थिति आहे. पूर्वीचे योद्धे धर्मयुद्ध करीत असत. त्यांनीं दिवसभर युद्ध केलें, तथापि रात्रीं

¶ येथें क्षमा हा द्रौपदीचा गुण वर्णिला आहे, परंतु तो धर्माचा असावा असें वाटतें. तूर्त महाभारत जवळ नसल्यानें ज्यास्त खुलासा देतां येत नाहीं.

शिबिरांत गेल्यावर त्यांच्या परस्पर प्रेमपूर्वक गोष्टी होत असत. इंग्रजांनीं कांहीं अंशीं या आमच्या नीतीचें अवलंबन केलें आहे. नुक्तीच जशी चीनमध्यें रूसच्या अधिकाऱ्यांकडून एकदम हजारों बायकापोरांची कत्तल केली गेली, तसा प्रकार इंग्रजांचा नाहीं.

आतां संतोषाबद्दल विचार करूं. संतोष हा एक दैवी संपत्तीचाच गुण आहे. कोणाजवळ याचना न करितां मिळालेल्या अन्नादि पदार्थांवरच तृप्त असणें, यास संतोष ह्मणतात. संतोषरूप ऐश्वर्यानें जे सुखी आहेत, ते इंद्राच्याही ऐश्वर्यास कसपटाप्रमाणें समजतात. तुलसीदास ह्मणतात:—

(दोहरा.)

**तीन टुक कौपीनके अरु भाजी बिन लोन ॥**
**तुलसी रघुवर उर बसे इंद्र बापुरो कौन ॥**

हृदयांत रघुनाथ वसत असून, कौपीनाचे जरी तीन तुकडे झाले असले आणि भाजी अळणी खाण्याचा प्रसंग असला, तरी तेवढ्यांत आह्मांस संतोष आहे; यापुढें बिचाऱ्या इंद्राच्या ऐश्वर्याची मुळींच मातबरी नाहीं ! !

सुखाचें मूळ संतोष व दुःखाचें मूळ तृष्णा आहे; ह्मणून तृष्णेच्या प्रवाहांत पडून सुखासाठीं अनीतिचें अवलंबन करूं नका. एका नीतिमान् राजास रात्रीं स्वप्न पडलें कीं, आपलें राज्यवैभव सर्व जाऊन व दासदासी सर्व नष्ट होऊन आपण कंगाल झालों त्यामुळें जिवास फार वाईट वाटलें; परंतु जागा झाल्यावर पाहतो तों, तसें कांहीं नसून पूर्ववत् सर्व ऐश्वर्य कायम आहे; तेव्हां त्यास पुनः आनंद वाटला. याचेच उलट, एका अनीतीनें वागणाऱ्या दरिद्र्यास स्वप्न पडलें कीं, आपण मोठे राजे बनलों आहों; हजारों दासदासी आपल्या सेवेंत तत्पर आहेत व पूर्ण वैभव आपण भोगीत आहों; त्यामुळें स्वप्नांत त्याला मोठा आनंद झाला, परंतु जागा झाल्यावर जसेच्या तसेच आपण रंक आहों, असें पाहून त्यास मोठा खेद वाटला. याच दृष्टांताप्रमाणें, या प्रपंचरूपी दीर्घस्वप्नांत धर्माचरण करीत असतां, जरी तुह्मांस पुष्कळ कष्ट पडत असले, तरी परिणामीं

त्यांत सुखच आहे व अनीतीच्या द्वारें जरी आपल्यास पुष्कळ सुखें वाटत असलीं, तरी परिणामीं त्यांत दुःखच आहे असें पक्कें समजा, आणि तृष्णारहित होऊन आपल्या प्रारब्धानें जे भोग प्राप्त होतील त्यांतच तृप्त रहा; उगाच नसती हांव धरूं नका. श्रीभगवान् पतञ्जलि योगसूत्रांत ह्मणतातः—

संतोषादनुत्तमसुखलाभः

साधनपाद—सूत्र ४२.

जो नेहमीं संतोषवृत्तीनें राहाण्याचा दृढ अभ्यास करितो, त्याच्या सर्व प्रकारच्या तृष्णा क्षीण होऊन सत्त्वाचा उत्कर्ष झाल्यामुळें त्याला पराकाष्ठेचें सुख प्राप्त होतें. त्या सुखापुढें स्वर्गसुखही त्यास तुच्छ वाटतें.

संतोषानें राहणाऱ्या पुरुषाचा सर्व भरंवसा ईश्वरावरच असतो व ईश्वरही अशा अनन्यभक्ताची उपेक्षा कधींच करीत नाहीं. याविषयीं एक गोष्ट सांगतोंः—

द्वापरयुगांत श्रीकृष्णाचा लहानपणचा परम मित्र व त्याचा परम भक्त असा 'सुदामा' नांवाचा ब्राह्मण होता. जें काय यदृच्छेनें प्राप्त होईल, तेवढ्यांत निर्वाह करून तो अतिशय संतोषवृत्तीनें राहत असे. त्याची भार्या 'शुकी' नांवाची होती. तीही अत्यंत सुशील व परमसाध्वी अशी होती. त्यांच्या मुलाबाळांचा परिवार वाढला, तेव्हां घरच्या अतिशय गरीबीमुळे सर्वांस पुरेसें अन्नवस्त्र मिळण्याची मोठीच पंचाईत पडूं लागली व कित्येक दिवसचे दिवस उपास काढण्याची पाळी येऊन पराकाष्ठेचे हाल होऊं लागले. ते शुकीला पाहवत ना व सहन होत ना, ह्मणन तिनें भर्त्यास विनंति केली कीं, आपला लहानपणचा मित्र श्रीकृष्ण हा सांप्रत द्वारकाधिपति असून सकलैश्वर्यसंपन्न आहे. त्याजकडे जाऊन आपण आपली हकीकत निवेदन केली असतां, तो आपणांस खचित कांहीं तरी मदत करील. सुदाम ह्मणाला, प्रिये, त्याजवर भार टाकणें योग्य नाहीं; प्रभुसत्तेनें हे अडचणीचे दिवसही निघून जातील. शिवाय, तो लहानपणचा मित्र खरा, परंतु आतां द्वारकाधीश झाला आहे, तेव्हां आपल्यास ओळखील न ओळखील!! त्यावर ती ह्मणाली, त्यानें आप-

त्यास नाहीं ओळखलें, तर नाहीं; आपण प्रयत्न तर करावा. शेवटीं तिच्या आग्रहावरून व घरांतील एकंदर दुर्दशा पाहून त्यानें श्रीकृष्णाची भेट घेण्याचा निश्चय केला. रिकाम्या हातानें प्रभुदर्शनाला जाणें योग्य नाहीं, असें समजून शुकीनें घरांत असलेले थोडे पोहे सतरा थिगळें दिलेल्या एका लहानशा स्वच्छ वस्त्रांत बांधून, ती मोटली त्याच्या स्वाधीन केली. तेव्हां तो श्रीकृष्णदर्शनाविषयीं अत्यंत उत्कंठित होत्साता, त्याच्या चरणांचें ध्यान करीत द्वारकेस जाण्यास निघाला. मोठ्या कष्टानें अर्ध्या मुक्कामापर्यंत आला, परंतु पुढें जाववेना. कारण, पायांत जोडा नसल्यानें पाय भाजून त्यांस फोड आले होते व कांहीं स्थळीं कांटे बोंचून त्यांतून रक्तही वाहत होतें. जवळ कांहीं खावयास नसल्यानें पोट अगदींच खपाटीस गेलें होतें. असा चोहींकडून अत्यंत व्याकुळ होऊन ऐन दोन प्रहरीं एका वृक्षाच्या छायेखालीं बसून प्रभूची प्रार्थना करूं लागला कीं, हे भगवान्, आतां आपल्या दर्शनाची माझी इच्छा सफळ होत नाहीं, व मला परत घरीं जाण्याचीही शक्ति नाहीं! मी आतां येथेंच मरणार ! ! असें ह्मणून श्रीकृष्णाचें ध्यान करीत असतां थकल्यामुळें त्यास झोप लागली. इकडे श्रीकृष्णाला अतिशय काळजी पडली व त्याच्या रक्षणासाठीं ते लगबगीनें निघाले. तेव्हां रुक्मिणीनें विचारिलें, इतकी धादल कशाची ? तेव्हां त्यांनीं सांगितलें, या वेळीं जास्त बोलण्यास अवकाश नाहीं, माझा परमभक्त संकटांत पडला आहे, त्याचें रक्षण करण्यासाठीं मला त्वरित गेलें पाहिजे. असें ह्मणून, गरुडावर बसून जेथें सुदामा निजला होता, तेथें एका क्षणांत येऊन पोंचले आणि त्यास जागा न करितां, योगमायेच्या बळानें तसाच उचलून अगदीं द्वारकेच्या प्रदेशांत आणून ठेविला आणि आपण आपल्या स्थळीं गेले. इकडे सुदामजी जागा झाल्यावर पहातो तों, आपण अरण्यांत निजलों होतों ते एकाएकीं अशा गजबजलेल्या रमणीय प्रदेशांत कसे आलों ? याचें त्यास मोठें आश्चर्य वाटलें. आणि तपास करितां, ही द्वारकानगरी आहे असें कळल्यावर त्यास मोठा हर्ष झाला व भगवंताच्या कृपेवांचून असें घडणें शक्य नाहीं, असें समजून त्याची त्यानें फार स्तुति केली. नंतर राजवाड्यासंनिध जाऊन त्यानें तेथील द्वारपाळांस विनंति

केली कीं, श्रीकृष्ण महाराजांस आपले मित्र सुदामजी आले आहेत अशी वर्दी द्या. तेव्हां ते हसूं लागले आणि ह्मणाले, एवढ्या ऐश्वर्यशाली श्रीकृष्ण महाराजांचा, असा हा दरिद्री वस्त्रहीन मित्र कोठला ? असें ह्मणून ते त्याचा धिक्कार करूं लागले व त्यास अर्धचंद्रही देण्याच्या बेतांत होते, इतक्यांत त्यांतील एका वृद्ध द्वारपाळास त्याची दया येऊन त्यानें वर्दी देण्याचें कबूल केलें. व त्याप्रमाणें वर्दी देतांच श्रीकृष्णांनीं लागलीच त्यास आंत घेऊन येण्याविषयीं आज्ञा केली. व तो आंत येत असतां, स्वत: श्रीकृष्ण सिंहासनावरून उठून त्यास सामोरे गेले व कडकडून भेटले. नंतर त्यास उच्च आसनावर बसवून आपण स्वत: त्याचे पाय रगडूं लागले. तेव्हां तर सर्व लोकांस फारच आश्चर्य वाटलें व द्वारपाळ तर बिचारे अगदींच ओशाळले. सुदामजी ह्मणाला, महाराज, आपण माझ्या गरीबाच्या पायांला कशाला स्पर्श करितां ? तेव्हा श्रीकृष्ण ह्मणाले, ब्राह्मणाचे पाय वारंवार हातीं येत नाहींत, ह्मणून मी ब्राह्मणाचें पाऊल भूषण ह्मणून वक्ष:स्थलावर कायमचें बाळगून ठेविलें आहे. ( भृगुऋषींनीं श्रीविष्णूस वक्ष:स्थलावर लत्ताप्रहार केला ही गोष्ट पुराणप्रसिद्धच आहे. ) ही बातमी अंत:पुरांत समजतांच, सर्व स्त्रिया कौतुकानें त्यास पहावयास आल्या व ज्याच्या शरीराचा केवळ अस्थिपंजर मात्र उरला आहे इतकी रोड व उंच अशी ती मूर्ति पाहून, हा आपल्या यजमानाचा मित्र ह्मणून त्यांस फारच विस्मय वाटला. परंतु स्वत: श्रीकृष्ण सेवा करीत होते, तें पाहून त्याही सेवा करूं लागल्या. तेव्हां तर सुदामजीची जी धांदल उडाली ती सांगतां पुरवत नाहीं. पुढें श्रीकृष्णांनीं ' माझ्याकरितां तूं काय आणिलें आहेस, ' ह्मणून त्यास विचारिलें, तेव्हां त्यानें लाजत लाजत आपल्या बगलेंतून ती पोह्यांची मोटली पुढें केली. तेव्हां श्रीकृष्णांनीं त्यांतून एक मूठभर पोहे घेऊन आनंदानें भक्षण केले व ह्मटलें कीं, आजपर्यंत मीं जे जे पदार्थ खाल्ले, त्या एकांतही अशी गोडी नव्हती. असें बोलून कुबेरास गुप्त रीतीनें आज्ञा दिली कीं, सुदामजीस एक लोकाची संपत्ति द्यावी, व दुसरे आणखी मूठभर पोहे खाऊन पुन: दुसऱ्या लोकाची संपत्ति देण्याची आज्ञा केली. तिसरी मूठ आणखी घेणार, तों रुक्मिणीनें विचार केला कीं, ही तिसरी मूठ

खाल्ल्यावर सर्व त्रैलोक्याचें ऐश्वर्य, हे यास देतील व मग आपणां सर्वांस याचे घरीं दास्य करावें लागेल; तेव्हां हें बरें नाहीं, असें समजून, तिनें बाकीचे पोहे भगवंताच्या हातांतून हिसकावून घेतले आणि सर्व स्त्रियांस वांटून दिले. ते त्या सर्वांनीं मोठ्या आवडीनें खाल्ले. पुढें चार दिवस उत्तम आदरातिथ्य करून त्याच्या इच्छेनुरूप त्याच्या जाण्याची तयारी केली.

सुदामजीस द्वारकेहून निघेपर्यंत वाटलें होतें कीं, श्रीकृष्ण हे आपल्यास कांहीं तरी देतील, परंतु शेवटीं कांहीं एक दिलें नाहीं असें पाहून निरनिराळे विचार त्याचे मनांत येऊं लागले कीं, हा आपला योगायोग ? किंवा श्रीकृष्णांनीं जाणून बुजून आपल्यास कांहीं एक दिलं नाहीं ? शेवटीं त्यानें निश्चय केला कीं, श्रीकृष्णांनीं मुद्दाम मला कांहीं दिलें नाहीं, कारण, कदाचित् ऐश्वर्यानें मत्त होऊन माझ्या हातून त्याच्या भक्तींत अंतर पडेल ! ! शेवटीं श्रीकृष्णाचें ध्यान करीत स्वारी परत आपल्या नगरापर्यंत येऊन पोचली, तेथें आपली ती पूर्वीची भिकार झोंपडी, ती स्त्री व तीं मुलें बाळें कोणी दिसेनात ! तेव्हां भांबावल्यासारखा होऊन विचारांत पडला कीं आपण आलों कोठें ? व जावयाचें कोठें ? शेवटीं तपास करितां त्यास कळून आलें कीं ही सोन्याची नगरी नवी निर्माण झाली आहे व आपल्या करितां एक सुवर्णमय सुंदर वाडाही तयार झालेला आहे. तेथें जातांच, त्याची पत्नी मुलांबाळांसह भर्त्याची वाट मोठ्या उत्सुकतेनें पाहत होती, तिनें पंचारती घेऊन त्याला मोठ्या आनंदानें ओंवाळिलें आणि झालेला वृत्तांत निवेदन केला. तो ऐकून सुदामजीच्या नेत्रांतून टपटपां अश्रु पडूं लागले व कंठ सद्गदित होऊन तो अगदीं स्तब्ध झाला, आणि मनांत ह्मणाला कीं, प्रभूची करणी अतिशय विचित्र आहे ! ! ! शेवटीं श्रीकृष्णाच्या चरणीं त्याचें प्रेम अतिशय वाढलें आणि त्यानें भार्येस सांगितलें कीं, ह्या ऐश्वर्याचा मुलांबाळांसह त्वां उपभोग घ्यावा आणि श्रीकृष्णाची भक्ति करावी. मला तर या ऐश्वर्याची मुळींच जरूर नाहीं; मी आपला पूर्वस्थितींत राहून श्रीकृष्णाच्या भक्तींत काळ घालविणार ! ! असें संतोषाचें मा-

हात्म्य आहे. व ईश्वरावर आपला सर्व भरंवसा ठेऊन जे संतोषवृत्तीनें वागतात, त्यांस परमेश्वरही साहाय्य अशाच प्रकारें करितो.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

---

## व्याख्यान ६ वें.

## विषय—पुनर्जन्म.

ईशस्तवन.

यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै-
वेदैः साङ्गपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ॥
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥

याप्रमाणें ईशस्तवन झाल्यावर स्वामिमहाराज ह्मणाले:—

आज सनातनधर्मरूपी वर व ब्रह्मविद्यारूपी वधू यांच्या विवाहसमारंभांत, सभासद हे वऱ्हाडी प्रेमरूपी पक्वान्नाचा आस्वाद घेऊन आनंदानें हरिनामोच्चरण करीत राहतील अशी आशा आहे.

प्रिय सभासद हो! सर्व रोगांत भवरोग हा परम दुस्तर होय. इतर रोग एकदोन वेळां येतात, परंतु हा तर ८४ लाख वेळां येतो. व तितक्या वेळां गर्भवासाच्या यातना सहन कराव्या लागतात. ह्या गर्भवासाच्या यातना कांहीं सामान्य नाहींत. कल्पना करा कीं, एकाद्या कैद्यास, चोहींकडून बंद परंतु फक्त दोन तीन जाळ्यांनीं युक्त अशा एका अंधारकोठडींत, एका जाळीशीं अग्नीचा प्रखर ताप, दुसरीशीं दुर्गंधयुक्त पदार्थांचा सांठा, तिसरीशीं अतिशय खराब पाण्याचा प्रवाह,

अशा स्थितींत जर कोंडून ठेविलें, तर त्याची काय दुर्दशा होईल बरें ? गर्भाशय ही एक अंधारकोठडीच होय. तिचीही स्थिति वरील प्रमाणेंच आहे; ह्मणजे एका बाजूस जठराग्नि व दुसऱ्या बाजूस मलमूत्रादिकांचा सांठा इत्यादि आहे. अशा या कैदखान्यांत येऊन पडणें—तेंही एकवेळ नव्हे तर अनंतवेळां—ह्मणजे दुःखाची परम सीमा नव्हे काय ? ज्यास नरदेह प्राप्त झाला आहे, त्यानें ही जन्ममरणाची अत्यन्त दुःखदायक आवृत्ति चुकविण्याचा अवश्य यत्न केला पाहिजे.

कोणी ह्मणतात कीं, मेल ह्मणजे गेलें, पुढें जन्म कशाचा आणि बंध कशाचा ? दुसरे कित्येक ह्मणतात, आत्मा तर '**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि**' असा आहे, त्याला चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत पडण्याचें कारण काय याचें उत्तर मागें एकदा दिलेंच आहे; तथापि त्याबद्दल आणखी थोडें निरूपण करितों.

चित्तवृत्तीचा धर्मच असा आहे कीं, ज्या विषयाच्या ठायीं ती आसक्त अथवा स्थिर होते, तदाकार ती बनते. तिच्या अनुषंगानें आत्माही तदाकार भासूं लागतो. उदाहरणार्थ पहा कीं, आपण बाहेर फिरावयास निघालों असतां, रस्त्यांत एकाद्या डोंबाऱ्याचा खेळ पहात उभे राहिलों; तेथें वृत्ति तन्मय होऊन 'किती तरी अद्भुत या डोंबाऱ्याचें कसब आहे ?' असें आपल्यास वाटलें. पुढें कोणी सतारीच्या निरनिराळ्या गति छेडतांना दृष्टीस पडला, तेथें वृत्ति तन्मय होऊन 'अहाहा ! ही किती मनोरंजक कला आहे ?' असें आपल्यास वाटलें. पुढें मल्लांचा आखाडा पाहिला, तेथें त्या मल्लांचीं तीं पीळदार शरीरें पाहून, 'किती उत्कृष्ट यांची शरीरसंपत्ति आहे ?' असें आपल्यास वाटलें. आणखी पुढें जातां एके ठिकाणीं कांहीं शास्त्रीपंडित वेदांच्या ऋचांचे अर्थ करीत होते व शास्त्रीय गहन विषयाचा उहापोह करीत होते, तें ऐकून वृत्ति अगदीं तन्मय होऊन आपल्यास वाटलें कीं अशा प्रकारचें ज्ञान आपल्यास असावें. ती वृत्ति दृढ झाली आणि सायंकाळीं घरीं आल्यावर रात्रभर ते आणि तेच विचार मनांत घोळत राहिले. शेवटीं प्रातःकाळीं एक शास्त्री घरांत ठेविला आणि चार पांच वर्षें दृढ व्यासंग करून आपणही पूर्वोक्त पंडिताप्रमाणें बनलों. सारांश,

ज्या विषयाचे ठायीं वृत्ति थोडा वेळ रममाण झाली, ती क्षणभर तदाकार बनली व जेथें ती ज्यास्त दृढ झाली, त्या विषयाचा पिच्छा पुरवून आपण शेवटीं अगदीं तदाकार झालों. यालाच शास्त्रकार **भृंगकीटक न्याय** असें ह्मणतात. ह्मणजे कोणीएक भृंग ( भ्रमर ) आपलें भक्ष्य–एका प्रकारचा किडा–एका मातीच्या घरांत आणून ठेवितो व रोज त्यास टोंचीत राहतो. तेव्हां त्या किड्याचे मनांत रात्रदिवस त्या भृंगाची धास्ती राहून व दुसरे सर्व त्याचे व्यापार बंद होऊन, तो एकसारखें त्या भृंगाचेच ध्यान करीत राहतो व असें ध्यान करितां करितां शेवटीं त्याला भृंगाचें स्वरूप प्राप्त होतें. त्याचप्रमाणें जो कोणी ज्या विषयाचें एकसारखें ध्यान करीत राहतो, तो सर्वथा तदाकार बनतो.

वास्तविक पाहिलें असतां आत्मा केवळ स्वप्रकाश आहे; वृत्ति हा त्याचा स्वभाव नाहीं. भगवान् पतंजलि म्हणतातः—

**तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् । वृत्तिसारूप्यमितरत्र ॥**

**यो. सू. समाधिपादः ।**

म्हणजे जेव्हां चित्तवृत्तींचा निरोध झालेला असतो, म्हणजे योग सिद्ध होतो, तेव्हां आत्मा केवळ चिन्मात्र अशा स्वरूपानें असतो; आणि इतर दशेंत म्हणजे जेव्हां वृत्तींचा निरोध झालेला नसतो, तेव्हां त्याचें स्वरूप, वृत्ति ज्या स्वरूपाची असते, त्यासारखें भासतें. जसा एकाद्या कंदिलांतील प्रकाश मूळचा शुद्ध असून, तो भोंवतालीं त्यास लाविलेल्या रंगीत कांचेच्या अनुरोधानें लाल, हिरवा, काळा इत्यादि रंगांचा भासतो, त्याचप्रमाणें वरील प्रकार समजावा. यावरून चित्तवृत्तींचा निरोध करून आत्मस्वरूपांत रममाण होणें हेंच अखंड आनंदाचें अगर मुक्तीचें साधन होय व याच्या उलट, वृत्तींचा निरोध न करितां त्या निरनिराळ्या विषयांच्या ठायीं हव्या तशा आसक्त होऊं देणें, हेंच बंधनाचें कारण होय, असें उघड सिद्ध होतें आणि म्हणूनच शास्त्रकार " **मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः** " असें आपल्यास सांगतात.

या विवेचनावरून ध्यानांत येईल कीं मनुष्यास, **'अन्ते मतिः सा गतिः'** ह्मणजे अंतकाळीं जी वृत्ति दृढ झाली असेल, त्याप्रमाणें पुढील जन्म मिळेल. श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं:-

**वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥**

अ. २ श्लो. २२.

ह्मणजे मनुष्य जसा जुन्या वस्त्रांचा त्याग करून, दुसरीं नवीं वस्त्र धारण करितो, तसा देहधारी आत्मा जुन्या शरीरांचा त्याग करून दुसऱ्या नवीन शरीरांत प्रवेश करितो. यावर कोणी ह्मणतील कीं, एका शरीरांतून निघून दुसऱ्यांत प्रवेश करण्यासाठीं, ईश्वरानें त्या त्या योनींतील प्राण्यांचे आयते सांगाडे अथवा Sets तयार करून ठेविले आहेत कीं काय? तसे असल्यास ते ८४ लक्ष असले पाहिजेत. शिवाय, एकाद्यास घोडा इत्यादिकांच्या योनींत जन्म घ्यावयाचा असल्यास, तो या स्थूल शरीरांतून निघून लागलाच त्या तयार असलेल्या घोड्याच्या सांगाड्यांत शिरतो, अगर एकदम घोडीच्या गर्भाशयांत शिरतो? किंवा घोड्याच्या वीर्यांत शिरून तेथून घोडीच्या गर्भाशयांत जातो? अथवा उभयतांतून कोणाच्या तरी अन्नात शिरतो? होतें तरी काय? अशा शंका येणें स्वाभाविक आहे, परंतु त्यांचे निराकरण इंग्रजी तीन चार सटरफटर पुस्तकें शिकून व्हावयाचें नाहीं. त्यासाठीं प्राचीन संस्कृत ग्रंथाचे मार्मिक अध्ययन केलें पाहिजे. पुनर्जन्म अथवा 'Transmigration of soul' याचा सविस्तर प्रकार जींत सांगितला आहे तिला **'पञ्चाग्नि विद्या'** ह्मणतात. तिचें मनन केलें असतां वरील शंकांचें निराकरण होईल; सबब, तिचें येथं दिग्दर्शन करितों.

शरीराचे मुख्यत्वेंकरून दोन भाग आहेत. एक स्थूल व दुसरा सूक्ष्म. यांस इंग्रजींत अनुक्रमें Physical व Astral म्हणतात. आणि फारशींत 'जिसन् कासीम्' व 'जिसन् लतीफ्' असें म्हणतात. जीव एक शरीर टाकून नवें शरीर धारण करितो, म्हणजे एका स्थूल शरीरांतून निघून लागलाच दुसऱ्या स्थूल शरीरांत शिरतो असें

नाहीं; तर मरणसमयीं तो, एक स्थूल व दुसरें सूक्ष्म, अशा शरीरांशीं संबंध ठेवितो. जशी श्रोत्यांपैकीं कांहीं थोड्या मंडळींची वृत्ति या वेळीं द्विधा आहे, ह्मणजे बाहेरून व्याख्यान ऐकण्यांत व आंतून, 'कोणी जोडे तर चोरणार नाहीं ना?' या चिंतनांत गुंतलेली आहे, तशी मरण-समयीं जीवाची वृत्ति बाहेर स्थूल शरीराशीं व आंत सूक्ष्म शरीराशीं संबद्ध असते. हें सूक्ष्म शरीर तो आपल्या वृत्तीच्या दृढतेनें त्याला ज्य योनींत जन्म घ्यावयाचा असेल त्या योनीला अनकूल असे मनोमय निर्माण करितो कोणतीही दृश्य वस्तु इष्ट आकाराची तयार करण्यास फार परिश्रम पडतात. परंतु पाहिजे त्या वस्तूची वाटेल तशा आकाराची मनोमय प्रतिमा तयार करण्यास कठिण पडत नाहीं. अशा प्रकारें भावी जन्माला अनूकूल अशा प्रकारचें शरीराचें बंधारण नक्की केल्याखेरीज तो स्थूलदेहांतील संबंध सोडीत नाहीं. श्रीमद्भागवतांत ह्मटलें आहे:—

व्रजंस्तिष्ठन् पदैकेन यथैवेकेन गच्छति ॥
यथा तृणजलूकैवं देही कर्मगतिं गतः ॥

जशी तृणजलूका ह्मणजे कुशिरडा किंवा सुरवंट नांवाचा किडा गव-तावरून चालत असता, प्रथम पुढच्या अंकुरावरील पाय दृढ करून, मग पूर्वीच्या अंकुरावरील पाय काढून घेतो, त्याप्रमाणें जीव, सूक्ष्म शरी-राशीं आपला संबंध पक्का करून, मग स्थूल शरीराचा संबंध सोडितो. एकाद्या घरांत कांहीं दिवस राहिल्यावर तें घर देखील सोडून जाणें जिवा-वर येतें, मग ज्या स्थूल देहांत त्यानें ४०—५० वर्षें वास्तव्य केलें, त्याचा अभिमान एकाएकीं कसा सुटावा? असो. स्थूल देहापासून वियुक्त होतांना, भूतें, इंद्रियें, प्राण, मन, बुद्धि, वासना, शुभाशुभ कर्म, व अविद्या, ह्या आठ पदार्थांची सत्ता ह्मणजे सारभूत अंश किंवा Essence आपणाबरोबर घेऊन जातो. त्यालाच '**श्रद्धा**' असें ह्मणतात व या आठ पदार्थांस '**पुर्यष्टक**' असें ह्मणतात. समजा कीं कोणी एकानें बडोद्यास घर बांधिलें, व तो कारणपरत्वें मुंबईस राहिला, तरी त्याचें लक्ष या घराकडे असतें; कदाचित् खिळे खुंट्या यांची संख्या बरोबर लक्षांत नसेल, परंतु निदान घराचें Valuation ( एकंदर किंमत ) त्याच्या

बिनचूक लक्षांत असते. त्याप्रमाणें स्थूल देहांतील पदार्थांचा सारभूत अंश किंवा अर्क त्याजबरोबर असतो, ह्मणजे चंपकाचें पुष्प कांहीं वेळ केळीच्या द्रोणांत ठेविलें, तर त्याच्या सुगंध परमाणूंचा संस्कार जसा त्या द्रोणाच्या ठायीं आढळून येतो-यालाच 'चंपकपुटवासन' न्याय असें ह्मणतात–त्या न्यायानें स्थूल देह व त्याच्या आश्रयानें भोगलेले अनंत विषय यांचे संस्कार आत्म्याचे ठायीं स्थित असतात, ते वासनात्मक बरे-वाईट संस्कार व इंद्रियें, प्राण इत्यादिकांचे सूक्ष्म तैजस अंश यांसहवर्तमान जीव सूक्ष्म शरीरांत प्रविष्ट होतो.* व याप्रमाणें तो प्रविष्ट झाला ह्मणजे त्याचे ठायीं '**वटबीजन्यायानें**' पुढील जन्माची सर्व सामग्री सिद्ध झाली. जसा वटवृक्षाच्या अल्प बीजांत, त्यापासून होणाऱ्या मोठ्या वटवृक्षाच्या फांद्या, पानें, पारंब्या इत्यादिकांचा अवाढव्य विस्तार सूक्ष्मरूपानें समाविष्ट असतो, त्याप्रमाणें सूक्ष्म शरीराचे ठायीं असलेल्या बीजांत भावी जन्माचा सर्व विस्तार समाविष्ट असतो. पुढें वटबीजाला, हवा, पाणी, मृत्तिका इत्यादिकांचा संयोग झाला ह्मणजे जसा त्यापासून विशाल

---

* मरणसमयीं स्थूलदेहांतून बाहेर काय निघून जातें व जन्मसमयीं त्यांत काय शिरतें हा प्रश्न अतिशय महत्वाचा व तितकाच गूढ आहे. त्याचा निर्णय, ऋग्वेदाच्या आठव्या अष्टकांतील "**यत्ते यमं वैवस्वतं मनो जगाम०, यत्ते दिवं यत्पृथिवीं०**" इत्यादि मंत्रांत वर्णिलेल्या मजकुरावरून होतो. त्याविषयीं जितकी माहिती लिहावी तितकी थोडीच आहे. परंतु तशी येथें देण्यास सवड नाही. वरील मंत्रच प्रमाणभूत धरून श्रीशंकराचार्यांनीं त्याविषयीं जो सिद्धांत लिहिला आहे, तेवढा मात्र येथें त्यांच्याच शब्दांनीं देतों—

( स्रग्धरावृत्त )

नायाति प्रत्यगात्मा प्रजननसमये नैव यात्यन्तकाले यत्सोऽखण्डोति **लिङ्गं मन इह विशति प्रव्रजत्यूर्ध्वमर्वाक्** ॥ तत्कार्श्यं स्थूलतां वा न भजति वपुषः **किंतु संसारजातं तेजोमात्रा गृहीत्वा व्रजति पुनरिहायाति तैस्तैः सहैव** ॥ २८ ॥

आसीत्पूर्वं सुबन्धुर्भूसुरमवनिसुरो यः पुरोधाः सनातेर्बाह्ययात्कूटाभिचारात्स खलु मृतिमितस्तन्मनोऽगात्कृतान्तम् ॥ तद्भ्राता श्रौत्रमन्त्रैः पुनरनयदिति प्राह सूक्तेन **वेदस्तस्माद्दात्माभियुक्तं व्रजति ननु मनः कर्हिचिन्नान्तरात्मा** ॥ २९ ॥

**वेदान्तकेसरी.**

वटवृक्ष आविर्भूत होतो, तसाच सूक्ष्म शरीरांतील बीजापासून पंचाग्निसंस्कारानें पुढील जन्मांतील स्थूलदेहादिकांचा आविर्भाव होतो. पूर्वीचा स्थूलदेह सोडून नवा स्थूलदेह मिळेपर्यंत अग्नींत टाकिलेल्या आहुतीप्रमाणें, दरम्यान त्याच्या सहा अवस्था होतात. १ उत्क्रान्ति ( बाहेर पडणें ), २ गति ( परलोकीं गमन ) ३ प्रतिष्ठा ( तेथें स्थिरावणें ) ४ तृप्ति ( तृप्त होणें ), ५ पुनरावृत्ति ( परत येणें ), व ६ प्रत्युत्थिति ( पुनरुत्पत्ति ). सूक्ष्म शरीरास '**लिंगदेह**' असेंही ह्मणतात. हा लिंगदेहधारी आत्मा अंगुष्ठप्रमाण असतो. अंगुष्ठप्रमाण याचा अर्थ कोणी अंगुठ्या एवढ्या आकाराचा असा करितात. परंतु त्यापेक्षां, अंगुष्ठानें ह्मणजे अंगुलीनें निर्देश करण्यसारखेंच त्याचें प्रमाण असतें असा अर्थ करावा हें बरें. कारण, भूमितींतल्या पॉइंट ( बिंदू ) प्रमाणें त्याला स्थिति मात्र असते, परंतु त्याचें कांहीं विशिष्ट प्रमाण नसून त्याचे भाग करितां येत नाहींत. तो अग्नीनें जळत नाहीं, शस्त्रानें तुटत नाहीं, ह्मणजे '**नैनं छिन्दन्ति**' इत्यादि श्लोकांत वर्णिल्याप्रमाणेंच त्याचें स्वरूप असतें.

आतां पंचाग्निसंस्कार ह्मणजे काय तें सांगतों. **छांदोग्य उपनिषदाच्या पांचव्या अध्यायांत** द्युलोक इत्यादि पांच अग्नि वर्णिले आहेत, त्यांत संस्कार पावून जीव पुनः स्थूलदेहधारी बनतो. येथें इतकें सुचविलें पाहिजे कीं, हे अग्नि ह्मणजे व्यवहारांतील अग्नीसारखे आहेत असें कोणी समजूं नये. तर ते केवळ अग्नींचें रूपक आहे. पहिला '**द्युलोकाग्नि**' त्याचें वर्णनः—

**असौ वाव लोको गौतमाग्निस्तस्यादित्य एव समिद्रश्मयो धूमोऽहरर्चिश्चन्द्रमा अङ्गारा नक्षत्राणि विस्फुलिङ्गाः ॥ १ ॥ तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवाः श्रद्धां जुह्वति तस्या आहुतेः सोमो राजा संभवति ॥ २ ॥**

हे गौतमा, हा जो द्युलोकाग्नि त्याची आदित्य हीच समिध, आदित्याचे रश्मि ( किरण ) हा धूम, दिवस ही ज्वाला, चन्द्रमा हे निखारे आणि नक्षत्रें ह्या ठिणग्या होत. त्या ह्या द्युलोकाग्नीचे ठायीं पूर्वोक्त जीव एखाद्या वनस्पतीच्या अर्काप्रमाणें जलप्राय असलेल्या श्रद्धेसहवर्तमान सूर्याच्या किरणांनीं प्रथमतः जलाप्रमाणें आकर्षण केला जातो. व तेथें त्या श्रद्धारूप

आहुतीचें हवन होऊन तीपासून **सोमराजा** ह्मणजे सोमरूप सत्ता निर्माण होते. नंतर त्या सोमराजासह तो पर्जन्याग्नींत दाखल होतो. त्याचें वर्णनः—

**पर्जन्यो वाव गौतमाग्निस्तस्य वायुरेव समिदभ्रं धूमो विद्युदर्चिर-शनिरङ्गारा ह्रादनयो विस्फुलिङ्गाः ॥ १ ॥ तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवाः सोमꣳ राजानं जुह्वति तस्या आहुतेर्वर्षꣳ संभवति ॥ २ ॥**

पर्जन्यरूप अग्नीची वायु हीच समिध, मेघ हा धूम, वीज ही ज्वाला, अशनि हे निखारे, गर्जनेचे शब्द या ठिणग्या होत. ह्या अग्नींत सोमराजाचें हवन होऊन त्यापासून '**वृष्टि**' तयार होते. तिसऱ्या अग्नीचें वर्णन—

**पृथिवी वाव गौतमाग्निस्तस्याः संवत्सर एव समिदाकाशो धूमो रात्रिरर्चिर्दिशोऽङ्गारा अवान्तरदिशो विस्फुलिङ्गाः ॥ १ ॥ तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा वर्षं जुह्वति तस्या आहुतेरन्नꣳ संभवति ॥ २ ॥**

पृथिवी हाच तिसरा अग्नि; त्याची संवत्सर हीच समिध, आकाश हा धूम, रात्रही ज्वाला, दिशा हे निखारे, व अवान्तरदिशा ह्या ठिणग्या होत. ह्या अग्नींत वृष्टिरूप आहुतीचें हवन होऊन तीपासून **अन्न** ( व्रीहियवादि धान्य ) उत्पन्न होतें. चवथ्या अग्नीचें वर्णनः—

**पुरुषो वाव गौतमाग्नितस्य वागेव समित्प्राणो धूमो जिव्हार्चिश्चक्षुरङ्गाराः श्रोत्रं विस्फुलिङ्गाः ॥ १ ॥ तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा अन्नं जुह्वति तस्या आहुते रेतः संभवति ॥ २ ॥**

पुरुष हाच चवथा अग्नि होय. त्याची, वाणी हीच समिध, प्राण हा धूम, जिव्हा ही ज्वाला, चक्षु हे निखारे, श्रोत्र ह्या ठिणग्या होत ह्या अग्नींत पूर्वोक्त अन्नाचें हवन होऊन **रेत** उत्पन्न होतें. आतां पांचव्या अग्नीचें वर्णनः—

**योषा वाव गौतमाग्निस्तस्या उपस्थ एव समिद्यदुपमन्त्रयते स धूमो योनिरर्चिर्यदन्तः करोति तेऽङ्गारा अभिनन्दा विस्फुलिङ्गाः ॥ १ ॥ तस्मिन्नेतस्मिन्नग्नौ देवा रेतो जुह्वति तस्या आहुतेर्गर्भः संभवति ॥ २ ॥**

हे गौतमा, योषा ह्मणजे स्त्री हाच पांचवा अग्नि. * *

या प्रमाणें द्युलोकादि पांच अग्नींचे ठायीं श्रद्धादिरूप पांच आहुतींचा होम होऊन त्यापासून सोमादि निरनिराळीं रूपांतरें होतां होतां, शेवटीं आपण गर्भापर्यंत येऊन पोंचलों. प्रत्येक ठिकाणीं जीवात्म्याचा संबंध खराच, परंतु सर्वत्र तो अविकृत असतो, हें मागें सांगितलेंच आहे.

अलीकडील विद्वानांस, सूर्यकिरणांनीं जलाचें आकर्षण होतें, व बाष्पीभवन होऊन मेघवृष्टीच्या रूपानें पुनः तें शुद्ध स्थितींत आपल्यास प्राप्त होतें, इतकें सामान्यतः माहीत आहे; परंतु त्याचा प्राणिजन्माशीं कसा काय संबंध आहे व मरणोत्तर जीवाची गति काय होते, याची कल्पना त्यांस नाहीं.

असो. वरील विषयाच्या स्पष्टीकरणासाठीं एक उदाहरण घेऊं. कोणा एकाला उज्जनीच्या राजाचें ऐश्वर्य पाहून वाटलें कीं, आपण उज्जनीचा राजा व्हावें. नंतर जोशाला त्यानें आपली पत्रिका दाखविली. त्यानेंही राजयोग असल्याचें सांगितलें. पुढें एका साधूची गांठ पडली, त्याला त्यानें विचारिलें, महाराज, मला राजैश्वर्य कशानें मिळेल ? त्यानें सांगितलें, उत्तम धर्माचरण करून अलौकिक पुण्य संपादन केल्यास तुला राजैश्वर्य मिळेल. त्याप्रमाणें तोच ध्यास त्याला लागून, उत्तम धर्माचरण करून, शेवटीं मरणसमयीं उज्जनीचा राजा होण्याची वृत्ति दृढ झाली; तेव्हां वृत्तीच्या बलानें त्यानें मनोमय शरीर निर्माण करून पूर्वदेहांतील संस्कार इत्यादिकांसह त्यांत प्रविष्ट झाला. पुढें पंचाग्नींच्या क्रमानें वृष्टींतून उज्जनीप्रदेशांतील धान्याच्या रूपांत येऊन, व तें धान्य राजाच्या खाण्यांत येऊन त्यापासून राणीच्या पोटीं पुत्ररूपानें जन्मला, व पुढें उज्जनीचा राजा झाला.

कोणी ह्मणतील, ती वृष्टि किंवा तो पाऊस उज्जनीच्या प्रदेशांतच कशावरून पडला ? अमेरिकेंत कशावरून नाहीं पडला ? होय. मी ह्मणतों कदाचित् अमेरिकेंतही पडला असेल. परंतु तसा पडला असल्यास तेथें उत्पन्न झालेलें धान्य Rally Brothers यांनीं व्यापारासाठीं बोटी भरून हिंदुस्थानांत रवाना केलें असेल व तें उज्जनीस जाऊन राजाच्या खाण्यांत आलें असेल.

दुसरे कोणी ह्मणतील कीं अमेरिकेंतील जें सर्व धान्य त्या राजानें खाल्लें किंवा तो पुढें खात राहिला, त्या सर्वांचा उपयोग पूर्वोक्त पुत्र-जन्माकडे घडला असें संभवत नाहीं, तर बाकीच्या अन्नाची काय वाट झाली ? याचें उत्तर असे आहे कीं मनुष्याच्या शरीरांतून स्वेद, मल, मूत्र इत्यादि जे धातु बाहेर पडतात त्या सर्वांपासून किती तरी प्राण्यांची उत्पत्ति होते ! ! केवळ स्वेदज प्राणी घेतले तरी गणती करितां येणार नाहीं, मग त्याचें मलमूत्र भक्षण करणार जे सूकरादि प्राणी, त्यांपासून केवढी मोठी प्राणिपरंपरा वाढते, हें सांगतां येणें अशक्य आहे. सारांश, आपापल्या कर्मानुसार ज्या प्राण्याचा ज्याच्याशीं जितका जशा प्रकारचा लागाबांधा असेल, त्या त्याप्रमाणें तो जन्मास येऊन व्यवहार घडतो. यावरूनच आपल्यामध्यें "**अन्नोदकऋणानुबंध** असेल त्याप्रमाणें घडेल" असें म्हणण्याची वहिवाट पडली आहे.

आपल्याकडे फार प्राचीनकाळापासून पुनर्जन्माची कल्पना रूढ आहे. परंतु पश्चिद्वीपांतील पंडित बरेच दिवसपर्यंत पुनर्जन्म मानीत नव्हते. ते अलीकडे, Mesmerism, Spiritualism, इत्यादि विद्यांचा प्रचार जास्त झाल्यापासून, पुनर्जन्म प्रांजळपणें मानूं लागले आहेत, इतकेंच नाहीं, तर त्याविषयीं आपली खात्री झाल्याचे लेख प्रसिद्ध करीत आहेत.* तेव्हां आतां त्याबद्दल विशेष सांगण्याची जरूर नाहीं. तथापि सामान्यतः दोन गोष्टी सांगून आटोपतें घेतों. कोणी मनुष्य निरंतर पापकर्में करीत असतो, परंतु जन्मभर सुख भोगितो व याच्या उलट, कोणी निरंतर पुण्यकर्में करीत असतो, परंतु जन्मभर दुःख भोगितो, असें कां व्हावें ? ईश्वराच्या न्यायी राज्यांत, गहूं पेरिले तर गहूं उगवतात व बाजरी पेरिली तर बाजरी उगवते, अशी सर्व ठिकाणीं कार्यकारणभावाची उत्तम व्यवस्था दिसून येते, मग येथेंच तेवढा विरोध कां ? तो नसला पाहिजे; या सर्व गोष्टींची उपपत्ति, पुनर्जन्म मानल्याखेरीज होऊं शकत नाहीं. बालक जन्मतांच मातेचें स्तनपान करूं लागतें; तसेंच तें, एकादी वस्तु हातीं येतांच ती तोंडांतच घालितें; नाकांत अथवा कानांत घालीत नाहीं. हा त्याचा पूर्वजन्मींचा अभ्यास होय. त्यावांचून असें घडणें शक्य नाहीं.

---

* "Researches in Spiritualism" नावाचा ग्रंथ पहा.

जे चित्तवृत्तींचा निरोध न करितां, बाह्यस्थूलभोगांस भुलून त्यांच्या जाळ्यांत फसतात, ते जन्ममरणाच्या फेऱ्यांत अगर पंचाग्नींत सांपडतात. त्यांत जे दुराचरणी असतात, ते अधोगतीस जातात. दुराचारी लोकांत देखील जे सामान्य चोरी, अपेयपान, परस्त्रीगमन इत्यादि करितात, ते थोड्या बहुत पुण्योदयानें कदाचित् आपल्या अधोगतींतून मुक्त होऊन लवकरच वर चढूं लागतील. परंतु, सुवर्ण चोरणारा, सुरापान करणारा, गुरुस्त्रीगमन करणारा इत्यादि महापातकी तर पंचाग्निचक्रांत चांगले फिल्टर होऊन (छाणले जाऊन) पक्क्या अधोगतीस जातात, व तींतून मुक्त होण्यास त्यांस फार पंचाइत पडते. ते महापातकी येणेंप्रमाणें:—

**स्तेनो हिरण्यस्य सुरां पिबंश्च गुरोस्तल्पमावसन्ब्रह्महा चैते पतन्ति चत्वारःपञ्चमश्चाचरंस्तैरिति ॥**

**छा०—पञ्चमाध्याये.**

१ सुवर्ण चोरणारा. २ सुरापान करणारा. ३ गुरुस्त्रीगमन करणारा. ४ ब्रह्महत्या करणारा, व ५ पूर्वोक्त चौघांशीं संसर्ग ठेवणारा अथवा सामील असणारा, हे पांच महापातकी होत.

जागृतींत मरण घडल्यास मनुष्ययोनींत जन्म होतो; स्वप्नावस्थेंत घडल्यास तिर्यग्योनींत, सुषुप्त्यवस्थेंत घडल्यास स्थावरांत, व तुर्यावस्थेंत घडल्यास ब्रह्मानंदप्राप्ति अथवा मुक्ति होते. ह्मणून तुर्यावस्था प्राप्त करून घेणें हाच जन्ममरणाचा फेरा चुकविण्याचा उपाय होय, असें आरंभीच सांगितलें आहे व ती तुर्यावस्था प्राप्त करून घेण्याचा उपाय प्राणायाम होय असें पूर्वीच्या व्याख्यानांत सिद्ध केलेंच आहे. तेव्हां संध्या प्राणायामादिकांची महती किती आहे, हें आतां आपल्या सहज लक्षांत येईल.

ज्यांच्या हातून प्राणायामादि क्रिया होऊं शकत नाहींत, त्यांस सुलभ तरणोपाय '**भक्तिमार्ग**' होय.* मात्र ती अनन्यभक्ति असली पाहिजे. एखाद्या मुलास मातुश्रीनें खेळणीं दिलीं असतां त्यांत तें गर्क होऊन मातुश्रीपासून बराच वेळ वियुक्त राहूं शकतें, व दुसरें एखादें मूल

---

* ईश्वरप्रणिधानाद्वा ॥ –योगसूत्र ।

कितीही खेळणीं दिलीं, तथापि त्यांस न जुमानितां तें मातुश्रीपासून बिलकुल वियुक्त राहूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें दुनियेंतील ऐष आरामाचे पदार्थ हीं सर्व परमेश्वरानें दिलेलीं खेळणीं आहेत, त्यांच्या लोभात न गुंततां जो ईश्वरचरणांपासून क्षणमात्र वियुक्त राहत नाहीं, तो ह्या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटतो. असे पुष्कळ भक्तजन तरले आहेत. व त्यांपैकींच **मिराबाई** ही एक आहे. तिचें संक्षिप्त चरित्र मी आपल्यास सांगतों.

सूर्यवंशांतील चितोडच्या राजास मिराबाई या नांवाची एक कन्या होती. ती फार देखणी व सद्गुणी होती. लहानपणीं एके दिवशीं ती आपल्या मातुश्रीबरोबर देवदर्शनास जात असतां, रस्त्यांत एका लग्नांतील वधूवरें मिरवत चाललीं होतीं ' त्यांला पाहून ती मातुश्रीला ह्मणाली, ही गडबड कशाची ? हा कोण ? व ह्याच्या शेजारीं बसलेली ही कोण ? तेव्हां ती ह्मणाली, हा लग्नाचा समारंभ आहे. या मुलीचें लग्न होऊन तिचा हा नवरा तिला आपल्या घरीं नेत आहे. तेव्हां ती ह्मणाली ' आई, माझें ग लग्न कधीं होईल ? व माझा नवरा कोण ? ' तिनें उत्तर दिलें, ' बेटा, तुझें लग्न लवकरच होईल, व तुझा नवरा गोपालकृष्ण. ' पुढें मंदिरांत गेल्यावर देवाकडे बोट करून विनोदानें ह्मणाली, हा गोपालकृष्ण तुझा नवरा बरें. तें तिला खरें वाटून व तें श्यामसुंदर मनोहर रूप पाहून त्याची मूर्ति तिच्या मनात इतकी ठसली कीं, तिनें खेळांत सुद्धां तशी मूर्ति करून तिची पूजाअर्चा करावी व तिच्या पायां पडावें; आणि लहानपणीं तें सर्वांस कौतुक वाटावें. पुढें खरोखर लग्नाची वेळ आली, तेव्हां रीतीप्रमाणें लग्नाचा सोहळा तर झालाच व आतां सासरीं जावयाचें, तेव्हां तिनें स्वच्छ सांगितलें कीं श्रीगोपालकृष्णावांचून मला अन्य पति नाहीं, व त्याला सोडून मी क्षणभर देखील दुसरीकडे कोठें जाणार नाहीं. तेव्हां गोपालकृष्णाची मूर्ति बरोबर देऊन व कशीबशी समजूत घालून तिला सासरीं रवाना केली. तेथें नवी नवरी गेल्यावर तिला बाहेरची बाधा वगैरे होऊं नये ह्मणून तिनें प्रथमतः **बुद्धामंगळ** नामक देवाच्या पायां पडावें अशी चाल होती. तीप्रमाणें तिला त्याच्या पायां पडावयास सांगितलें.

तिनें साफ उत्तर दिलें कीं मी एका गोपालकृष्णावांचून दुसऱ्या कोणाच्याही पायां पडणार नाहीं. तेव्हांच सासूबाईनें आंख ओढला कीं ही पोरगी मोटी द्वाड व हट्टी आहे ! ही येथें नांदावयाचें लक्षण दिसत नाहीं ! ! पुढें तारुण्यदशेंत आल्यावर सुद्धां तिचें लक्ष संसारांत बिलकुल लागेना व ती लौकिकी रीतीप्रमाणें आपल्या पतीशीं वर्तन करीना. तें पाहून व अतिशय त्रासून सासूसासऱ्यांनीं तिला शेवटीं गिरिधर गोपालकृष्णाच्याच मंदिरांत नेऊन ठेविली व आपल्या मुलाचें दुसरें लग्न करून दिलें.

इकडे मिराबाई गोपालकृष्णाची पूर्ण सेवा करूं लागली व त्याच्या भजनपूजनांत आनंदानें काळ घालवूं लागली. ही बातमी चोंहींकडे पसरतांच निरनिराळ्या ठिकाणचे साधूसंतही तिच्या दर्शनास येऊं लागले व ती त्यांच्या मेळ्यासह भजनकीर्तन करूं लागली. तेव्हां कांहीं कुटाळ लोकांनीं 'ही साधुसंतादि परपुरुषांशीं सहवास ठेविते,' ही गोष्ट आपल्या रजपूत घराण्याच्या अब्रूस कलंक आणणारी आहे, असें तिच्या सासऱ्याच्या मनांत भरवून दिलें; तेव्हां त्यानें बंदोबस्त करण्याचा विचार करून कोणाही पुरुषास मंदिरांत न जाऊं देण्यासाठीं चोंहींकडे सक्त पहारा ठेविला व विषाचा अर्क तयार करून, तो देवाच्या तीर्थाच्या मिषानें आपल्या मुलीच्या हस्तें तिला देवविण्याची तजवीज केली. राजाज्ञेनें ती नणंद विषाचा पेला घेऊन भावजईजवळ गेली व तीर्थ असें सांगून तिनें तो पेला तिच्या पुढें केलाच, परंतु पोटांत दया आली कीं, हिचा विनाकारण आह्मी जीव घेणार, हें बरें नाहीं. शेवटीं, तिच्यानें राहवेना ह्मणून तिनें खरा खरा प्रकार कळविला, आणि ह्मटलें 'हें विष तूं पिऊं नको.' तेव्हां ती ह्मणाली 'हें गोपालकृष्णाचें तीर्थच आहे; यमुनाडोहांत कालियासर्पाच्या फणांवर नृत्य करणाऱ्या श्यामसुंदर प्रभूची तेजस्वी मूर्ति मला यांत दिसत आहे, ह्मणून मी हें अवश्य घेणार; तूं भिऊं नको.' असें ह्मणून तिनें तें विष घटाघट प्राशन केलें. प्रभूची पूर्ण कृपा असल्यावर विषाची बाधा कशानें होणार ? तें अमृतरूप झालें. याविषयीं दोहरा प्रसिद्धच आहे:—

चरणामृत कहि विष दियो भयो सुमंगलमूल ॥

असो. नणंद घरीं गेली व इकडे मिराबाई भक्तिरसांत निमग्न होऊन प्रभूची प्रार्थना करूं लागली कीं हे भगवन्, भक्तानें प्रेमपुरःसर हांक मारिल्याबरोबर आपण धांवून येतां असें आपलें ब्रीद आहे व मी तर अगदीं लहानपणापासून आपल्यास मनापासून वरिलें आहे. व रोज हांका मारीत आहे. असें असून ज्या अर्थी एक वेळ देखील आपल्या दर्शनाचा लाभ मला घडला नाहीं, त्या अर्थी मी अतिशय पापी आहें यांत संशय नाहीं. आतां जर आपण दर्शन देणार नाहीं, तर मी हा देह ठेवणार नाहीं. विषप्राशन केलें आहे, त्याचा परिणाम घडून देह नष्ट होईल तर बरेंच आहे; ह्मणजे मी लवकर आपल्या चरणांपाशीं येऊन पोहोंचेन. ती प्रार्थना ऐकून प्रभूला करुणा आली आणि त्यानें तिच्यावर अनुग्रह करण्याच्या बुद्धीनें श्यामसुंदर रूप धारण करून रात्रीं तिच्या इच्छेप्रमाणें तिला प्रत्यक्ष दर्शन दिलें व तिच्या बरोबर सारीपाट खेळण्याचा प्रारंभ केला. रोज असाच क्रम चालला. तेव्हां मिराबाईचा आनंद त्रैलोक्यांत मावेनासा झाला. उभयतां सारीपाट खेळत असतां, खेळण्याची गडबड पहारेकऱ्यांच्या कानावर जाऊन त्यांच्या पोटांत धस्स झालें कीं, आतां आपली नोकरी खचित जाणार ! ! ! एवढ्या अपरात्रीं चोंहींकडे पक्का बंदोबस्त असतां, परपुरुषाचा प्रवेश तेथें झाला कसा ! ! ! पुढें त्यांनीं दाराच्या फटींतून हळूच पाहिलें, तों तेथें पुरुष तर कोणी दिसेना, आणि छतीन–नऊ, पव–बारा, वांकडे–तेरा असा पुरुषाचा आवाज मात्र लख्ख ऐकू येई ! ! हें गूढ आहे तरी काय ? याचा निर्णय त्यांस होईना. शेवटीं त्यांनीं निश्चय केला, कसेंही असो, राजास ही वर्दी द्यावयाची. त्याप्रमाणें सकाळीं वर्दी देतांच राजा अत्यंत क्रोधाविष्ट झाला व त्या रात्रीं हातांत तलवार घेऊन तो त्या मंदिरांत आला आणि जोरानें दार उघडून तेथें मिरा व दुसरा कोणी पुरुष खेळत आहे असें पाहून त्या उभयतांवर तरवार उपसून धांवला. तेव्हां गोपालकृष्ण पुढें पळत सुटले. आणि मिराबाई त्यांच्या कमरेला मिठी मारून ‘ अहो ’ या वेळीं मला कसे सोडून चाललां ! ’ अशी ओरडत त्यांच्या मागोमाग गेली व शेवटीं तीं उभयत

पाषाणमय गोपालकृष्णाच्या मूर्तीच्या ठायीं शिरून अंतर्धान पावली. शिरतां शिरतां तिच्या साडीचा थोडा कांठ तसाच बाहेर राहिला. राजा घाबरल्यासारखा होऊन इकडे तिकडे पाहूं लागला, परंतु तेथें पुरुष नाहीं, स्त्री नाहीं, कोणीच नाहीं. ह्मणून मूर्तीजवळ जाऊन निरखून पाहूं लागला, तेव्हां तो साडीचा कांठ बाहेर दिसला, त्यामुळें तर तो जास्तच भांबावला आणि ह्मणाला कीं मी स्वप्नांत आहें? अथवा मला भ्रम पडला आहे? स्त्री ह्मणावी तर दिसत नाहीं, निवळ मूर्ति दिसत आहे; नाहीं ह्मणावी, तर साडीचा कांठ बाहेर दिसत आहे. असे नाना विकल्प उत्पन्न होऊन त्याच्या मनाचा विलक्षण घोंटाळा झाला, त्याचें वर्णन कवीनें केलें आहे:—

( दोहरा. )

**कि सारीमध्य नारी है कि नारीमध्य सारी है ।।**
**कि सारी है कि नारी है किनारी है कि सारी है ।।**

सारी=साडी, "सारींत नारी आहे किंवा नारींत सारी आहे'. निवळ सारीच आहे किंवा नारी आहे? सारी असल्यास ती पुरी आहे किंवा नुसती किनारीच आहे?" अशा तरंगांत त्याची मति गुंग झाली असतां आकाशवाणी झाली कीं, "ही तुझी स्नुषा भक्तशिरोमणी, परमपवित्र, व उभयकुलतारक अशी होती, ती आतां गोपालकृष्णाशीं तादात्म्य पावली आहे." हे शब्द ऐकतांच राजा जागच्या जागीं स्तब्ध होऊन त्याला परम खेद झाला आणि मी किती अधम, किती पातकी, कोणत्या घोरकर्मास प्रवृत्त झालों, असें ह्मणून आपल्या पोटांत तीच तरवार भोंसकून घेऊं लागला; इतक्यांत, त्याजवरही अनुग्रह करणाच्या बुद्धीनें श्रीकृष्णांनीं आपलें रूप प्रकट करून त्याचा हात धरिला, आणि त्यालाही कृतार्थ केलें, कारण, हा राजा देखील मोठा प्रेमळ भक्त होता आणि ह्मणूनच श्रीकृष्ण खेळत व नंतर पळत असतां त्याला दर्शन घडलें होतें; परंतु, केवळ लोकांच्या सांगण्यावरून तो या कृत्यांत फसला होता. सारांश, "**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्**" असें जें भगवंताचें अभिवचन आहे, त्यास अनुसरून तो आपल्या भक्तांचे मनोरथ पूर्ण करितो.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

## व्याख्यान ७ वें.

### विषय—संध्येच्या द्वारा आरोग्याची वृद्धि.

ईशस्तवन.

जटाकटाहसंभ्रमभ्रमन्निलिम्पनिर्झरी-
विलोलवीचिवल्लरीविराजमानमूर्धनि ॥
धगद्धगद्धगज्ज्वलल्ललाटपट्टपावके
किशोरचन्द्रशेखरे प्रतिक्षणं रतिर्मम ॥ १ ॥

याप्रमाणें ईशस्तवन झाल्यावर स्वामिमहाराज ह्मणाले:—

आजरोजीं सनातनधर्मरूपी सूर्याचा उदय झाल्यानें अज्ञानरूपी रात्र नष्ट होऊन पाखंडचंद्रमा निस्तेज झाला आहे; स्वकपोलकल्पित विविध-मतरूपी नक्षत्रें सर्वथा लुप्त झालीं आहेत; आणि आमच्या सभासदांचें हृदयरूपी कमळ प्रफल्लित होऊन राहिलें आहे. आतां थोड्या वेळांत त्या कमळावर सभासदमनोरूपी भ्रमर, हरियशोरूपी गुंजारव 'हरे राम हरे राम ?' इत्यादि करीत राहील अशी आशा आहे.

आजचा विषय 'संध्येच्या द्वारा आरोग्याची वृद्धि' हा आहे. पूर्वी एका स्वतंत्र व्याख्यानांत संध्येच्या योगानें आयुष्याची वृद्धि कशी होते त्याचें सविस्तर वर्णन केलें होतें, त्याचा व आजच्या व्याख्यानाचा अतिशय निकट संबंध आहे, किंबहुना आजचें व्याख्यान ही त्याची पुरवणी आहे. असें ह्मटलें तरी चालेल. सबब, त्या दिवशींच्या गोष्टी आपल्या ध्यानांत असल्यास, आजचा विषय समजण्यास कठीण पडणार नाहीं.

त्या दिवशीं आयुष्यवृद्धीचा उत्तम उपाय प्राणायाम होय असें सिद्ध केलें होतें; व आज, तोच प्राणायाम शारीरिक रोगांचा परिहार करण्यास

व आरोग्य कायम ठेवण्यास समर्थ असून तद्द्वारा आयुष्यवर्धक होतो. असें दाखवावयाचें आहे.

आसनावांचून प्राणायाम सिद्ध होत नाहीं. व प्राणायामाच्या सिद्धीवांचून **सच्चिदानंद परमात्म्याचें** दर्शन होऊं शकत नाहीं. साधारण व्यवहारांत देखील, राजदर्शनाचा कांहीं वेळ व्यवस्थित लाभ घेणें असल्यास जर दरबारांत अमुक एक आसनावर विशिष्ट मर्यादेनेंच बसावें लागतें, तर जो सर्व राजाधिराजांचा राजा व अनंत ब्रह्मांडांचा नायक त्या परमात्म्याचें दर्शन घेणें झाल्यास आसनाची विशिष्ट रचना कां नसावी ?

आसन* हें, पूर्वी सांगितलेल्या ब्रह्मविद्येच्या २६ अक्षरांपैकीं २१ वें अक्षर असून तें प्राणायामाचें पूर्व अंग आहे. जितक्या प्राण्यांच्या जाती आहेत तितक्या प्रकारचीं अर्थात् ८४ लक्ष आसनें आहेत. त्या सर्वांचे भेद एक भगवान् शिव जाणतात. त्यांनीं पार्वतीच्या विनंतीवरून त्या ८४ लक्ष आसनांतून मनुष्याला साधण्याजोगीं ८४ आसनें सांगितलीं व तितकींही सर्वांना साधणार नाहींत ह्मणून त्यांचा पुनः संक्षेप करून, **१ सिद्धासन, २ पद्मासन, ३ भद्रासन,** व **४ सिंहासन** अशीं चारच मुख्य आसनें सांगितलीं. या चोहोंतही **सिद्धासन** श्रेष्ठ वर्णिलें आहे. त्याच्या योगानें योग लवकर सिद्ध होतो व तें सर्व सिद्धांस मान्य आहे ह्मणून त्याला '**सिद्धासन**' ह्मणतात. यालाच कोणी, याच्या योगानें देह वज्रासारखा होतो ह्मणून **वज्रासन,** मनुष्य संसारापासून मुक्त होतो ह्मणून **मुक्तासन,** गुप्तविद्येचें द्वार खुलें होतें ह्मणून **गुप्तासन,** असेंही ह्मणतात.

हें ऐकून आधुनिक विद्वानांपैकीं कित्येकांच्या मुखांतून, "What troublesome task is this ?" कोण ही पीडा ! 'सिद्धासन, पद्मासन'

---

* ज्याच्या योगानें शरीर स्थिर राहून सुख प्राप्त होतें अशा बसण्यास 'आसन' ह्मणतात. तें दोन प्रकारचें; १ बाह्य, व २ शारीर. बाह्यासनासंबंधानें–सर्वांखालीं दर्भासन, त्यावर मृगासन, त्यावर कमलासन असावें; तें अति उंच नसावें व अति नीच नसावें, इत्यादि पुष्कळ नियम सांगितले आहेत. सिद्धासनादि शारीर आसनांचें सविस्तर वर्णन हठयोगप्रदीपिका इत्यादि ग्रंथांत केलें आहे.

ही किटाकिट करीत बसावें कोणीं? सोईस पडेल तसें बसावें, इत्यादि प्रकारचे उद्गार निघतील व तसे ते निघणें स्वाभाविक आहे; कारण, त्यांचें नेहमींचेंच वर्तन अतिशय शिथिल व अनियंत्रित असतें. हिंदुधर्मशास्त्रांत, शौचविधि, मुखमार्जन, वगैरे क्रिया सावकाशपणें कराव्या व अमुक ठिकाणीं अमुक वेळ मृत्तिका लावल्यानें बाह्य शुद्धि होते, वगैरे बारीकसारीक बाबतींतही नियम सांगितलेले आहेत. परंतु ते नियम यांना मूर्खपणाचे वाटतात; कारण, त्यांच्या योगानें वाटेल तसें वागण्याची सूट मिळत नाहींत. यांचा लघुशंकाविधि प्रसंगानुसार उभ्याउभ्यानींच व्हावयाचा; बहिर्दिशेचाही प्रकार अशांतलाच: ह्मणजे तोंडांत विडीचा झुर्का आणि अर्धा मळ पोटांत व अर्धा बाहेर; हस्ताला मळाचा संसर्ग लागूं नये ह्मणून मृत्तिकेनें शुद्धि सांगितली आहे; परंतु यांना मृत्तिकेची मुळींच जरूर नाहीं. दांत घांसणें ह्मणजे डुकराच्या केंसाचा कुचला (ब्रश्) वरून वरून फिरवावयाचा; जिभेवरील मळ काढण्यांत वेळ घालवून उपयोग नाहीं; कारण, इकडे चहा निवून जावयाचा! टेबलाशीं चहापाणी इत्यादि मनसोक्त विधि उरकल्यावर, मग बाहेरून इस्त्री केलेला कोट, पाटलून वगैरे भपकेबंद कपडे व बूट वगैरे चढवून, मग चार मंडळींत मोठ्या आढ्यतेनें मिशावर हात फिरवीत, " I am the professor of Philosophy passed in Oxford University. " अशी प्रतिष्ठा मिरवावयाची. सारांश, धर्मशास्त्राच्या नियमांपासून हे फारच दूर, किंबहुना विरुद्ध दिशेला गेलेले, तेव्हां संध्याप्राणायामादि क्रिया, यांस त्रासदायक कां न वाटाव्या? योगविद्या आपल्या घरांतली; असें असून, 'अतिपरिचयादवज्ञा' या ह्मणीप्रमाणें आपण तिजकडे दुर्लक्ष करितों, परंतु परके लोक, ज्यांना थोडासा या विद्येचा आस्वाद मिळाला, ते या विद्येचा पाठलाग सोडीत नाहींत. पूर्वीं **मनसूर** नांवाचा एक फकीर अरबस्तानाकडून फिरत फिरत मुलतानास आला. तेथें एका योगिराजाची गांठ पडून त्याच्याजवळ योग शिकण्याची त्यास इच्छा झाली. तेव्हां त्या योग्याची त्याजवर कृपा होऊन त्यानें योगाचा कांहीं प्रकार त्यास शिकविला. त्याच्या योगानें त्यास साक्षात्कार होऊन चोहोंकडे तो ज्योतिःस्वरूप पहूं लागला, व

तोंडानें अखंड ' अनल् हक्क् ' ( अहं ब्रह्मास्मि ) असें ह्मणूं लागला. स्वदेशी गेल्यावरही त्याचा तोच क्रम चालू राहिला. मुसलमानी धर्माप्रमाणें आपणा स्वतःला ईश्वरस्वरूप मानणें हा गुन्हा आहे; सबब, तेथील लोकांनीं मनसुराविषयींची हकीकत राजास कळविली. राजानें आपल्या पुत्रास त्याला पकडून आणण्याविषयीं आज्ञा केली. तो पकडावयास गेला, तेव्हां तो अदृश्य झाला. असा अनेक वेळां त्याचा प्रयत्न फुकट गेला. शेवटीं **मनसूर** आपण होऊनच राजाच्या स्वाधीन झाला. राजानें त्याला सुळावर चढविण्याचा हुकूम केला, तेव्हां तो ह्मणाला, 'अनल् हक्क्' प्रत्यक्ष सुळावर चढविला तरी त्याच्या मुखांतून ' अनल् हक्क् ' चालूच होतें. तेथें त्याच्या शरीरांतून रक्ताचे बिंदु पडले. त्यांतूनही ' अनल् हक्क् ' असाच ध्वनि निघूं लागला. तेव्हां राजानें त्याच्या शरीराची राख करून ती समुद्रांत फेंकून देण्यास सांगितलें, तेथूनही हाच ध्वनि निघूं लागला. तें पाणी कोणा एका कन्येच्या पिण्यांत आलें, तेव्हां तिला पुढें जो मुलगा झाला, तोही मोठा साधु झाला. आपल्या इकडेही सिद्धांच्या हातून याहून मोठे विलक्षण चमत्कार घडलेले आहेत; परंतु सिद्धदशेला चढण्याचें मूळ आसन–प्राणायामादि क्रियाच होय. ह्मणून तिकडे आपणांस दुर्लक्ष करितां कामा नये.

आपल्या चालू विषयाकडे वळतां, सिद्धासन हें जसें श्रेष्ठ आहे, तसेंच तें सुलभ ह्मणजे सर्वांस साधण्यासारखें आहे. तें घालण्याचा प्रकारः—

**योनिस्थानकमंघ्रिमूलघटितं कृत्वा दृढं विन्यसत्**
**मेंढ्रे पादमथैकमेव हृदय कृत्वा हनुं सुस्थिरम् ।**
**स्थाणुः संयमितेन्द्रियोऽचलदृशा पश्येद्भ्रुवोरन्तरं**
**ह्येतन्मोक्षकपाटभेदजनकं सिद्धासनं प्रोच्यते ॥**

**अर्थः**—डाव्या पायाची टांच गुद आणि लिंग यांच्या मधल्या भागांत ठेवून व उजव्या पायाची टांच लिंगाच्या वरच्या भागावर ठेवून आपली हनुवटी हृदयाजवळ धरून दृष्टि भुवयांच्या मध्यभागीं ठेवावी आणि जसा झाडाचा नुसता सोट निश्चळ असतो, त्याप्रमाणें सर्व इंद्रियांना वश ठेवून अगदीं स्थिर रहावें; याला ' **सिद्धासन** ' ह्मणतात. याच्या योगानें

मोक्षाचें द्वार खुलें होतें. या एकट्या सिद्धासनाच्या अभ्यासानें ह्मणजे दुसरी कोणतीही योगक्रिया न करितां, बारा वर्षांत योग सिद्ध होतो ह्मणन तें सर्व आसनांत श्रेष्ठ मानिलें आहे.*

आसन सिद्ध झाल्यानें प्राणायामाची सिद्धि होण्यास अडचण पडत नाहीं. प्राणायामाचा कांहीं प्रकार पूर्वींच्या व्याख्यानांत सांगितला होता. त्याचें थोडें जास्त विवेचन करून त्याच्या योगानें शारीरिक रोगांचा परिहार कसा होतो, त्याचें आतां दिग्दर्शन करितों.

प्राणं चेदिडया पिबेन्नियमितं भयोऽन्यया रेचये-
त्पीत्वापिंगलया समीरणमथो बध्वा त्यजेद्वामया ।
सूर्याचन्द्रमसोरनेन विधिनाऽभ्यासं सदा तन्वतां
शुद्धा नाडिगणा भवन्ति यमिनां मासत्रयादूर्ध्वतः ॥

अर्थः—जर डाव्या नाकपुडीनें पूरक करून प्राणवायु पोटांत सांठविला असेल, तर तेथें नियमित वेळेपर्यंत कुंभक करून, नंतर तो उजव्या नाकपुडीनें हलके हलके बाहेर सोडावा; व जर उजव्या नाकपुडीनें पूरक करून पोटांत सांठविला असेल तर तेथें नियमित वेळेपर्यंत कुंभक करून, नंतर डाव्या नाकपुडीवाटे हलके हलके बाहेर सोडावा.‡ याप्रमाणें वरचे-वर व नित्य अभ्यास करणाऱ्या व उत्तम रीतीनें यमादिकांचें पालन कर-णाऱ्या योग्याच्या सर्व नाड्या तीन महिन्यानंतर शुद्ध होतात ह्मणजे अगदीं मलरहित होतात. अशा रीतीनें नाड्या मलरहित झाल्या ह्मणजे सहसा मोठाले रोग होण्याची भीति राहत नाहीं. आपण पहा कीं,

---

* हठयोगप्रदीपिका इत्यादि सर्व योगग्रंथांत सिद्धासनाची महती फारच वर्णिली आहे. त्याचें कारण असें आहे कीं, अशा बैठकीनें शरीर समतोल राहतें, श्वासोच्छ्वास बराबर चालतात; देहाला श्रम न होतां पुष्कळ वेळपर्यंत बसवलें जातें; वृत्ति स्थिर राहते; आणि रक्ताभिसरण सारखें झाल्यानें शरीर निरोगी राहतें. एक सिद्धासन उत्तम सिद्ध झाल्यानें मूलबंधादि तीन बंध आपोआप सिद्ध होतात.

‡ पूरक, शांतपणानें अगर वेगानें केला तरी हरकत नाहीं; कारण, पूरक वेगानें करण्यांत कांहीं दोष उत्पन्न होत नाहीं. परंतु रेचक तर शांतपणानेंच केला पाहिजे. उतावळेपणानें केला असतां शरीरबळ कमी होतें, अशी योगग्रंथांत सूचना आहे.

आमच्या सारख्या संन्याशास कधीं तेल नाहीं, ऊन पाणी नाहीं, दुसरे आरोग्यरक्षक व्यावहारिक उपचार नाहींत, तेव्हां आमच्या आरोग्याचें रक्षण कशानें व्हावें? तर आमच्या आरोग्याची सर्व भिस्त केवळ प्राणायामादि—योगक्रियेवर आहे.

अन्नादि पदार्थ शरीराच्या रक्षणास अत्यंत आवश्यक आहेत. परंतु त्यांचें बेतानें सेवन केलें पाहिजे. तसें न केल्यास शरीरांत निरनिराळे **विकार** उत्पन्न होऊन योगक्रियेला विघात होतो. ह्मणूनच '**मिताहार**' हें ब्रह्मविद्येच्या २६ अंगांपैकीं एक अंग सांगितलें आहे. कांहीं पदार्थ वातवर्धक, कांहीं पित्तवर्धक, व कांहीं कफवर्धक असतात. जठराग्नि दुर्बल असून ते ते पदार्थ ज्यास्त सेवन करण्यांत आले ह्मणजे त्या त्या दोषांचा प्रकोप होऊन शरीरांत वातपित्तकफात्मक नानातऱ्हेचे रोग उद्भवतात. तिन्ही दोष कुपित झाले ह्मणजे त्याला 'सन्निपात' ह्मणतात व तिन्ही दोष सम स्थितींत असले ह्मणजे शरीर आरोग्यस्थितींत असतें.

शरीर हें आत्म्याचें राहतें घर आहे. **पचनक्रिया** हा त्या घराचा पाया व **शुक्रधातु** ही तिजोरी होय. तिजोरी बळकट असली ह्मणजे फारशा व्यावहारिक अडचणी बाधक होत नाहींत. त्याचप्रमाणें शुक्रधातूची बळकटी असली ह्मणजे इतर धातु तरतरीत राहून जठराग्निही प्रदीप असतो. शुक्रधातु बिघडण्यास मुख्य कारण उष्णता होय व ती उष्णता शरीराच्या आंतल्या भागांत सांठलेल्या मलापासून उत्पन्न होते. एकाद्या मोरींत रोज अन्नाचा अंश जात असला व ती आपण धुवून स्वच्छ ठेविली नाहीं, तर कांहीं दिवसांनीं तेथें मलसंचय होऊन व उष्णता उत्पन्न होऊन सूक्ष्म कृमी दिसूं लागतील; त्याचप्रमाणें जठराग्नि दुर्बल असला ह्मणजे खाल्लेल्या अन्नापैकीं अपक्व राहिलेल्या अन्नरसाचे परमाणु त्या त्या नाड्यांत जागोजाग संचित होऊन त्यांपासून उष्णता उत्पन्न होते व पुढें कांहीं दिवसांनीं सूक्ष्म जंतू उत्पन्न होऊन निरनिराळे रोग होतात. यावरून रोगांचें बीज नाहींसें होण्यास शरीराच्या आंत जमत जाणारा मल समूळ नाहींसा झाला पाहिजे, हें उघड आहे. डाक्टर, हकीम इत्यादिकांच्या उपचारांपासून तसा तो निर्मूळ होऊं शकत नाहीं; ह्मणून आजकाल डाक्टर, हकीम, वैद्य यांचा जरी सुकाळ झाला आहे व शहरा-

तून भपकेदार पाट्या गल्लोगल्लीं झळकत आहेत, तथापि रोगाचें प्राबल्य बिलकूल कमी नसून उलट, त्यांचा ज्यास्त फैलावा दिसून येत आहे व लोक दिवसेंदिवस फारच दुर्बल होत आहेत. प्रिय सभासद हो, शरीराच्या आंतील कोणत्याही अत्यंत सूक्ष्म भागांतून मलाचें निःसारण करण्यास प्राणायामासारखें रामबाण औषध नाहीं, आणि ह्मणूनच प्राणायाम हें आरोग्यवृद्धीचें मुख्य साधन होय.

आतां प्राणायामानें मलाचें निःसारण कसें होतें, तें थोडक्यांत सांगतों. एकाद्या सुगंधि पदार्थाचा सुगंध अथवा दुर्गंधि पदार्थाचा दुर्गंध येणें ह्मणजे त्या त्या पदार्थांतील अत्यंत सूक्ष्म अंश अर्थात् परमाणु, हवेंतून आपल्या घ्राणेंद्रियापर्यंत येऊन पोहोंचणें हें होय. ही सृष्टि निरनिराळ्या पदार्थांच्या असंख्य परमाणूंनीं भरलेली आहे. ज्या तंबूखालीं आपण हल्लीं बसलां आहां, त्या तंबूच्या वर खालीं इत्यादि सर्व बाजूंस अनंत परमाणु भरून राहिले आहेत. ते सांप्रत आपल्यास दिसत नाहींत. परंतु सकाळीं सूर्योदय झाल्यावर तंबूला एक छिद्र पाडून त्यांतून सूर्याचें किरण आंत घेतले, तर किरणात्मक एका तिर्कस रेषेंत असंख्य परमाणु खेळून राहिले आहेत, असें आपल्या नजरेस येईल. अशीं अनेक छिद्रें पाडिलीं तरीही तोच प्रकार दिसून येईल. येथे टेबलावर अथवा दुसऱ्या एकाद्या ठिकाणीं कापुराची वडी ठेविली, तर ती कांहीं दिवसांनीं नाहींशी झाल्याचें आढळून येईल. एवढी मोठी वडी कोठें गेली असावी बरं? अर्थात् ती नष्ट झाली नाहीं, तर हवेंत परमाणुरूपानें उडून गेली. ही परमाणूंची कल्पना शरीराच्या आंतील भागासही लागू आहे ह्मणजे जसे ब्रह्मांडांत लक्षावधि परमाणु खेळून राहिले आहेत, तसेच पिंडांत ( शरीरांत ) ही खेळून राहिले आहेत. हे परमाणु एका ठिकाणाहून अन्य ठिकाणीं जाण्यास कारण वायु आहे. प्राणायाम करितांना, प्रथमतः मूलबंधानें अपानवायूची उर्ध्वगति झाली ह्मणजे त्या वायूबरोबर मूलाधाराचे ठायीं व त्याच्या आजूबाजूच्या नाड्यांत सांठलेल्या मलाचे परमाणु वर षट्दलचक्रांत येतात. तेथून ते परमाणु, तेथल्या मलाच्या परमाणूंसह वायुबरोबर त्याच्या वरच्या चक्रात ह्मणजे दशदल चक्रांत दाखल होतात. या क्रमानें खालच्या भागांतील मलाचे परमाणु अपानवायूच्या बळानें

ऊर्ध्वभागीं, व वरील तमाम भागांतील मळाचे परमाणु प्राणवायूच्या बळानें अधोभागीं खेंचले जाऊन, व प्राणापानसंयोगकाळीं ते एकवटून रेचकाच्या द्वारानें शरीराच्या बाहेर काढून दिले जातात. याप्रमाणें एकदा इडेनें व एकदा पिंगलेनें रेचक केला असतां, अग्नींत तावून काढलेल्या सोन्याप्रमाणें सर्व देहांतील नाड्यांची उत्तम शुद्धि होते. व अशी वारंवार शुद्धि होत गेली ह्मणजे रोगाचा उद्भव होण्यास कारणच राहणार नाहीं.

रात्रीं मैथुनप्रसंगीं शुक्रधातु स्वस्थानापासून चलित झाल्या कारणानें शरीरांत जी अशुद्धता उत्पन्न झाली, ती दूर होण्यासाठीं अठरा वेळ प्राणायाम करावा, असें सांगितलें आहे. याचप्रमाणें जप, होम, पूजा इत्यादि हरएक धर्मकृत्याशीं आमच्या शास्त्रकारांनीं जो प्राणायामाचा संबंध जोडून दिला आहे, त्यांतलें तरी बीज हेंच आहे.

कोणी आधुनिक विद्वान् डाक्टर वगैरे ह्मणतील कीं हा सर्व मूर्खपणा आहे. वायूच्या आश्रयावांचून मुळीं जीवनच अशक्य आहे, मग त्याचा निरोध केल्यावर रोगांचा परिहार तर दूरच, पण उलट रोग वाढतील. यावर पूर्वीं एकदा उत्तर दिलेंच आहे व आजही सांगतों कीं यथाविधि प्राणायामाचा अभ्यास करणारास, शारीरिक रोगांची बाधा तर होत नाहींच, परंतु जसजसा त्याचा अभ्यास वाढत जाईल तसतसा तो क्षुधा-तृषा, शीत-उष्ण इत्यादि द्वंद्वांस जिंकून पंचभूतांच्या अधिकारापलीकडे जातो ह्मणजे त्याजवर पंचभूतांची सत्ता बिलकुल चालत नाहीं व खेचरी मुद्रेच्या प्रभावानें त्यास अमृतपान मिळाल्यामुळें तो प्राणवायूच्या आश्रयावांचून कित्येक दिवस नव्हे कित्येक वर्षे,—आनंदानें राहूं शकतो. या गोष्टी अनुभवावांचून कळणें शक्य नाहीं; तथापि तितका ज्यांस धीर नाहीं, त्यांच्या कारितां सामान्य व्यवहारांतील एक गोष्ट सांगतों. ज्या कृत्यांनीं श्वासांचा प्रमाणाबाहेर खर्च होतो तीं कृत्यें आचरण केल्यावर अथवा प्रांतःकाळीं उठल्यावर आपलें शरीर तोलावें आणि स्नानसंध्या व कांहीं वेळ प्राणायाम केल्यावर मग पुनः शरीर तोलावें ह्मणजे प्राणायामानंतरच्या वेळीं कांहीं ज्यास्त वजन झाल्याचें आढळून येईल व त्यावरून प्राणायामाचें शरीरावर काय कार्य घडतें, त्याजबद्दल तत्काळ खात्री होईल.

या कोव्यांस लोकमतास न जुमानतां केवळ आपल्या मनगटाच्या जोरावर कायद्याचें स्वरूप दिलें. या नव्या कायद्याप्रमाणें राजद्रोह हा गुन्हा पूर्वी जो राजाविरुद्ध बंड करण्यास चिथावण्याचा होता तो केवळ राजाच्या बेअदबीचा होऊन बसला आहे. हल्लीं राजद्रोहाची अशी व्याख्या आहे कीं, जो कोणी शब्दानें, लेखानें, चित्रानें किंवा दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें लोकांच्या मनांत सरकाराबद्दल "शत्रुभाव, द्वेष किंवा तिरस्कार" उत्पन्न करील तो राजद्रोही समजला जाईल. यास अपवाद म्हणून जें एक कलम दिलें आहे त्यांत सरकारावर कडक टीका करण्याची मोकळीक दिली आहे; पण तीही इतकी मर्यादित आहे कीं, अशा प्रकारची टीका करतांना लेखकानें किंवा वक्त्यानें सरकाराबद्दल लोकांच्या मनांत "द्वेषबुद्धि अगर तिरस्कार" उत्पन्न न होईल याबद्दल खबरदारी घेतली पाहिजे, असें त्यांत लिहिले आहे. सारांश १८९८ सालीं जेव्हां हा कायदा पास झाला तेव्हांच या देशांतील लेखकांच्या व वक्त्यांच्या गळ्याभोंवतीं सरकारानें दोरी गुंडाळून ठेवलेली आहे. कारण असें पहा कीं, जेव्हां एकाद्या अधिकाऱ्याच्या किंवा सरकारच्या विरुद्ध टीका करावयाची, अथवा सरकारानें अमुक गोष्ट केली ती न्याय्य नाहीं, लोकांनीं ती गोष्ट सरकाराकडून फिरवून घेतली पाहिजे अशी बुद्धि लोकांमध्यें जागृत करावयाची, तेव्हां ती गोष्ट सरकारच्याबद्दलची पूज्यबुद्धि थोडी बहुत तरी कमी केल्याखेरीज कशी करतां येणार ! सरकारच्या राज्यपद्धतीचें धोरण आमच्या देशास घातूक आहे, ही राज्यपद्धत प्रत्यहीं आह्मांस सामर्थ्यहीन व द्रव्यहीन करीत आहे, असें लोकांच्या मनांत भरवून त्याचा प्रतिकार करण्यास त्यांस जर उद्युक्त करावयाचें असलें तर लोकांच्या मनांत सरकाबद्दल असलेला पूज्यभाव थोडाबहुत तरी कमी झालाच पाहिजे. आणि पूज्यभाव जितका कमी तितका तिरस्कार ज्यास्ती अशा कोटिक्रमानें सर्व कांहीं राजद्रोही ठरणार ! बरें यापासून राज्याचे हित होतें ह्मणावे तर तेंही नाहीं. राज्याचा सुरक्षितपणा आणि सरकारबद्दलचा पूज्यभाव या दोन गोष्टी अगदीं स्वतंत्र आहेत. एवढा मोठा रामराजा कीं, ज्यानें रावणादिकांचासुद्धां नाश केला त्याच्या राज्यांत देखील त्याच्याबद्दल पूज्यभाव नसणारा एक परीट निघाला होता ! पण त्या महाथोर रामराजानें या परिटास राजद्रोहाबद्दल तुरुंगांत टाकले नव्हतें अगर दंड केला नव्हता, इतकेंच नव्हे तर,

**स्नेहं दयांच सौख्यंच अपिवा जानकीमपि ।**
**आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥**

असें ह्मणून सीतेचाही त्याग केला ! हे दिवस आतां गेले हें आह्मी जाणून आहों; व श्रीरामचंद्राची ही कसोटी इंग्रजसरकारास आह्मी लावूं इच्छित नाहीं व ती लागणारही नाहीं. परटाचें समाधान करण्याकरितां कोणीही राजा या युगांत धर्मपत्नीचा त्याग करील असें घडून येणें शक्य नाही. परंतु परटाच्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष करणें

किंवा त्याला बोलावून त्याची समजूत काढणें शक्य नाही काय? सरकारास कदाचित् असें वाटत असेल कीं, नव्या दुरुस्त केलेल्या पिनलकोडाच्या १२४ अ कलमाचा अर्थ आह्मी कोर्टमार्फत व ज्यूरीमार्फत खरा करून घेतला. परंतु आमच्या मतें ही चूक आहे. सरकारच्या टंकसाळींतूनच निघालेला रुपया अशा रीतीनें वाजवून खरा करून घेण्याचें सरकारास कांहीं कारण नव्हतें. राजद्रोहाची व्याख्याच आतां इतकी संकुचित झालेली आहे की, कर्झन साहेब राहूं द्या, पण पोलिस शिपायास जरी अवरंगझेबाची उपमा दिली तरी तो राजद्रोह होऊं शकेल; मग 'नरकांतील दरबारा'ची गोष्ट तर राहूंद्याच. राजद्रोह हा आतां बेअदबीचा गुन्हा झाला आहे; आणि जोंपर्यंत युरोपियनाप्रमाणें नेटिवांस आपल्या जातीची ज्यूरी मागण्याचा कायद्यानें अधिकार दिलेला नाहीं तोंपर्यंत खटला करण्याचा मात्र अवकाश कीं, सरकाराविरुद्ध लिहिणाऱ्या कोणाही लेखकास किंवा वक्त्यास शिक्षा ही ठेवलेलीच समजावी! कारण सरकाराबद्दल तिरस्कार उत्पन्न झाला कीं राजद्रोह होतो, असा कायदाच झालेला आहे; आणि तिरस्कारबुद्धि या सदरांत अपमान, थट्टा, अनादर, किळस, या सर्वांचा समावेश सहज करतां येण्यासारखा आहे. सन १८९७ साली स्ट्राची साहेबांना शब्दांची ओढाताण करावी लागली; पण ९८ सालच्या पिनलकोडांतील दुरुस्तीनें आतां तशा प्रकारचा वाक्छल किंवा वाक्पांडित्य कोणत्याही जज्जांस करण्याची जरूर नाहीं. त्याने फक्त ज्यूरींस एवढेंच सांगावयाचें कीं, "या लेखानें सरकाराबद्दल लोकांच्या मनांत तिटकारा उत्पन्न होईल कीं नाही; होईल असें वाटत असल्यास आरोपी राजद्रोही आहे, नाहीं तर नाही." 'भाल्या'वरील खटल्यांत सरकारतर्फे ॲडव्होकेट-जनरलास, किंवा ज्यूरीस खटला समजावून देतांना न्यायाधीशास फारसें वाग्डंबर माजवावें लागलें नाहीं याचे खरें कारण हेंच होय. राजद्रोहाची हल्लींची व्याख्याच इतकी मर्यादित झालेली आहे कीं, अमुक एक प्रकारचा लेख राजद्रोही असें ठरविण्यास फार बडबड करावयास नको. सरकारची अदबी अगर अब्रू कमी करण्यासारखा लेख असला ह्मणजे त्यापासून सरकारच्याबद्दल लोकांच्या मनांत तिटकारा येणारच; आणि तिटकारा असला कीं राजद्रोह हा झालाच, असा हल्लींचा कायदा व कोटिक्रम आहे. हा कायदा ज्या वेळीं पास झाला त्या वेळीं याच्या घातुक व्यापकपणाबद्दल हिंदुस्थानांत चोहोंकडे ओरड होऊन सरकारास अर्ज गेले होते. पण सरकारानें त्या वेळीं असें उत्तर दिलें कीं, 'आह्मी राजद्रोहाची जी ही व्याख्या अधिक कडक केली आहे त्यापासून लोकांनीं भीति बाळगण्याचें कारण नाहीं. आमच्या हातांत अधिकार रहावा एवढ्याकरितां मुद्दाम बेअब्रूस देखील राजद्रोहाच्या सदरांत घातलें आहे. पण लोकांचा विनाकारण छळ होऊं नये ह्मणून आह्मी अशी तजवीज योजिली आहे कीं, राजद्रोहाचा खटला करण्याचें काम केवळ पोलिसाच्या मर्जीवर न ठेवतां त्यास सरकारच्या मंजुरीची अट ठेविली आहे. महत्वाच्या बाबीखेरीज सरकार मंजुरी

देणार नाहीं. राजद्रोहाची बाब किरकोळ असेल तर आरोपीस प्रथमतः इषारा दिला जाईल ( क्रिमि. प्रो. को. क. १०८ ), व तो इषारा उपयोगी न पडेल तर खटला करण्यास मंजुरी मिळेल, एरव्हीं मिळणार नाहीं.' या आश्वासनाचा खरा अर्थ असा आहे कीं, 'बाबानो, तुमच्या गळ्याभोंवती जरीं दोऱ्या गुंडाळलेल्या आहेत तरी आजच तुह्मांला फांशी देतो असें समजूं नका. ही दोरी आवळण्याचें काम पोलिसाकडे न ठेवतां आह्मी आपल्या हातांत ठेवलें आहे; व किरकोळ बाबतीत आह्मीं निदान इषारत दिल्याखेरीज तरी दोरी आवळणार नाहीं.' हें आश्वासन हल्लींच्या प्रसंगीं सरकारानें पाळले कीं नाहीं याचा विचार करण्याचें काम आह्मीं वाचकांवरच सोंपवितों. ज्यूरीनें 'भाला'पत्रकारांस सर्वानुमतें दोषी ठरविलें खरें; किंबहुना हल्लींच्या कायद्याच्या निर्दय व्याख्येप्रमाणे 'भाला'पत्रकार राजद्रोहाच्या व्याख्येच्या चिमट्यांत सांपडतो, असे याच काय, पण दुसऱ्या कोणत्याही ज्यूरीनें ह्मटलें असतें. हा ज्यूरीचा दोष नव्हे, ज्यूरीपुढें मांडलेल्या कायद्याचा आहे. पण या खटल्यांत ज्यूरी एवढेच मत देऊन राहिली नाहीं; तर आरोपी कायद्याप्रमाणे गुन्हेगार असला तरी तो दयेस पात्र आहे, अशी त्यांनीं सर्वानुमतें जज्जांस शिफारस केली. आतां सरकारास आमचा एवढाच प्रश्न आहे कीं, ज्यूरीनें जज्जांस जी ही शिफारस केली त्याप्रमाणें सरकारास शिफारस करणारे अंमलदार कोणी निघाले होते काय? भाल्यावर खटला करावा अशी शिफारस कोणी केली? सरकारानें लीगल रिमेंब्रन्सर किंवा अॅडव्होकेट—जनरल यांजकडे हें प्रकरण पाठविलें होतें किंवा नाहीं; आणि असल्यास भालापत्रकार नवीन निर्दय कायद्याप्रमाणें गुन्हेगार असला तरी हा खटला कोर्टांत आणण्यासारखा नाहीं, अशी त्यांनी सरकारास सल्ला दिला कीं नाहीं? भालापत्रकार तुरुंगांत गेल्यानें राज्यावरील कांहीं मोठे अरिष्ट टळलें असें नाहीं; व तो तुरुंगांत न गेला असतां तर पुढें मागें एकादें अरिष्ट उद्भवलें असतें असेंही नाहीं. इंग्रजी राज्यपद्धतीबद्दल लोकांच्या मनांत जो वाईट ग्रह झालेला आहे तो कांहीं भालापत्रकाराच्या लेखानें उत्पन्न झालेला नाही अगर त्यास शिक्षा झाल्यानें मोडतो असेंही नाहीं. जोंपर्यंत हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी चाळीस कोट रुपये आर्थिक मोबदल्या-खेरीज बाहेर जात आहेत, जोंपर्यंत दुष्काळाचा प्रतिकार रिलीफ कामांखेरीज अन्य रीतीनें करण्याचें सरकारच्या मनांत येत नाहीं, व जोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोकांस उत्साह, धैर्य, संपत्ती वगैरे बाबतींत लंगडे पांगळेच ठेवण्याचें सरकारचें धोरण आहे, तोंपर्यंत या राज्यव्यवस्थेबद्दलचें लोकांचें मत कधींही चांगलें व्हावयाचें नाहीं अगर ते अथवा त्यांचे पुढारी संतुष्ट राहणार नाहींत. हा असंतोष लोकांच्या मनांत जागृत आहे, जळत आहे; आणि त्याच्या ज्वाला प्रकृतीमाना-प्रमाणें कोठें सौम्य, कोठें तापट, तर कोठें बीभत्स रीतीनें बाहेर पडत आहेत. हल्लींच्या राजद्रोहाच्या व्याख्येप्रमाणें पाहिलें तर हा सर्वच राजद्रोह होय. परंतु अंतः-करणेंच जेथें जळत आहेत तेथें या असंतोषाग्नीच्या ज्वाला बाहेर पडण्याचें एकाद-

दुसरें किं द्वारें बंद केल्यानें कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. भालपत्रांतील लेखांत जर कांहीं दोष असला तर तो हाच कीं, त्यांत बीभत्सरस ( नरकाचें वर्णन आदिकरून ) अधिक ओतला गेला होता. परंतु त्याबद्दल भालपत्रकारास शिक्षा केल्यानें सध्यांच्या इंग्रजी राज्यपद्धतीबद्दल लोकांच्या मनांत जो वाईट ग्रह आहे तो नाहींसा होईल असें मानणे चुकीचें होय. हा वाईट ग्रह जोंपर्यंत हल्लींची सदोष राज्यपद्धति कायम आहे तोंपर्यंत कधींही नाहींसा व्हावयाचा नाहीं. कांहीं लोक चांगल्या शब्दांनीं तर कांहीं लोक तो ग्राम्य शब्दांनीं व्यक्त करतील; व ग्राम्य शब्दांनीं व्यक्त करणें एवढाच गुन्हा असल्यास तितक्या पुरता कदाचित् तो बंद होईल. परंतु रोगाचे मूळ यानें नाहींसें व्हावयाचें नाहीं, हें सरकारानें पक्कें लक्षात ठेवलें पाहिजे. वर सांगितलेंच आहे कीं, एका गळवास मलमपट्टी लावल्यानें दूषित रक्त शुद्ध होत नाहीं. हिंदुस्थानांतील प्रजेची स्थिति हल्ली याच मासल्याची झालेली आहे; व या प्रजेचे जे पुढारी आहेत त्यांना ही स्थिति सरकारच्या व लोकांच्या लक्षांत आणून देणें व ती सुधारण्याचे उपाय सुचविणें व करणें, हें त्यांचे कर्तव्य होय. हें कर्तव्य करीत असतां एकादा मनुष्य जहाल गेला, किंवा दुसरा एकादा बीभत्स बोलूं लागला, अगर कांहीं गोष्टी अलंकारिक भाषेने सांगूं लागला तर त्यास साध्या कैदेंत कां होईना, पण सहा महिने तुरुंगांत धाडणें न्यायी व सुधारलेले म्हणविणाऱ्या राज्यकर्त्यांस कधींही भूषणास्पद नाहीं अशी आमची समजूत आहे. सरकारची अदबी राखून बोलावें हें खरें आहे. पण हजारों वेळां ती तीच गोष्ट सांगितली तरी तिचा जेथें प्रतिकार होत नाहीं तेथें भीक मागणारांचेंही डोकें फिरून जातें ही गोष्ट विसरतां कामा नये.याकरितां सरकारास आमची विनंति आहे कीं,उगीच अतिप्रसंग करून विनाकारण एकाद्यास सतावूं नका. हिंदुस्थानांतील प्रजा सध्यां ज्या दुःखांनीं गांजलेली आहे तीं दुःखें वास्तविक आहेत आणि प्रत्यक्ष आहेत. भाल्यासारख्या एखाद्या पत्रकारास शिक्षा दिल्यानें तीं कधीं कमी व्हावयाचीं नाहींत अगर त्यांचा बंदोबस्तही व्हावयाचा नाहीं. प्रजा जर संतुष्ट किंवा अक्षुब्ध रहावयास पाहिजे असली तर या दुःखांचा आधीं विचार केला पाहिजे. राजद्रोहाचा कायदा अधिकाधिक कडक केल्यानें निर्वाह लागणार नाही. बीभत्सरसांत आमच्या दुःखांचें रडगाणें गावयाचें नसल्यास तें आम्ही हास्य, करुण, अद्भुत, अथवा भयानक रसांत गाऊं. परंतु जोंपर्यंत दुःख कायम आहे तोंपर्यंत सरकारी राज्यपद्धतीविरुद्ध तक्रार करण्याचें काम व तीं बदलून घेण्याचा उद्योग कधींही थंड पडणार नाहीं, व थंडे पडून उपयोगीही नाहीं. भाल्यासारख्या पत्रकारास कैदेंत पाठविल्याने हा उद्योग अधिक वाढेल; व दुःख व्यक्त करण्याचे मार्ग कमी न होतां अधिक होतील. मागें आम्ही लिहिलेंच आहे कीं, राजद्रोहाचा कायदा बदलल्यानें बाटलीवर कसरत करण्याचा प्रसंग वर्तमानपत्रकारांवर येऊन ठेपला आहे. हेंही सरकार बंद करील तर दोरीवर कसरत करूं; पडूं, पण उद्योग सोडणार नाहीं. कारण, सरकारच्या परवानगीवर हा उद्योग अवलंबून

नाहीं. देशाच्या दुःखाचें मूळ काय ही गोष्ट शास्त्रोक्त विचारानें सिद्ध झालेली आहे, व त्या दुःखाचें मूळ अमुक एक आहे, अशी जोंपर्यंत मनाची पूर्ण समजूत आहे, तोंपर्यंत तें दुःख कमी करण्याबद्दल झटणें किंवा दुःखाचें स्वरूप आणि कारण लोकांपुढें मांडून तें कमी करण्याबद्दल झटावयास त्यांस सांगणें, हें देशाकरितां आमचें कर्तव्य होय. यांतच राजा व प्रजा या दोघांचेंही कल्याण आहे; व प्रजाजनांपैकीं अशा तऱ्हेचा उद्योग कोणी करीत असतां गफलतीनें, गैरसावधपणानें, गैर-समजानें, राजद्रोहाच्या कायद्याची कैची अलीकडे किती आवळली आहे इकडे लक्ष न गेल्यामुळें त्याचें पाऊल निर्दयपणानें संकुचित केलेल्या मर्यादेच्या जरा बाहेर पडलें तर गरुडपक्ष्याप्रमाणें त्याजवर झडप घालून त्यास एकदम तुरुंगांत नेऊन ठेवणें हें खऱ्या मुत्सद्दीपणाचें लक्षण नव्हे व हा राजमार्गही नव्हे, असें म्हण-ण्यास आम्हांस बिलकुल दिक्कत वाटत नाहीं."

इंग्रजींत टीका करण्याची यांची हातोटी कशी आहे हें 'मराठा' पत्रांतील पुढील उताऱ्यावरून कळून येईल:—

HUMOUR—A CRIME IN A NATIVE.

We are not very much surprised at the incapacity of the Bombay *Times* to understand the writings in the native press, as evidenced by the comments on the humorous skit on Lord Curzon which appeared in the vernacular columns of the *Gujarati* a fortnight ago. To construe such a writing seriously or to scant the arguments in it logically betrays an utter want of appreciation of the humorous element in the same. We do not think that the writer in the *Times* would have ventured to construe in the same way a similar paragraph in a London paper. But the *Times* perhaps thinks that the natives of this country have no right to criticise the acts of the bureaucracy or its head in a spirit of sarcastic humour, and that it is nothing less than sedition to speak of Viceroys and Governors except in a tone of reverential sub-mission or with a proper recognition of the exalted position of the subject of the article and the correspondingly degraded position of the writer. The *Times* has naively asked the question how far writing of this sort is consistent with the law of the land, and whether it would not be an attempt to create enemical feeling against Government. But we assure the *Times* that unless the Penal Code is amended again there is no chance of such writings coming under the clutches of law, whatever the conceited bureaucracy or its admirers may think of them. A humorous and sarcastic article does and will contain statements which may not be strictly or logically true, much in the same way as the detailed features of a comic picture in the *Punch* are not expected to accurately represent the personal appearance of the object so portrayed. But our enraged contemporary is strong-ly under the impression that it is highly profane for a native to

speak of Lord Curzon, the ideal Viceroy of the *Times*, with such levity or humour "Are not the Gujaratis," asks the *Times*, "endowed with sober and eminently likeable qualities" and its sense of propriety is shocked at the idea of a Gujarati paper indulging in the occupation of throwing ridicule upon what the *Times* considers to be the most benevolent of the Indian Viceroys. Self-conceit, stupidity and wanton or deplorable disregard of the ordinary laws of literary criticism could hardly go further than what we find in the *Times'* attack on the *Gujarati*. It only betrays uncompromising intolerence of criticism and a perverse desire to distort facts and statements with the malevolent object of bringing into scrape people, who, in criticising the bureaucracy, use the same weapons as are used by journalists all over the world. But India, the *Times* would say, is an exception to the rule; and if the legislation of the country were left to itself, it would certainly enact that it is a crime in a native to speak even humorously of the *de facto* Governors in the land, and perhaps also of the writers or journalists who may be pleased to take cudgels, be it through sheer sense of duty or otherwise, in their behalf. The incident only shows how the malevolent activity of the leading Anglo-Indian journal is ever ready to detect anything that can be construed into an attack against Government even though it be by far-fetched or morbid imagination. The *Times* with its usual tactics has not failed, even in this writing, to appeal to the sobriety or moderation of native or Congress leaders in the hope of creating a breach in the adversary's camp. But tactics like these are now too patent to deceive anybody; and we have no doubt that all Indian leaders would condemn the folly or the malice of the *Times* in failing to read aright the writings in the Vernacular press. The *Gujrati*, we think, deserves to be congratulated not so much on humorously exposing Lord Curzon as on bringing to light the extravagent conceit and intolerence of the self-styled leading paper of Asia." 3—12—1905.

यांची ग्रंथांवरील टीका मेकॉलेच्या पद्धतीची असून ग्रंथांतील गुणदोष तर हे दाखवीत असतच; पण त्याबरोबर आपणास सांगावयाची माहिती व त्यावरून निघणारे सिद्धांत यांचाही त्यांत खुबीनें ते समावेश करीत. याचीं उदाहरणें पाहावयाचीं असल्यास रा. ब. चिंतामणराव वैद्य यांनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलेलें 'महाभारत' व 'रामायण' हे ग्रंथ, वे. शा. सं. पारखीशास्त्री यांचा 'बाणभट्टावरील निबंध', रा. रा. दाभोळकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'ज्ञेयाज्ञेयमीमांसा,' या ग्रंथांवरील त्यांची केसरींत आलेली टीका वाचकांनीं अवश्य वाचावी.

## दृष्टांतादि अलंकार.

यांचे दृष्टांतादि अलंकार प्रसादयुक्त असतात. ह्मणजे ते ओढून ताणून

न आणतां सहजासहजीं येतात, व विषयास अगदीं बरोबर लागू पडतात. तसाच यांचा विनोद व कोटिक्रमही सुसंस्कृत असतो; व वेळींअवेळीं त्याची रेलचेल करून चव न घालवितां प्रसंगविशेषींच त्याची योजना ते करीत असल्यामुळें त्यानें त्यांच्या लेखास खुमारी येते.* याचीं कांहीं उदाहरणें वाचकांस पाहावयास मिळावीं ह्मणून तीं येथें देतों.

मि. मलबारी यांनीं १९०३ सालांत 'ईस्ट अँड वेस्ट' या मासिक पुस्तकांत 'रानडे आणि त्या वेळची स्थिति' या विषयावर इंग्रजींत लेख लिहितांना 'आपणास लोक कॉंग्रेसचे शत्रु समजतात,' ही चूक आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. यासबंधानें लिहितांना टिळक यांनीं पुढील वाक्यांत एक मजेदार उपमा देऊन कोटिक्रम केला आहे:—

"कॉंग्रेस ही संस्था आपल्याच घरांतून पहिल्यानें बाहेर पडली, आपल्याच घरांत कॉंग्रेसचें पहिलें प्रसिद्धीपत्रक व ठराव एका मोठ्या इंग्रजी मुत्सद्यानें लिहिलें, असें मलबारी शेटजींनीं मोठ्या गौरवानें प्रसिद्ध केलें आहे. परंतु दैवयोग असा विचित्र आहे कीं, शकुंतला कण्वाश्रमांतून बाहेर पडल्यानंतर जशी ती पुन्हां कण्वाश्रमास परत गेली नाहीं, तशी मलबारी शेटजींच्या कन्येची स्थिति होऊन शेटजी कॉंग्रेसला कधी गेले नाहींत व कॉंग्रेस सभेनेंही शेटजींच्या पुन्हां घरीं जाऊन त्यांचा सल्ला घ्यावा तो घेतला नाहीं!"

पोलिस—कमिशनच्या रिपोर्टासंबंधानें लिहितांना पोलिसखात्याची स्थिति कशी आहे, हें पुढील अवतरणांत दाखविलें आहे:—

"ज्या खात्याचा पाया सात किंवा आठ रुपयांच्या अडाणी, अशिक्षित व लोभी शिपायावर रचलेला, ज्याच्या इमारतींतील मधला भाग या शिपायाच्या दर्जापासून वाढलेल्या व त्याचे दुर्गुण अंगीं मुरलेल्या चीफ कान्स्टेबल किंवा इन्स्पेक्टरांनीं भरलेला; आणि ज्याचा कळस मोठ्या युरोपियन अमलदारांच्या उनाड व टोणग्या पोरांकरितां राखून ठेवलेला, तें खातें आदि, मध्य, व अंत मिळून सर्व ठिकाणी एकसारखें कुजलेलें असणें अगदीं स्वाभाविक आहे."

'मराठी भाषेची लेखनपद्धति' या निबंधांत ऱ्हस्व, दीर्घ, सानुनासिक किंवा निरनुनासिक शब्दांसंबंधानें घोंटाळा काढण्याचा जो प्रयत्न चालला

---

* विनोदासंबंधानें अतिप्रसंग न करतां त्याचा कसा उपयोग करावा याचा कलकत्त्याच्या 'न्यू इंडिया' नामक पत्रानें एका लेखांत एकाच वाक्यांत येणेंप्रमाणें उल्लेख केला आहे:—

"Humour is like seuse to the intellect, and to convert it into its staple food, is to pervert the use of humour on the one hand and to strave the intellect on the other." 11—5—04.

होता तो सयुक्तिक नाहीं, हें दर्शवितांना त्यांनीं पुढील कोटिक्रम केला आहे:—

" मराठी भाषा अद्याप बाल्यावस्थेंत आहे; व एव्हांच जर तिच्या स्वरूपाचें निरीक्षण करून त्याच्या वाढीची दिशा मर्यादित केली तर चिनी स्त्रियांच्या पायांप्रमाणें तिच्या सौंदर्याची स्थिति होऊन तें कांही थोड्या सोंवळया किंवा आग्रही लोकांखेरीज कोणासही पसंत पडणार नाहीं. ... भाषेंतील घोंटाळा काढूं नये, असें आमचें ह्मणणें नाहीं. उलट, भाषेंतील घोंटाळे काढणें हेंच वैय्याकरणांचें कर्तव्य आहे, असें आह्मीं समजतों. स्त्रियांस केशसंस्कार किवा केंस विंचरून वेणीफणी करणें हें जितकें इष्ट व अवश्य आहे तितकेंच भाषेंतील शब्दांस सुसंस्कृत करणें अवश्य होय. तथापि, केशसंस्कारांत केंस कापण्याचा किंवा वपनाचा जसा अंतर्भाव होत नाही, त्याप्रमाणेंच शब्दांची वाढ कुंठित करणें किंवा कापणें या गोष्टी व्याकरण संस्कारांत येत नाहींत."

सन १९०१ सालीं जमिन—महसुलाचा कायदा पास करते वेळीं ना. मेथा आदिकरून कांहीं मंडळी मुंबई सरकारच्या कायदेकौन्सिलांतून उठून आली; त्या वेळीं लोकमतास न जुमानतां सरकारानें जी अरेरावी केली तीस उद्देशून त्यांनीं असा टोमणा दिला आहे:—

" लोकांचे प्रतिनिधी कायदेकौन्सिलांत घेऊन अशाच तऱ्हेनें जर त्यांचा बोज ठेवावयाचा असेल तर यापेक्षां पांच सहा संगमरवरी दगडाचे पुतळे करून त्यांचीच कायदेकौन्सिलांत निरनिराळ्या ठिकाणीं स्थापना करावी; आणि निरनिराळ्या भागांच्या निवडणुकी झाल्या, ह्मणजे एका पुतळ्यास ना. मेथांची टोपी तर दुसऱ्यास प्रो. गोखल्यांचें पागोटें घालून चटावरील श्राद्धाप्रमाणें कायदेकौन्सिलांतील फार्स उरकून घेण्याचा एकादा नवा कायदा पास करून घ्यावा."

' सरकारी नोकरांनीं काम करावयाचें तें पगारासाठीं न करतां कर्तव्य ह्मणून करावें, ' असा उपदेश लॉर्ड कर्झन यांनीं १९०२ सालीं कलकत्ता येथील पदवीदानसमारंभाचे वेळीं आमच्या लोकांस केला होता, त्यास उद्देशून ते ह्मणतात:—

" फलाची आशा न धरतां कर्तव्यबुद्धि ठेऊन कामें करावीं व तीं परमेश्वरास अर्पण करावीं, असा उपदेश वेदांतांमध्यें केलेला असतो; परंतु त्यापासून मोक्ष मिळत असतो. तसा तो सरकारी नोकरीपासून मिळत असल्यास वरील उपदेश सर्वांशीं ग्राह्य आहे यांत शंका नाहीं! परंतु हा वेदांतोपदेश पावड्यांनीं पगार ओढणाऱ्या बड्या इंग्रजी अधिकाऱ्यांनीं शंभर दोनशें रुपड्यांच्या आंतील पगारांच्या

नेटिव नोकरांस करणें, ह्मणजे दुसऱ्याच्या घरचे चमचमीत जेवण जेऊन घरच्या यजमानास मिताहाराचा उपदेश करण्यासारखें हास्यास्पद नव्हे काय?"

युनिव्हर्सिटी—बिलास डॉ. भांडारकर यांनीं अनुकूल मत दिल्यावर त्यांच्याविरुद्ध लिहितांना टिळक यांनीं पुढील कोटिक्रम योजिले आहेत:—

"गंडकींत ज्याप्रमाणें शालिग्रामच निपजावयाचे तद्वत सरकारी नोकरीची स्थिति आहे. तिच्या प्रवाहांत जे एकदां सांपडले त्यांचे कानेकोपरे झिजून जाऊन कांहीं वर्षांनीं ते शालिग्रामाप्रमाणें आपणांस लोकांनीं पूज्य मानावे, असें समजूं लागतात. ... आपल्या भाषणाच्या आरंभीं 'पुढें काय बोलणार हें कळण्यापूर्वींच लोकांनीं मजविरुद्ध टीका करण्यास आरंभ केला,' ह्मणून डॉक्टर साहेबांनीं आश्चर्य प्रदर्शित केलें आहे, आणि लोकांस दोषही दिला आहे. पण आह्मांस त्यांत कांहीं आश्चर्य वाटत नाहीं. सगळा जन्म शाळाखात्यांत घालविलेले डॉक्टर साहेब कितीही विद्वान् असले तरी लॉर्ड कर्झन साहेबांच्या राजकीय धोरणासंबंधानें बोलतांना हे चकतील अशी पूर्वींच पुष्कळांनीं अटकळ केली होती. ही अटकळ बांधण्यास डॉक्टर साहेबांचें भाषण होण्याची वाट पाहणें जरूरच होतें असें नाहीं. हरिदासाचे दिवाण झालेले माणकेश्वर जेव्हां पालखींत बसून खडकीच्या समरांगणावर लढाई मारण्यास निघाले, तेव्हांच पुण्यांतील कांहीं शाहाण्या लोकांस लढाईचा परिणाम कळून चुकला होता; आणि त्यांस जर कोणी असें विचारलें असतें कीं, 'कायरे, तुह्मी लढाई होण्यापूर्वींच तिच्या परिणामाविषयीं अटकळ कां करितां?' तर त्यांनीं जो जबाब दिला असता तोच आज आह्मी डाक्टर साहेबांस देऊं शकतों. ... ज्यांनीं जन्मभर शाळेंत शिकविण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं; आणि परकीय राजे आपल्यावर कोणत्या रीतीनें अंमल करतात, अथवा त्यांच्या राजनीतीचें धोरण कसें असतें, अगर तें अहितकारक असून हितकारक आहे असें लोकांस दाखविण्याचा कसा प्रयत्न चालला असतो, इत्यादि गोष्टींचा ज्यांनीं विचार केला नाहीं त्यांनीं जन्मभर आपण युनिव्हर्सिटींत होतों ह्मणून युनिव्हर्सिटी—बिलावर मत देण्याच्या आपल्या पात्रतेची टिमकी वाजविणें, ह्मणजे नेहमीं मी पाण्यांत राहतों ह्मणून बेडकानें सृष्टींत होणाऱ्या पावसाच्या घटामोडीवर अभिप्राय देण्यासारखेंच होय! ... शिक्षणाचें काम लोकांच्या हातीं असेल तितकें चांगलें; किंबहुना लोकांनींच तें हातांत घेतलें पाहिजे, अशा तऱ्हेचा अभिप्राय हंटर साहेबांच्या एज्युकेशन कमिशननें दिला होता; व आह्मांस असें आठवते कीं, तो आपल्यास मान्य असल्याबद्दल डॉक्टर साहेबांनीं त्या वेळीं एक दोन ठिकाणीं उद्गारही काढले होते. पण आज सरकारचा मोर्चा फिरल्याबरोबर डॉक्टर साहेबांचाही मोर्चा फिरला आहे. त्यांतूनही विशेष दुःखाची गोष्ट हीच कीं, सरकारानें या वेळीं डॉक्टर साहेबां-

सारख्या शाब्दयाचा फायदा घेऊन मुत्सद्यांचा पराभव करण्याकरितां शस्त्राऐवजीं त्यांचा उपयोग केला आहे.''

युरोपियन नोकरांपेक्षां हिंदु नोकरांच्या संख्येचेंच प्रमाण शेंकडां अधिक वाढलें आहे, यावरून वाढलेल्या नोकऱ्यांचे मालक हिंदु लोकच आहेत, असा सरकारानें नोकऱ्यासंबंधानें एक ठराव काढून कोटिक्रम केला होता. त्यावर टिळक यांनीं उलट कोटिक्रम करून सरकारचीं बोटें सरकारच्याच डोळ्यांत येणेंप्रमाणें घातलीं आहेत:—

" शेंकडां अमुक जागा सरकार नेटिवांस देतें या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. घरांत यजमानापेक्षां नोकरच जास्त असतात; पण तेवढ्यावरून ह्मणजे घरांतल्या एकंदर माणसांच्या मानानें पाहिलें तर शेकडां नोकरांचेंच प्रमाण जास्त आहे अशी कोटी करून हें सर्व घर नोकरांचेंच आहे; यजमान काय दररोज पावशेर भात खाऊन राहतो, असे जर कोणी प्रतिपादन करूं लागला तर त्याचा कोटिक्रम जितका हास्यास्पद होईल तितकाच हिंदुस्थान सरकारच्या ठरावांतील कोटिक्रम हास्यास्पद, भ्रामक, आणि चुकीचा झालेला आहे. "

## शब्दांच्या खुबीदार व्याख्या.

डॉ. जॉन्सनप्रमाणेंच* यांनीं कांहीं शब्दांच्या खुबीदार व्याख्या कोठें कोठें केलेल्या आहेत. त्यांचींही दोन तीन उदाहरणें येथें देतों.

दिल्ली-दरबारचे वेळीं एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या स्थितीचें चित्र रेखाटतांना 'मोठया संस्थानिका'ची व्याख्या येणेंप्रमाणें केली आहे:—

"आज मोठा संस्थानिक ह्मटला ह्मणजे इंग्रज सरकरास संस्थानें खालसा करावयाचीं नाहींत ह्मणून त्यांच्या खुषीनें, परवानगीनें, व सल्ल्यानें कांहीं विवक्षित मुलखावर राजकीय सत्तेचे कांहीं अधिकार चालविणारा, आणि इंग्रज सरकारानें नेमलेल्या शिक्ष-

---

* 'निबंधमाला'कारांनीं डॉक्टर जॉन्सनचें चरित्र लिहितांना त्याच्या डिक्शनरींतील Pension (पेन्शन) व Pensioner (पेन्शनर) या दोन शब्दांच्या व्याख्या येणेंप्रमाणें दिल्या आहेत:—

*Pension*:—Pay given to a state hireling for treason to his country, ह्मणजे फितूर राहून देश बुडविण्याकरितां सरकारच्या बंद्या गुलामास जो पगार देतात तो.

*Pensioner*:—A slave of state hired by a stipend to obey his master, ह्मणजे तोंडावर तुकडा टाकून सरकारानें वश करून घेतलेला बंदा नोकर.

—निबंधमाला, पान ७५३; टीप पाहा.

काचे हातीं तयार झालेला एक जुन्या राजकुलांतील औरस अगर दत्तक राजपुरुष होय, असें ह्मणण्यास हरकत नाहीं."

ता. १०।१२।१९०१ च्या केसरींत 'राष्ट्र' या शब्दाची व्याख्या त्यांनीं अशी केली आहे:—

"राष्ट्र ह्मणजे समुद्र आणि नद्या यांनीं मर्यादित पृथ्वीचा भाग अशी जर कोणी व्याख्या करीत असेल तर ती चुकीची आहे. पृथ्वीच्या कांहीं मैल चौरस तुकड्यास राष्ट्र ह्मणावयाचें तर साहरा वाळवंटासही राष्ट्र ह्मटलें पाहिजे; किंवा उत्तरध्रुवाजवळील बर्फाच्छादित प्रदेशासही राष्ट्र ह्मणतां येईल. परंतु राष्ट्र शब्दाचा तसा अर्थ नाहीं, व त्याचप्रमाणें नुसता लोक-समुदाय ह्मणजेही राष्ट्र नव्हे हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. ज्या लोकसमुदायांत एक प्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाहीं, ज्याचे घटकावयव सामान्य बंधनांनीं एकत्र बांधलेले नाहींत, अथवा ज्यांच्या अंगांत इतर समुदायाहून भिन्न अशा प्रकारचें वैशिष्टय वास करीत नाहीं ते लोक किंवा त्यांचा समुदाय कधींही राष्ट्र या संज्ञेस पात्र होत नाहीं."

युनिव्हर्सिटी–बिलावर टीका करतांना 'सरकार' या शब्दाची व्याख्या येणेंप्रमाणें केली आहे:—

"या इंग्रजी राज्यांत सरकार ह्मणजे राज्यसत्ता विशिष्ट एक प्राणी नाहीं; अर्थात् त्यास शरीर नाहीं आणि आत्माही नाहीं, असें पुष्कळांचे ह्मणणें आहे! अशा प्रकारच्या सरकारचा अमुक एक कृत्य करण्यांत काय हेतु आहे हें पाहणें असेल तर त्याचें अनुमान सदर सरकारच्या कृतीवरूनच केलें पाहिजे, अंतःकरणावरून करतां येत नाहीं; कारण, सरकारास अंतःकरणच नाहीं!"

## थोडक्यांत पण चटकदार लिहिण्याची तऱ्हा.

कोणताही विषय थोडक्यांत व चटकदार भाषेनें लिहिणें ही एक कला आहे; व ती टिळक यांच्या अंगीं पूर्णपणें बाणली असून दर अंकांत तिची थोडी तरी झांक दिसून आल्यावांचून राहत नाहीं. विषय जास्त होऊन पत्राची बहुतेक जागा आडली असावी आणि एकादा नवीन विषय उपस्थित होऊन त्याला स्थळ देणें इष्ट असावें, अशा वेळीं यांच्या या कलेची बारिकसारिक अंगेंही दिसून येतात. नमुन्याकरितां अशा लेखाचें एक उदाहरण येथें देतों.

सन १९०४ सालीं वकीलीच्या परीक्षेंत अगदींच थोडे उमेदवार पास झालेले पाहून त्यांनीं पुढील स्फुट लेख लिहिला आहे:—

" गरीब बिचाऱ्या वकीलीच्या परीक्षेच्या उमेदवारांची नोटीस न देतां कत्तल करण्यांत परीक्षकांस किंवा हायकोर्टास काय आनंद होत असेल कोण जाणे ! साडेतीनशेंतील आठ पास ह्मणजे शेंकडा सुमारें २॥ असें प्रमाण पडतें. अर्थात् बाकी राहिलेले साडेसत्याण्णव अजागळ, मूर्ख किंवा खुशालचेंडू असे परीक्षकांचें मत आहे असें दिसतें. परंतु हाच प्रसंग जर परीक्षकांवर येऊन ठेपला तर शेंकडा २॥ च्या ऐवजी शेंकडा त्यांतले १। तरी शहाणे ठरतील कीं नाहीं याचा आह्मांस वानवा आहे. परीक्षा कठिण घ्या किंवा सोपी घ्या; कांहीं झालें तरी त्याची यत्ता आधीं नियमित ठरली पाहिजे. आज एक तऱ्हेचा प्रश्नाचा कागद निघतो तर पुढील सालीं त्याहून भलताच, अथवा आज कागद तपासण्याची एक पद्धत तर पुढील सालीं त्याहून सौम्य किंवा कडक. हा भेद सामान्य लोक शहाणपणाचा दर्शक न समजतां तऱ्हेवाईकपणाचा व आचरटपणाचा समजतात. अशा तऱ्हेच्या परीक्षांत पास होणें ह्मणजे रूसो-जपानी युद्धांतील पोर्टआर्थरच्या हल्ल्यांतून जिवंत परत येण्यापेक्षांही अधिक कठिण आहे; आणि अशा तऱ्हेचा न्याय हायकोर्टाच्या देखरेखीखालीं होणाऱ्या परीक्षेंत मिळावा हें मोठेंच आश्चर्य होय. मॅकॉलेनें एका ग्रंथाबद्दल एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, त्या ग्रंथाचें नांव ह्मणजे इतर ग्रंथाची प्रस्तावना; आणि त्या ग्रंथाची प्रस्तावना ह्मणजे इतर समग्र ग्रंथ होऊं शकेल. हाच न्याय यंदाच्या सालच्या परीक्षेच्या प्रश्नांस लावला असतां प्रत्येक विषयावरील एक लहानसें पुस्तकच होतें असें दिसून येईल. हा कागद वाचण्यासच आधीं अर्धा तास लागणार, मग उत्तर देण्यास किती वेळ लागेल हे सांगावयास नकोच ! उमेदवारांचा अशा रीतीनें छल करण्यापेक्षां वकीलीच्या परीक्षेस बसणें ही एक शिक्षाच ठरवून कोणी कांहीं गुन्हा केल्यास त्यास त्याबद्दल पीनलकोडांत ही शिक्षा सांगण्याचें नमूद केल्यास फार चांगलें होईल ! "

## भाषांतराची हातोटी.

इंग्रजीचें मराठींत भाषांतर करण्याचीही यांची हातोटी चांगली आहे. भाषांतर करतांना शब्दास शब्द न ठेवतां विवक्षित अर्थ जोरदार भाषेनें कसा व्यक्त करतां येईल याकडे त्यांचें मुख्य लक्ष असतें. अशा प्रकारच्या भाषांतराचा एक मासला, लॉर्ड कर्झन यांनीं १९०५ सालीं कलकत्ता युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांस सत्यानें व नीतीनें वागण्याचा उपदेश केला असतां ' खोटे कोण ? ' या अग्रलेखांत ' प्रॉब्लेम्स ऑफ धि फार ईस्ट ' या पुस्तकांतील त्यांचेच उद्गार देऊन त्यांचीं बोटें त्यांच्या डोळ्यांत घालतांना, जो सहजी आला आहे तो येथें देतों.

लॉर्ड कर्झन यांचे खालील उद्गार प्रथमतः 'अमृतबझार पत्रिका'-कारांनीं आपल्या पत्रांत देऊन त्यावर त्यांनीं अशी टीका केलेली आहे:—

FROM "PROBLEMS OF THE FAR EAST" BY GEORGE N. CURZON, PP. 155 AND 156.

"Before proceeding to the royal audience, I enjoyed an interview with the President of the Korean Foreign Office. . . . I remember some of his questions and answers. Having been particularly warned not to admit to him that I was only thirty-three years old, an age to which no respect attaches in Korea, when he put to me the straight question (invariably the first in an Oriental dialogue), 'How old are you?' I unhesitatingly responded 'Forty.' 'Dear me.' he said, 'You look very young for that. How do you account for it?' 'By the fact,' I replied, 'that I have been travelling for a month in the superb climate of His Majesty's dominions'. —Finally. 'He said to me 'I presume you are a near relative of Her Majesty the Queen of England.' 'No,' I replied, 'I am not.' But, observing the look of disgust that passed over his countenance, I was fain to add, 'I am, however, as yet an unmarried man,' with which unscrupulous suggestion I completely regained the old gentleman's favour."

It must be added that this latter passage, containing the interview of Lord Curzon with the President of the Korean Foreign Office, has been discreetly omitted from the last edition of "Problems of the Far East."

टिळक यांनीं त्याचें भाषांतर येणेंप्रमाणें केलें आहे:—

"अगदीं क्षुल्लक कामाकरितां देखील बिनदिक्कत खोटें बोलण्याची लार्ड कर्झन यांस संवय लागलेली आहे असें त्यांनी आपल्या एशियाखंडांतील प्रवाससंबंधाचें जे बुक लिहिले आहे, त्यांतील एका गोष्टीवरून दिसून येतें. या प्रसंगाचा त्यांच्या ग्रंथांतील उतारा आमचे बंधु 'अमृतबझारपत्रिका'कार यांनीं आपल्या पत्रांत दिला आहे. हिंदुस्थानांत व्हाइसरॉय होण्यापूर्वी लॉर्ड कर्झन हे एशियाखंडांतून प्रवास करून गेले. या प्रवासांत कोरिया द्वीपकल्पाच्या राज्यांतील फॉरिन ऑफिसचे प्रेसिडेंट यांस भेटण्याकरितां लॉर्ड ( त्या वेळीं नुसते मिस्टर ) कर्झन यांची स्वारी गेली होती. भेटीस जाण्यापूर्वी मि. कर्झन यांस असें समजलें होतें कीं, कोरिया देशांत तरुण मनुष्यास फारसा मान देत नाहींत; तेव्हां भेटीच्या वेळीं कर्झनसाहेबांनीं कोरियाच्या प्रधानास जीं उत्तरें दिलीं तीं खालीं लिहिल्याप्रमाणें:—

**कोरियाचे प्रधानः**-तुमचें वय काय ?

**कर्झनः**-( बिनदिक्कत ) चाळीस.

**को. प्रधानः**-वयाच्या मानानें आपण फारच तरुण दिसतां, यांचें कारण काय असावें ?

**कर्झन**:-कारण मी आपल्या राज्याच्या सुंदर हवेच्या मुलखांत आज महिनाभर प्रवास करीत आहें.

लॉर्ड कर्झन यांचें वय यावेळीं फक्त ३३ वर्षांचें होतें. असें असून केवळ कोरियाच्या प्रधानास खुष करण्याकरितां व त्यांचें आपल्याबद्दल चांगलें मत व्हावें ह्मणून आपलें वय ४० वर्षांचें आहे असें त्यांनीं सांगितलें, आणि तेंही बिनदिक्कत (unhesitatingly) सांगितलें असें मोठ्या फुषारकीनें त्यांनी आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे! बरें, हें जें चाळीस वर्षांच्या वयांत दिसणारें अपूर्व तारुण्य याचें कारण काय? असा जेव्हां कोरियाच्या प्रधानानें प्रश्न केला तेव्हां लॉर्ड कर्झन यांनीं मोठ्या शिताफीनें कोरियाच्या राज्याच्या सुंदर हवेची स्तुति करून वेळ मारून नेली आहे. परंतु एवढ्यानेंच संपलें असें नाहीं. कोरियाच्या धानानें पुढें आणखी असें विचारलें कीं:—

**को॰ प्रधानः**—आपण इंग्लंडच्या राणीसाहेबांचे जवळचे आप्त आहां?

**कर्झनः**—नाहीं. (हें उत्तर कोरियाच्या प्रधानास आवडलें नाहीं असें पाहून) परंतु माझें लग्न अद्याप व्हावयाचें आहे.

लॉर्ड कर्झन साहेबांचे हे उत्तर त्यांसच लबाडीचें वाटलें, (unscrupulous) असें त्यांनीं आपल्या ग्रंथांतच ह्मटलें आहे. परंतु अशा लबाडीच्या उत्तरानें कोरियाच्या वृद्ध प्रधानाची मर्जी संपादन केली असें लिहिलें आहे. मि. कर्झन हे हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन झाल्यानंतर काढलेल्या नव्या आवृत्तींत हें संभाषण गाळलें आहे, ही छपवाछपवीही लक्षांत ठेवण्यासारखी आहे."

## यांच्या लेखांची भाषा.

"यांच्या लेखांत काय विशेष आहे?" याविषयीं आतांपर्यंत जें विवेचन केलें आहे त्यावरून यांच्या लेखांच्या भाषेसंबंधानें बऱ्याच गोष्टी वाचकांस कळून येतील. तथापि, त्यासंबंधानें आणखी कांहीं गोष्टी स्वतंत्र रीतीनें सांगणें इष्ट वाटतें ह्मणून त्या येथें देतों. या ठिकाणीं मुख्य गोष्ट ही लक्षांत ठेविली पाहिजे कीं, टिळक यांची भाषा ह्मणजे केसरीची भाषा असा अर्थ घेणें बरोबर नाहीं. कारण, कोणतेंही वर्तमानपत्र जरी एकाच्याच नांवानें निघतें व त्यांतील लेखांबद्दल एकच मनुष्य जरी जबाबदार असतो तरी नियतकालीं प्रसिद्ध होणें हा पत्राचा धर्म पडल्यामुळें एकाद्या ग्रंथाप्रमाणें त्यांतील सर्व लेख एकाच्याच हातून लिहिले जातात असें नाहीं. पत्राचा संपादक असतो तो सदासर्वकाळ ठिकाणावर असतोच किंवा ठिकाणावर असला तरी सदोदित तोच सर्व लेख लिहितो, असें

ह्मणतां यावयाचें नाहीं. तसेंच ग्रंथाप्रमाणें वर्तमानपत्रांत ज्याच्या हातून लेख लिहिला जातो तो स्वतःच आपण लिहिलेला लेख तपासून दुरुस्त करून देतों असें नाहीं. तर पुष्कळ वेळां जरुरीमुळें किंवा अडचणीमुळें एकानें लिहिलेला लेख दुसऱ्यास दुरुस्त करावा लागतो. अर्थात् वाक्यरचना किंवा भाषापद्धतीसंबंधानें लेखांत पुष्कळ फिरवाफिरव होते. खुद्द टिळक यांनीं लिहिलेल्या लेखांत दुसऱ्यांनीं केलेली फिरवाफिरव फारच थोडी आहे, किंबहुना नाहींच असें ह्मटलें तरी चालेल; व ह्मणून केसरींतील लेखांच्या भाषेचा विचार न करतां टिळक यांच्या भाषेचा—अर्थात् त्यांच्याच लेखांच्या भाषेचा—मी विचार करणार आहे, असें जें वर ह्मटलें आहे तें एवढ्याचकरितां होय.

आतां टिळक यांच्या भाषेचा विचार करावयाचा ह्मणजे व्याकरण-शास्त्रांतील किंवा भाषाशास्त्रांतील बारिकसारिक नियमांच्याही कसोटीस ती कितपत उतरते हा विचार न करतां सामान्यपणें त्यांच्या भाषेचें स्वरूप काय, व मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें तिनें कोणतें कार्य केलें आहे, एवढेंच आपणास पाहावयाचें आहे. टिळकांनीं केसरींत जे लेख लिहिले आहेत तें तोंडानें सांगून लिहिले आहेत. अर्थात् मनुष्याच्या मनांत उठलेले विचार तो नेहमीं दुसऱ्यापाशीं ज्या भाषेनें व्यक्त करतो तीच भाषा नेहमीं वापरीत. यामुळें त्यांत कृत्रिमपणा, ओढाताण किंवा अवजडपणा न येतां विचारांचें जसें शुद्ध स्वरूप असतें व ते विचारही जसे एकापाठीमागून एक सुचत जातात तसेंच यांची भाषा अथवा भाषण* ह्मटलें तरी चालेल शुद्ध स्वरूपानें बाहेर पडली आहे. भाषेच्या या स्वरूपावरून प्रख्यात तत्ववेत्ते स्पेन्सर साहेब यांच्या भाषे-संबंधानें त्यांच्या एका चरित्रकारानें जे उद्गार काढले आहेत त्याची येथें आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. तो ह्मणतोः—" त्यांचें प्रतिभारूप दर्पण जर स्वच्छ व साफ आहे, तर त्याच्यावर कोणत्याही विचाराचें प्रतिबिंब तरी पुसट किंवा वांकडे कसे पडणार ? किंवा भाषारूप लेखणीच्या

* " माझे लेख मी स्वतः न लिहितां दुसऱ्यास लिहावयास सांगतों याचें कारण सध्यां आपण बोलतों त्या भाषेंत ते यावेत ह्मणूनच सांगतों, " असें संभाषणप्रसंगीं त्यांनीं एकदां ह्मटलें होतें, यावरून त्यांच्या लेखांस त्यांचें भाषण ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं हें कोणासही कळून येईल.

द्वारां त्यांनीं रेखाटलेलें जें त्या विचाराचें मूर्त चित्र त्यांत तरी किंचित्‌ही दोषास अवकाश कसा सांपडणार ? "* असो; यांची भाषा साधी असून त्यांत विवक्षित अर्थ केवळ सरळ रीतीनें व्यक्त केलेला असल्यामुळें साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें ती प्रसादयुक्त असून निबंधमालाकारांनीं चांगल्या भाषापद्धतीचें वर्णन करतांना एके ठिकाणीं ह्मटल्याप्रमाणें ती ‘ रसिक वाचकांस पसंत होऊन कितीही काळ लोटला तरी तिच्या रमणीयत्वाची हानी होणार नाहीं. ’

साधेपणा व सरळपणा याबरोबरच टिळकांच्या भाषेंत सुबोधपणाही असतो. ह्मणजे विषय कितीही कठिण किंवा गहन असो, तो सामान्य वाचकाच्या आटोक्यांत आणून सोडतां येईल अशा रीतीची भाषा हे वापरीत. खेड्यापाड्यांतील लोकांतही वाचनाची अभिरुचि उत्पन्न होऊन गेल्या पंचवीस वर्षांत राजकीय, सामाजिक व धार्मिक विचारांत आमच्या समाजाची बरीच प्रगति करण्यास यांच्या लेखांतील हा भाषेचा सुबोधपणाच कारणीभूत झाला आहे, हें कोणासही कळून येईल. हे आपल्या लेखांत सहसा इंग्रजी शब्द घालीत नसत. तथापि, इंग्रजी शब्द घालावयाचेच नाहींत असा कांहीं यांचा बाणा नसे. तसेंच इंग्रजी शब्दांबद्दल मराठींत संस्कृतभाषेच्या आधारें नवे नवे शब्द बनविण्याकडेही यांची प्र ‍ ्ति नसून जे शब्द हल्लीं मराठींत प्रचारांत आले आहेत किंवा येत चा ले आहेत ते जसेच्या तसेच हे ठेऊन देत. उदारणार्थ—कॉंग्रेस, कान्फरन्स, इलेक्शन, ट्रस्टी, प्लँटर, प्लॅन, हॉल, पोर्टट्रस्ट, चेंबर—ऑफ्—कॉमर्स, युनिव्हर्सिटी, सेनेट, एडिटर, इत्यादि. अशा प्रकारच्या शब्दांस केव्हां केव्हां मराठींतीलही प्रतिशब्द घालीत, नाहीं असें नाहीं. पण त्याकरतां लेख सांगतांना थांबत नसत. सांगण्याच्या ओघांत जशा प्रकारचे शब्द येतील तसलेच ते घालीत, हाच यांतील मुख्य मुद्दा आहे. यांच्या लेखांतील अलंकार, विनोद, कोटिक्रम, अवतरणें, हीं कोणत्या प्रकारचीं असतात हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. त्यासंबंधानें येथें विशेष सांगण्याचें कारण नाहीं. तथापि, एवढी गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं, त्यांपैकीं कोणा-

* रा. रा. फडकेकृत ‘ अज्ञेयमीमांसा ’ या पुस्तकांतील स्पेन्सरचें चरित्र. पान ३० पहा.

करितों, मग हजारों खंड्या धान्य व निरनिराळे उपभोगाचे पदार्थ आपल्या उदरांतून जी आह्मांस देते, तिची पूजा करावयास नको काय? अवश्य केली पाहिजे.

याप्रमाणें विराट्पुरुषाच्या पंचभूतात्मक विश्वरूपी देहाच्या निरनिराळ्या अवयवांची पूजा सांगितली. परंतु, परमेश्वराच्या तितक्या व्यापक रूपाची कल्पना देखील ज्यांच्या बुद्धीस आकलन करतां येत नाहीं, अशा लोकांच्या उद्धारासाठीं दयाळू परमेश्वरानें मत्स्य, कूर्म इत्यादि निरनिराळ्या प्राण्यांचीं साकार रूपें धारण केलीं. तेवढ्यानेंही तृप्त न होतां, कदाचित् तशा विजातीय रूपांचे ठायीं मनुष्याचें प्रेम चांगलें बसणार नाहीं असें समजून परमात्मा मनुष्यदेहधारी बनला व रामकृष्ण इत्यादि रूपांनीं अवतीर्ण होऊन तो आह्मांस सन्मार्ग दाखविता झाला. हा त्याचा आह्मांवर मोठा उपकार आहे. अवतारकृत्य आटोपल्यावर त्या त्या विभूति निजधामास गेल्या. तेव्हां त्यांचा ठसा चिरकाल मनांत राहावा ह्मणून त्यांच्या पाषाणादिमय अथवा धातुमय मूर्ति बनवून तद्द्वारा त्यांची उपासना करण्याचा मार्ग शास्त्रकारांनीं आह्मांस लावून दिला दिला आहे. त्या मूर्तींचे ठायीं चित्त एकाग्र व्हावें ह्मणून त्राहाटकादि* प्रयोगही सांगितले आहेत. व त्याप्रमाणें त्यांचे ठायीं ध्यानयोग होतां होतां शेवटीं रामकृष्णादि ईश्वरविभूतींचा फोटो (चित्र) आमच्या अंतःकरणावर बराबर उठून भृंगकीटकन्यायानें आपण खऱ्या परमात्मस्वरूपाला जाऊन मिळावें, अशी योजना त्यांत केलेली आहे. फोटो उत्तम निघण्यास क्यामेरा वगैरे सामान उत्तम असावें लागतें. ह्मणून आपला भक्तिरूप क्यामेरा जशा प्रकारचा असेल, तसा परमात्ममूर्तीचा फोटो आपल्या अंतःकरणरूप कांचेवर उठणार आहे. चित्तवृत्तीपुढें जो कोणताही पदार्थ येतो, तदाकार ती बनते, असा मार्गे सिद्धांत सांगितला आहे. तो लक्ष्यांत घेतला असतां वरील सर्व गोष्टींचें बीज आपल्यास सहज कळून येईल. त्या सिद्धांताचें विवेचन करितांना मी असेंही सांगितलें होतें कीं, वृत्ति

---

* अंतःकरण स्वस्थ व दृष्टि निश्चल ठेवून एकाद्या सूक्ष्म पदार्थाकडे, डोळ्यांना पाणी येईपर्यंत, एकसारखें पहात राहाणें, याला त्राहाटक ह्मणतात.

ह. यो. प्रदीपिका.

कोणत्याही विषयाचे ठायीं जेव्हां अतिशय स्थिर होते, तेव्हां ती पूर्ण तदाकार बनते. अर्थात् वृत्ति स्थिर होण्यास समोरचा पदार्थही जितका स्थिर असेल तितका चांगला, हे उघड आहे व आपण फोटोग्राफींतही नेहमीं पाहतों कीं, ज्याचा फोटो घ्यावयाचा तो पदार्थ फोकसमध्यें (केंद्रांत–मध्यबिंदूंत) येऊन कांहीं वेळ स्थिर असावा लागतो. यावरून शास्त्रकारांनीं सांगितलेल्या पाषाणादिमय मूर्ति, वृत्ति तन्मय करण्यास किती उपयोगी आहेत, याचीही कल्पना आपल्यास सहज करितां येईल.

प्रतिमापूजा हा ईश्वरप्राप्तीचा ॐनामा अथवा पहिला सोपा धडा आहे. तो शिकतांना शास्त्रकारांनीं ज्या प्रकारच्या प्रतिमा उपासनेला युक्त असल्याचें सांगितलें आहे, त्याच ग्राह्य मानून आपण शुद्ध रीतीनें उपासना केली पाहिजे, त्याविषयीं आपला तर्कवितर्क चालविण्याचें प्रयोजन नाहीं. लहान मुलास अ, आ इत्यादि अक्षरें गुरु शिकवूं लागला असता तो जर ह्मणेल कीं मी यास 'अ' ह्मणत नाहीं किंवा हा 'अ' मला आवडत नाहीं, तर हें त्याचें ह्मणणें जसें निरुपयोगी आहे, तसेंच शास्त्रकारांनीं मान्य केलेल्या शिव-विष्णु इत्यादिकांच्या ज्या शालिग्राम, बाण इत्यादि प्रतिमा, त्या आह्मांस मान्य नाहींत असें जे ह्मणतात, त्यांचेंही ह्मणणें निरुपयोगी जाणावें. पुस्तक वाचतां यावें अशी ज्याची इच्छा असेल त्याला जशीं शिक्षकानें घालून दिलेलींच अक्षरें मान्य केलीं पाहिजेत, त्याच प्रमाणें परमेश्वरप्राप्तीची इच्छा असल्यास आह्मालाही शास्त्रकारांनीं सांगितलेल्याच प्रतिमा मान्य केल्या पाहिजेत.

नवीन शिकणाराला आरंभींच शास्त्राचें मर्म कळणें शक्य नाहीं ह्मणून कांहीं काळपर्यंत गुरूनें सांगितलेल्याच गोष्टी गृहीत मानून त्यास चाललें पाहिजे. उदाहरणार्थ पहा कीं, भूमिति शिकतांना गुरु मुखानें 'A point is that which has position, but no magnitude' ह्मणजे 'ज्याला स्थिति मात्र असते, परंतु परिमाण नसतें तो बिंदु होय.' अशी बिंदूची व्याख्या सांगतो व फळ्यावर एक मोठा बिंदु काढून दाखवितो व पुढें 'A line is length without breadth' ह्मणजे 'जीस लांबी मात्र असते, परंतु रुंदी मुळींच नसते, ती रेषा होय' अशी रेषेची व्याख्या सांगून खडूची भली जाडी रेषा काढून दाखवितो; त्या वेळीं

विद्यार्थ्यानें जर गुरूला विचारिलें कीं, मास्तरसाहेब, आपण ह्मणतां कीं 'बिंदूला परिमाण नसतें' आणि आपण फळ्यावर काढिलेला बिंदु तर चांगला हरभऱ्याएवढा दिसतो, हें कसें? तसेंच, आपण ह्मणतां, 'रेषेला रुंदी नसते' आणि आपण काढिलेली रेषा ही चांगली पट्टीसारखी रुंद दिसत आहे, हें कसें? तर हे त्याचे प्रश्न चुकीचे नाहींत. परंतु गुरूनें त्या वेळीं पुष्कळ माथाफोड करून जरी या प्रश्नांचा जबाब देण्याचा यत्न केला, तथापि त्याचें समाधान होणार नाहीं व त्या शास्त्रांत त्याची बरीच गति झाल्याखेरीज त्याचें वास्तविक स्वरूपही त्यास कळणार नाहीं. तें कळेपर्यंत त्याला गुरूनें सांगितलेल्याच गोष्टी केवळ विश्वासानें मानिल्या पाहिजेत. त्याच न्यायानें आमच्या प्राचीन आचार्यांनीं 'प्रतिमापूजन' इत्यादिकांच्या संबंधानें ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्याच आपल्यास प्रथम मान्य केल्या पाहिजेत.* ह्मणून ब्रह्मविद्या शिकण्याचा आरंभ करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं मी ह्मणतों कीं, In religious Geometry, let it be granted that Shâligram is a given point and Shivalinga a perpendicular line ह्मणजे धर्मविषयकभूमितींत, **शालिग्राम** हा एक दिलेला बिंदु आहे, व **शिवलिंग** ही दिलेली उभी रेषा आहे, असें गृहीत धरून पुढें चाला.

हा शास्त्रदृष्टया विचार झाला. आतां प्रतिमापूजनाचें रहस्य काय आहे त्याचें दिग्दर्शन व्हावें, या साठीं एक व्यावहारिक दृष्टांत सांगतों. परवां काठेवाडांत राजकोटास नामदार लाटसाहेबांची स्वारी आली होती तेव्हां त्यांच्या स्वागतासाठीं राजेलोकांचा मोठा दरबार व्हावयाचा होता. त्या दरबारांत कांहीं चूक होऊं नये ह्मणून सर्वांनीं आदले दिवशीं तालीम केली होती. तींत सर्व राजे आपापल्या स्थानीं विराजमान झाले असून नामदारसाहेबांच्या जागीं नुसती खुर्ची मांडून ठेविली होती; त्या खुर्चीजवळ जाऊन प्रत्येकानें लवून मुजरा करावा आणि नंतर आपल्या स्थानीं परत जाऊन बसावें. या प्रमाणें सर्व मानपान पूर्वदिवशीं जरी खुर्चीला मिळाला

---

* अव्युत्पन्नमना यावद्भवानज्ञाततत्पदः ॥ गुरुशास्त्रप्रमाणैस्तु निर्णीतं तावदाचर ॥

योगवासिष्ठ.

होता, तथापि तो केवळ खुर्चीला नसून नामदारसाहेबांच्या प्रतिनिधित्वानें तिला मिळाला होता हें उघड आहे. त्या प्रमाणेंच आपण एकाद्या देवतेची प्रतिमा मांडून तिचे ठायीं गंध, फूल, धूप, दीप, नैवेद्य इत्यादि जे उपचार समर्पण करितों, ते केवळ त्या धातुमय प्रतिमेला नसून त्या त्या देवतेस उद्देशून असतात, हें निर्विवाद आहे. कांहीं ठिकाणीं मूर्तीला निरनिराळे भोग व शृंगार करण्यांत येतात व तिजपुढें नृत्यगायन इत्यादिकहीं चालतें. हा प्रकार अतिशय निंद्य होय असें कित्येक ह्मणतात, परंतु त्यांत नृत्यगायनादि विषय मुख्य नसून त्याच्या द्वारा लोकांस भक्तिमार्गाकडे वळविण्याचाच उद्देश असतो. बुद्धिपूर्वक देवदर्शनाला जाणारे फार थोडे; परंतु तेथें लखनौरच्या उत्तम कलावंतिणीचें गाणें आहे, असें समजलें, ह्मणजे हजारों लोक जातात आणि ती मोहिनी राग गाऊं लागली ह्मणजे त्यांत अगदीं गर्क होतात. परंतु पुढें श्रीकृष्णाची मोहिनी मूर्ति नजरेस पडून जर सुदैवानें ती मनांत भरली, तर त्याची पापवासना नष्ट होऊन तो सन्मार्गाकडे वळतो. इतकें न झालें तरी निदान श्रीहरीचें नामस्मरण, भजन, कीर्तन इत्यादिकांचा कांहीं वेळ तरी योग घडतो, हासुद्धां कांहीं थोडा लाभ नाहीं. सोमल स्वतः विष आहे हें खरें, परंतु इतर औषधांशीं मिश्र करून त्याचा युक्तीनें उपयोग केल्यास तो अमृतरूप होऊन मोठाले रोग दूर करण्यास समर्थ होतो. तसेंच वरील विषय विषरूप असले तरी हरिकीर्तनरूपी अमोलिक औषधांशीं संयुक्त करून घेतानें त्यांचें सेवन केल्यास त्यापासून भवरोगाचें शमन होण्यास पुष्कळ मदत मिळते. जो प्रेमानें ईश्वरचिंतन करितो तो तर मुक्त होतोच, व त्यांत आश्चर्यही नाहीं; परंतु काम, क्रोध, लोभ, किंबहुना प्रत्यक्ष द्वेष, यांपैकीं कोणत्याही वृत्तीनें जो कोणी ईश्वरचिन्तन करितो, तोही सद्गतीला पावतो. याविषयीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील; तशीच प्रतिमापूजनाचे समर्थनासाठीं जीं प्रमाणें वर दाखविलीं आहेत त्यांखेरीज आणखीही पुष्कळ प्रमाणें दाखविण्यांत येतील, परंतु अवकाश नाहीं. यास्तव केवळ पाषाणादिमूर्तींचें ठायीं भावना दृढ झाल्यानें परमेश्वराची प्राप्ति कशी होते, या विषयीं एक लहानसा चुटका सांगून आजचा विषय पुरा करितों.

काश्मीर देशीं वसुमती नांवाची एक सुशील स्त्री रहात होती व तिला गोविंद या नांवाचा एक मुलगा होता. तो ५—६ वर्षांचा असतांना, एके दिवशीं ती शेजारच्या मुरलीधराच्या मंदिरांत कथाश्रवणास गेली होती; तेथें तिला प्रसाद मिळाला तो घरीं आल्यावर तिनें गोविंदाला दिला. त्यानें विचारिलें हा कोठून आणिला ? ती ह्मणाली, मुरलीधराच्या मंदिरांतून. तेव्हां पुन्हां त्यानें प्रश्न केला कीं, मुरलीधर कोण ? तो कसा आहे ? तो मला भेटेल काय ? ती ह्मणाली, तो प्रत्यक्ष परमेश्वर होय. त्याचें ऐश्वर्य व पराक्रम फार मोठा आहे,तथापि तो फार दयाळू असल्यामुळें जो कोणी त्याला प्रेमानें हांक मारितो, त्याला तो अवश्य भेट देतो. तूं प्रयत्न करशील तर तुलाही तो भेटेल. त्यावरून तो बालक सांजसकाळ आरतीच्या वेळीं मुरलीधराच्या मंदिरांत जाऊं लागला. आरती चालली असतां देवाची सुंदर मूर्ति पाहून त्यास मोठा हर्ष होई व तोंडानें ‘ मुरलीधरा, ये ये, मला भेट ’ असें ह्मणून त्याला घेण्यास पुढें हात करी. असा सुमारें वर्षभर क्रम चालला. इतके दिवस झाले तरी मुरलीधर प्रभु आपल्यास भेटत नाहीं व आपल्याशीं बोलतही नाहीं, असें पाहून तो मातुश्रीस ह्मणाला, देव मला अजून कां भेटत नाहीं ? त्यावर ती ह्मणाली, बाळा, देव असा एकदम भेटत नाहीं; आणखी कांहीं दिवस असाच प्रयत्न करशील तर तो भेटेल. गोविंदाचें अकृत्रिम प्रेम प्रभूच्या ठिकाणीं जडलें व प्रत्यहीं पुण्यसंचय वाढत चालला. तो आपली तहानभूक विसरला आणि मुरलीधराच्या भेटीचें त्याला इतकें वेड लागलें कीं एके दिवशीं तो त्याच्या भेटीविषयीं अत्यंत उत्कंठित होऊन कांहीं वेळ त्याच्यासमोर स्तब्ध उभा राहिला आणि शेवटीं प्रार्थना करून ह्मणाला कीं हे मुरलीधरा, भेटीसाठीं मी इतके दिवस तुझी आर्जवें करीत आहे, तूं भेटत नाहींस; आतां आज जर तूं भेट न देशील तर मी येथें आपला प्राण देईन. मुरलीधरानेंही त्या बालभक्ताची अशी दृढभक्ति पाहून, मनांत दया येऊन त्यास दर्शन दिलें ! आणि सुकुमार अष्टवर्षात्मक सुंदर बालरूप धारण करून गोविंदाच्या गळ्यांत मिठी घातली. तेव्हां त्याच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. पुढें त्याचें कौतुक पुरविण्यासाठीं मुरलीधर देवळाबाहेर येऊन त्याजबरोबर इटीदांडू खेळूं लागला व खेळतां

खेळतां हरून गोविंदाचे पांच डाव त्याजवर लागले. ते हातावर देण्यासाठीं गोविंदानें त्याला सांगितलें कीं, हात पुढें कर. त्याप्रमाणें हात पुढें करितांच गोविंदानें तीन दांडू हातावर मारिले व बाकीचे दोन तसेच चढलेले असतां मुरलीधर हात मागें खेंचून तेथून हळूच निसटून जाऊं लागला; तेव्हां गोविंद, ' अरे लबाडा, मार चुकविण्यासाठीं पळून जातोस काय ? माझे डाव हातावर दिल्याखेरीज मी बरा तुला जाऊं देईन ! ' असें ह्मणत, हातांत तो दांडू घेऊन मुरलीधराच्या पाठीस लागत गेला. मुरलीधर स्वतः मंदिरांत धांवत जाऊन पाषाणमय मूर्तींत शिरून अंतर्धान पावले !! व गोविंद मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत वेगानें पाठलाग करीत गेला परंतु तेथील पुजाऱ्यांनीं त्याला पुढें जाण्याचा अटकाव केला. हा प्रेमभरांत असल्यानें तसाच धिट्टाईनें पुढें जाऊं लागला; तेव्हां पुजारी जास्त संतापून त्यांतून एकानें फाडकन त्याच्या तोंडांत मारिली, त्याबरोबर तो मूर्छित झाला. कांहीं वेळानें सावध होऊन माघारा परतला व मनांत " बरें आहे, आज चुकविलेंस ह्मणून काय झालें ? उद्यां कोठ जाणार आहेस ? उद्यां मी अगोदर आपले डाव उगवून घेईन तेव्हांच सोडीन, " असें ह्मणत ह्मणत घरीं निघून आला.

इकडे त्या मूर्तीचा गाल छिन्नभिन्न झालेला दिसला व त्यांतून रक्त वाहूं लागलें व चेहराही रडका दिसूं लागला. तें पाहून पुजारी घाबरले. कारण, असें होणें हें दुश्चिन्ह होय. आपल्या शास्त्रांत सांगितलें आहे कीं प्रतिमा हसूं लागली, रडूं लागली, किंवा कांपूं लागली अथवा तींतून रक्त वाहूं लागलें तर दुनियेंत कांहीं तरी मोठा उत्पात होणार असें खास समजावें. आमच्या इकडे चार वर्षांपूर्वी नेपाळांत श्रीपशुपतीच्या पिंडींतून एकदम रक्तस्राव होऊं लागला होता. व त्यावरून कांहींतरी अरिष्ट उद्भवणार असें पुष्कळांनीं भविष्य केलें होतें. त्याप्रमाणें या देशांत प्लेग वगैरे उत्पन्न होऊन लाखों लोकांचा संहार झाला !! असो. प्रतिमेची स्थिति पाहून पुजारी अतिशय चिंतातुर झाले. त्या रात्रीं मुरलीधरानें स्वप्नांत येऊन त्यांस सांगितलें कीं, तुह्मीं गोविंदाचा मोठा अपराध केला आहे; सबब नैवेद्य, भोग, शृंगार इत्यादि मला समर्पण न करितां ते नेऊन त्याला समर्पण करावे आणि त्याचें समाधान करावें, ह्मणजे मला

संतोष होईल. असा दृष्टांत झाल्यावर दुसरे दिवशीं पुजाऱ्यांनीं नैवेद्याचीं वगैरे सर्व ताटें निमूटपणें गोविंदाचे घरीं नेलीं आणि तीं त्याला अर्पण केलीं ! ! तेव्हां गोविंद ह्मणतो, हूँ समजलों ! मुरलीधर मोठा कावेबाज आहे ! आपला मार चुकविण्याच्या बुद्धीनें आतां कसा लांच देतो आहे ! ! ! सारांश, जशी भावना तशी सिद्धि. 'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्' असें भगवंताचें ब्रीदच आहे. प्रतिमेचे ठायीं दृढ ईश्वरभावना ठेवून जो उपासना करितो, त्याला परमेश्वराची प्राप्ति कशी होते, तें या गोष्टीवरून आपल्यास चांगलें कळून येईल.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

---

## व्याख्यान ९ वें.

### विषय—श्राद्ध.

ईशस्तवन.

ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं
द्वन्द्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूत
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥

याप्रमाणें ईशस्तवन झाल्यावर स्वामिमहाराज ह्मणाले:—

आजरोजीं सनातनधर्मरूपी प्रयागक्षेत्रांत हरिनामरूपी गंगा सभासदांच्या हृदयपटावरील मळ धुवून टाकीत आहे व कर्मकांडरूपी यमुना लोकांस यमाच्या पंज्यांतून सोडवीत आहे आणि ब्रह्मज्ञानरूपी सरस्वती सभासदांच्या अंतःकरणांत गुप्तरूपें निवास करून राहिली आहे, तेव्हां अशा या त्रिवेणीसंगमविशिष्ट पवित्र तीर्थांत स्नान करून आपण मुखानें हरियशाचें भजन करीत रहाल अशी आशा आहे.

अलीकडे युरोप, अमेरिका इत्यादि स्थळीं जशी सांसारिक उन्नति शिखरास जाऊन पोंचली आहे, तशी प्राचीन काळीं भरतखंडांत आध्यात्मिक उन्नति शिखरास जाऊन पोंचली होती. त्या वेळीं निरनिराळ्या मोठमोठ्या ऋषींनीं आपल्या तपोबलानें व योगबलानें दैवी शक्ति प्राप्त करून घेऊन अध्यात्मविद्येसंबंधानें जे अलौकिक शोध केले, त्यांतील तत्त्वांस अनुसरूनच आपली श्राद्धपद्धति चालत आली आहे. तीविषयीं आज विवेचन करण्याचा आमचा विचार आहे.

ज्याप्रमाणें वाळवंटांत रेतीचा कण असावा, त्याप्रमाणें या अफाट विश्वांत हा भूलोक आहे. भूलोकाप्रमाणेंच सूर्यलोक, इंद्रलोक, चंद्रलोक इत्यादि अनंत लोक परमेश्वरानें निर्माण केले आहेत. जे असंख्य तारे आपल्यास आकाशांत दिसतात, तितके ते निरनिराळे लोक अथवा ब्रह्मांडें आहेत, इतकेंच नाहीं, तर, आपल्यास दिसत नाहींत असेही अगणित लोक आहेत. जशी भूलोकावर वस्ती आहे व वनस्पति वगैरे आहेत, तशी इतर लोकांवरही वस्ती असून निरनिराळे अनंत पदार्थ आहेत. जशी पृथ्वी गोलाकार आहे, तसे तेही गोलाकार आहेत. आकाशांत तारे जरी एकसारख्या पृष्ठभागावर असल्याचें आपल्यास दिसतें, तथापि वास्तविक ते तसे नसून त्यांच्यामध्यें उच्चनीचभाव फार आहे. परंतु प्रत्येक लोकाची रचना अशी कांहीं खुबीदार आहे कीं, प्रत्येकाला बाकीचे लोक आपापल्यावर आहेत असें वाटावें. जसे आपण ध्रुवलोक, चंद्रलोक इत्यादिकांकडे बोट दाखवितों, तसेच तेथील लोक आपल्या भूलोकाकडे बोट दाखवीत असतील. फार तर काय, परंतु जसें आकाश, आपण जावें तेथें आपल्या डोक्यावर उंच व चोहींकडे कटाहासारखें व्यापलेलें आपणांस दिसून येतें, तसेंच तें आपल्या खालीं असलेल्या ह्मणजे अमेरिकन् लोकांनाही त्यांच्या डोक्यावर व चोहींकडे व्यापलेलें दिसतें. जसे आपले पाय भूपृष्ठावर टेंकलेले आहेत, तसेच त्यांचेही आहेत. आपणांवर जसें पृथ्वीचें आकर्षण चालू आहे, तसेंच त्यांच्यावरही चालू आहे व हे तमाम लोक अथवा गोल परस्परांच्या आकर्षणशक्तीनें नियन्त्रित आहेत. जसा भूलोकास प्रकाश सूर्यापासून मिळतो, तसाच इतर सर्व लोकांसही प्रकाश सूर्यापासून मिळतो. इतर सर्व लोकांपेक्षां चंद्रलोक हा भूलोकाच्या अतिशय जवळ आहे व

चंद्रलोकाच्या वरच्या बाजूस पितृलोक आहे.* विशेषेंकरून देव, यक्ष, गंधर्व, इत्यादिकांचे लोक उत्तरध्रुवाच्या बाजूस आहेत. व पितृलोक दक्षिणध्रुवाच्या बाजूस आहेत. जशी सूर्य, चंद्र, इंद्र इत्यादि लोकांकडून प्रकाश, अमृतवृष्टि व जलवृष्टि इत्यादिकांची तजवीज होते, तशीच पितृलोकांकडून मृतजीवांच्या संबंधाची हरएक व्यवस्था होत असते. जसे एकाद्या कचेरींत मुख्य कामगार, चिटनीस, बारनिशी कारकून वगैरे इसम असतात, त्याचप्रमाणें पितृलोकच्या कचेरींत वसु, रुद्र, आदित्य, अर्यमा, अग्निष्वात्त इत्यादि मंडळी असून ते श्राद्धद्वारा स्वतः तृप्त होतात आणि श्राद्धकर्त्याकडून मिळालेले अन्नादि पदार्थ मृत जीवास तो असेल तेथें पोंचते करून आचरण केलेल्या श्राद्धानुरूप त्याला अधोगतींतून मुक्त करण्याची तजवीज करितात, व श्राद्ध करणारालाही आयुष्य, प्रजा, धन, विद्या, इत्यादि देऊन सुखी करितात. वसु, रुद्र, आदित्य ह्या तर प्रत्यक्ष श्राद्धदेवताच ह्मणवितात.¶ या सर्व पितरांचे ठायीं देवांप्रमाणेंच दिव्य शक्ति आहे.

कोणी ह्मणतात कीं, प्राणी मेला ह्मणजे गेला, मेल्यावर मग काय आहे? श्राद्ध हें श्रद्धेनें करावयाचें असून तें पिता जिवंत असतांनाच करणें योग्य आहे. या आक्षेपाचा विचार करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. कारण श्राद्धांत तीळ, दर्भ इत्यादि पदार्थ जे सांगितले आहेत, ते जिवंत मनुष्याच्या मुखांत कोंबण्यासाठीं नाहींत, हें लहान मुलासही कळण्यासारखें आहे. व मेल्यावर पुढें कांहीं नाहीं असें जें ह्मणणें आहे त्यांतही कांहींच अर्थ नाहीं, अशी आपली पुनर्जन्माच्या व्याख्यानावरून खात्री झालीच असेल. तसेंच 'श्रद्धेनें जें करावयाचें तें श्राद्ध' इतकाच जर श्राद्ध शब्दाचा अर्थ असेल

---

* विधूर्ध्वभागे पितरो वसन्ति । —सिद्धान्तशिरोमणि.

¶ वसुरुद्रादितिसुताः पितरः श्राद्धदेवताः ॥
प्रीणयन्ति मनुष्याणां पितॄन् श्राद्धेन तर्पिताः ॥
आयुः प्रजां धनं विद्यां स्वर्गं मोक्षं सुखानि च ॥
प्रयच्छन्ति तथा राज्यं प्रेता नृणां पितामहाः ॥

या० स्मृ० आचाराध्याय.

तर लग्नकार्यादि पुष्कळ कृत्यें लोक श्रद्धेनेंच करितात, तेव्हां तीं सर्व श्राद्धेंच ह्मणावीं लागतील, परंतु तसें कोणी ह्मणत नाहीं; त्या अर्थी, श्राद्धांत श्रद्धा ही मुख्य तर खरीच, परंतु ती खेरीज आणखी पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश होतो हें उघड आहे.*

आजच्या व्याख्यानाचा पुनर्जन्माशीं निकट संबंध आहे. पुनर्जन्माच्या व्याख्यानांत मरणसमयीं जीवाबरोबर काय काय पदार्थ जातात व मरणोत्तर काय गति होते, त्याची सविस्तर माहिती सांगितली होती, ती ध्यानांत आणिल्यानें पुढील विषय चांगला समजेल. मरणोत्तर जीवाची गति तीन प्रकारची. १ उत्तम, २ मध्यम, ३ कनिष्ठ. जे जीव कर्मबंधांतून मुक्त होतात त्यांस पुनरावृत्ति नाहीं; ही उत्तम गति होय. बरेंच पुण्यकर्म आचरण केल्यानें स्वर्गादि लोकीं गति मिळते, व पुण्य संपल्यावर तेथून परत मृत्युलोकीं यावें लागतें; ही गति मध्यम. बरेंच पापकर्म केल्यानें जे जीव अखंड चौऱ्यायशींच्या फेऱ्यांत फिरत असतात, ती कनिष्ठ गति होय. या तिन्ही प्रकारच्या जीवांस श्राद्ध हितकर आहे व त्यांतही कनिष्ठ प्रतीच्या जीवांस त्याची फारच आवश्यकता आहे व श्राद्धकर्त्यांसही श्राद्धापासून आयुष्य, प्रजा, धन इत्यादिकांची प्राप्ति होते, हें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

या दुनियेंत इतर कोणाच्याही ऋणापेक्षां आईबापाचें ऋण पुत्राच्या शिरावर विशेष असतें; कारण, त्यांचे त्याजवर अपरिमित उपकार झालेले असतात. मातेला नऊ महिने त्याचें ओझें उदरांत वागवून असह्य यातना सोसाव्या लागतात; व जन्मल्यावर त्याच्या पराधीन स्थितींत हरएक प्रकारें त्याचें रक्षण व संवर्धन करण्याची काळजी उभयतां रात्रंदिवस आपल्या जीवापलीकडे वाहत असतात. हे उपकार त्याच्या हातून सर्वथा फिटणें अशक्यच होय. अशी वस्तुस्थिति असतां कित्येक कृतघ्न लोक ह्मणतात कीं, आईबापांचे उपकार कशाचे ? पित्याची आत्मसुखाविषयीं प्रबळ इच्छा हीच आमच्या उत्पत्तीस कारण आहे, व मातुश्रीनें आह्मांस उदरांत वाग-

---

* प्रेतान् पितॄंश्च निर्दिश्य भोज्यं यत्प्रियमात्मनः ॥
श्रद्धया दीयते यत्र तच्छ्राद्धं परिकीर्तितम् ॥—मरीचि.

विलें यांतही फारसें महत्त्व नाहीं. कारण, भाड्याचीं घरें आपण थोडीं का ठेवितों ? त्यांतलेंच हें एक. फार झालें तर थोडें ज्यास्त भाडें ह्मणजे दरमहा पांच रुपये प्रमाणें नऊ–पंचे पंचेचाळीस रुपये तिच्या अंगावर फेंकून दिले ह्मणजे आटपलें ! ! ! या कोटिक्रमाचा विचार करण्याची मुळींच गरज नाहीं; कारण तो ऐकून सहृदय मातृपितृभक्त कानांत बोटेंच घालतील इतकी त्याची योग्यता आहे. असो; एका कवीनें ह्मटलें आहे:—

यत् मातापितरौ क्लेशं सहेते संभवे नृणाम् ॥
न तस्य निष्कृतिः शक्या कर्तुं वर्षशतैरपि ॥

ह्मणजे मुलाच्या जन्मसमयीं व जन्मल्यानंतर जे क्लेश आईबापांस सहन करावे लागतात, त्यांची फेड शेंकडों वर्षांनींही होणें शक्य नाहीं. सारांश, आईबापांचें ऋण मोठें आहे; तें एकट्याच्या हातून फिटणें शक्य नाहीं; ह्मणून पुढील एकदोन पिढ्यांच्या संततीचें साहाय्य घेऊन तें फेडण्याचा यत्न करणें हें पुत्राचें कर्तव्य होय. हल्लींच्या व्यावहारिक कायद्यांतही बापाच्या ऋणाबद्दल मुलगा जबाबदार गणला जातो व तें त्याच्या हातून न फिटल्यास त्याच्या मुलानें तें फेडावयाचें असतें, हें सर्वांस माहितच आहे. प्रकृत स्थळीं आईबापांचें ऋण ह्मटलें ह्मणजे ते अधोगतींत असल्यास तींतून मुक्त करून त्यांस सद्गति प्राप्त होईल असें करणें. व तशी सद्गति होण्यास विद्वान् पुत्रानें त्यांचें श्राद्ध इत्यादि केलें पाहिजे.

श्राद्धाला ब्राह्मण चांगले विद्वान्, मंत्रज्ञ, व आचारसंपन्न असे असले पाहिजेत. आणा–दोन आण्यांत मिळणारे, अशिक्षित अथवा आचारभ्रष्ट उपयोगाचे नाहींत. जसें यज्ञांतील 'स्फ्य' नांवाचें पात्र खदिराचें (खैराचें) असतें, तसेंच श्राद्धांतील पिंडाचा चरु कुटण्यासाठीं लागणारें उलूखल (उखळ) व मुसल खदिराचें अथवा टिंटकनामक वृक्षाच्या काष्ठाचें असावें लागतें.† 'मेस्मेरिझम्'चा (प्राणविनिमयविद्येचा) प्रयोग करणारा मनुष्य

† याप्रमाणें उलूखल करून त्यांत चरु कुटण्याचा वगैरे सांप्रदाय या प्रांतीं नाहीं. शिवाय, पुढें वर्णन केलेली श्राद्धपद्धति व या प्रांतीं चालू असलेली श्राद्धपद्धति यांत पुष्कळ फेरफार आहे; परंतु दोहोंचें तात्पर्य पाहिल्यास तें एकच आहे, असें दिसून येईल.

आपल्या ताब्यांतील मनुष्याचे ठायीं कांहीं विशिष्ट प्रकारच्या हस्तव्यापारादिकांनीं दैवी शक्ति जागृत करून त्याजकडून लोकोत्तर माहिती कथन करवितो, हें आपण पाहिलेंच असेल; त्याचप्रमाणें प्लँचेट् नांवाचें यंत्र परदेशांतून आलेलेंही पुष्कळांच्या पहाण्यांत असेल; त्याच्या फळीवर प्रश्न करणारानें हात ठेविला ह्मणजे त्यांतील विशिष्ट शक्ति जागृत होऊन त्याला इष्ट प्रश्नांचा लेखी जबाब मिळतो. अलीकडे या यंत्रांत खऱ्याखोट्याचें मिश्रण फार झालें आहे, आणि त्यामुळें इष्ट हेतु पार पडत नाहीं, ही गोष्ट निराळी; परंतु त्या यंत्राचे ठायीं ती शक्ति येण्यास त्याचें लांकूड विशेष प्रकारचें असावें लागतें. व्यवहारांतही आपणांस कांहीं विशिष्ट पदार्थांच्या ठायीं विद्युदादिशक्तींचें शीघ्र वहन करण्याचें सामर्थ्य इतरांपेक्षां विशेष असल्याचें आढळून येतें, त्याप्रमाणें खदिर, टिंटक इत्यादि काष्ठांचे ठायींही पितरांचें आवाहन करण्यास अनुकूळ अशी शक्ति असते, ती तज्जन्य उलूखलादिकांचे ठायीं चरु कुटल्यानें पिंडांस प्राप्त होऊन विद्वान् ब्राह्मणांनीं उच्चारिलेल्या मंत्रांनीं जागृत होते आणि पितृदेवता तत्काळ तेथें येऊन हजर होतात. जशी तारेनें बातमी एका क्षणांत दूर स्थळीं पाठवितां येते व तेथून इष्ट मनुष्य रेल्वेच्या साह्यानें चट्कर येऊन दाखल होतो तद्वत् ब्राह्मणांनीं:—

उशंतस्त्वा निधीमह्युशंतः समिधीमहि ।
उशं नु शत आवह पितृन् हविषे अत्तवे ॥
आयंतु नः पितरः सोम्यासोग्निष्वात्ताः पथिभिर्देवयानैः ।
अस्मिन्यज्ञे स्वधया मदंत्वधि ब्रुवंतु तेवंत्वस्मान् ॥

असे आवाहनादिकाचे मंत्र ह्मटल्याबरोबर मंत्रशक्तीनें पितरांस क्षणांत खबर मिळून त्यांच्या अंगीं दिव्य शक्ति असल्यामुळें ते तत्काळ श्राद्धस्थळीं दाखल होतात; ह्मणजे पर्यायानें श्राद्ध हें पितरांस Telegraphic communication [ तारेची खबर ] आहे, हें आपल्या लक्षांत येईल.

श्राद्ध करणारास आपल्या मातापित्यांची गतिस्थिति काय झालेली आहे ह्मणजे त्यांचा जन्म कोणत्या योनींत झाला आहे, वगैरे गोष्टी कळण्यास मार्ग नाहीं; त्याजबद्दलची सर्व माहिती पितृलोकच्या अर्यमा इत्यादि अधि-

कार्‍यांस असते, व पितृलोकच्या कचेरींत जें काम चालतें, त्या कामांत विश्वेदेवांचीही मदत चांगली असते, ह्मणून श्राद्धकर्त्यास त्या सर्वांच्या मार्फत आपल्या पित्रादिकांच्या सद्गति मिळण्याची तजवीज करावी लागते. तो त्या सर्वांस बोलावितो आणि प्रथम देवांची पूजा करून, त्यांच्या अनुज्ञेनें पितरांची पूजा करितो. पितरांच्या पूजेचीं द्रव्यें तीळ, दर्भ, तुळसी, माका इत्यादि विशेष प्रकारचीं असतात.‡ पवित्र क्षेत्रें व पवित्र तीर्थे ह्या जागा श्राद्धास अत्यंत प्रशस्त मानिल्या आहेत, इतकेंच नाहीं, परंतु त्यांचें दर्शन होतांच अधिकार्‍यानें श्राद्ध करावें, अशी आज्ञा आहे. देवांची पूजा सव्यानें व पितरांची अपसव्यानें (दक्षिण स्कंधावर यज्ञोपवीत ठेवून) करावयाची असते. पितृकर्मांत दक्षिण दिशेचा संबंध विशेष असतो; कारण, पितरांचें वसतिस्थान दक्षिण दिशेस असल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. आश्विनमास ह्मणजे तुमच्या या प्रांतांतील भाद्रपद कृष्णपक्ष अथवा कन्यागतसूर्य हा पितृकर्माला प्रशस्त काळ मानिला आहे. कारण त्या वेळीं सूर्य दक्षिणायनांत असून त्याचे किरण पृथ्वीवर लंब रेषेनें पडतात आणि पृथ्वीवरील पदार्थ, वर दक्षिण दिशेस त्याच्या किरणांनीं जोरानें खेंचले जातात. जशी ब्याटरी चांगली असली ह्मणजे तारेचें काम जोरानें चालतें, तसें सूर्यकिरणांच्या मदतीनें पितृलोकच्या अधिकार्‍यांस आपलें काम चांगलें करितां येतें. असो, पूर्वी सांगितल्याप्रमाणें पूजा झाल्यावरः—

इदं पितृभ्यो नमो अस्त्वद्य ये पूर्वासो य उपरास ईयुः ॥
ये पार्थिवे रजस्या निषत्ता ये वा नूनं सुवृजनासु विक्षु ॥

इत्यादि मंत्र ह्मणून शेवटीं श्राद्धकर्ता प्रार्थना करितो कीं, 'आपण सर्वांनीं ही माझी पूजा मान्य करून समर्पण केलेल्या अन्नादिकेंकरून तृप्त होऊन माझ्या पित्रादिकांस मुक्ति द्यावी.' ते त्याप्रमाणें मान्य करून स्वतः तृप्त होत्साते त्याच्या पित्रादिकांस तृप्त करितात व त्याच्या श्राद्धपुण्यानें त्यांस अधोगतींतून मुक्त करून त्यालाही संतति, संपत्ति आरोग्य इत्यादि मिळविण्याविषयीं चांगला आशीर्वाद देतात, आणि आपण स्वस्थानीं जातात. श्राद्धाचें हें तात्पर्य सांगितलें, जास्त माहितीसाठीं शुक्र

‡ अगस्त्यं भृंगराजं च तुलसी कमलं तथा ॥ चंपकं तिलपुष्पं च दूर्वा च पितृवल्लभाः ॥

यजुर्वेद अध्याय १९ यांतील श्राद्धप्रयोग पहावा ह्मणजे ती सविस्तर कळेल. ‘ Welcome ’ ‘ Good morning ’ इत्यादि ज्या कल्पना आपल्यास हल्लींचे काळीं अत्यंत परिचित झाल्या आहेत, त्याच मासल्याच्या कल्पना पितृपूजेच्या प्रकारांत आपल्यास आढळून येतील.

कित्येक सुधारक असें ह्मणतात कीं श्राद्ध हें भटांनीं काढिलेलें ढोंग आहे. पितर येत नाहींत व ते कांहीं खात नाहींत. ते खाते तर श्राद्धांतील पदार्थ कांहीं अंशानें तरी कमी झाले असते; तसे ते कमी होत नाहींत. भट मात्र श्राद्धाच्या मिषानें यथेच्छ पक्वान्नें झोडतात, आणि पिंडदर्भादि पदार्थ नदींत फेंकून देतात. भटांचें पोट पोष्टांतील Letter-box ( लखोटे टाकण्याची पेटी ) प्रमाणें थोडेंच आहे कीं त्यांत अन्न भरले कीं तें ताबडतोब जाऊन पितरांस पोंचावें ! हा आक्षेप मोठा आहे, यांत शंका नाहीं; पण हल्लींच्या काळीं कोणी गांवढळ मनुष्य, एकाद्या एज्युकेटेड् मनुष्याला जर असा प्रश्न करील कीं महाराज, बडोद्याच्या तार—आफिसांत जे खट् खट् खट् असे ठोके ऐकूं येतात, तेच एका क्षणांत कलकत्त्यास कसे ऐकू जातील ? तर हा प्रश्न ऐकून तो त्याला तेव्हांच मूर्खांत काढील. तशांतलाच वरील प्रकार आहे. श्राद्ध हें टेलिग्राफिक् कॉम्युनिकेशन् आहे असें पूर्वी सांगितलेच आहे. मातुश्रीनें खाल्लेलें अन्न जसें गर्भांतील बालकास पोंचतें, तसेच विद्वान् ब्राह्मणांनीं खाल्लेलें अन्न त्यांच्या ठायीं मंत्रशक्तीनें प्रविष्ट झालेल्या पितरांस पोंचतें. सृष्टींत निरनिराळ्या पदार्थांचे ठायीं निरनिराळी शक्ति परमेश्वरानें ठेविली आहे. उदाहरणार्थ पहा कीं, हत्ती कपित्थफल ( कंवठ ) भक्षण करून व त्यांतील सत्त्वांश मात्र खेचून घेऊन तें पुनः कवचासहित बाहेरून जसेंचे तसें मलद्वारांतून विसर्जन करितो. मधुमक्षिका फुलें जशींच्या तशीं कायम ठेवून मध गोळा करिते. अमेरिका सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचली आहे, परंतु तेथील लोकांनीं मधुमक्षिकेच्या या अद्भुत शक्तीशीं तुलना पावणारें एकादें यंत्र निर्माण केलें आहे काय ? हंस दूधपाणी एकत्र करून ठेविलें असतां दूध तेवढें घेतो. त्याचप्रमाणें देव व पितर यांच्या ठायीं दिव्य शक्ति असून तिच्या योगानें पदार्थांतील सत्व मात्र खेंचले जाऊन पदार्थ जसेच्या तसेच कायम रहातात; तसाच मंत्रशक्तीचाही प्रभाव विलक्षण

आहे, हें इंग्रजी एकदेशी शिक्षण ज्यांना मिळालें आहे, त्यांच्या डोक्यांत एकाएकी शिरावें कसें ?

दुसरे कित्येक वेदोक्त गर्भाधानसंस्कार, मौंजीबंधन इत्यादि मानितात आणि श्राद्धसंस्कार तेवढा मानीत नाहींत. परंतु यावर मी असें ह्मणतों कीं गर्भाशयावर हात ठेवून केवळ मंत्रशक्तीनें गर्भाला संस्कार होतो व उपनयनाचे वेळीं मंत्रशक्तीनें बटूचे ठायीं कांहीं संस्कार होऊन द्विजत्व प्राप्त होतें हें जर त्यांस मान्य आहे, तर त्याच न्यायानें श्राद्धाचे वेळींही मंत्रशक्तीनेंच मृतकाला इष्ट संस्कार होतो, असें मानण्यास काय हरकत आहे ?

आतां मृत जीवास श्राद्धाच्या योगानें सद्गति कशी प्राप्त होते, त्याविषयीं विचार करूं. पुत्राचा रक्तमांसास्थिमय सर्व देह मातापित्यांपासून उत्पन्न झालेला आहे; अर्थात् तो त्यांचा फोटो अथवा प्रतिबिंब आहे आणि पौत्र हा पुत्राचा फोटो आहे असें ह्मटलें तरी चालेल. एका फोटोवरून दुसरा, दुसऱ्यावरून तिसरा याप्रमाणें अनेक फोटो तयार होतात. अशी फोटोची परंपरा मनांत आणिली ह्मणजे ही कल्पना गोत्रप्रवर्तक ऋषीपर्यंत जाऊन थडकते. कोणत्याही एका फोटोवरून घेतलेले एक, दोन, तीनपर्यंतचे फोटो चांगले व्यक्त उठतात, व त्यांपुढील फोटो सुबक व स्पष्ट उठत नाहींत, हें अनुभवसिद्ध आहे. त्याच न्यायानें मृत जीव, आपल्या पश्चात् दुनियेंत आपला अधिकार चालविण्यास पुत्र, पौत्र व प्रपौत्र हे तीन अधिकारी नेमून जातो. हे जणूं काय त्याचे एजन्ट आहेत. त्याच्या पापकर्मांचे परिमार्जन करून अथवा त्याच्या कृत्यांतील उणें दूर करून आणि त्याच्या पुण्यास भर घालून त्याला अधोगतींतून मुक्त करण्याची तजवीज त्या एजन्टांस करावयाची असते. मृतजीवास आपली सुटका करून घेतां येत नाहीं; तो स्वर्गादि स्थळीं आपल्या पूर्वकर्मांचें फळ भोगीत असतां, तें संपेपर्यंत नवें कर्म करण्यासाठीं कर्मभूमीवर ( मृत्युलोकीं ) येण्याची त्यास सवड नसते. त्यानें बरेंचसें पुण्यकर्म आचरण केल्यामुळें त्यास स्वर्गादि फळ मिळालें असल्यास तेथून त्यास मुक्त करण्यास एजन्टास फार श्रम पडणार नाहींत; परंतु पुष्कळ पापामुळें तो जर अगदीं अधोगतीस पावला असेल तर मात्र जास्त श्रम पडतील हें उघड आहे; तथापि निराश होण्याचें कारण नाहीं. पुत्रादिकांनीं

त्याच्या उद्धाराची तजवीज केल्यास, तींतूनही त्यास मुक्त होतां येईल. कल्पना करा, कीं एक मनुष्य वरून एक मोठा दगड दोन हातांनीं खालीं लोटीत आहे व खालून तीन असामी आपल्या सहा हातांनीं तोच दगड परत वर लोटीत आहेत, तर याचा परिणाम काय होईल बरें ? अर्थात् तो दगड वर चढेल हें उघड आहे. त्याच न्यायानें पित्यानें ५–५० वर्षे एकसारखें पाप केलें असलें, तथापि पुत्रादिक जर कमींत कमी ५० वर्षे त्याच्या उद्धारासाठीं प्रयत्न करतील तर १५० वर्षांच्या प्रयत्नानें त्याचा उद्धार होणार नाहीं काय? अवश्य होईल. स्मृतिकारांनीं श्राद्धाचे पांच प्रकार¶ सांगितले असून त्यांतलाच नित्यश्राद्ध हा एक प्रकार आहे. रोज श्राद्ध न करितां निदान ब्रह्मयज्ञांत तर्पण केलें तरी पित्रादिकांच्या सद्गतीस बरीच मदत मिळेल. मृतजीव स्वर्गी असला, अथवा पंचाग्नींतून पृथ्वीवर आला असला तरी 'स्वधा पितृभ्यो दिविषद्भ्यः' 'स्वधा पितृभ्यः पृथ्वीषद्भ्यः' इत्यादि मंत्रांनीं त्यास त्या त्या स्थळीं अन्नपाणी प्राप्त होऊन त्यांची तृप्ति व सद्गति व्हावी अशी योजना श्राद्धांत केलेली आहे. कोणी ह्मणतील कीं तो जर घोड्याच्या जन्मास गेला असला, तर पुत्राच्या श्राद्धापासून त्याला काय फायदा? तर त्यालाही फायदा आहे, तो असाः— तो घोडा एकाद्या राजाच्या किंवा सरदाराच्या येथें सुखांत पडेल. त्या घोड्याची चाकरी करण्यास १०–१० माणसें झुलतील व आंगावर हजारों रुपयांचे अलंकार पडतील. खावयास उत्तम मालमसाला मिळून मेहनतही अगदीं बेताचीच ह्मणजे एकादे दिवशीं खाशांची स्वारी चढेल तेवढ्यापुरतीच पडावयाची. असा ऐषआरामांत त्याचा काळ जाऊन पुत्राच्या

---

¶ नित्य नैमित्तिकं काम्यं वृद्धिश्राद्धं तथैव च । पार्वणं चेति मनुना श्राद्धं पञ्चविधं स्मृतम् ॥—बृहस्पति.

यां पांचांपैकीं नित्यश्राद्ध ह्मणजे :—

कुर्यादहरहः पुत्रः श्राद्धमन्नोदकेन वा । पयोमूलफलैर्वापि पितृभ्यः प्रीतिमाहरेत् ॥

यदन्नं पुरुषोऽश्नाति तदश्नाति पितृदेवताः । अपक्केनापि पक्केन तृप्तिं कुर्यात्सुतः पितुः॥

एकमप्याशयेद्विप्रं गृही नित्यं समाहितः ।

मनु.

श्राद्धादिपुण्यानें त्यास पुढील जन्मही चांगलाच मिळून उत्तरोत्तर सद्गतीच प्राप्त होईल. परंतु याच्या उलट, जर पुत्रादिक श्राद्ध न करतील तर त्याच घोड्यास आपल्या पापानुसार एकाद्या भाडोत्री टांगेवाल्याचे येथें राबावें लागेल; व सकाळसंध्याकाळ, रात्रींबेरात्रीं, अतोनात मेहनत पडून खावयासही पोटभर मिळणार नाहीं. पाठीवर नाळ पडलेली व वरून चाबूक सणासण ओढले जात आहेत, अशी दुःसह स्थिति भोगावी लागेल! बरें, मृतजीव कुत्र्याच्या जन्मास गेला असून जर त्याचे पुत्रादिक श्राद्ध करतील, तर तो कुत्राही एकाद्या अमीराच्या येथें मऊ परांच्या गादीवर बसेल आणि तसें नसेल तर आंगाला किडे पडून त्यास खावयास मिळणार नाहीं व हड् हड् करून वेत व लोकांच्या काठया खात रस्त्यांत पडावें लागेल. मनुष्ययोनींत जन्मला असल्यास श्राद्धाच्या पुण्याईनें तो धन, धान्य, संतति, संपत्ति यांहीं युक्त होईल; आणि श्राद्ध न झाल्यास, दारिद्र्य व विपत्ति यांत काळ काढीत राहील. कोणी शंका काढतील कीं मनुष्ययोनींत येऊन संन्यासी बनल्यावर मग तर कांहीं पंचाईत नाहीं? तर तेथेंही पंचाइत आहेच; दुःख व्हावयाचें असल्यास तें हरएक स्थितींत होईल. त्या स्थितींतही तुंबा फुटला, वस्त्रांची चोरी होणें, कोणी पुढीला न बोलाविणें, इत्यादि विटंबना आहेतच. सारांश, मृत जीवाला सुखी करण्यास श्राद्ध आवश्यक आहे.

यावर कोणाचा आक्षेप येईल कीं ज्यांस स्वर्गप्राप्ति झाली आहे, ते तर तेथें सुखांत असतात, मग त्यांच्या साठीं श्राद्धाची काय जरूर आहे? तर त्यांनाही श्राद्धाची जरूर आहे. त्याच्या योगानें त्याला स्वर्गापेक्षांही उच्च स्थान ह्मणजे अक्षय्यसुखाचें साधन जी मुक्ति ती प्राप्त होते व शिवाय पुत्राच्या या सदाचरणानें त्यांस अतिशय संतोष होऊन ते त्यास आशीर्वाद देतात. आपण म्यॅजिक् ल्यॅन्टर्नचा खेळ पाहिला असेल. स्वर्गस्थ देव व पितर हे प्रेक्षक आहेत. आकाश हा मोठा विस्तीर्ण पडदा आहे. त्या पडद्यावर सृष्टीच्या म्यॅजिक ल्यॅन्टर्नमधून पुत्रपौत्रादिकांचीं चित्रें दिसावयाचीं आहेत. तीं जर शुभाचरणांनीं मंडित अशीं दिसतील तर पित्रादिकांस आनंद होईल; आणि जर तीं चित्रें चोऱ्या, खून वगैरे दुष्कर्में करीत असलेलीं दिसतील, तर इतर स्वर्गस्थ प्रेक्षकां देखत पित्रादिकाना शरमेनें

आपली मान खालींच घालावी लागेल ! ! तर मित्रहो, त्यांना अशी खालीं मान घालण्याची पाळी येईल असें आचरण करूं नका. असो, स्वर्गस्थांस मुक्ति मिळते, पण जे पूर्वीच मुक्त झाले आहेत, त्यांस श्राद्धादिकांपासून काय फळ आहे ? अशी कोणी शंका घेईल तर त्याचें उत्तर असें आहे कीं, त्यांच्या उद्देशानें केलेलें श्राद्ध फुकट जात नाहीं. एकादा गृहस्थाला त्याच्या निर्वाहापेक्षां जर जास्त द्रव्य मिळालें, तर तें टाकून न देतां, तो त्याचा दुसऱ्याच्या हिताकडे उपयोग करितो किंवा एकादा विवक्षित खाडा पाण्यानें भरून तें वाहूं लागल्यावर त्याच्या योगानें त्याच्या शेजारीं असलेले खाडेही भरले जातात; तद्वत् मुक्ताला श्राद्धफलादि अपेक्षा नसली तरी, त्याच्या कुळांतील जे कोणी इतर जन अधोगतींत क्लेश पावत असतील त्यांच्या उद्धाराकडे तें पुण्य त्यांस खर्चितां येतें. याप्रमाणें कोणासही उद्देशून केलेलें श्राद्ध कधींही फुकट जात नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्यांपासून पुष्कळ जीवांना अधोगतींतून मुक्त होण्याचा मार्ग मिळतो. आतां एकानें केलेल्या श्राद्धाच्या योगानें दुसरा जीव दुनियेंत नांवालौकिकास चढून कसा सुखी होतो व अंतीं तो कसा मुक्त होतो, याविषयीं एक गोष्ट सांगून आजचा विषय आटोपता घेतों.

श्रीमत् स्वामी रामानंद यांच्या शिष्यवर्गांत एक ब्रह्मचारी शिष्य असून त्याजकडे देवाच्या नैवेद्याकरितां शिधासामग्री आणण्याचें काम असे; त्याला गुरूची अशी आज्ञा होती कीं, देवाच्या नैवेद्याकरितां जें सामान आणावयाचें तें अपवित्र ठिकाणचें असूं नये. त्या आज्ञेप्रमाणें तो शिष्य निरंतर वागत असतां, एके वेळीं पावसाळ्यांत नदीस अतिशय पूर येऊन पाणी गांवांतील बाजारांत शिरलें आणि वाण्यांचीं दुकानें बंद झालीं. तेव्हां शिधासामान खरेदी करण्यास मार्ग राहिला नाहीं. बाजाराच्या अलीकडे एक चांभाराचें घर होतें, त्याच्या जवळ, तो पाणी आतां उतरेल, घटकेनें उतरेल, अशी वाट पहात बराच वेळ उभा राहिला; परंतु पाणी उतरेना; त्यामुळें आतां काय करावें या विवंचनेंत तो पडला. ह्या घराचा मालक चांभार हा तेथील राजाचे पदरीं पहारेकऱ्याचे जागेवर नोकर होता, परंतु त्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. त्यानें हा रामानंदाचा शिष्य आहे असें ओळखून व त्याची त्या वेळची अडचण मनांत आणून विचार

केला कीं, मी जर आज देवाकरितां नैवेद्याची सामग्री दिली, तर ह्या पुण्यानें मला पुत्रप्राप्ति होईल; ह्मणून त्यानें त्यास शिधासामग्री आपले घरून घेऊन जाण्याविषयीं आग्रह केला. प्रथमतः तो शिष्य ऐकेना परंतु त्यानें फारच आग्रह केला आणि त्या वेळीं दुसरा इलाजही नव्हता ह्मणून शेवटीं त्याचे येथील शिधासामग्रीचा स्वीकार करून तो मठांत आला. स्वामींनीं ती सामग्री पाहून अंतर्दृष्टीनें जाणिलें कीं, ही चर्मकाराच्या येथील आहे. तेव्हां लागलीच त्यांनीं त्या शिष्याला 'हे चर्मकारा' अशी हांक मारिली व ही सामग्री कोठून आणिलीस, असा त्यास प्रश्न केला. तेव्हां त्यानें हात जोडून स्वामींस खरी हकीकत निवेदन केली व आपल्या अपराधाची क्षमा व्हावी ह्मणून प्रार्थना केली. स्वामींनीं पोटांत दया आणून सांगितलें कीं, ह्या कृत्यामुळें तुला चर्मकाराचा जन्म तर चुकणार नाहीं, परंतु तुझ्याकरितां सत्क्रिया आचरून मी तुझी लवकर सुटका होईल अशी तजवीज करीन. पुढें कांहीं काळानें ह्या शिष्याचा देहावसान होऊन तो त्याच चांभाराच्या घरीं जन्मास आला. तेव्हां तो तपश्चर्यासंपन्न असल्यामुळें त्यास पूर्वजन्माची आठवण राहून तो मातुश्रीचें स्तनपान करीना. ही गोष्ट स्वामींच्या कानीं गेल्यावर त्यांनीं तेथें जाऊन त्यास उद्देशून ह्मटलें कीं, तूं नऊ महिने मातुश्रीच्या उदरांत राहून तिच्या अन्नापासून वाढलास, मग आतांच मातुश्रीचें स्तनपान करण्यास कां संकोच करितोस? कर्मानुसार भोगणें येईल तें भोगलेंच पाहिजे, त्याशिवाय गति नाहीं. असा उपदेश करून स्वतः त्याच्या उद्धारासाठीं त्यास उद्देशून श्राद्धादिकर्म चालू ठेविलें. इकडे गुरूचा उपदेश ऐकून तो स्तनपान करूं लागला. बापानें ह्याचें नांव **रोहिदास** असें ठेविलें. भक्तमालिकेंत पुढें प्रसिद्धीस आलेला जो रोहिदास चांभार, तो हाच. ह्यानें लहानपणीं दगडाचे देव मांडून त्यांस मातीच्या निरनिराळ्या पक्वान्नांचे नैवेद्य दाखवावे. मुलें तरी दोन प्रकारचीं असतात. कोणी दैवी संपत्तीचीं असून तीं रोहिदासाप्रमाणें सत्कृत्यांचेच खेळ खेळतात; आणि दुसरीं कित्येक आसुरी संपत्तीचीं असतात, तीं 'बकरा आणा, कापा; अमक्याचें घर जाळा,' इत्यादि प्रकारचे खेळ खेळतात. असो. हा रोहिदास मोठा झाल्यावर घरांतलें कांहींच कामकाज करीना. अहर्निश आपला काळ भगवत्सेवेंत

घालवूं लागला. कारण त्यानें सात जन्मपर्यंत ब्रह्मचर्यव्रत पाळलें होतें व गुरुसेवा उत्तम केली होती आणि या तपश्चर्येच्या बळानें पूर्वजन्मांतील सर्व गोष्टींची त्यास आठवणही होती. परंतु बापाच्या दृष्टीनें तो असा भलत्याच उद्योगांत काळ घालवूं लागल्यामुळें बापाचें त्याजवर प्रेम बसेना. पुढें एके दिवशीं बापानें आपले ऐवजीं त्यास राजवाड्यांत पहाऱ्यावर पाठविलें, त्याप्रमाणें तो गेला असतां त्यानें घटकोघटकीं ह्मणावें कीं, हे राजा 'कामक्रोधादि शत्रु तुझा नाश करितील, सबब जागृत रहा.' हे शब्द राजाच्या कानीं पडले, तेव्हां तो मनांत ह्मणाला "हा आज नवा पहारेकरी कोण आला आहे? याचे विचार फार खोल दिसतात." प्रातःकाळीं शोध करितां त्यास कळलें कीं, आपले येथील पहारेकऱ्याचा हा मुलगा आहे. तेव्हां त्यानें संतुष्ट होऊन त्यास एक हजार रुपये बक्षीस दिले. त्यानें ते न स्वीकारतां बापाच्या अंगावर टाकून आपण अलग राहिला व साधुसंताच्या सेवेंत पूर्ववत् काळ घालवूं लागला. फक्त पोटापुरता मात्र जोडे शिवण्याचा वगैरे आपला धंदा करावा आणि बाकीचा सर्व काळ ईश्वरसेवेंत घालवावा. असा क्रम चालला असतां, एके दिवशीं श्रीकृष्ण परमात्मा साधुवेषानें त्याजकडे आले. प्रसन्न होऊन त्यांनीं त्यास परीस दिला, परंतु त्यानें तो घेतला नाहीं. कित्येक लोक 'परीस' हा पदार्थ मुळींच अस्तित्वांत नाहीं असें समजतात; परंतु तें खरें नाहीं. नेपाळ येथील श्रीपशुपतीची मूर्ति परिसाची आहे व तिच्या संसर्गानें लोहाचें सुवर्ण बनतें असें पुष्कळांच्या पहाण्यांत आलें आहे. दरसाल तेथें थोडें सोनें याप्रमाणें तयार करून व त्यावर अमुक सालचें सोनें अशी अक्षरें नमूद करून तें राजसंग्रहीं ठेवितात. असो, तो परीस त्यानें घेतला नाहीं. तेव्हां साधुवेषधारी श्रीकृष्णांनीं त्यास एक शालिग्राम दिला, तो त्यानें हौसेनें घेतला व मोठ्या भक्तीनें त्याची तो पूजा करूं लागला. मी चांभार, तेव्हां माझ्या घरीं शालिग्राम जर ब्राह्मणादिकांच्या पाहण्यांत आला, तर ते माझा निषेध करून मला शिक्षा करतील ह्मणून तो ह्या शालिग्रामास नेहमीं आपल्या कातड्याच्या थैलींत ठेवी व पूजेच्या वेळीं मात्र बाहेर काढी. ह्या शालिग्रामापासून त्यास दररोज एक मोहोर

प्राप्त होई. तिची किंमत त्यास कांहींच वाटत नसे व ती आपल्या घराच्या एका कोपऱ्यांत फेंकून देई. असें चालतां चलतां एके प्रसंगीं श्रीकृष्णासह सुमारें एक हजार साधुजन रोहिदासाच्या येथें प्रसादास आले. रोहिदासाचा ईश्वरावर पूर्ण विश्वास होता, त्यामुळें त्यानें बिलकुल न डगतां त्या सर्वांचें आदरातिथ्य करण्याचा विचार योजून ईश्वराची प्रार्थना केली. तेव्हां त्यांतील एका मुख्य साधूनें ( श्रीकृष्णांनीं ) जवळच्या कोपऱ्यांतील मोहोरा गोळा करून व बाजारांतून शिधासामग्री आणून त्या दिवशींचा समारंभ साजरा केला. ही गोष्ट त्या गांवांत सर्वत्र फैलावून अखेरीस राजाचेही कानीं गेली. राजाला संशय आला कीं, ह्याचा बाप माझ्या येथें पहारेकरी आहे तेव्हां त्यानें हें द्रव्य आमच्या येथून चोरून नेलें असावें; ह्मणून त्याचे घराची झडती घेतली, तींत तसें कांहींच दिसून आलें नाहीं व शोधा अंतीं शालिग्रामाचा व मोहोरेचा सर्व प्रकार कळून आला. तेव्हां राजानें त्यापासून जबरदस्तीनें तो शालिग्राम घेतला, व मनांत विचार केला कीं ही एक माझी नवी इन्कम्ची ( उत्पन्नाची ) बाबत झाली. ह्मणून भोंवतालीं चौकीपहारा ठेवून मोठया बंदोबस्तांत त्या शालिग्रामास ठेविलें. तरी ईश्वरेच्छेप्रमाणें तो शालिग्रामास पुनः रोहिदासाकडेच आला. पुनः राजानें रोहिदासाकडून नेऊन जास्त बंदोबस्तांत ठेविला तथापि तो पुनः रोहिदासाच्या कोथळींतच आढळून आला. तेव्हां राजाला फार विस्मय वाटून हें काय गूढ आहे, याचा निर्णय करण्यासाठीं त्यानें पुष्कळ प्रयत्न केला, परंतु पत्ता लागला नाहीं. असे अनेक चमत्कार या रोहिदासाकडून घडले; त्यामुळें लोक त्याला 'हा अद्वितीय ईश्वरभक्त आहे' असें मानूं लागले. पुढें एके दिवशीं कोणी एक ब्राह्मण काशीयात्रेस निघाला असतां, रोहिदासानें कांहीं पूजासाहित्य त्याजपाशीं देऊन त्याला सांगितलें कीं आपण हें पूजासाहित्य माझ्या वतीनें श्रीगंगेला समर्पण करून माझा नमस्कार सांगावा. त्याप्रमाणें काशीस गेल्यावर त्यानें तें पूजासाहित्य गंगेस समर्पण केलें. त्या वेळीं गंगेनें आपला प्रत्यक्ष हात बाहेर काढून आपल्या प्रसादाचें चिन्ह ह्मणून एक अमोलिक कंकण रोहिदासास देण्याकरितां त्याच्या जवळ दिलें. तें दिव्य कंकण पाहून ब्राह्मणाच्या मनांत अतिशय

लोभ उत्पन्न झाला आणि रोहिदासास त्याबद्दल कांहींएक न कळवितां तें त्यानें आपल्या पाशींच ठेविलें आणि कांहीं दिवसांनीं हळूच विकावयास काढिलें. असलें रत्न सामान्य मनुष्य काय विकत घेणार? शेवटीं तें राजाच्या जवाहिरखान्यापर्यंत पोंचलें आणि तें त्याच्या मुलीच्या मनांत इतकें भरलें कीं, वाटेल ती किंमत देऊन त्याच्या जोडीचें कंकण आणविण्याविषयीं ती राजाजवळ हट्ट घेऊन बसली. राजानें ब्राह्मणास बोलावून आणून त्याला सांगितलें कीं, "याच्या जोडीचें कंकण आणून दे; त्याची लागेल ती किंमत मी तुला देईन. परंतु आठ पंध्रा दिवसांत दुसरें कंकण आणून न देशील, तर तुझा शिरच्छेद करण्यांत येईल." हें ऐकून ब्राह्मण घाबरला आणि काय करावें, हें त्यास सुचेनासें झालें. शेवटीं निरुपाय होऊन तो रोहिदासाकडे आला आणि त्याचे पाय घट्ट धरून आपल्या अपराधाची क्षमा करण्याविषयीं व आलेलें संकट दूर करण्याविषयीं प्रार्थना करूं लागला. रोहिदास ह्मणाला घाबरूं नको; काय खरी हकीकत असेल ती सांग. तेव्हां ब्राह्मणानें झालेली सर्व हकीकत त्याला निवेदन केली, ती ऐकून तो ह्मणाला, 'इतकेंच ना? चिंता करूं नको. श्रीगंगा माता कृपा करील. ती आपल्यापासून थोडीच दूर आहे? **"मन चंगा, तो कठोटमें गंगा"** असें ह्मणून त्यानें काथोटींत ताजें पाणी ओतलें आणि दुसरें कंकण देण्याविषयीं गंगेची सप्रेम प्रार्थना केली. तेव्हां त्यांतूनही प्रत्यक्ष हस्त बाहेर निघून गंगेनें दुसरें कंकण स्वाधीन केलें तें घेऊन ब्राह्मण राजाकडे गेला आणि झालेला एकंदर प्रकार त्यास निवेदन केला. त्यावरून रोहिदासाचे साधुत्वाविषयीं राजाची खात्री झाली आणि त्या दिवसापासून तो त्याच्या अतिशय भजनीं लागला. याप्रमाणें या भक्तशिरोमणीची चोहींकडे ख्याति झाली व अंतीं तो मुक्त झाला.

अशा रीतीनें चर्मकारासारख्या निकृष्ट वर्णांत उत्पन्न होऊनही रोहिदास जो एवढ्या योग्यतेस चढला व अंतीं सद्गति पावला, हें त्याच्या शुद्धाचरणाचें व त्याच्या उद्धारासाठीं त्याच्या गुरूनें जें श्राद्धादिकर्म चालू ठेविलें होतें त्याचें फळ होय. सबब कोणीही धर्मशास्त्रविहित श्राद्धादिकर्में करण्यास आळस करूं नये, अशी सर्वांस सूचना आहे.

ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

## व्याख्यान १० वें.

### विषय—रामनामाचा महिमा व अवतार.

ईशस्तवन.

कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानां
पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य ॥
विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानां
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम ॥

ह्याप्रमाणें ईशस्तवन झाल्यावर स्वामिमहाराज ह्मणाले:—आजरोजीं सनातनधर्मरूपी रंग खेळण्यासाठीं सभासदरूपी खेळगडी तयार होऊन राहिले आहेत; ते कर्मकांडरूपी गुलालगोट्यांत ज्ञानरूपी गुलाल भरून एकमेकांवर फेकीत आहेत; प्रेमरूपी पिचकारीच्या योगानें त्यांचें हृदयरूपी वस्त्र रंगून गेलें आहे व उपासनारूपी बुक्क्याच्या सुगंधानें त्याचें मस्तक भरून राहिलें आहे; तेव्हां अशा या रंगांत दंग होऊन सर्व सभासद 'हरे राम हरे राम, राम राम हरे हरे' इत्यादि प्रकारें हरिनामस्मरण करीत राहतील अशी आशा आहे.

कालपर्यंत जीं नऊ व्याख्यानें देण्यांत आलीं, त्याप्रमाणें वागल्यानें इहपरत्र कल्याण होईल, हें निराळें सांगण्याची जरूर नाहीं. मी पूर्वजन्मावरील व्याख्यानांत भक्तिमार्गाचें थोडेंसें निरूपण करून दृष्टांतादाखल मिराबाईची कथाही सांगितली होती. ती भक्ति नऊ प्रकारची आहे.* त्यांपैकीं स्मरणभक्तिविषयीं आज विवेचन करण्याचें योजिलें आहे. कारण, ही भक्ति सर्वांना सर्वस्थळीं व सर्वकाळीं सुलभ असून परमेश्वरप्राप्तीचा सोपा व

---

* ते नऊ प्रकार असेः—

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ॥
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

उत्तम उपाय आहे. देवाचें कोणतेंही नांव मुखानें भक्तिपुर:सर उच्चारलें असतां त्या योगानें पुण्य घडून अखेरीस ईश्वरप्राप्ति होते, तथापि त्यांतही रामनामाचा महिमा विशेष आहे. त्याचें कारण पुढील विवेचनावरून आपल्या ध्यानीं येईल.

कोणाही मनुष्याला त्याच्या नांवानें हांक मारिली असतां जसा तो चट्कन आपल्याजवळ येऊन हजर होतो, तशी परमेश्वराला कोणत्या नांवानें हांक मारावी ह्मणजे तो आपल्यासन्निध प्राप्त होईल ? कारण त्यांचीं नांवें तर अनंत आहेत. यावर भगवान् पंतजलि ह्मणतात:—

**तस्य वाचकः प्रणवः ॥ २७ ॥**

ह्मणजे त्या परमेश्वराचा वाचक शब्द प्रणव ह्मणजे ॐकार होय. हेंच त्याचें मुख्य नांव जाणावें; कारण या नांवांत त्याच्या संपूर्ण ऐश्वर्याचा बोध होतो. मांडूक्योपनिषदांत आरंभींच ह्मटलें आहे:—

**ॐमित्येतदक्षरमिदँ सर्वं तस्योपव्याख्यानं भूतं भवद्भविष्यदिति सर्वमोंकार एव । यच्चान्यत्त्रिकालातीतं तदप्योंकार एव ॥**

अर्थ— " ॐ हें अक्षर सर्वमय आहे, त्याचें आह्मी उपव्याख्यान करितों. भूत, वर्तमान व भविष्य ह्मणून जें कांहीं आहे, ह्मणजे या तीन कालांनीं जें परिच्छिन्न आहे, तें सर्व ॐकाररूपच आहे; व जें त्रिकालातीत आहे ह्मणजे तिन्ही कालांनीं ज्याचा परिच्छेद होऊं शकत नाहीं, तेंही सर्व ॐकाररूपच आहे. " अकार, उकार, आणि मकार ह्या ज्या प्रणवाच्या तीन मात्रा, त्यांच्यापासून तीन वेद, तीन देवता तीन गुण, तीन लोक, तीन तेजें इत्यादि उत्पन्न झालीं व त्यांच्याच आश्रयानें तीं राहिलीं आहेत. आपण कानांत बोटें घातलीं असतां जसा अखंड नाद ऐकूं येतो किंवा हरिद्वारास गंगाप्रवाहाचा ध्वनि जसा एकसारखा चालू आहे, तसा प्रणवाचा अप्रतिहत नाद चोंहोंकडे भरून राहिला आहे व सर्व वर्णमाला आणि शब्द त्यापासून उत्पन्न झाले आहेत. त्याचें अवलंबन केल्याखेरीज वाणीनें कांहीं एक बोलतां यावयाचें नाहीं. मृदंग, तबला, इत्यादि वाद्यांवर वाळू ठेवून निरनिराळ्या गति छेडिल्या असतां जशी त्या वाळूची रचना भिन्न

भिन्न प्रकारची होते, तशी प्रकृतीच्या व्यापारांनीं या ॐकारापासून ब्रह्मांडांतील निरनिराळ्या पदार्थांची उत्पत्ति झालेली आहे. प्रणवांतील अकारादि मात्रांचें आत्म्याच्या निरनिराळ्या पादांशीं ऐक्य करून जो प्रणवाची उपासना करितो त्यास निरनिराळें फळ प्राप्त होतें तें असें:—

अकारो नयते विश्वमुकारश्चापि तैजसम् ॥
मकारश्च पुनः प्राज्ञं नामात्रे विद्यते गतिः ॥

माण्डूक्योपनिषत् ।

ह्मणजे प्रणवामध्यें अकाराचें प्राधान्य आहे असें समजून व आत्म्याच्या पहिल्या पादाशीं त्यांचें ऐक्य करून जो प्रणवाची उपासना करितो तो वैश्वानर होतो; उकाराचे द्वितीय पादाशीं ऐक्य करून उपासना करितो, तो तैजस होतो; व मकाराचें तृतीय पादाशीं ऐक्य करून उपासना करितो तो प्राज्ञ होतो, आणि मात्रारहित जो प्रणव तोच केवळ आत्मा होय असें जाणून जो त्याची उपासना करितो, तो तुर्यावस्थेला पावतो ह्मणजे शुद्ध ब्रह्मानंदाचे ठायीं निमग्न होतो. ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर उपासकाला याहून उत्तम गति कोणतीही मिळावयाची राहात नाहीं. सारांश, स्थूल प्रपंच, जागरितस्थान, आणि विश्व हीं तीन मिळून प्रणवांतील अकार हा भाग होय; सूक्ष्म प्रपंच, स्वप्नस्थान व तैजस हीं तीन मिळून प्रणवांतील उकार होय; व स्थूलसूक्ष्म प्रपंचाचें कारण, सुषुप्तिस्थान, आणि प्राज्ञ हीं तीन मिळून प्रणवांतील मकारमात्रा होय; व मात्रारहित जें प्रणवाचें रूप तेंच ईश्वराचें मूळरूप अथवा आत्म्याची तुर्यावस्था होय. आत्म्याचे पाद व तुर्यावस्था इत्यादिकांचें सविस्तर वर्णन मागें एका व्याख्यानांत केलेंच आहे. असो, याप्रमाणें ॐकाराच्या चार विभागांनीं ईश्वराच्या सर्व गुणांचा व ऐश्वर्याचा बोध होतो. ही गोष्ट स्पष्ट कळण्यासाठीं एक व्यावहारिक दृष्टांत सांगतों. एका संस्थानच्या अधिपतीचें नांव **लक्ष्मीधरसिंग** आहे. त्याला **महाराज** हें पद जोडलें. आणखी पुढें **रायबहादूर** हें पद जोडिलें आणि शेवटीं **के. सी. एम्. आय्.** इत्यादि पदव्या जोडल्या ह्मणजे त्याचें एकंदर नांव "**महाराज लक्ष्मीधरसिंग रायबहादूर के. सी. एम्. आय्. इ०**" असें होऊन त्यापा-

सून त्याच्या संपूर्ण वैभवाचा बोध होतो. तसाच ॐकारापासून ईश्वराच्या सर्व वैभवाचा बोध होतो. आतां लक्ष्मीधरसिंग याचे नोकरचाकर इत्यादि माणसें हरएक व्यवहारांत त्याच्या वरील लांबलचक नांवाचा उपयोग करीत नाहींत, तर त्या नांवांतील सर्व अर्थ थोडक्यांत दाखविणारा असा सारभूत अंश '**महाराज**' अथवा '**महाराजसाहेब**' असा काढून घेऊन '**महाराजसाहेब** स्नान करीत आहेत,' '**महाराजसाहेब** न्यायासनावर बसले आहेत' इत्यादि रीतीनें व्यवहार करितात, त्याचप्रमाणें ॐकारानें वर्णिलेलें ईश्वरस्वरूप सामान्यबुद्धीच्या मनुष्यास आकलन होणें कठिण आहे, असें जाणून ॐकारांतील सारभूत अंश काढून त्याची उपासना शास्त्रकारांनीं लावून दिली आहे. हा सारभूत अंश ह्मणजेच **रामनाम** होय. ते कसें ? याची स्पष्टता होण्यासाठीं थोडं विवेचन करण्याची जरूर आहे. ॐकारापासून सर्व वर्णमालेची उत्पत्ति झाली असें मागें सांगितलेंच आहे. त्या वर्णमालेंतील 'र्, म्,' हे दोन वर्ण अत्यंत महत्वाचे असल्यामुळें ते ॐकाराच्या शिरोभागीं लिहिण्याचा प्रघात पडला आहे; ह्मणजे त्याच्या मस्तकावर ँ असें चिन्ह लिहिलेलें असतें, त्यांतील अर्धचंद्राकृति अंश रेफाचा दर्शक असून बिंदु हा मकाराचा दर्शक आहे. '**जलतुंबिकान्यायेन रेफस्योर्ध्वा गतिः**' अशी संस्कृतांत ह्मण आहे. ह्मणजे जसा पाण्यावर भोंपळा, त्याप्रमाणेंच रेफ सर्व वर्णांच्या मस्तकांवर येतो. आणि '**मोऽनुस्वारः**' असें पाणिनीचें सूत्र आहे, त्यावरून मकाराचा अनुस्वार ( बिंदु ) होतो. तेव्हां ँ ह्या चिन्हाचा अर्थ 'र् म्' असा झाला. व्यंजनात्मक वर्णांचा उच्चार स्वराच्या साहाय्यावांचून होऊं शकत नाहीं, ह्मणून पाणिनीनें 'हयवरट्' इत्यादि सूत्रांत 'ह्' 'य्' इत्यादि प्रत्येक व्यंजनांस अकार जोडून संस्कृत वर्णमाला दाखविली आहे, त्याच न्यायानें 'र् म्' या व्यंजनास प्रत्येकीं अकार* मिळवून '**राम**'

---

* कित्येकास शंका येईल, कीं 'र् म्' पासून 'राम' उत्पन्न होण्यास र मध्यें आ मिळविला पाहिजे, ही शंका खरी आहे, परंतु संस्कृतवर्णमालेंत 'आ' हें अक्षर निराळें गणलें नसून त्याचा 'अ' मध्येंच समावेश केलेला आहे. 'अ'चे ऱ्हस्व दीर्घ इत्यादि १८ भेद असून त्या सर्वांचें एकट्या अकारानें ग्रहण होतें, हें संस्कृत व्याकरण जाणणारांस माहीतच आहे.

असा सर्वांना उच्चार करण्यास योग्य तारक मंत्र निष्पन्न होतो. त्यांत ॐकाराचें सर्वस्व आलें असल्यामुळें त्याचा ज्या अक्षराशीं योग होईल ह्मणजे तद्दर्शक रेफानुस्वारात्मक चिन्ह ज्या अक्षराच्या मस्तकावर ठेविलें जाईल, त्या अक्षराचे ठायीं अद्भुत मंत्रशक्ति प्राप्त होते. याविषयीं एक दोहरा प्रसिद्ध आहे:—

**एक छत्र एक मुकुटमणि, सब वर्णनपर जोग ॥**
**तुलसी रघुवर नामके वर्ण बिराजत दो ॥**

अशा रीतीनें लँ हें पृथ्वीबीज, रँ हें अग्निबीज, वँ हें वरुणबीज, यँ हें वायुबीज इत्यादि मंत्रशास्त्रांत प्रसिद्ध असलेल्या नाना मंत्रबीजांची उत्पत्ति झाली आहे. त्या त्या मंत्राचा जप केला असतां ती ती देवता प्रसन्न होऊन आपल्यास विशिष्ट फल प्राप्त होतें. उदाहरणार्थ, रँ या बीजमंत्राचा जप केला असतां अग्नि प्रसन्न होऊन आपल्यास तेज इत्यादि गुण प्राप्त होतात. आपल्या शरीरास ताप झाला असेल तर, वँ या वरुणबीजाचा जप करावा ह्मणजे वरुणदेवता प्रसन्न होऊन तापशांति होते. याप्रमाणेंच इतर बीजांविषयीं जाणावें. ही बीजमत्रांचे ठायीं असलेली शक्ति अलीकडील जडपदार्थवादी लोकांस मान्य नाहीं; परंतु मी त्यांना असें ह्मणतों कीं, सामान्यपणे दोन अक्षरें एकत्र उच्चारिलीं तर त्यांच्या ठायींही आपल्यास विलक्षण शक्ति दिसून येते. पहा, एकाद्यास अनुलक्षून 'मूर्ख' असें ह्मटलें कीं लागलाच त्यास राग येतो व त्याचे डोळे लाल होतात. याच्या उलट, ज्याला राग आला असेल त्याला कृपासागर, हुजूर, दयाघन इत्यादि शब्दांनीं गौरवून त्याची प्रार्थना केली, तर त्याचा राग शांत होतो. अशा रीतीनें सामान्य अक्षरांचे संयोगापासून जर ही शक्ति आपल्या प्रत्ययास येते, तर ज्यांत विशिष्ट शक्ति आहे, अशा बीजमंत्रांचा जप केला असतां इष्टकार्यसिद्धि कां बरें होणार नाहीं ? अवश्य होईल. मात्र जप यथाशास्त्र झाला पाहिजे. योग्य हंगाम साधून सुपीक जमिनींत बीज पेरिलें असतां जसें चांगलें उगवतें, तसा अधिकारी यानें शुद्ध स्थितींत योग्य स्थळीं व योग्य काळीं मंत्रांचा जप केला असतां चांगली सिद्धि होते. जप करितांना मंत्रांच्या अर्थाचें चिंतन करावें. भगवान् पतञ्जलि ह्मणतात:—

'तज्जपस्तदर्थभावनम्'

म्हणजे मंत्राचा जप करणें तो त्याच्या अर्थाचें चिंतन करून एकाग्रचित्तानें करावा. नाहींतर इकडे तोंडानें मंत्राचें उच्चारण चाललें आहे व तिकडे मनानें मोठ्या शहरीं जाऊन यजमानाची मर्जी संभाळण्यासाठीं फक्कड घोडा खरेदी करण्याची तजवीज चालली आहे. इकडे माळेचे किती मणि ओढले याची शुद्ध नाहीं, परंतु तिकडे घोड्याच्या किंमतीचे रुपये बरोबर गणून दिले जात आहेत! अशा रीतीनें मंत्रसिद्धि कशी व्हावी? हजार जप केला पाहिजे तेथें जर शंभरच केला अथवा मंत्राच्या सांगतेसाठीं जेथें शंभर ब्राह्मण जेऊं घातले पाहिजेत तेथें जर पांचच घातले, तर फळही तितक्याच मानानें मिळेल, किंबहुना कित्येक ठिकाणीं मुळींच मिळणार नाहीं. एकाद्यास भात शिजवावयाचा असतां, अग्नि, जल, तांदूळ इत्यादि सामग्रीची तजवीज त्यानें बरोबर केली पाहिजे. त्यांतून एखादें साधन नसेल अथवा एखाद्या साधनांत कांहीं उणेपणा असेल तर कार्य निष्पत्ति होणार नाहीं. अग्नीचा अभाव असेल किंवा भाताखालीं एकच ठिणगी असेल तर भात शिजणार नाहीं; तसेंच पाणी मुळींच नसेल किंवा दहाशेर तांदुळांत पावशेर पाणी घातलें असेल तरी भात सिद्ध होणार नाहीं. त्याचप्रमाणें योग्य वेळ न दिला किंवा कर्ता अडाणी असला तरीही भात शिजणार नाहीं. सारांश, लहान मोठ्या कोणत्याही कार्यांत साधनांचें किंचित् वैगुण्य असलें तरी कार्यसिद्धि होत नाहीं. मग मंत्रशास्त्राच्या प्रयोगांत तरी दोष असल्यास कार्यसिद्धि कशी व्हावी? अर्थात् इष्ट कार्याची सिद्धी होण्यास मंत्रानुष्ठान यथाविधि घडलें पाहिजे.

रामनाम हा ॐकाराचा सारभूत अंश असल्यामुळें त्यांत ॐकाराची सर्व सत्ता आलेली आहे व त्याचा महिमा साधुसंतांनीं विशेष गाइला आहे. सूर्यादि सर्व तेजें ॐकारापासून उत्पन्न झालीं असून तीं सर्व त्याच्याच आश्रयानें राहिलीं आहेत, असें मागें सांगितलेंच आहे. त्याचप्रमाणें रामनामाविषयीं तुलसीदास म्हणतातः—

वंदों रामनाम रघुबरके। हेतु कृशानु-भानु-हिमकरके ॥

अर्थ-कृशानु=अग्नि. भानु=सूर्य. हिमकर=चंद्र. कृशानु, भानु व हिमकर यांस कारणीभूत जें रामनाम त्यास वंदन करा. रामनाम हें कृशानु, भानु व हिमकर यांस अनेक प्रकारांनीं कारणीभूत आहे ह्मणून या वाक्याचे निरनिराळे अनेक अर्थ होऊं शकतील.

१ ला–'राम' या पदांत र, अ, म हे तीन वर्ण असून ते अनुक्रमें कृशानु, भानु, व हिमकर या तीन देवतांचीं बीजें आहेत ह्मणून राम हें पद त्यांस कारणीभूत आहे. फार तर काय, पण त्या तीन शब्दांचा अर्थ न घेतां नुसते शब्द जरी घेतले, तथापि त्या शब्दांत वरील तीन वर्ण अनुक्रमें दाखल* असून त्या वर्णांच्या योगानेंच त्यांस त्या शब्दांची शक्ति प्राप्त झाली आहे; त्या शब्दांतून ते वर्ण काढून घेतले तर ते शब्द निरर्थक होतील. ह्मणून राम हें पद कृशानु इत्यादि शब्दांच्या देखील उत्पत्तीस कारणीभूत आहे. कोणी ह्मणतील हें शब्दपांडित्य आहे, यांत कांहीं अर्थ नाहीं. तर त्यांच्या समाधानासाठीं निराळा अर्थ दाखवितों.

२ रा अर्थ—अग्नि पाचकरूपानें †चतुर्विध अन्नाचें पचन करून सर्व प्राण्यांच्या शरीराचें पोषण करितो. सूर्यापासून प्रकाश मिळून व आरोग्यरक्षण होऊन सर्वांचे व्यवहार सुरळीत चालतात; व चंद्रापासून वन-

---

* 'कृशानु' या शब्दांत र, 'भानु' शब्दांत अ, व 'हिमकर' शब्दांत म. असे वर्ण आहेत. बोलूनचालून या शब्दांस धरून ही कोटी आहे. वास्तविक पाहिलें असतां 'कृशानु' शब्दात र स्पष्ट नसून ऋ आहे. तेव्हां त्या शब्दाचा अपभ्रंश 'क्रशानु,' असा घेतला तर त्यांत र स्पष्ट दिसेल किंवा 'कृशानु' असें शुद्ध रूप घेतलें तर त्यांतील ऋकारांतून संकृत व्याकरणास अनुसरून रेफाचा अंश आहे, असें मानिलें तर वरील अर्थ जुळण्यास हरकत पडणार नाहीं.

† यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ॥
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥
गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ॥
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मक.॥
अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः॥
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥

भ० गी० अध्याय १५.

स्पतींचें पोषण होऊन त्यांच्याद्वारें सर्व प्राण्यांस मदत मिळते. अशा रीतीनें प्राणिमात्राच्या जीवनयात्रेस कारणीभूत ज्या कृशानु इत्यादि तीन देवता त्यांच्या ठायीं ती शक्ति, **रामरूप तेजा**पासूनच प्राप्त झाली आहे.

**३ रा अर्थ**—'कृशानु, भानु, हिमकर' या तिघांस ह्मणजे या तिन्ही कुळांच्या उत्कर्षास रामनाम करणीभूत झालें आहे. अग्निवंशांत **परशुराम** उत्पन्न झाला, सूर्य कुळांत **दाशरथि राम** झाला व चंद्रकुळांत **बळराम** झाला; या तिघांसही '**राम**' ही संज्ञा सुप्रसिद्ध आहे;* अशा रीतीनें रामनाम वरील तिन्ही कुळांच्या उत्कर्षास कारणीभूत झालें आहे.

**४ था अर्थ**–शरीरांत मुख्यत्वेंकरून इडा, पिंगला, आणि सुषुम्ना अशा तीन नाड्या आहेत. डाव्या नाकपुडींतून जेव्हां श्वास पूर्णरीतीनें वाहातो तेव्हां त्यास **इडा** किंवा **चंद्रनाडी** ह्मणतात. उजव्या नागपुडींतून जेव्हां श्वास पूर्णरीतीनें वाहतो, तेव्हां त्यास **पिंगला** किंवा **सूर्यस्वर** ह्मणतात. दोन्ही नागपुड्यांतून जेव्हां सारख्या वेगानें श्वास चालतो, तेव्हां त्यास **सुषुम्ना** अथवा **अग्निनाडी** ह्मणतात. या नाड्या कोणत्या नियमांनीं चालतात त्यांचें सविस्तर वर्णन स्वरोदयशास्त्रांत केलें आहे; तें येथें सांगण्यास अवकाश नाहीं. हिमकर, भानु आणि कृशानु या तीन शब्दांनीं क्रमानें नाड्यांचा बोध होतो व त्यांचा सर्व आधार रामरूप चैतन्यावर आहे. याप्रमाणें **रामरूप तेज** प्राणिमात्राच्या जीवनास कारणीभूत असून तें सर्वत्र व्यापून राहिलें आहे.

मनुष्यमात्राच्या नांवांत देखील सर्वत्र 'राम' या दोन अक्षरांचीच व्याप्ति आहे ह्मणजे कोणत्याही व्यक्तीचें कितीही अक्षरांचें नांव असलें तथापि शेवटीं त्याचें पर्यवसान दोन अक्षरातच होतें, अशा विषयीं गणिताच्या साह्यानें होणारा एक चमत्कार सांगतों. प्रत्येक मनुष्यास चतुर्विध पुरुषार्थ साधावयाचे असतात ह्मणून त्यानें आपल्या नांवास ( नांवांतील अक्षरांच्या संख्येस ) चोहोंनीं गुणावें; आणि ते पुरुषार्थ पंचभूतांच्या आश्रयानें साधावयाचे ह्मणून त्यांत पांच मिळवावे. ते साधण्याचा प्रयत्न करीत

---

* या कारणानेंच 'राम' हा शब्द ज्योतिःशास्त्रांत 'तीन' या संख्येचा वाचक मानिला आहे.

असतां त्यास सुख, दुःख; मान, अपमान; इत्यादि अनेक द्वंद्वांशीं झगडावें लागतें ह्मणून वरील रकमेची दुप्पट करावी आणि शेवटीं हा सर्व अष्टधा प्रकृतीचा पसारा विवेकानें दूर करून सत्य स्वरूपाचे ठायीं रममाण व्हावयाचें ह्मणून आलेल्या गुणाकारास आठांनीं भागून बाकी काढावी ह्मणजे दोन शिल्लक राहतील. तींच ' राम ' हीं दोन अक्षरें सत्य होत. उदाहरणार्थ ' **सोराबजी** ' हें नांव घ्या. त्यांतील अक्षरांचे संख्येस चोहोंनीं गुणून पांच मिळविले असतां एकवीस होतात; आणि त्यांची दुप्पट करून आठांनीं भागिलें तर बाकी दोन राहते, ती ' राम ' या दोन अक्षरांची दर्शक होय. याचप्रमाणें इतर कोणत्याही नांवाविषयीं जाणावें. हा केवळ गणिताचा मनोरंजक चुटका सांगितला, परंतु व्यवहारांतही रामशब्दानें विशेष तेज सूचित होतें. एकाद्या मनुष्याचे ठायीं तेजाचा अभाव दर्शविणें झाल्यास त्याच्यांत कांहीं ' राम नाहीं. ' असें आपण ह्मणतों. रामरूप शक्तीचा एके प्रकारें आश्रय सुटला ह्मणजे वर सांगितलेल्या तीन नाड्या बंद होतात आणि मरण प्राप्त होतें, त्या वेळीं राम सत्य व बाकी सर्व मिथ्या अशी लोकांची खात्री होऊन ते ' राम, राम, राम, ' असें ह्मणत शवाच्या मागें जातात.

या रामनामाच्याच बळानें समुद्रमंथनाचे ठायीं उत्पन्न झालेलें दुर्धर कालकूट विष शंकरांनीं प्राशन केलें; रामनामाचें माहात्म्य शंकर पूर्णपणें जाणतात; एके वेळीं भोजनाची तयारी झाली होती व शंकरांनीं पार्वतीस भोजनास बोलाविलें; तेव्हां ती ह्मणाली, मला विष्णुसहस्रनाम ह्मणावयाचें आहे तें ह्मटल्यावर मी जेवावयास बसेन. त्यावर शंकर ह्मणाले:—

**राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे ॥ सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ॥**

ह्मणजे, सहस्रनामाचें सर्व सार एका रामनामांत आलें आहे; मी अखंड रामनामाचे ठायीं रममाण होतों. अशा रीतीनें रामनामाचा महिमा शंकरापासून पार्वतीस कळला व तिच्यापासून पुढें गणपतीस कळून त्याच्याच आश्रयानें त्यास अग्रपूजेचा मान मिळाला. एके वेळीं इंद्रादि देवगणांमध्यें ' श्रेष्ठ कोण ' या विषयीं वाद उपस्थित झाला व ज्याला

त्याला हरएक कार्यांत आपली प्रथम पूजा व्हावी असें वाटूं लागलें तेव्हां ते सर्व प्रजापति ब्रह्मदेव याजकडे निर्णयासाठीं गेले. त्यानें सांगितलें कीं जो ब्रह्मांडाला प्रदक्षिणा घालून सर्वांच्या अगोदर येईल, तो श्रेष्ठ व त्यासच अग्रपूजेचा मान मिळेल. त्यावरून सर्वांनीं आपापलीं वाहनें सज्ज करून ब्रह्मांडप्रदक्षिणेची तयारी केली. ही हकीकत गणपतीस समजतांच त्यासही ईर्षा चढली, परंतु स्वतः दोंदिलबुवा व वाहन पडलें मूषक, यामुळें या शर्यतींत जय मिळण्याची त्यास आशा वाटेना. म्हणून स्वारी खिन्नवदन होऊन एकांतांत विचार करीत बसली. पार्वतीनें तें पाहून, ' तूं खिन्नवदन कां ? ' असें त्यास विचारिलें. त्यानें कारण सांगतांच पार्वती त्यास म्हणाली, बाळा, भिऊं नको; मी तुला एक युक्ति सांगतें; ती अशी:—रामनाम हा ॐकाराचा मथितार्थ आहे व ॐकारापासून सर्व ब्रह्मांडांची उत्पत्ति झालेली आहे, यास्तव मुखानें रामनामाचें उच्चारण करून व मनानें त्याच्या अर्थाचें ॐकाराशीं ऐक्य करून त्याच्या भोंवतीं तूं प्रदक्षिणा कर ह्मणजे एका क्षणांत तुझी अनंत ब्रह्मांडांभोंवतीं प्रदक्षिणा होईल. तें ऐकून व त्याप्रमाणें करून तो लागलाच ब्रह्मदेवापुढें हजर झाला, आणि ब्रह्मांडप्रदक्षिणा केल्याचें सांगूं लागला. ब्रह्मदेव शंकित होऊन मनांत विचार करूं लागला कीं ही तुंदिल मूर्ति मूषकावर बसून ब्रह्मांडाची प्रदक्षिणा इतक्यांत कशाची करून येणार ? परंतु अंतर्दृष्टीनें पहातां ती गोष्ट खरी आहे व गणपतीचें वाहन मूषक, अनंत ब्रह्मांडांभोंवतीं वेगानें फिरून राहिलें आहे, असें आढळून आलें. तेव्हां विस्मित होऊन त्यानें त्याला विचारलें, ही गुरुकिल्ली तुला कोणीं सांगितली ? तेव्हां तो ह्मणाला, सर्व योगिजनांमध्यें मुकुटमणि व परम रामोपासक असा शंकर माझा पिता, व मंत्रशास्त्रांत निष्णात अशी आदिशक्ति पार्वती ही माझी माता, तेव्हां ही आमची घरचीच विद्या आहे, आह्मांला दुसरीकडे शिकावयाला जाण्याची जरूर नाहीं. असो, त्या दिवसापासून त्यास अग्रपूजेचा मान मिळाला व हल्लींही निर्विघ्न कार्यसिद्धि व्हावी ह्मणून हरएक कार्यांत प्रथमतः त्याचेंच पूजन होत असतें, हें सर्वांस माहीतच आहे.

कितीएक सुधारक ह्मणतात कीं राम हा एक राजा होऊन गेला व तो आपणांसारखाच एक मनुष्य होता. परंतु हें त्यांचें ह्मणणें चुकीचें आहे. राम हा केवळ मनुष्यच असता तर समुद्रावर दगडांनीं सेतु बांधण्यासारखीं अलौकिक कृत्यें त्याच्या हातून कशीं घडलीं असतीं ? त्याजपाशीं मोठमोठ्या पगाराचे एंजिनियर्स् नव्हते. त्यानें नळ, नीळ इत्यादि वानरांस समुद्रावर सेतु बांधण्याविषयीं आज्ञा केली. त्यांनीं आणून टाकलेले दगड प्रथमतः समुद्रांत बुडूं लागले; तेव्हां परम रामभक्त व रामनामाचें माहात्म्य जाणणारा जो हनुमान् त्यानें तथें येऊन कांहीं जादू केली, तिच्या योगानें सर्व पाषाण तरूं लागले. ती जादू कोणती ह्मणाल तर एका दगडावर 'रा' व दुसऱ्यावर 'म' अशीं अक्षरें लिहून ते दगड एकमेकांशीं संयुक्त असे पाण्यांत सोडल्याबरोबर ते तरूं लागले. हा केवळ रामनामाचा महिमा होय. रामाच्या नुसत्या नांवानें समुद्रावर दगड तरले; आपण प्रत्यक्ष आपल्या हातानें पेलाभर पाण्यांत थोडी रेती टाकिली तर ती तरेल काय? आपली गोष्ट राहिली; परंतु एकोणिसाव्या शतकांत यंत्रशास्त्रादिकांची प्रगति फार झालेली आहे, तेव्हां यंत्रकलाकुशल असा आधुनिक एकादा जाडा पंडित, हनुमंताच्या मंत्रशास्त्रांतील कोटीशीं टक्कर मारणारी अशी एकादी यंत्रशास्त्रांतील शक्कल काढूं शकेल काय? अथवा आजकालच्या सार्वभौम राजांचे ठायीं तरी हें सामर्थ्य आढळतें काय? तें जर कोठेंच आढळत नाहीं, तर राम हा लोकोत्तर अथवा दिव्य मनुष्य होता, असें ह्मणावयास नको काय? अर्थात् तो जरी मनुष्यासारखा दिसत होता, तरी तो साक्षात् परमात्माच अवतरला होता, हें निःसंशय जाणावें. 'अवतार' शब्दाचा अर्थ खालीं उतरणें असा आहे. वेदादिकांनाही अगम्य व अनिर्वचनीय असें जें आपलें परमोन्नत रूप तें सोडून परमेश्वरानें भक्तजनांच्या कल्याणासाठीं एकाद्या सामान्य मनुष्यासारखें रूप धारण केलें ह्मणून त्यास 'त्याचा अवतार' असें ह्मणतात. जो कोणी त्याचें नामस्मरण करून एकाग्रतेनें त्याचें ध्यान करितो त्यास तो प्रसन्न होऊन त्याच्या इच्छेनुरूप दर्शन देतो. वायूचीं स्पंद व निष्पंद अशीं दोन रूपें आहेत, किंवा अग्नीचीं व्यक्त आणि अव्यक्त अशीं दोन रूपें आहेतः—

(दोहरा)

एकदारुगत देखिये एकू । पावकसमयुग ब्रह्मविवेक ॥

—तुलसीदास.

ह्मणजे काष्ठादिकांचे ठिकाणीं असलेला अग्नि हें त्याचें अव्यक्त रूप होय; आणि व्यवहारांत स्पष्ट दिसून येणारा जो अग्नि तें त्याचें व्यक्त रूप होय; त्याचप्रमाणें ईश्वराचींही साकार व निराकार अथवा सगुण आणि निर्गुण अशीं रूपें आहेत. कोणी त्याच्या सगुणरूपाची भक्ति करितात आणि कोणी त्याच्या निर्गुणरूपाचे ठायीं रममाण होतात. गुरु रामानंद हे रामाच्या साकाररूपाचे उपासक होते. सारांश, चतुर दुभाषी ज्याप्रमाणें आपला विवक्षित मजकूर न्यायाधिशाला इंग्रजी, मराठी, अगर गुजराथीवगैरे त्यास इष्ट असेल त्या भाषेंत समजावून देतो, त्याचप्रमाणें परमेश्वर आपल्या भक्ताला इष्ट असेल त्या रूपानें दर्शन देऊन त्याचे मनोरथ पूर्ण करितो. पूर्वी स्वायंभू मनु व त्याची स्त्री शतरूपा यांनीं परमात्म्याचें दर्शन व्हावें यासाठीं हजारों वर्षे अरण्यांत राहून तीव्र तपश्चर्या केली. तेव्हां भगवंतानीं त्यांना चतुर्भुज पीतांबरधारी अशा रूपानें प्रत्यक्ष दर्शन देऊन वर मागण्यास सांगितलें. तीं उभयतां ह्मणालीं 'आह्मांला दुसरें कांहीं नको; याच रूपानें आपण आमच्या पोटीं जन्म घेऊन पुत्ररूपानें आमची सगळी हौस पुरवावी.' भगवंतानीं भक्त वात्सल्यास्तव त्यांनीं मागितलेला वर मान्य करून 'अशाच रूपानें आपला पुत्र होईन' ह्मणून त्यांस आश्वासन दिलें. पुढें त्रेतायुगांत तीं उभयता दशरथ—कौसल्या झालीं आणि त्यांच्या पोटीं भगवान् श्रीरामचंद्ररूपानें अवतरले हें सुप्रसिद्धच आहे. कौसल्येच्या उदरीं जन्म घेतांना कौसल्येला इतर स्त्रियांप्रमाणें गरोदरपणाचीं सर्व चिन्हें जरी भासत होतीं, तथापि वास्तविकपणें परमात्म्याचा इतर लोकांप्रमाणें गर्भवासाशीं संबंध नव्हता. भगवंतांचे सर्व अवतार अयोनिसंभवच होते; त्यांच्या ठायीं गर्भवासाचा अथवा रजोबीजाचा कोणत्याही प्रकारें संबंध नाहीं. फक्त त्या वेळीं कौसल्येच्या शरीरांत परमात्म्याचें तेज फाकून राहिलें होतें व तिला आंत बाहेर सर्वत्र रामरूप दिसत होतें. लौकिकी रीतीप्रमाणें नवमास पूर्ण हो